भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, पुणें

४१ व ४२ वर्षें] त्रैमासिक [१ ते ८ अंक

१६१-१६८

शिव-चरित्र-साहित्य

१३ वा खंड

(स्वीय ग्रंथमाला क्र. ९४)

BHĀRATA ITIHĀSA SAMŚODHAKA MAṆḌALA

Vols XLI & XLII } QUARTERLY { Nos. 1 - 8

161-168

Records of the Shivaji Period, Vol. XIII

श. १८८६ रा. श. २९१] किंमत ६ रु. Price Rs. 6 [A. D. 19..

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, स्वीय-ग्रंथमाला

१ अहवाल (शक १८३२) रु. ३—०
२ अहवाल (शक १८३३) रु. ५—०
* ३ सुबंतविचार (वि. का. राजवाडे) १०—०
४ वार्षिक इतिवृत्त (शक १८३४) ५—०
५ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १२ (वि. का. राजवाडे) १—५०
६ प्रथम संमेलनवृत्त (शक १८३५) ०—७५
७ वार्षिक इतिवृत्त (शक १८३५) ६—०
* ८ द्वितीय संमेलनवृत्त (शक १८३६) ३—०
९ वार्षिक इतिवृत्त (शक १८३६) ३—०
१० मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड २० (शिवकालीन घराणीं) ३—०
११ वार्षिक इतिवृत्त (शक १८३७) ६—०
१२ तृतीय संमेलनवृत्त (शक १८३७) ३—०
१३ मुकुंद-महाभाष्य (संस्कृत) ०—५०
*१४ ग्रंथराज (दासोपंत) ०—५०
१५ स्फुट प्रकरणें, भाग १ ला ०—७५
१६ स्फुट प्रकरणें, भाग २ रा ०—७५
१७ वार्षिक इतिवृत्त (शक १८३८) ३—०
१८ चतुर्थसंमेलनवृत्त (शक १८३८) ४—०
१९ राजवाडे खंड स्थलसूची ४—०
२० पंचम संमेलनवृत्त (शक १८३९) ३—०
*२१ संशोधनसंग्रह
२२ चंद्रचूड-दप्तर, कला १ (द.वि.आपटे) ३-०
*२३ महाराष्ट्र-सारस्वत १०—०
२४ षष्ठ संमेलनवृत्त (शक १८४०) ४—०
२५ सप्तम संमेलनवृत्त (शक १८४१) ३—०
२६ संशोधकाची छोटी जंत्री (आपटे) ०—२५
२७ मंडळप्रदर्शनपरिचय ०—२५
२८ फार्सी पत्रव्यवहार (गं.ना.मुजुमदार) ५—०
२९ फार्सी-मराठी कोश (मा.त्र्यं.पटवर्धन) ४—०
३० शिवचरित्रसाहित्य खंड १ ला (कृ. वा. पुरंदरे) १—५०
३१ हिस्टॉरिकल मिसलेनी १—०
पुरंदरे-दप्तर, भाग १ (कृ.वा.पुरंदरे) ४—०
शिवचरित्रसाहित्य, खंड २ ४—०

*३४ दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें, खंड १ (ग. ह. खरे) २—०
*३५ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड १ २—०
३६ राजारामचरितम् (वा. सि. बेंद्रे) १—५०
३७ मंडळांतील नाणीं (ग. ह. खरे) १—०
*३८ शिवचरित्रसाहित्य, खंड ४ १—५०
३९ गोवळकोंड्याची कुतुबशाही (वा. सि. बेंद्रे) ४—०
*४० ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड १ (ग. ह. खरे) १—५०
*४१ दक्षिणेच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें, खंड २ (ग. ह. खरे) २—०
*४२ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड २ १—५०
*४३ मंडळचित्रग्रंथ, चित्रें २० ०—५०
४४ शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड ३ (शं. ना. जोशी) २—५०
४५ विजयनगर-स्मारक-ग्रंथ (करमरकर व ओतुरकर) ४—०
*४६ ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड २ (ग. ह. खरे) १—५०
४७ शिवचरित्रसाहित्य, खंड ६ (ग.ह.खरे) १-५०
४८ मराठ्यांच्या सत्तेचा उत्तरेकडील विस्तार (शं. पु. जोशी) ०—७५
४९ शिवचरित्रवृत्तसंग्रह (कानडी), भा. १ (पां. भी. देसाई) १—५०
४९अ अखिल भारतीय अर्वाचीन इतिहास परिषद पहिलें अधिवेशन ३—०
५० शिवचरित्रसाहित्य, खंड ७ (कृ.वा.पुरंदरे व ब. द. आपटे) १—५०
*५१ ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड ३ (ग. ह. खरे) १—५०
५२} शिवचरित्रवृत्तसंग्रह, खंड २ व ३
५३} फार्सी विभाग (ग.ह.खरे), प्रत्येकीं १—२५
५४ पुणें नगरसंशोधनवृत्त, खंड १ (चिं.ग.कर्वे) १
*५४अ, ऐ. संकीर्ण साहित्य, खंड ३ ३—०

भारत–इतिहास–संशोधक–मंडळ, पुणें

३१ व ४२ वर्षे] **त्रैमासिक** [१ ते ८ अंक

१६१–१६८

एक विनंती

या मंडळाचे संस्थापक इतिहासाचार्य कै. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांचें एक उत्तम तैलचित्र मंडळांत असावें अशी या मंडळाची इच्छा आहे. त्यासाठी मंडळ कांहीं पैसे खर्च करील. पण कै. राजवाड्यां-विषयीं आदर असणाऱ्या मंडळींनीहि या कार्यास यथाशक्ति हातभार लावावा अशी आग्रहाची विनंती आहे.

Vols XLI & XLII } QUARTERLY { Nos. 1 – 8

161–168

Records of the Shivaji Period, Vol. XIII

श. १८८६ रा. श. २९१] किंमत ६ रु. Price Rs. 6 [A. D. 1964-65

अनुक्रमणिका

भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिकाची केंद्रसरकारच्या नियमानुसार द्यावयाची माहिती

(१९५६ चे नियम; नियम ८, नमुना ४)

१ प्रकाशन स्थळ —भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणें २

२ प्रकाशन काळ —त्रैमासिक

३ मुद्रकाचें नांव राष्ट्रीयत्व व पत्ता — दत्तात्रेय वासुदेव आंबेकर; भारतीय; आर्यभूषण प्रेस; ९१५।१ शिवाजीनगर, पुणें ४.

४,५ प्रकाशक व साधारण संपादक यांचीं नांवें, राष्ट्रीयत्व व पत्ते — श्री. गणेश हरि खरे, श्री. विश्वनाथ त्र्यंबक शेटे, डॉ. बाळकृष्ण मोरेश्वर कानिटकर; भारतीय; १३२१ सदाशिव पेठ, पुणें २

६ मालक व पत्ता—भारत इतिहास संशोधक मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणें २.

आम्ही उपर्युक्त तिघे प्रकट करतों कीं, आमची माहिती व विश्वास यांप्रमाणें वर दिलेला तपशील अचूक आहे.

ता. २०।३।१९६५. ग. ह. खरे, वि. त्र्यं. शेटे, बा. मो. कानिटकर

मुद्रक : **द. वा. आंबेकर**, आर्यभूषण मुद्रणालय, ९१५।१ शिवाजीनगर, पुणें २.

प्रकाशक : **ग. ह. खरे, वि. त्र्यं. शेटे, बा. मो. कानिटकर**, १३२१ सदाशिव पेठ, पुणें २.

मालक : भारत इतिहास संशोधक मंडळ, १३२१ सदाशिव, पुणें २.

निवेदन

१. भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकाचा ४१ व ४२ या दोन वर्षांसाठीं काढलेला हा जोड अंक आहे. सध्या अनुभवास येत असलेल्या विलक्षण महागाईमुळें मंडळास प्रतिवर्षासाठीं शंभर शंभर पृष्ठांचे कां होईनात; पण चार अंक काढणें मुळींच परवडत नसल्यानें साधारणतः १०० पृष्ठांचें एक पुस्तक काढून त्यासच एक ते चार अंक संबोधणें भाग पडत आहे. या अंकांत २०० पृष्ठें असल्यानें यांत दोन वर्षांचे मिळून आठ अंक समाविष्ट आहेत. प्रस्तुत पुस्तक श. १८८२ व १८८३ या दोन वर्षीं असलेल्या मंडळाचे सभासदांसाठीं आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळानें या पुस्तकास तर द्रव्यसाह्य केलेंच; पण पुढील त्रैमासिक अंकांसही प्रकाशनखर्चाच्या विशिष्ट प्रमाणांत द्रव्यसाह्य करण्याचा विचार करूं असें आश्वासन दिलें आहे. याबद्दल त्या मंडळाचे हार्दिक आभार मानतों. पण या आश्वासनाप्रमाणें द्रव्य मिळालें म्हणजे सर्व चिंता दूर झाली असें नाहीं. या आश्वासनामुळें फक्त प्रकाशनाची चिंता अंशतःच दूर होणार आहे. तथापि याचा लाभ घेऊन श. १८८७ मध्यें मागे पडलेले श. १८८४ ते १८८६ या वर्षांचे तीन अंक व श. १८८७ चा एक मिळून चार अंक आणि श. १८८८ पासून पुढें नियमित प्रतिवर्षी चार याप्रमाणें अंक काढावयाचे असा प्रयत्न करण्याचें ठरविलें आहे. या चार अंकांपैकीं एक मंडळांत वाचलेल्या लेखांचा, एक मराठी साधनांचा, एक फार्सी साधनांचा व एक ताम्रशिलाशासनांचा अशी सध्याची साधारण कच्ची योजना आहे. हीमध्यें परिस्थितीप्रमाणें बदल करूं.

२. काम अवघड आहे. आम्हा इतिहासाभ्यासी म्हणविणारांची उदासीनता, गांधीखुनानंतर झालेली जाळपोळ, वतनें, इनामें, जागिरी, संस्थानें इत्यादि नष्ट केल्यामुळें तद्धारकांच्या ठिकाणीं उत्पन्न झालेला उद्वेग, त्यांस आलेल्या आर्थिक अडचणी, त्यांचें आंगिक अज्ञान इ. कारणांमुळें स्वातंत्र्योत्तर काळांतील गेल्या १५।१८ वर्षांत ऐतिहासिक व सांस्कृतिक सामग्रीचा विशेषतः कागदपत्रें, पोथ्या इत्यादि सामग्रीचा फार मोठ्या प्रमाणांत कल्पनेबाहेर नाश झाला आहे. द्रव्यप्रलोभनामुळें सोने, रुपें, तांबें इत्यादि धातूंचीं नाणीं वितळविलीं गेलीं, मूर्ति, चित्रें इत्यादींनीं परदेशीं गमन व वास्तव्य केलें, हस्तलिखित पोथ्या पुस्तकांनींहि त्याच मार्गाचें अनुसरण केलें आणि ही प्रक्रिया आजहि चालू आहे. अलीकडे मधून मधून निरनिराळीं सरकारें पोथ्या–पुस्तकें, कागदपत्र, विकत घेत असल्याच्या जाहिराती वर्तमानपत्रांत येतात. यामुळें सुशिक्षित जुन्या पुस्तकांचे विक्रेते धंदा म्हणून हस्तलिखित पोथ्या–पुस्तकांची खरेदी–विक्री करूं लागले आहेत. फलतः पोथ्या–पुस्तकांना परदेशी जाण्याचे पाय अधिक त्वरेनें फुटूं लागले आहेत. कॉईन डीलर्स, क्यूरिओ डीलर्स प्रमाणें मॅन्युस्क्रिप्ट डीलर्सही पूर्वीहून अधिक प्रमाणांत तयार होऊं लागले आहेत. कागदपत्रांकडे यांची अधाशी दृष्टी अजून फारशी वळलेली

नाहीं; तोंवर सर्व सामर्थ्यानिशीं प्रयत्न केला तर उरलेली सामग्री हातीं लागण्याचा संभव आहे. बैल गेल्यावर झोपा करण्यांत कांहींच स्वारस्य नाहीं. बैल प्रायः गेलाच आहे. पण पराकाष्ठेच्या त्वरेनें धावाधाव केली तर बैल वांचून झोप्याचा उपयोग होण्याचा संभव आहे. तथापि यासाठीं सुद्धा आतां आम्हांस पूर्वींहून अधिक द्रव्य, वेळ व शक्ति खर्च करून दूरदूरच्या यात्रा काढाव्या लागतील. तात्पर्य सामग्री जमविण्याचें कामहि कष्टतर बनत चाललें आहे.

३. हें कष्टतर काम करून सामग्री जमविली तरी तिचें उत्तम संपादन करणें कष्टतम झालें आहे. गेल्या ऐंशी–नव्वद वर्षांत इतिहासाभ्यासी लोकांनीं केलेल्या प्रयत्नांचें फलित काय तर आज आमचे पाशीं इतिहासाभ्यासोपयोगी बहुभाषाभिज्ञ नाहींत. तौलनिक अभ्यासास उपकारक अशा ग्रंथसंग्रहाची लाजिरवाणी व उद्वेगकारक उणीव आहे. एकनिष्ठ अभ्यासक नाहींत. फार काय पण फार्सी, मोडी, कानडी, पोर्तुगीज कागदांचे पद्धीचे प्रतिलिपिकार नाहींत. उलट आतां मिळाला कागद कीं, दे छापून असें करतां येत नाहीं. सामग्री मिळाली तरी तीपैकीं मुद्रणार्ह कोणती याविषयीं विचार करावा लागतो, इतर साधनांच्या साह्यानें टीपा देऊन पत्रें बोलकीं करावीं लागतात, नाहींतर त्यांचें महत्त्व व मुद्रणार्हत्व ध्यानांत येत नाहींत. यामुळें संपादनाचें काम अधिकच बिकट झालें आहे. भरपूर द्रव्य गाठीशीं असल्याशिवाय आतां कांहींहि होणें शक्य नाहीं. पण तें तर आमचे जवळ नाहीं. तें येऊन योजनापूर्वक काम करूं तेव्हां कांहीं वर्षांनीं फळ दिसेल. तथापि प्रयत्न करून पाहूं.

२

४. या खंडांत केवळ सावंतवाडी–चिटणिसांचेंच कागद छापावे असा मानस होता; पण इष्ट पृष्ठसंख्या भरेना. उलट नुकतेच आणलेले एकसंबें–शिंदे देसायांचे कागद स्वतंत्र खंड काढण्याइतके नव्हते. तेव्हां त्यांतील निवडक कागद येथें छापून इष्ट पृष्ठसंख्या पूर्ण केली. पण येवढ्यानें सावंतवाडी–चिटणिसांचे सर्व कागद संपले असें नाहीं; त्यांचे संग्रहांत इंग्रज–सावंतवाडीकर तहांचे व कानडी असे कागद उरले आहेत; पण त्यांची तपासणी अजून व्हावयाची आहे. मनांत येतें कीं, जमल्यास इतिहासोपयोगी कानडी पत्रांचाही एक खंड प्रकाशित करून त्या साधनांकडे अभ्यासकांचें लक्ष वेधावें. पाहूं या कसें, केव्हां, कितपत जमतें तें.

५. या खंडास शिवचरित्रसाहित्य असें नांव दिलें असलें तरी यांतील सावंतवाडी–सावंत प्रकरणांतील बहुसंख्य कागद पेशवाईतीलच आहेत. ते स्वतंत्र छापले असते तर इतिहासाचा अनुस्यूत तंतू तुटला असता. म्हणून शिवकालीन कागदांबरोबर तेही छापले आहेत. कागदपत्र घराणेवार छापावयाचे म्हणजे असें होणारच. पण या उणीवेची भरपाई एकसंबें येथील कागदांनीं केली आहे. त्या प्रकरणांतील बहुसंख्य कागद शिवकालीन आहेत. एथील ले. ३४ चा कागद सावंतवाडीच्या चिटणीस घराण्यांतील नाहीं.

इंग्लंडमधील स्कूल ऑफ ओरिएंटल अँड ॲफ्रिकन स्टडीज या संस्थेनें तो भा. इ. सं. मंडळाकडून तिजकडे पाठविला गेला होता अशा समजुतीनें या मंडळाकडे परत पाठविला. त्याच समजुतीनें मंडळानें तो आपल्या संग्रहांत ठेऊन घेतला. आणि महत्त्वाचा असल्यानें येथें प्रसिद्ध केला.

६. यातील सावंतवाडी–पोर्तुगीज संबंधांतील कागदपत्रांचा परामर्श डॉ. पां. स. पिसुर्लेकर यांच्या परिपक्व ज्ञानाच्या साह्यानें घ्यावा या दृष्टीनें प्रयत्न केला. एकदोनदा त्यांना मुंबईस जाऊन त्रासहि दिला. पण ते आपल्या कौटुंबिक कर्तव्यांत एवढे व्यग्र झालेले दिसले, कीं त्यांना अधिक त्रास देणें शुद्ध कठोरपणाचेंच झालें असतें. यामुळें ते जवळ असूनहि त्यांच्या ज्ञानाचा लाभ घेतां आला नाहीं. नाहीं तर या खंडाची गुणवत्ता आणखी वाढली असती.

७. या खंडांतील कागद केव्हां, कोठून, कसे आणले, तें दोन्ही प्रकरणांच्या प्रस्तावांत दिलें आहे. सावंतवाडी–चिटणिसांकडील कागदांत वाडीकर सावंत, कोल्हापूरकर छत्रपति व त्यांचे सरदार, इचलकरंजीकर घोरपडे, कापशीकर घोरपडे, आंग्रे, हैदर व टिपू, जंजिऱ्याचा सिद्दी, पोर्तुगीज, इंग्रज, सातारकर छत्रपति, त्यांचे पेशवे थोरले माधवराव, सवाई माधवराव व दुसरा बाजीराव, त्यांचे कारभारी सखारामबापू व नाना फडणीस, त्यांचे आरमारी प्रमुख धुळप, रामाजी महादेव इत्यादि, त्यांचे भूदल प्रमुख फडके, बेहरे, शिंदे, होळकर, इत्यादि, पेशव्यांचा विरोधक रघुनाथराव अशा लहानमोठ्या सत्ताधाऱ्यांचे कागदपत्र किंवा त्यांच्या हालचाली दाखविणारा पत्रव्यवहार समाविष्ट आहे. यांतील माहितींत तौलनिक दृष्ट्या एवढी विविधता आहे, कीं तिच्या विशदीकरणासाठीं टीपांच्या रूपानें सुमारें १०० पृष्ठें तरी खर्ची घालणें आवश्यक होतें. अकालिक पत्रांचे काल ठरवून त्यांचीं समर्थनें देणें, पत्रांतील नवी माहिती कोणती व उपोद्बलक अगर विरोधी कोणती, नव्या माहितींतील सत्यासत्यविश्लेषण, सत्तास्पर्धांचें स्वरूप, त्यांमधील स्थित्यंतरें इत्यादि विवेचनांचीं हीं शंभर पृष्ठें लिहून काढावयास महिना दोन महिने सवड सहज पाहिजे. ती तर मुळींच नव्हती. फार काय पण आवश्यक त्या सवडीच्या अभावीं मुद्रणार्ह म्हणून निवडलेले कागदही बाजूस पडत होते. परंतु तें वेळेवर ध्यानांत आल्यामुळें असे कागद शेवटीं पुरवणीरूपानें छापून काढावे लागले. मग शंभर पृष्ठांच्या टीपा कुठून होणार ? सारांश सहज शक्य त्या पत्रांवरील टीपा लिहून काढल्या व डॉ. अ. रा. कुलकर्णी यांच्या टीपांचा उपयोग केला, बहुसंख्य अपरिचित गावांचा स्थलनिश्चय केला आणि जमला तसा हा खंड सजविला आहे.

शिवजयंति श. १८८६
ता. २०–३–१९६५

ग. ह. खरे
चिटणीस व संपादक

शब्दसंक्षेप

अ.	=	अस्पष्ट	बा.	=	बालबोध
अष्ट.	=	अष्टकोनी	म.	=	मराठी
इ.	=	इसवी वर्ष	मज.	=	मजकूर
औ.	=	औरंगजेबी	मो.	=	मोर्तब
क्र.	=	क्रमांक	मो. जा.	=	मोकळी जागा
चौ.	=	चौकोनी	रा	=	रवाना
जखर	=	जमादिलाखर	रा. श.	=	राज्याभिषेक शक
जवल	=	जमादिलावल	ले.	=	लेखांक
जु.	=	जुलूस वर्ष	लं., लं. व.	=	लंबवर्तूळ
नि	=	निराळ्या वळणांत	वा.	=	वाटोळा
पौ	=	पैवस्ती	श.	=	शक वर्ष
फ.	=	फसली वर्ष	शि.	=	शिक्का
फा.	=	फार्सी	ष.	=	षट्कोनी
ब.	=	बदामी,	ब.	=	बहुदळी
सु.	=	सुहूर वर्ष	हि.	=	हिजरी वर्ष

संदर्भग्रंथसंक्षेप

आइमु = आर्मी ऑफ दि इंडियन मुघलस्

कछघइसा = करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें, भाग व लेखांक

खरे = ऐतिहासिकलेखसंग्रह, भाग व लेखांक

रा = राजवाडे मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड व लेखांक

विल्क्स् = विल्क्स् हिस्ट्री ऑफ म्हैसूर

शिचप्र = शिवचरित्रप्रदीप

शिचसा = शिवचरित्रसाहित्य, खंड व लेखांक

शोध

या पुस्तकाच्या छपाईंत कांहीं अशुद्धें राहिलीं आहेत. पैकीं अगदीं अपरिचित शब्दांची तोडजोड खालीं दर्शविली आहे. इतरांची नाहीं. जुन्या पत्रांत विरामचिन्हें नसतात; येथें पडलेलीं अनावश्यक समजावीं. मात्रा व वेलांटी यांस चिकटून अतिसूक्ष्म असलेला अनुस्वारही कांहीं ठिकाणीं अनावश्यकच आहे. क्वचित् ज, न च्या वाचनांत बदल झाला आहे. तीच स्थिति ऱ्हस्वदीर्घ उकारांची. पोर्तुगीज शब्द व विशेषनामें यांच्या उच्चारांविषयीं निश्चय करतां आला नाहीं. म्हणून शक्य त्या पोर्तुगीज व्यक्तिनामांपुढें पृ. १५७–१६१ मधील नावांचे क्रमांक कंसांत घातले आहेत.

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
२	२	२ सोम	२ अ सोम
११	२०	श. १५०८	श. १६०८
२०	२४	राजमान नंतर घाला	[मो. जा.*]
२३	२	बकरे	बाकरे
३३	१०		श. १६६३ भाद्रपद शुद्ध १२
३३	११		इ. १७४१ सप्टेंबर ११
३८	१	श. १६८५	श. १६८२
३८	५	मशमहद	मशहूद
४४	५	प्रति राजश्री [मो. जा.*]	[मो. जा*] प्रति राजश्री
४९	२३	कैरीसाल	लोरीसाल
५३	१८	ले. ३७	ले. ५१
५५	३	ले. ३९	ले. ५१
५५	१५	ले. ३९	ले. ५१
५६	७	ले. ३९	ले. ५१
५६	९	‘ राजमान्य ’	राजमान्य [मो. जा.*] श्रो
५८	३	जून	जुल
६९	२१	बहूत	बहुत
७२	२०	इ. १६९९	श. १६९९
७७	१	मु. [११*] ७९	मु. [११*] ७९
७७	२५	इ. १८७८	इ. १७७८
७९	८	श.	श.
८६	२३	नेमून	नहून
८८	२९	गिलप	गिलर्म
९२	९	श. १७७०	श. १७०७
१००	३	सेपनास	सखनास
१००	१८	पौप	पौष

१०१	४	आलेले	आलेचे
१३५	४	गेवाडी	बागेवाडी ?
१३७	८	मुगेवाडी	बुगेवाडी
१३७	२६	हानवाड	दानवाड
१३७	२९	येलमोड	येलगोड
१३८	८	हेदरी	बेदरी
१४०	६	इ. १६२९	श. १६२९
१४८	२५	बम	बाकी

प्रमुख पत्रांचे प्रेषक, इ.

शिवचरित्रसाहित्य, १३ वा खंड

सावंतवाडी–सावंत

१ सावंतवाडीकर सावंतांचें घराणें निदान शिवकालापासून तरी मराठी इतिहासांत प्रसिद्ध आहे. घोरपडे, भोसले व सावंत हीं तिन्ही घराणीं मूलतः एकच अशी समजूत आहे. तिन्ही घराण्यांविषयीं लहानमोठे इतिहासग्रंथ प्रकाशितही झाले आहेत; पैकीं ' सावंतवाडी संस्थानचा इतिहास ' हें पुस्तक कै. विठ्ठल पुरुषोत्तम पिंगुळकर यांनीं लिहून इ. १९११ मध्यें प्रसिद्ध केलें आहे. या पुस्तकाच्या १ व २ या परिशिष्टांत मिळून ११८ पृष्ठांत सावंतांच्या इतिहासलेखनास उपयोगी पडतील असे १३२ कागद प्रकाशित झाले आहेत.

२ यांपैकीं १–५ लेख शिवपूर्व कालांतले असून पुढील सर्व लेख शिवशाही, पेशवाई व आंग्लाई या तीन कालांतील आहेत. या उर्वरित कागदांत कांहीं लेख मूलतः मराठी भाषेंतील आहेत तर कांहीं मूलतः फार्सी किंवा इंग्रजी लेखांचे मराठी अनुवाद आहेत. फार्सी अनुवादांचें परीक्षण केल्यावर असें आढळलें कीं, ते निर्दोष नाहींत. तेव्हां मूळें पाहण्याची इच्छा झाली. पण तीं कोठें असतील याचा नीट पत्ता लागेना. दरम्यान महाराष्ट्र राज्याचे पुरातत्त्वसंचालक व अभिलेखाधिकारी डॉ. पु. म. जोशी यांनीं सावंतवाडीकरांच्या कांहीं फर्मानांचे फोटो घेतल्याचें समजल्यावरून त्यांच्या कृपेनें ते फोटो पाहिले. त्यांवरून येवढें पक्कें झालें कीं, उपर्युक्त इतिहासांत छापलेल्या अनुवादांपैकीं कांहींचीं मूळें त्यांत आहेत व या इतिहासांत नसलेले कांहीं कागद त्यांत आहेत. पण फोटो लहान व लवकर परत करावयाचे होते म्हणून त्यांची सूची करून तिची एक प्रत डॉ. जोशी यांस दिली व एक मजपाशीं ठेविली. पुढें कै. पिंगुळकर यांचे चिरंजीव श्री. पुरुषोत्तम नारायण वर्दे (पिंगुळकर) हे मंडळांत आले असतां त्यांनीं त्या फर्मानांची व त्या इतिहासाची इत्थंभूत माहिती सांगितली. त्या माहितीच्या आधारानें मीं बेळगांव व सावंतवाडी येथें जाण्याचें ठरविलें.

३ इ. १९६१ च्या १२ जुलैच्या जलप्रलयामुळें पुण्यांत जो विलक्षण हाहाकार उडाला त्यामुळें मंडळाचें काम जुलैमध्यें यथातथाच चालू होतें. तेव्हां बेळगांव–सावंतवाडीकडे पावसाळा जोरांत चालू होता तरीही तिकडे जावें असें ठरवून प्रथम बेळगांवास सावंतवाडीचे अधिपति श्रीमंत शिवराम राजे भोसले यांजकडे गेलों. त्यांनीं मला अठ्ठायशी फार्सी कागद दाखविले. त्यांचे अर्थ सांगून छापण्यासाठीं ते कागद त्यांजपाशीं मागितले. त्यांनीं आनंदानें ते कागद मजकडे दिले. तेथून सावंतवाडीस गेलों. जातांना पाऊस तर होताच; पण अंबोली घाटांत धुकें एवढें दाट होतें कीं,

फुटांपुढलें कांहींही दिसत नव्हतें. प्रत्येक क्षणाला वाटे कीं गाडीहाक्या आम्हां उतारूंना सावंतवाडी ऐवजीं यमधानीला तर नेत नाहीं ना ? पण त्यालाहि जीव प्यारा होनाच व अशा धुक्यांत गाडी हाकण्याचा सरावहि होता. यामुळें आम्हीं सुखरूप वाडीस पोचलों. तेथील माझे मित्र प्राचार्य द. ग. कोपरकर यांना घेऊन श्री. श्रीपाद आत्माराम चिटणीस यांजकडे गेलों. त्यांजकडील कागद तपासले. अधिक अभ्यासाच्या योग्यतेचे सुमारें ५५० कागद व बाडें यांची निवड केली. पण ते येथें आणावयाचे कसे हा प्रश्न पडला. दरम्यान उपर्युक्त वर्दे (पिंगुळकर) हे चिटणिसांचे अगदीं जवळचे नातेवाईक असून ते जवळच पिंगुळीस राहतात असें समजल्यावरून त्यांस बोलावूं पाठविलें. ते धो धो पाऊस पडत असतांहि धावून आले; येवढेंच नव्हे तर त्यांनीं चिटणिसांस सांगून कागद व बाडें मंडळास देवविलीं. ही सर्व सामग्री घेऊन मी मंडळांत आल्यावर कांहीं महिन्यांनीं बाडांपैकीं अस्सल कागदांतून कापून एकत्र चिकटविलेलीं विविध शिक्कामोर्तबें, निरनिराळ्या मुसलमान उमरावांना पत्रें लिहितांना वापरावयाचे मायने, सावंतवाडीकर व इतर यांच्या वंशावळी, इत्यादि सामग्री असलेलीं बाडें श्री. चिटणिसांनीं मागून परत नेलीं.

४ येथें आणलेले मराठी कागद पुनः तपासून निदान प्रतिलिपि करण्यायोग्य कागद बाजूस काढण्याचें काम मीं केलें. प्रति करण्याचें बहुतेक काम श्री. ज. भा. परांजपे, डॉ. अ. रा. कुलकर्णी व श्री. ना. के. जोशी यांनीं केलें असून मूळांशीं रुजू घेण्याचें काम मीं केलेलें आहे. सर्व फार्सी कागद नकलणें व रुजू घेणें हीं कामें मीं व माझे सहकारी श्री. गो. शि. साठे, एम्. ए., बी. टी., या दोघांनीं केलें आहे. फार्सी कागद महाराष्ट्र राज्य व भा. इ. सं. मंडळ यांच्या जोड प्रकाशनांत प्रसिद्ध व्हावयाचे असून मराठी कागद येथें प्रसिद्ध करीत आहे. फार्सी कागदांत २७ आदिलशाही फर्मानें-त्यांत ३ मुहम्मदचीं, १८ दुसऱ्या अलीचीं, ६ सिकंदरचीं-२ औरंगजेबाचीं फर्मानें, एक-कामबख्शाचें निशान आणि उर्वरितांपैकीं ४ फार्सी-मराठी द्वैभाषिक आणि अवशिष्ट पत्रव्यवहाररूप आहेत. मराठी कागदांत मोठा भरणा शिवकालीन कर्जखतें, खरेदीखतें, दानपट्टे, वाटणीपत्रें, तहनामे, अस्सल व नकल पत्रव्यवहार इत्यादि आहेत. यांतील राजकीय व इतर दृष्टींनीं वैशिष्ट्यपूर्ण कागद येथें प्रकाशित करीत आहे.

५ येथें छापलेले कागद समजण्यास उपयोगी पडण्यापुरतीच सावंतांची वंशावळ येथें देतों. ही सावंतवाडी संस्थानच्या इतिहासांतून उतरून घेतली आहे. कालही तेथें दिल्याप्रमाणेंच येथें घेतले आहेत. हे अर्थात् कच्चे आहेत. ही वंशावळ त्यांनीं रत्नागिरि सावंतवाडी गॅझेटियरवरून घेतली असें दिसतें. पण कै. बांबर्डेकर यांनीं प्रकाशित केलेल्या 'मळगांवचा शिलालेख व ब्राह्मण सामंत राजवंश' या पुस्तकांत एक वंशवृक्ष व एक वंशावळीचा कागद यांचीं छायाचित्रें दिलीं आहेत, त्यांच्या आधारांनीं दोन निराळ्या वंशावळी तयार होतात त्याहि येथें देऊन ठेवितों. वृक्ष व कागद या दोघांचेंहि मूळ एकच असावें.

कारण दोहोंत कारकिर्दींचीं वर्षें एकच आहेत. तथापि वंशवृक्षांत नात्यांचा खुलासा अधिक आहे; पण कागदांतील २ सोम ही व्यक्ति गाळली आहे, ८ जयराम ऐवजीं ८ नार घातला आहे व १० खेम नंतर आणखी एक ११ रामचंद्र अधिक दाखविला आहे. वंशवृक्षांत कारकिर्दींचीं केवळ वर्षेंच दिलीं आहेत तर कागदांत वर्षें देऊन शिवाय शुहूर वर्षेंहि दिलीं आहेत.

सासंइमधील वंशावळ

- १ पहिले खेम सावंत
  - २ सोम
  - ३ फोंड
    - ५ दुसरे खेम
    - नार
      - ६ फोंड
        - नार
          - ७ रामचंद्र
            - ८ तिसरे खेम
              - ९ रामचंद्र
        - ७ अ जयराम
        - सोम इ. ११ मुलगे
          - १० फोंड
            - ११ चवथे खेम
              - १२ फोंड
                - १३ रघुनाथ
              - नार
                - १४ श्रीराम
                  - १५ पाचवे खेम
                    - १६ शिवराम
  - ४ लखम

वर दिलेल्या वंशावळींतील पुरुषांचे शक व इसवी वर्षांतील कच्चे कार्यकाल

(१)	खेम१	श. १५४९–६२	=	इ. १६२७–४०
(२)	सोम	श. १५६२–६३	=	इ. १६४०–४१
(३)	फोंड	श. १५६३–७३	=	इ. १६४१–५१
(४)	लखम	श. १५७३–९७	=	इ. १६५१–७५

(५)	खेम२	श. १५९७–१६३१	=	इ.	१६७५–१७०९
(६)	फोंड	श. १६३१–६०	=	इ.	१७०९–३८
(७)	रामचंद्र	श. १६६०–७७	=	इ.	१७३८–५५
(७अ)	जयराम	श. १६६०–७५	=	इ.	१७३८–५३
(८)	खेम३	श. १६७७–१७२५	=	इ.	१७५५–१८०३
(९)	रामचंद्र	श. १७२५–३०	=	इ.	१८०३–०८
(१०)	फोंड	श. १७३०–३४	=	इ.	१८०८–१२
(११)	खेम४	श. १७३४–८९	=	इ.	१८१२–६७
(१२)	फोंड	श. १७८९–९१	=	इ.	१८६७–६९
(१३)	रघुनाथ	श. १७९१–१८२१	=	इ.	१८६९–९९
(१४)	श्रीराम	श. १८२१–१८३५	=	इ.	१८९९–१९१३
(१५)	खेम५	श. १८३५–१८५९	=	इ.	१९१३–३७
(१६)	शिवराम	१८५९	=	इ.	१९३७

वंशवृक्षांतील आवश्यक व कागदांतील संपूर्ण वंशावळ

वंशवृक्ष

- १ पाये
  - २ खेम १२
    - ३ फोंड ७
      - ५ खेम ३२
        - ७ फोंड २९
          - ८ नार
            - ९ रामचंद्र १२
              - १० खेम ४८
                - ११ रामचंद्र
    - ४ लखम २४
      - ६ नार

कागद

- १ पाये
  - २ खेम १२
    - २ अ सोम १
      - ३ फोंड ७
        - ५ खेम ३२
          - ६ नार
            - ७ फोंड २९
              - ८ जयराम १८
                - ९ रामचंद्र
                  - १० खेम ४८
      - ४ लखम २४

वंशवृक्ष व कागद यांत आलेल्या आवश्यक व्यक्ति व त्यांचे काल

व्यक्ति	कारकिर्द	शुहूर	शक	इसवी
१ पाये सावंत	—	—	—	—
२ खेम	१२	१०३४-४५	१५५५-६६	१६३३-४४
२ अ सोम	१	१०४६	१५६७	१६४५
३ फोंड	७	१०४७-५३	१५६८-७४	१६४६-५२
४ लखम	२४	१०५४-७७	१५७५-९८	१६५३-७६
५ खेम	३२	१०७८-११०९	१५९९-१६३०	१६७७-१७०८
६ नार	—	—	—	—
७ फोंड	२९	१११०-३८	१६३१-५९	१७०९-३७
८ जयराम	१८	११३९-५६	१६६०-७७	१७३८-५५
९ रामचंद्र	—	—	—	—
१० खेम	४८	११५७-१२०४	१६७८-१७२५	१७५६-१८०३
११ रामचंद्र	—	—	—	—

६ मी आणलेल्या फार्सी कागदांपैकीं कालदृष्ट्या पहिले तीन कागद सावंतांविषयीं नाहींत. चौथा कागद हि. १०७३, शु. १०६३ जखर १ (श. १५८४ माघ शुद्ध २ किंवा इ. १६६३ जानेवारी १) चा असून त्यांत लखम सावंताचा कुडाळ परगण्याचा सरदेसाई म्हणून निर्देश केला आहे. त्यापूर्वी खेम, सोम, पाये किंवा फोंड हे सावंत होऊन गेले असल्यास ते केव्हां काय करीत होते याविषयीं समकालीन कागदपत्रांवरून सिद्ध होणारी माहिती आज आमचेपाशीं नाहीं. पूर्वीच्या सावंतवाडी संस्थानांतील मठगांवामध्यें एक मोठी शिला आहे. तीवर सहा दालनें खोदलीं असून त्यांत खालून वर क्रमानें लढाईच्या देखाव्यापासून ते त्यांत मरणारा वीर कैलासास जाऊन शिवपूजा करीत बसण्यापर्यंतचीं दृश्यें खोदलीं आहेत आणि शिलेची बहुतेक किनारी व दोन दालनांमधील पट्टया यांवर नागरी अक्षरांत एक लेख कोरला आहे. त्यांवरून ही वीरस्मृति-शिला आहे या विषयीं शंका राहात नाहीं. यावरील लेखाचा काल शक १३१९ चित्र-भानु संवत्सर अधिक बहुल ३ गुरुवार असा दिला आहे आणि यांत भाम सावंतु असा एका व्यक्तीचा निर्देश आहे. ही व्यक्ति सावंतांची पूर्वज आहे कीं नाहीं याविषयीं मोठा वाद आहे. हा पुरुष या सावंतांचा मूळ पुरुष धरला तरीहि हा व उपर्युक्त लखम सावंत यांच्या मध्यें किती पिढ्या झाल्या याचा पक्का पत्ता नसल्यामुळें हा भाम सावंत खरोखरीच या सावंतांचा मूळ पुरुष होता कीं नाहीं याविषयीं निश्चयात्मक सांगतां येत नाहीं. मला जे मराठी कागद मिळाले त्यांतहि ज्यांत सावंतांचा निश्चयानें उल्लेख आहे असा कागद

आलमगीरी जु. २७ शव्वाल २२ (श. १६०५ आश्विन वद्य ९, इ. १६८३ आक्टोबर ४) चा असून त्या पूर्वीच्या येथें प्रकाशित केलेल्या कागदांत सावंतांचा उल्लेख नाहीं. लखम सावंतासंबंधीं फार्सी कागद मिळाले; पण मराठी मिळूं नयेत हें एक आश्चर्यच आहे.

सु. [१०२ *] ९ सवाल ९ (८) श. १५५१ शुक्ल ज्येष्ठ शुद्ध ११ शुक्रवार	१	श. १५५१ ज्येष्ठ शुद्ध ११ इ. १६२९ मे २२

[मुख्य मजकुराच्या प्रत्येक ओळीच्या आरंभीं ०।। *]

स्वस्ति श्री नृप शालिवाहान सक १५५१ वरुसे वर्तमान शुक्लनाम सवतसर जेष्ट सुध येकादसी सुक्रवारी कुडाल कसबा राजेश्री तिमाजी पंडित हेजीब याचे पटसाले बैसके श्रीमत नारोबासुत गोदोबा नायेक ठाकूर मोकाम कसबा वा भास्करभटासुत गोदोबा मुडलिया मोकाम मौजे वेगुर्लें पा। मजकूर यांसीं रामाजी पंडितासुत गिरमाजी वा येल्हो पंडितासुत बीरणा मोकाम पा। मजकूर याणी लिहून दिले कयेलत यैसे जे अमचे नारलमाडाचें कुलागर किते २ मौजे पाट पा। मजकूरमधील अमी उपर्जना केले होते तपसील

सटीचे गाली वा निमे गावीक वा निमे देव सु... किता १ | वोगलेचे धाट गावीक किता १

हे अमी पहिले गाहाण तुमापासील पैके घेऊनू वरसा १० दाहाचे मर्यादा करून ठेविले होते ते तुमासी भोगवटा तागायेत मिरग सन तिसा जाहाले गावीचे माहसूल अमी देवे केले होते ते अमी दिले नाही गावाने तुमापासी घेतले तेचे हिसेब करितां असल वा नफा मोबलग जाहले होते मग आमी तुमासी मिनतमाना केले वा चौगा ग्रहस्त मध्यावर्ती होऊन तुमासी सांगितले वरून पैकेचे खंड मखता करून अमी तुमासी देणें केले नुकरा होन २५० अडीच सेहे ते पैके देउनू कुलागरे सोडवावेसी मवसरं नाहीं देखोन ४ ग्रहस्तांकरवी तुमासी कोण येक निर्गम करावे म्हणौन सांगितले मग आमी मनासी आणून कुलागर किते २ पैकी किता येक वोगलेचे धाट कुलागर गावीक अमी अपुले आत्मसंतोसे तुमासी किये विकये करून देउनू नुकरा होन अडीच सेहे २५० घेउनू तुमचे सदरहू ब्रेरिजेसी देउनू पावते केले वा दुसरा किता सटीचे गाली वा निमे गावीक वा निमे देवसू तुमापासी गाहाण होता तो आमासी सोडून दिले तो आमी आपुले अधीन करून घेतले तुमासी वोगलेचे धाट गावीक कुलागर विकत दिले असे ते अमी

विकिले तुमी ठेविले ते कुलागराचे मूलपटा गावापासून अमी लिहून घेतले होते तो पटा येन जिनस तुमापासी दिले असे तेणेंप्रमाणें चतुरसीमामधील भूमी वा जागते माड वा साली जमीन वा उसम स्थल गावीचे माहासूल गावासी देऊन तुमी वा तुमचे जात-प्रजाताने यावस्चद्रार्कवेरी भोगावे आमासी वा अमचे जातप्रजातासी त्या कुलागरासी अर्था-अर्थी समंध नाही कोणी सकवक्र करूंसी कारण नाहां पहिले गाहाण भासेचे दोही कितेचा कतबा वा सटीचे गाली तुमचे गावीचा मूलपटा तुमापासी होते ते आमी घेतले हे कियेन्वत सही छ ९ माहे सौवाल सन तिसां

गोवई

बाव सेणवी चंदवणकार
[कानडी *] बाव सेणवी
वालो बोरीकार
विसो (ठो ?) गायीतोडा
गोरख सेणवी नार सेणवी
कुलकर्णी परउल्ले
गोरख सेणवी
[कानडी *] गोरख सेणवी
लिंगो सातपा खाडालेकार
[डाव्या बाजूचे समासांत *]
दस्तूर गिरमाजी रामाजी
दस्तूर वीरणा येल्हरस
आद सावत नायेकवाडी
राणा [फा. अष्ट. शि. *]

वीर सावत गावकार
परउलेकर
सातो गौडा (?) कानविदा
वालो तानरस
नार जोइसीसुत
माद जोइसी याचा
साहापाण
अनत हरिये प्रभू

[उजव्या बाजूचे समासांत *]
विसो मुदगल मजमदार
[फा. अष्ट. शि. *]
राजेश्री तिमाजी पडीत
श्रीदरपत
बिा तिमाजी मोदाजी
जानेब हेजीब पाा
मजकूर [फा. अष्ट. शि. *]
रामजी प्रभू देसाई
दादा सावत देसाई
[फा. अष्ट. शि. *]
माद सेणवी कावाडी
[कानडी *] माद सेणवी

श. १५९८ नल वैशाख शुद्ध ७ सोमवार	२	श. १५९८ वैशाख शुद्ध ७ इ. १६७६ एप्रिल १०

शके १५९८ वर्ष नलनाम छंवछरे वैशाख शुध ७ मी सोमवारी दिचोली ग्रामे राजश्री नरसोबा नायेकाचे घरी बैसके राजश्री राम सेणवी कोठारियां सुत रघुनाथ सेणवी व नारायेण सेणवै व हरबा सेणवी कोठारियां त्रिवर्गी येकमेकांच्या समतें केलें विभाग पत्र ऐसा जे आम्ही तिघई बंधुवर्ग आमचे पिते राजेश्री राम सेणवी कोठारी स्वामीचे छायेखाली येकत्र घरी असतां नारायेण सेणवी यांची राहाटी लोकाविरूध जाहाली या करिता घरामधे कलह होऊं लागला येणेकरून सेणवी गोसावियास श्रम पावोन बहुत क्लेश हेऊं लागला त्यावर त्याणी निरोप दिला जें हे रात्रीदिवस खटखट आपणाच्यान सोसत नाही आता तुम्ही तिघई बंधुवर्ग परिछिन वेगले वेगले होऊन आपापली सौंसार-राहाट चालवितां बरें येसा निरोप दिला ते आज्ञा आम्ही त्रिवर्गी मान्य करून रघुनाथ सेणवै व नारायण सेणवै व हरबा सेणवै विभागपूर्वक परिछिन वेगले वेगले जाहलों सेणवी गोसावी यानी सोनेचे रुपेचे नग आम्हा तिघांई बंधुवर्गांच्या स्त्रियांवरी होतें तेणेप्रमाणे तिनी वर्गांचें ज्याचे त्यांस दिलें आम्ही तिघई बंधुवर्गांच्या अंगावरील होतें तें तीन वर्गांस पाविलो तांबेपितलीची भांडी व लुगडेंवस्त्र व बटीकदासी व गोरूवासरू आम्हास वांटून दिले तेणेप्रमाणें त्रिवर्गी घेतले वितवाने सेणवै गोसावी यांनीं वांटून दिले तेणेप्रमाणें आम्ही त्रिवर्गी घेतले दिचोलीचे घर श्रोत्रीयाचे सेजारचें तें नारायण सेणवै यास राहावयास दिले ते घेतले रघुनाथ सेणवै व हरबा सेणवै यास दिचोलीमधे घर अथवा स्थल घेउनू घरे करून देतील तेथे राहातील मिरासपैकीं दिचो-लीचे माहाजनकीचे सेतें न्हवलीमधे आहेती ती देखील विस्वा नारायण सेणवी यास दिले मणेरीची सरमखदुमीची पटीपछोडी व आबली रघू सेणवी यास दिले तरेखोलचे बाग हरबा सेणवै यास दिले गोवेचें घर कुरतारे मोरी अलकारिकाचे येकसे अश्रिफिया व न्हावेलीचे घरभाट व पातीचे सेत पुरातन व घोडदेचे आगर हिदलचे घरभाट व दिचोलीच्या बंदरावरील बाग हे सेणवै स्वामीने आपल्या खाशाखाले ठेऊनू घेतले हे सेणवै गोसावी जे वेलेस ज्यास देतील त्याणे भोगावे आमचे विभागसमंध त्यास काही विवाद नाही येणेप्रमाणे विभाग होउनू आम्ही तिनी वर्ग वेगले वेगले जाहालो दायाद विभाग आम्हा त्रिवर्गांचे जातप्रजात संततीस अर्थाअर्थी दायाद समध विवाद नाही

स्वहस्त वोप

[पाठीवर*] साक्षी

नरसोबा नाईक नावरे	
हरबा नायेक ठाकूर	बाळकृष्ण नायेक बाकरे
नारायेणसेटी पोकले	भास्कर भट पित्रे
लिहित परिसराम निब्राजी आहेरीकर	नारापा नायीक

आ. जु. २७ सवाल २२	३ आलमगीर हु	श. १६०५ आश्विन वद्य ९ इ. १६८३ आक्टोबर ४

खान आलीशान असदखान दिवान हजरतशाः याणी राजेश्री खेम सावत सरदेसाई यांस लिहिले हसिबुल हुकूम

जुबदेथुल अमासिल वल अकरान म्हणिजे समान लोकांमधें थोर खेम सावंत मोकीफ बाशेद म्हणिजे वाकिफ आसावे

मकसूद सांप्रत मशखत व सुजाअतमाब सेख माहामद यास खिजमत फर्माविलें आहे ते मकसूद तुम्हास जाहीर करील पादशाही हुकूम यैसे सादीर आहे जें येख्तियार होऊन खिजमत करणें जातीस च्यार हजारी मनसब व च्यार हजार स्वारांचे दौलत पावोन आणिकही पादशाहांचे मरहमता व नवाजीस पाविजेल ये बाबे बहूत कोसीस करणें व हें फलशृतीचे उमेदवार आसोन आपले फाइदा समजणे तेरीख २२ सन सौवाल जळूसवाला २७

आ. जु. २९ जखर २०	४ हु	श १६०८ वैशाख बद्य ७ इ. १६८६ मे ४

सलाबतखान याचे किताबतीपैकी मकसूद

सुज्याअत व तहूर दस्तगा जुबदेतुल अमासिल वल असबाः खेम सावंत भोसुले कीं (?) बहज्यत व आफियेत बाशेद

बाअद हाजा मखफी न मानद के पहिले मशीखत व रफाअत पनाः शेख महमद बख्शी व वाकेनिवीस किले दंडाराजपुरी व ज्याहजात अरमादं पादशाही याणी तेथून येक दोनी वेले तुमचे व अवघे देसमुखाचे व जमीनदाराचे उमेदवारीची नियेत जे दरगा ज्यांहपनाःसी धरीत अहा व त्या हुकुमाने गनिमाचे मुळूक कबजात आणीत आहा हे लिहिले होते त्याउपरी मशीखत व रफाअत पना मजकूर सुरतेस आले पहिले सकल वर्तमान जाहीर केले त्यावरून लिहिले असे तरी तुम्ही तैसेंच प्रकारें उमेदी व अकीदा महकम धरून सकल वर्तमान आपले वकिलासवें ल्हिहून पाठवणे त्यावरून विदीत होउनू जे पाहिजे ते हुजूर पुरनूर अर्ज लिहून पाठविले जाईल श्री [मो. जा.*] चे कृपेने बरे फलप्राप्ती होईल व पादशाहाचे मराहमती करून सरफराजी पावेल विशेष { विशेष } अहे छ २० जमादिलाखर सन २९

आ. जु. ३० सवाल ९ } ५ } श. १६०८ भाद्रपद शुद्ध ११
हू } इ. १६८६ आगस्ट १९

येखलास आसार सावंत अजम खेम सावंत भोसले सरदेसाई प्रगणे कुडाल दाम शफकत हू

.॥र्दे शौकत व शाहामत आगाह उबहत व अवाली इतिबाह [मो. जा.*] अजीं दिल येखलास याकूतखान सरदार अरमाद पादशांहीं अज मेंा बंदर मुबारक सुरत दुवा सलाम महबतअंज्यांम माहुवल मकसूद आ खे सांल गुजस्तां बंदर मजकुरींहून गनिमाचें मुलुकत खरींद करावयास बाअरमांद किले दंडाराजपुरीस गेलो या बादज हुजुरूंन हुकूम सादर जाला कीं बंदर भडोचेंस बतेकौमाने हरामखोरीं करूंन तेथींल फौजदारास धरून जागा कैद करून राहिले असें तरी तुम्हीं बाअरमाद तेथें जाऊंन मुफसिदास तंबी करणे म्हणौन हुकूम सादर जाला तैसेच बाअरमाद भडोचेतर्फेस स्वार जालो यैसे-यामधें वजारतपन्हां कारतलबखान सुभें गुजरात खासाच भडोचेस जाऊन ते मुफसिदास कापून काढून कोट व बंदर मजा पादशाही तस[र*]फेमधें आणून फसाद बरतर्फ केलां याबादज ईजानेब फिर जंजिरे राजपुरीस जाता खबर अली कीं गनींमाचें अरमाद संजूदा होऊन दाभोलेचे खाडींमधें मोहिबाचे तर्फेस जावयाकरितां तयार जाले असें फिर खबर आली कीं शाहाजादा स्वार होऊन जाणार आहे हे खबर माळूम होताच बाअरमाद दाभोलेचे सरखोरावर जाऊन गनिमाचे अरमादावर स्वारी रा केली ते जाऊंन खूब वजाने लडाई देऊन गनिमाचे अरमादाचा नासरदार गोविंद कान्हों मायेफसाद जो होतां तो व गुराबा पाच ५ पाडाव करूंन ७॥८ गुराबा बुडऊन कै लस्कर गनिमाचे कतल करून गरदीस मेलविले बादज बाअरमाद जंजिरे मजकुरीं येऊंन ते जागांही गनीम जागा जागा जोरावारीं करूंन राहिला असें त्यासहीं सजा पोंचाविला व चेऊल बाजे जागा मुलकेमधेंही गनिमांचें लोका होते त्यासही कतल करून कितेकास आसीर करून आणिलें बादज मोहिबांची किताबत ईजानेबास व भाई अजम वजारत व येकबालपन्हां खैरयेतखांन यांस मरकूम छ २४ माहे जिलकाद केले ते पौ छ २६ माहे जिल्हेजीं ईजानेबांच जोडेकरीं बंदर मजकुरींहून आलें त्याचे हस्तें येऊन पोंचलें मोहिबीं कोणे आदमियांबराबर कागद रवाना केलें तों आदमीं येऊन ईजानेबा-नजीक रुजूं जालाच नाहीं कीं ते किताबतीचा जवाब त्याचबराबर मोहिबास पोंचे यैसेयास नंच वख्तीं ईजानेबे व भाई अजमें मोहिबाची कुल हकीकत माकुलवजानें बेयांवार बंदरगाह फलकबारगाह मारूज लिहिला व वाकेयामधेंहीं मसीखनपन्हां सेख महमद येहीं लिहिलें ते दरबंदगी आलमपन्हां पोंचोंन ईजानेबास व भाई अजमास हसबुल हुकूम सादर जालें बमोहर नवाब लुतफुलाखान जालें कीं तुम्हीं सावंत मानुलेंचें लिहिलेयांवरून हुजूर मारूज लिहिला तरीं तेणें गनिमाचे कितेक नासरदार व असप ४६ सेतालीस पाडाव केले आहेत तरी तेणे गनिमाचे कितेक किले व मुळूक जबत केलां असें तरी

तुम्हीं त्याचे हकीकतेस खूप वारीस होऊंन याचा करीना काये असें ते कुल हकीकत हुजूर लिहिणें म्हणौन हुकूम सादर जाला त्याचे जवाबही फिर हुजूर लिहिला कीं ते कदीम जमीदार आहेत गड किले व मुल्क तसरफेमधे आणून काईम होऊन राहाणे हें बगैर ज आलमपन्हाचे मेहरबानी व खजानेयाचा सरंजाम व कुमक जाले बगैर जईत नसे आल[म*]पन्हांचीं मेहरबानी होऊन खजानेयाचा सरंजाम फर्माऊन कुम[क*]आणूं तरी तोही सरंजाम त्यापासून होऊन येईल म्हणौनू खूब वजाने मारूज लिहिलां व सेख मालुलेहीं मोहिबाचे कामावर वाकीफ आहेत चाहात आहों की मोहिबाची खूबी व बेहबूदीं होऊन यावीं हे कुल हकीकत व मोहिबाचे किताबतीच जवाब लेहून अज राहा खुस्की रवाना केले तो आदमी गनिमाचेचै[चौ*] कियाचे शकाकरिता कागद फिराऊन घेऊनं आलां यैसेयास रायांत आलियांत हजरत जिल सुभांनी येहीं विजापुरीची मोहीम फर्माऊंन यशरीफ आर्जानी ते तर्फेस फर्माविली असे यैसेयामधे मोहिबांचा वकील येऊन हरयेक तलास तरदूद दौलतखाहींची हकीकत दरगाहांस लेहूंन मजुरा होये यैसे करणे इनशालाहू तालां तूर्तच आलमपन्हां विजापुराची फना करुंन विजापूर तसरुफेमधें आणूंन संभा मकहूरावर फौजा तै होतील तरी मोहिबीही आपले जागां तयांर राहोन जे फौज असल तेतर्फेस येऊंन पोचेल त्यासवें रुजूं होऊंन आपले मतालिबांचा सरंजाम करुंन घेणे ईजानेबाहीं बाअरमाद तूर्तच गनिमाचां मुल्क ताख्त व लोकांस तनखा करावयास जंजिरेतर्फेस येऊंनं मालूम जाले पाहिजे यैसेयास मोहिबीं नियेत बंदगी दरगाहास साबीत राखोंन दर कारहाये पादशाही सरगरम असणें दरीं बाब जियादा लिहिणे काये असें हर वख्त कार नेकी लिहिता जाणे रा छ ९ माहे सौवाल सन ३० जलूसवाला [मजकुराखाली*] हे किताबती

सवाल ११ नंतर

६

श १५०८ भाद्रपद शुद्ध १३
इ. १६८६ आगस्ट २१

शेक माहामादाचे कानडी लिहणेचा मकसूद

मकसूद ऊ की [मो. जा.*] साल गुदस्ता आमची किताबत व हसबुल हुकूम ज्याहामता पाठविले होते त्याचे जाब आमासी व खान आलीशान याकूदखान यासी किताबत लिहुनू पाठविले होते ते तीनी म्हैनेउपरी पावले त्याची हकीकत आम्ही खान मशारनिलेंसी लिहिले होते त्यावरी हुकूम ज्याहमता सादीर जाहाले त्यावरोनू तुम्हासी व सरनौबत शेख आली यासी लिहिले इतुकेवरी शेक आलीसी हुकूम खुदाई जाहाले ज्या माणुसापासी कागद पाठविले ते न पावताती कागदे गनिमाचे धाशती करोनू गमविलीं खबर आमासी आजी तीन म्हैनेनी झाली त्यावरोनू आम्ही फिरुनू लिहिले नाही

हाली माणूस पाठविले आहे तुम्हापासी पावेल हाली दरगाहासी तुमचा बहूत काही मजुरा केले आहे हाली काही मतलब आसेल ती खान सलाबतखान व खान याकूतखान यास किताबती मतलबा लिहून येक आपला माणूस आमापासी पाठवणे माणूस येथे पावलेवरी कितेक तुमचे सरफराजी होउनू येईल तुम्ही गनिमाचे मुलकासी काबिजाती केली आसिले ती तैसेची आपले कबजामधें ठेवणें वतन तुमचे तुम्हासी मराहामत होईल तुम्ही आपुला खातिरजमा आसो देवणे तुम्हासी मदत उपरा [ळा*] बाबे किले धारवाडासी लिहिले आहे व आम्ही धारवडाचे किलेदारासी कागद पाठविले आहे तुम्ही त्यापासी माणूस पाठवणे आम्ही थोडेच रोजानी येत आहू व तुम्हासी किताबती लिहिली आहे दुसरी फारसी कागद लिहिली आहे विजुरईच किताबतीमधे आहे ती किताबत मतलबेची म्हणौनू कानडी अखेरी लिहिली आहे आणि फारसी किताबती दिवाणदारीची आहे आणि ४ किताबती लिहिले आहेती त्याचा तपसील राम दलवी १ लानगो राम दलवी १ तानसावत १ देवसावत १ ते त्यास देवणं तेतर्फेसी गनिमाचे येक दोनी किले कबज करवणे याची जवाब आमासी हिंदवी अखेरी पाठवणे मो। छ ११ सौवाली आणि बावाजी आमचे खाशेचा इतबारी आहे यावराबरी जे काही मतलब आसईल ते लिहणे अबदुल कादीर आमचेजवळ चाकरीसी राहुनू त्याचे घर गोवेपासी आहे तो येणार तर तुमापासी जाईल तर कागदपत्र त्यापासी दिले पाहिजे हे किताबत

फारसी कनडी खताने लिहिले आहे आपले खातरेसी हर येक बाबे जमे धरोनू याच जवाब फारसी नाही तरी हिंदवी खताने लिहुनू पाठवणे दस्तूर खास लिहिले असे

---

७ { श १६०८ आश्विन शुद्ध ६ पूर्वी
{ इ. १६८६ सप्टेंबर १३

तान सावत यांस सेख माहमद बक्षी वाकेनिगार याणे लिहिले त्याचा मकसूद

बहुत दिवस जाहले परंतू आठवण करून पत्र लिहिले नाही येसे उचित न्हवे या उपेरी आपले सलामती व मतलब लिहून स्नेहविशेष करणे मकसूद ऊकी तुम्ही तहूर दस्तगाः खेम सावंत याचे इतफाकीने गनिमाचा मुलुक सोडवावया कोसीस करिता हे वर्तमान आम्ही बदरगा फलक बारगाः अर्ज लिहिले होते की खेम सावंत सरदेसमूख परगणे कुडाल व माहलहाये व त्याचे कितेक अजीज व सुऱ्याअतपन्हाही व राम दलवी खुर्द व देव सावंत व तान सावंत येकदिल होउनू पादशाही कामावरी आहेत व दरगाहाचे बंदगीस येकनिस्टा धरिताती म्हणून लिहिले आमचे लिहिलेचा जाब हुकूम ज्याहमता सादीर जाहला की अवघियाचा दिलासा राखोनू पादशाही कामावरी साबीद ठेवणे पादशाहचे मरामत होउनू सरफराज होतील हे वर्तमान सरदेसमूख व दलवी यास

सविस्तर लिहिले आहे त्यावरून कलो येईल तुम्हीं आपला हर बाबा खातिरजमा राखोन गनिमास तंबी करीत जाणे व हजरत जिल इलाहीं विजापुरास आहेत विजापूरची फते जाहलेवरी फौजा पादशाही व पादशाहजादे व बुबराव कोकणप्रांती रवाना होतील त्यापूर्वी सरदेसमूख व तुमचा मजरा जाहलेवरी बहून बरे आहे व कितेक इतबार विशेष होउनू वतनाचे व मनसबा व इनाम मराहमत होईल आमी तुमचे कार्यास साहे करितो तें सेख अबदुल फता तुम्हास लिहील विशेश काये लिहिणे वल दुवा

	८	शा. १६०८ आश्विन शुद्ध ६ नंतर
	श्री	इ. १६८६ सप्टेंबर १३

[पाठीवर चौ. अ. म. शि.*]

राजेंश्री खेम सांवत सरदेसाई पा। कुडाल गोसावी यांसि

दें श्री सकलगुणालंकरण अखंडित लक्षुमी आलंकृत राजमान्य [मो. जा.*] स्नेहपूर्वक राजेश्री माहादाजी नाईक विनती येथील क्षम जाणौन स्वकीये कुशल लेखन केलें पाहिजे उपरि तुम्ही अम्हास न लिहितां अम्ही तुमचे विशई पातशाहाजीस अर्जदास्त लिहिली होती यावरून अम्हास हसबल हुकूम आला व तुमचे नावेंही हसबल हुकूम आला ते दोन्हीं हसबल हुकूम बराबरी मा। अनाम रुद्राजीपंत पाठविले आहेत त्यावरून कलो येईल येसियास हे दिलीचे पातशाहा बहुत थोर यांसमान दुसरा कोण्ही नाही विजापुरीचां जो काही मामला जाहला तो तुम्हास जाहीर आहे सभाजीचीही बाबत राहाणार नाही भागानगरीची मोहीम जालियावरी यांचाही सिताबीनेच परामृश करितील तुमचीही ते तरफेने वतने आहेत अगोधरच यासी साजीस राखिलियां कितेक गास्टीने आपला नफा आहे तुमचा इतबार दिसोन आलियावरी पातशाही फौज अठ दाहा हजार स्वार अम्हीच तुमचे कुमकेस घेऊन येतों अणी तहद राहेरीपावेतो ठाणेबंदी केली जाईल तरी तुम्ही येसमई दुसरा विचार न करितां अपली येक पातशाहाजीस अर्जदास्त व अपले येक भले मनुश्य येथे अम्हापासी पाठविले पाहिजे येदर्थी विशेष लेहावे तरी तुम्ही अम्ही पहिलेपासून शरीरसमंधी असो इतर भाव नाही [ब.*] मोर्तब सूद

फ. १०९८ रवल २१ } ९ { श. १६१० पौष वद्य ८
 इ. १६८९ जानेवारी ४

खेम सावंत भोसले देसमूख पा। कुडाल व माहलहाये

सुजाअत व शहमतपनाः [मो. जा*] ...मकसूद तुम्ही हकीकत लिहिले होते छ १९ रविलौवल पाचोन माळूम जाहले सरफराजनामे माफिक सुजाअतपनाः राम दलवी तयार जाहले अमा गनिमाचे रवारवी सबब चंद रोज मुजोत पाहून चोरले घाटेस येतो साहेबास खबर लिहितील मग जमा [य*] ती पाठविले पा। हुजूर पोचतील म्हणून तरी येकीन आहे तुमचे करारदादेस तपावत नाही चोरले घाटास येऊन मुस्तकीम करू राहोन आणीक येक दोनी घाट तलासीने बातनीस करू असावे तवतक फिलहाल मातबर हमकामिदे वकील पाठविले पा। त्यासी हरयेक तजवीज करून मनसफेचे सकल मुशकस टीक करू बाजद येताची सरजामी होईल अम्ही तलासेदार असिल करू तुम्ही खातिर-जमा असू चोरल घाटे असणे किसी वख्त स्वारी करू तुमचे गिर्दनवाई येऊ तेव्हा तुम्हासी खबर करू तेच वख्त येउनू दाखल जाहले पाहिजे असो तजवीजात कीजे तुमचे मातबर वकील आलिया इतबार होईल जानिजे छ २१ रबिलौवल १०९८

फ. [१०*] ९९ सवाल २७ } १० { श. १६११ श्रावण वद्य १४
 इ. १६८९ आगस्ट ४

रफायेती व मालीपन्हा सुजायेत व स्याहामत इतिबा खेम सावत सरदेसाई पा। कुडाल व माहालानिहाये इजहाये आ की दरीवि}वि{ला तुम्ही इलतमास पाठविला पाहचोन मजमून माळूम जाला तुम्ही आपली खातिर जमा करून हजूर येने इनस्या-न करिता हजूर येने मोर्तबू छ २७ सौवाल सन ९९ वाजे[ल*] कोन्हे बाबे शक अदेस्या

फ. ११०० सफर ६ } ११ { श. १६१२ कार्तिक शुद्ध ७
 इ. १६९० आक्टोबर २९

रफायेती व मालीपन्हा सुजायेत व स्यादमत इतिबा खेम सावत सरदेसाई मामिले कुडाल व माहालानिहाये दरी विला सुजायेत स्यार जलालखान व दिलावर ते तरफेस पाठविले असेती तरी याचे हमराहा आपला फर्जद व राम दलवी व माप सावत व कान सावत वगैरे जमीदार व जमीयेती देऊन तुम्ही हजूर येने काम जरूर असे ये

बाबे मातल न करिता त्याचे हमराहा करून तुम्ही हुजूर येने बाजे मजकूर मा। रामाजी पडीत वकील माळूम करितील त्यावरून माळूम होईल जादा लिहिने हाजीन नाही छ ६ सफर स[न*] ११०० गनिमाचे लोकास तुम्ही कौल द्याल तो मजूर असे मे।।

फ. ११०० सफर १२ } १२ { श. १६१२ कार्तिक शुद्ध १३
{ इ. १६९० नोव्हेंबर ४

रफायेती व मालीमर्तबा सुजायेत व स्यामत इतिबा खेम सावन सरदेसाई मामिले कुडाल व माहालानिहाये दरी विला तुम्ही फोंडेस गेलेती अमा तेथील हकीकत जाहीर न जाली येकिन अहे की काम फते केले असेल अमा तुमचे खातिरेबदल फौज पाठविली तैसाच कस्त तुम्हीं करून मुजरा करोन दाखवने पहिला मुजरा हाच असे कोसीस व तरतूद करून काम सरजाम कीजे व येथून फौज उमदी सरदाजखा वगैर उमराव तै केले असेती तुम्ही व ते येकदिल होऊन थानेबदी व किलेजाती फते करून हजूर लिहिने यामधे कुली मुजरा असे छ १२ सफर सन ११००

फ. ११०० रवल ७ } १३ { श. १६१२ मार्गशीर्ष शुद्ध ८
{ इ. १६९० नोव्हेंबर २९

सुजायेत स्यार खेम सावत सरदेसाई मामिले कुडाल व माहालानिहाये दरी विला सुजायेत स्यार जलालखान व तुम्ही व दुलबा नाईक यैसे पारगडास येऊन तेथील किला फते करून हजूर येने तुमचा वगैरे बिरादरीचा मनसफ हजुरून मोकरर होऊन तसदिकेस हुकूम जाला असे हाली वकील पाठवायाची मातल असे यैसियास तुम्ही हजूर आलिया-वरी कुली सरजाम होईल पारगडीचा सरजाम करून हजूर येने तोवरी बर्खूरदार सादत निस्या मनेरीस मुकाम करितील अमा ये बाबे मातल न करणे कामी सरजाम पोहचाऊन तुम्ही हजूर येने छ ७ रबिलौवल सन ११००

फ. ११०० } १४ { श. १६१२ मार्गशीर्ष शुद्ध १०
रवल ९ } { इ. १६९० डिसेंबर १

सुजायेत व स्याहमर्ता इतिबा खेम सावत देसाई मामिले कुडाल वगैरे दरी विला तुम्हास पेशजी हुकूम सादर असे की किले पारगडास जाऊन किला फते करून हुजूर

येने येकीन अहे की किले मजकुरास स्वार जाले असाल व किले मदार्नगड येथे तुमचे तरफेने व राम दलवी व तुमचा फरजद वगैरे येही खूब काम केले यावरून मुजरा जाहीर जाला हे हकीकती कुली हजूर लिहिली जाईल हाल तुम्ही किले मजकुरास येऊन किला फत्ते करून हजूर येने ये बाबे मातल न करने मो।

तो। ९ रविलौवल सन ११००

---

१५ { श. १६१२ मार्गशीर्ष वद्य १ / इ. १६९० डिसेंबर ६ }

फ. ११००
रवल १४ }

सुजायेत व स्याहमत इतिबा खेम सावत सरदेसाई मामिले कुडाल व माहाला-निहाये दरी विला तुम्ही व गैर जमीदार मिलोन किले पारगडास जाने किला फते होये तोवरी बर्खुरदार सादत निस्या मनेरीस राहतील तुमावेगले पुढे जानार नाहीत तुम्ही खातिरजमा राखने किला फते करून मा। अनाम रामाजी नायेक ठाकूर यास हजूर पाठवने आनी तुम्ही खानजादेयापासी मनेरीस जाने हजूर न येने किला फते जालिया-वरी तुम्ही खानजादेचे हमराहां होऊन कुडालास जाने किलियाचे बाबे मातल न करने दर हाल फते करून हजूर लिहिने मो।

तो। १४ रविलौवल सन ११००

---

१६ { श. १६१२ मार्गशीर्ष वद्य ६ / इ. १६९० डिसेंबर ११ }

फ. ११००
रवल १९ }

सुजाअत शहमत इतबाहा खेम सांवत सरदेसाई सूर सन ११०० दरी विला हजुरोन परवाना सादीर होता की कुल जमीदारास परगडस रवाना करने येथून तुम्ही रुकसत होऊन घाटाखाली उतरला अहे मण्हे तर तुमचे काये मतलब अहे हे मालूम होत नाही अता शहबाजखा तुम्हानजीक पाठविला आहे तुम्ही शहबाजखा व कुल जमीदार मिलोन म्रहास लागणे जे काये हकीकत होईल ते लिहून पाठवणे ते बमोजीब [ह*]जूर लिहून काम बादशाही अहे यात तुमचे सरफराजी अहे छ १९ माहे रबिलौवल

फ. ११०० रवल २१ } १७ { श. १६१२ मार्गशीर्ष वद्य ८
{ इ. १६९० डिसेंबर १३

सुजाअत व शहमत इनबाहां खेम सावत सरदेसाई सूर सन ११०० दरी विला तुम्ही गेलेवरी काही गर्डाचे हकीकत लिहिले नाही तेथील काये मजकूर अहे त्याचे मुदा काये अहे ते लिहून पाठवणे दीगर हर येक कामकाज पडील तर तुमचे वकील येक पाठवणे त्याने हर ये [क*] कामकाज खबर पोहचावील मार्तबू गूद [पाठीवर *] तेरीख २१ रबिलौवल

फ. ११०० रवल २२ } १८ { श. १६१२ मार्गशीर्ष वद्य ९
{ इ. १६९० डिसेंबर १४

सुजायेन व स्याहमत इतिवा खेम सावंत सरदेसाई मामिले कुडाल व माहाला-निहाये दरी विला इजतीअसार रामाजी नायेक ठाकूर येही जाहीर केले तरी तुम्ही आपली जमीयेती मातब्रर आदमीचे हमराहा देऊन तुम्ही व दलवी हजूर येऊन मुला-जमती करने अमा जमीयेत दर हाल पारगडास पोहचावने बाजे मजकूर इजतीअसार येही लिहिले असे त्यावरून मालुम होईल मो छ २२ रबिलौवल सन ११००

फ. ११०० रखर १७ } १९ { श. १६१२ पौष वद्य ४
{ इ. १६९१ जानेवारी ८

सुजायेत स्यार खेम सावत सरदेसाई मामिले कुडाल दरी विला खरीदीबदल पैसे तुम्हानजदीक दिधले याबदल अहद नोकर सरकार पाठविला असे व वलदेज यास किताबती पाठविली असे यैसियास बमोजीब यादीदास्ती जिनस असल खरीदी करून आपले आदमीसाथ देऊन हजुर पाठवने ये बाबे मोतल न करने मो छ १७ रबिलाखर सन ११००

सु. १०९१ } २० { श. १६१३ चैत्र शुद्ध ६
रजब ४ } श्री { इ. १६९१ मार्च २५

राजेश्री [मो. जा.*] सरदेसाई पा कुडाल व माहालानहाये स्वामीचे सेवेसी

सेवक नारोवा नाईक वाळके आगकार व बाबसेट सोनार सेटिया टाकसाल बंदर

वेंगुर्ले जोहार सुा इहिदे तिसैन अलफ बंदर मजकुरी पेसजी टकसाली होनाची होती ती धामधुमीकरितां राहिली याबदल श्वामीचा धीर भरवसा जालेवर हाली टकसाल घालून काम चालऊ म्हणौन सांगितले त्यावरून श्वामीने कौल दिल्हा धीर भरवसा दिल्हा याबदल आम्ही टाकसालपैकी दर हजारे होन निा ·।· प्रताप गोसावियांसि हकवतन करून दिले आहे साल दर साल सदरहूप्रमाणें श्वामीस देऊ सेवेसी स्रुत होये छ ४ रजब हे विनंती

[नि.*] दस्तूर नारोवा वाखलीप (ले ?)

[नि..*] दस्तूर बाबसेट वा भ्रमासेट सोनार टगसाली

श. १६१३ कार्तिक वद्य ७ सोमवार; सु. १०९२ सफर २१	२१ श्री	श. १६१३ कार्तिक वद्य ७ इ. १६९१ नोव्हेंबर २

सरदेसाई पाा कुडाल व माहालनहाये

श्वस्ती श्री नृप शालिवान शेक १६१३ वरुसे कार्तीक बहूल सप्तमी सोमवारी सुहूर सन इसने तिसैन अलफ मुकाम वाडी पाा कुडाल येथे मिलाले समस्त माहानाड वरघाट व तलघाट सादेसीपरदेसी यांनीं राजेश्री [मो. जा.*] गोसावी यांस लिहून दिले राजीपत्र यैसा जे साहेबी आम्हास हुजूर बोलाऊन नेऊन आज्ञा केली जे आपण वांडीस पेठ केली आहे तरी तुमी हणमंत घाट व पारपोली घाटे जे वीत येईल तें कुली वाडीस पेठेस आणावे आणि येथून फुा करावे वाडीस जकात आम्हास येक मोईन करून देणें म्हणौनु त्यावरून आम्हीं आपले सतोशेकरून गोस्ट मान्य केली जे कांहीं वीत या प्रांताचे मारगाने उतरेल ते कुली वाडीस आणू येथोन मग फुा करू येथे पेठेचे जकात येणेंप्रमाणे देऊ बिा मार्गास ज्या जकाती बाा साल गुदस्तां देत आहो त्या जेथील तेथें देऊन त्याखेरीज हे पेठेस जकात देऊ बिा

नगास जिनस कापड व तंबाकु व बाजे नगास चवल होन निशाने ८॥

खोबरे सुपारी जे वाडीस भरूं त्यास दर गोणीस होन निा ब्याल ८·।·

भूस गोणीस दर होन निा ब्याल ८·।·

मीठ वाडीहून जे भरूं त्यास दर गोणीस होन निा ब्याल ८·।·

येणेप्रमाणें जकात देऊं सोडसाड सालाबाद जकात रवेसीनें करून सदरहू जकात देऊन सुखरूप उदीम करूं साहेबीही येणेप्रमाणें कौल दिला पाहिजे आम्ही सुखरूप आमदरफ्ती करून म्हणौन राजीपत्र सही छ २१ सफर

निशाना महानाड

सागापा वाडेकर	पावाडी सेठ इलदी
लिगाणा दैलीवी	दानपा इलदी
हानापा देसुरी	नागाणा उतूरकार
खानापूरकार	हुकेरीकार
	जायणा
	सिवाणा

श. १६१४ अंगिरा कार्तिक वद्य १० बुधवार; सु. १०९३ रवल २४	२९ श्री	श. १६१४ कार्तिक वद्य १० इ. १६९२ नोव्हेंबर २३

स्वस्ति श्री नृप शालिवान शेके १६१४ वरुसे प्रवर्तमान अंगिरानाम संवछर कार्तिक बहूल १० दशमी बुधवारी श्रीमत राजश्री खेम सावंत भोसले सरदेसाई पा। कुडाल व माहालानिहाये गोसावी यांसि समस्त माहानाड वरघाट व तलघाट यांनीं लिहून दिले पत्र यैसा जे या प्रांतें वरघाटी व तलघाटी धामधुमी होऊन तमाम मार्ग चालत नाही याबदल आम्ही समस्त माहानाड येऊन गोसावियांसि विनति केली जें घाट हणमत या मार्गास कौल देउनू मार्ग चालवावा त्यास वरघाटी धामधूम याबदल थोरले अनप का। पाटगाऊ येथे आपले लोक मेट ठेउनू मार्ग सुरलीत चालवावा म्हणौन विनति केली ते गोसावी यानी मान्य करून कौल मऱ्हामत केला याबदल आम्ही आपले संतोषेंकरून अनप मजकुरी चोरगे गोसावी यांस करून दिले आहे दर गोणीस हर्तेट करून निशाणी होनु ०।॰ व्याल प्रमाणें दिले आहे गोसावियानीं व गोसावियाचे पुत्रपौत्रीं घेतले पाहिजे आम्ही व आमचे पुत्रपौत्री चालउनू छ २४ रबिलौवल सुहूर सन सलास तिसैन अलफ

निशान माहानाडानी

पावाडी सेटे इलदी	जायण वडेकार
हानपा लिहीत	नागणा उसूर
	हानापा देसुरी
	सागापा वाडकार
	लिगाणा हाडताला
	तावनाप पवडेकर

श. १६१४ अंगिरा कार्तिक वद्य १३ शुक्रवार } २३ { श. १६१४ कार्तिक वद्य १२ (जं.) इ. १६९२ नोव्हेंबर २५

स्वस्ति श्री नृप शालिवाहन शके १६१४ वर्षे प्रवर्तमान अंगिरानाम संवछरे कार्तिक बहूल त्रयोदसी सुक्रुवारी श्रीमत राजेश्री खेम सावंत भोसले सरदेसाई पाा कुडाल व महालानिहाये स्वामीचे सेवेसी समस्त माहानाड पेठ पाटगाऊ व वरघाट व तलघाट याणीं लिहून दिले शासनपटा यैसा जे वरघाट व तलघाट धामधुमी होऊन मार्ग सुरलीत चालेना होऊन आमा उदमियांचा उदीम राहिला देखून आम्ही समस्त माहानाड मिलोन स्वामीचे सेवेसी विनंति केली जे स्वामियांसि सरदेसमुखीचें चोरगे पेठ मजकूरचे थोरले अनप आहे. तेथें दर गोणीस होन निाा ८·।· व्याल मी......दिली आणि मार्ग सुरलीत चाल...... आहे हे स्वामियानी आपला मुतालीक ठेवून सदरहू सरदेसमुखीचे चोरगे लिहिलेप्रमाणें घेउनू भोगवटा केला पाहिजे हे चोगे लिहून दिलेप्रमाणे आमा माहानाडाचे संतानपरंपरेने यावें स्वामियांचे संतानपरंपरेने भोगावे हा पटा सही

पापडीं सेठ इलदी
बानापा इलदी लिकिता
जायाणा कड (वा) कार
लिंग
सन्नप बेलप [कानडी *]
दानपा कामापूर

नागाणा तलभार
उतूरकर
सागापा वाडकार
तवणा पटण
कुडीकार

सु १०९५ रमजान २५ } २४ श्री { श. १६१७ वैशाख वद्य १२ इ. १६९५ एप्रिल ३०

ताा

[बा. सि. व फा. ब. मो.*]

राजश्री येसाजी जसवतराऊ देसाई ताा पेडणे गोसावी यासि

दं अखडित लक्षुमी आलकृत राजमान स्नेहपूर्वक खेम सावत भोसुले सरदेसाई पाा कुडाल व माहालानिहाये रामराम येथील कुशल जाणउनू स्वकीये कुशल लिहिले पाहिजे यानतर मौजे तुये हें माा विठलप्रभू देसाई पारसेकर याणे आपणास निमे मोकासा आहे म्हणउनू आम्हास क्रियेविक्रये करून पटा करून विकरा करून दिले होते येसेयास तुम्ही येउनू आम्हास भेटलेवरी सदरहू निमे गाऊची तकसीम आम्ही तुम्हास मखता खड होन निाा १००८ येकसे होनू दर सालीना मखता गुतका आम्ही करून

तुम्हास दिले असे गावची कमाविसी तुम्ही करणे सदरहू सेभर होनप्रमाणें दर सालीना तुम्हीं आम्हांस देऊन कमाविसी करणे तूट मुदतीचे साल मजकुरास ५० पनास होन देणें आणि पुडील सालापासून दर सालीना सेभर होनप्रमाणे देत जाणे छ २५ रमजान सुा खमस तिसैन अलफ हे वि

श. १६२० बहुधान्य चैत्र शुद्ध ५ सोमवार; सु. १०९८ रमजान	२५ श्रीगणेशायनमा	श. १६२० चैत्र शुद्ध ६ (जं.) इ. १६९८ मार्च ७

सरदेसाई

स्वस्ति श्रीं शक १६२० वरूसे बहुधान्य नाव छवछरे चेत्र सुध पचमी सोमवारी मो वाडी किर्येपत्र दिो वीट सेणवी सालसकार सुहूर सन समान तिसैन अलफ कारणे राजश्री [मो. जा.*] पाा कुडाल स्वासीचे सेवेसी लिहून दिले किर्येपत्र येसा जे आमचे बाग नारगील व बाजे हर जिनस झाडे पणस व आंबे व बाजे हर जिनस झाडे व सेत बिा माडाचे विदलबाव तिमाजी मुदगल मौजे आबडीपाली हे आम्ही रा विठलभट बिन गोविंदभट बाकरे मो कसबे कुडाल यापासून विकत घेतले होते ते आम्ही आपले कार्याबदल आत्मसंतोसे स्वामीस विकत किर्येविक्रिये करून दिले आणि मरेचे घेतेले निशानी होन १३८

येन ———————— विठल भट निाा होन १२८ — गुजारती रा प्रभाकर भट कशालकर निाा होनू १०

येकून निशानी होन तेरा नकद आमासी पावले सदरहू बागाचे चतुर सीमा बिा असल पटा भोगवटा करणे आमाजवल भट्ट म[ज*]कुराचे असल फटा होता तो दिले आहे स्वामींने भोगवटा करणे आमासी त्या बागासी समध नाही हे किर्येपत्र सही

[समासांत *] बीठ सीणवी कलसकर

लिहित विठल विस्वनाथ कावडी नाडकर्णी पाा मजकूर

विठल नरहरी मुकठाणेकर साक्ष

तेरीख रमजान

सु. ११११ जिल्हेज १२ } २६ नक्कल { श. १६३३ पौष शुद्ध १३ इ. १७१२ जानेवारी १०

तहनामा फिरंगी इस्ताद जंजिरे गोवा यांसी तह केला ऐसा जे ईजानेबामधें व मोहिबामधें इफ्तादापासोन प्रीती चालोन आली होती त्यास मधें मैत्रीस अंतर पडोन आलें त्यावर सुज्याअतशाआर दों फरासीस संत मयोर मेल्राकाद यांचे विदमाने बोलणे होऊन दुतर्फा खुलासा होऊन तह जाहाला कलमे

१ तो फोड सवदेकर यांखालें आहे त्याचा आपला तह होऊन त्यास त्या जागां आपण ठेविला आहे तरी त्या माहालचे वाटेस जाऊं नये कलम

१ देसाई आलीकडील फिरंगणामधे आहेत त्याचें वतन सिवाजीराजे कारकिर्दी व मोगला कारकिर्दी यांस जें कांहीं चाललें आहे तेणेप्रो त्यास चालववे कलम

१ फिरंगणातील उदेमी व्या [पा*] री पडव वा वीत घेऊन येतील व वरकड खुसगी उदेम वेवसाई जिनस आणितील त्यास ज्याजती करू नये जकात सालाबादप्रमाणे घ्यावी कलम

१ आरब आमच्या इस्तादाचे दुसमान त्याची मैत्री करूं नये व त्यांस जागा देऊं नये त्यांची ज्याहांजे येकादे समई बंदरास आली त्यास फिरंगी यानी जालली व लोकास मारले तरी सख्यास अंतर करू नये कलम

१ फिरंगी सियोर विजुरैच्या निरोपाखेरीज आलतडीस येतील तर बारदेसच्या जनरालास सांगावे त्याणे सुगूर पाठऊन त्यांचे समाधान करून त्यास न्यावे कलम

१ तुम्हाकडील लोक पलतडीस फिरंगणामधे जाऊन नागवण व चोरी करितील तर ज्याचे वित्त गेले असेल त्याचें प्रमाण मुखी त्याकडून घेववावे व त्याणे मोडत मारली व जखमा केल्या तरी त्यान फरास दस्त करून बुदसी लावावी कलम

१ फिरंगाणातून खापरी गुलाम व खापुरलीं पळोन आलतडीस आली ती द्यावी म्हणोन तर त्याच्या धन्याच्या कौल पाठऊन न्यांवी कलम

१ खोरजुवे पनाले हे आमच्या बारदेसचे सीमेचे मोगलानी आम्हास दिले आहेत ते आम्ही घेतले तुमचे आमचे विरोधामुले घेतले नाहीत त्याचे वाटेस जाऊ नये कलम

१ मागा रेवाडची इग्रज व घर मोडिले त्याचे खर्चास द्यावी आसुरफ दाहा हजार द्यावी कलम

१ दरसालीना घोड २ इस्तादास द्यावे घोड नाही तर असुरफिया सालास हजार येक द्याव्या तो डिचोलीपैकी कलम

१०

येकून कलमे दाहा लिहून पाठविली ती सदरहूप्रमाणे कलमे मान्य केली आहेत सुहूर सन इसने अशर मया अलफ रा। छ १२ माहे जिल्हेज तालीक सिवभट बकरे याच्या तहनामेची जामदारखानेमधील

सु. ११३९ रमजान १० } २७ श्री. { श. १६६० मार्गशीर्ष शुद्ध १२ इ. १७३८ डिसेंबर ११

[आरंभीं ब. शि.*] श्री । राजा शाहू नर । पति हर्ष नीधान । बाजीराव बला । ल प्रधान

तहनामा सरकार राजश्री पंतप्रधान राजश्री जयराम सावंत भोसले व राजश्री रामचंद्र सावंत भोसले सरदेसाई पा। कुडाल व माहायें सु॥ तिसा सलासैन मया अलफ विद्यमान भिकाजी केशव

बारदेश हस्तगत करून दिल्हि यावर द्यावें

वतन देशमुखी खेरीज

वतन राणें ता॥ बारदेस

इनाम गाव	दर सदे रुपये
पाच ५	दोन २

मौजे खरजुवे व पनाले ता। ड़िचोली हे तुमचे गाव फिरंगियानी बाधिले आहेत ते हस्तगंत जाहाले तर तुमचे तुम्हांस द्यावें गाव २

वकसिसें

कडी सोन्याची पचवीस २५	कलग्या पाच ५
मोत्याच्या जोड्या पचवीस २५	घोडे पाच ५
कडी रुप्याची सेंभर १००	नख्त रुपये दाहा हजार १००००

माहाराज राजश्री [मो. जा. *] स्वामींनी चिकेवाडीचे मुकामीं फोड वगैरे माहालीं प्रात मजकुरी मुकासे गाव दिल्हे आहेत त्यांस मर्दनगड व कोट फोडे प्रात साष्टी येथील स्वारीस तुमची फौज हशम दोन हजार व स्वार सेंभर येऊन सरकारचे फौजेबराबर कस्त मेहनत करावीं तुम्हांस सदरहू गाव चालवावे त्यामध्ये तुमचे सनदे अंगोधर संनदी वतनी गाव असतील ते ज्याचे त्यास देऊन त्याचे मुबदला तुम्हास दुसरे गाव द्यावें कलम १

सरदेस जागा वसविला तर त्यास गला लागला तर तुम्ही विकत घ्यावा व तुम्ही जागियांची कुमक करीत जावी कलम १

सरदार नाईकवाडी येतील त्यास वस्त्रें द्यावी कलम १

खाशास बहुमान द्यावा कलम १

येकून कलम १

बारदेशात हस्तगत होईल त्यापैकीं ठाणी व तोफा व अरमार व गला सरकारचा बाकी लूट सरकारचे फौजेस बकसीस केली तर तुमच्याही लोकास बकसीस कराव जत्फ केली तर सरकारची चौथाई अलाहिदा काढून बाकी तीन हिसे फौजे-वरी वांटणी घ्यावी

राउताचा राऊत व दोन प्यादे यांचा येक राऊत येणेप्रा घ्यावे कलम १

सदरहू प्रो काबजात होऊन बारदेसात ठाणी बैसली तर येणेप्रो चालवावें व बकसीस येक वेल घ्यावें कदाचित फिरं-गियाचा तह जाहाला आणि बारदेस त्यास फिरोन देणे लागले तरी तुम्हांस

बारदेसच्या वतनाच्या मुबदला प्रा फोंडे व जावोली पंचमहाल येथे इनाम गाव १० येकून तनखा रुपये १५००० पंधरा हजाराचे द्यावें कलम १

खरजुवे व पनाले तो डिचोली फिरंगी याकडे आहेत ते घेऊन तुम्हास द्यावें कलम १

फिरंगियानी तुम्हावर चढाई केली तर तुमचें पत्र येईल ते समई कुमक करावी कलम १

तह होऊन आल्यावर तुम्हास बकसिसासिवाये रुा २५००० पंचवीस हजार द्यावे कलम १

येकून कलम १

आम्हास देस हस्तगत होऊन सरहदेस ठाणी जाहाल्यावर तुमचे स्वस्थानास पूर्ववत चालवावे अपाये करू नये तुम्ही लिहिल्याप्रो निष्ठापूर्वक वर्तणूक केलि-यांवर आम्हीं अंतर करूं तर आम्हास श्री [मो. जा. *] ची शफत असें कलम १

तुमची फौज सरकारचे फौजेबराबर येईल त्यास लूट न मिले तेव्हा लस्कर सिरस्त्याप्रो पोटास द्यावे कलम १

आमचा फिरंगियांचा तह होईल ते समई तुमचा फिरंगीयांचा तह करून दिल्हा जाईल कलम १

फारशा तोफा मिळाल्या तर थोड्या बहूत तुम्हांस दिल्या जातील तेथील स्थलास ठेवणे ते ठेऊन राहिल्या त्या तुम्हीं अरनालियास पोहचाऊन द्याव्या कलम १

येकून कलमे नव करार केली असेत सदरहूप्रो चालविले जाईल जाणिजे छ १० रमजान [नि.*] पा हुजूर [ब*] लेखन सिमा [जोडावर लेखन सीमेचे दोन शिक्के *]

जिल्काद २९; पो. इ. १७४० मार्च २ — २८ — श. १६६१ फाल्गुन शुद्ध १, इ. १७४० फेब्रुवारी १७

नकल सन १७४०

तह कलमें राजेश्री जयराम सावंत भोसले व रामचंद्र सावंत भोसले सरदेसाई प्रा कुडाल व माहालानिहाय यांही डिचोलीचें मुकामी विठोजी सेणवी धुमे व भोगण कामत लिगिस्ताद याणी येकबाल पन्हा कोंदी द सादोमिल विजुरे दे इंद याचा येख्तयार हुकूम आणिलियाकडे तहनामे करार करून हिंदवी आक्षराचे राजेश्रीच्या सिक्यानसीं निविस्तन बतेरीख २८ माहे फिब्रोर सन १७४० गोवेस आणून मारनिलेने रुजू केले ते मान्य करून त्याची प्रती येकबालपन्हा याचे निशाणेची व सिक्याची राजेश्रीच्या दफ्तरी ठेवावयास मानिले लिंगिस्ताद याणे तालीक बितपसील

सिधार्थी नाम सवछरे फालगूण सुा प्रतिपदा सुा आर्बैन मया आलफ राजश्री जयराम सावंत भोसले व राजश्री रामचंद्र सावंत भोसले सरदेसाई प्रां कुडाल व माहालानिहाय यामध्ये व फिरंगी इस्तादामध्ये ऐहास आंतराई आली त्यास उभयपक्षी खुलासा व्हावा याकरिता रा विठोजी सेणवी धुमे व बहुगुण कामत लिग्व दे इस्ताद जाहाला तहनामा ऐसां जे १

१

हाली तहनामे करार जाहाले तेणेप्रमाणें दुतर्फा चालावे याउपरी मागील तहनामे जाहाले होते ते बातील असेत कलम २

२

श्रीमंत बाजीराऊ पंतप्रधान यांचा व फिरंगी इस्तादाचा तह इंग्रजाचे विद्यमाने पहलीच बोली लागली आहे परंतु राजश्री सरदेसाई प्रा कुडाल व माहालानिहाय या वित्रुक्त बोली करू नये कलम १

३

राजश्री सरदेसाई प्रां कुडाल व माहालानिहाय यांची जीं ज्याहाजे प्रतिवर्सी घोडे आणावयास मस्कतास जातात त्यावरी सिक्याचा कागद व निशान पाहून इस्तादाच्या आरमाराने जाऊ येऊ द्यावी कलम ४

४

राजश्री सरदेसाई प्रा कुडाल व माहालानिहाय यांस दारूगोला पाहिजे होईल तरी फिरंगी इस्तादाने रास्ता दरेप्रमाणें द्यावा कलम ५

५

उभयपक्षींच्या आरमाराने येकमेकाचे वाटे न जावे येकमेकाचा उपराला कोणही प्रसंगी करावा समयास उभयपक्षी आरमारास आश्रयही द्यावा कलम १

६

राजश्री सरदेसाई प्रां कुडाल व माहालानिहाय याचा सरकारी हर येक सामान जिनस तरांडेवरून कोटांकिलेनी फिरंगियांचे खाडीतून जाणार येणार त्यास पाहिजे तेव्हा फिरंगी इस्तादाने निरोप द्यावा कलम १.

७

राजश्री सरदेसाई प्रा कुडाल व माहालानिहाय याच्या राज्याचे गनीम जे आसतील त्यासी इस्तादाने श्नेह करू नये व आपुले मुलकामध्ये आश्रा देऊ नये कलम १

८

राजश्री सरदेसाई प्रा कुडाल व माहालानिहाय याच्या राज्यातील देसाई वतनदार फिरंगियाच्या राज्यामध्यें पुरातन होते सद्या आहेत त्याचे सालाबादप्रमाणे हकवतन राजश्री सरदेसाई प्रा कुडाल व माहालानिहाय याणी चालवावे कलम १

९

इस्तादाचा बारदेश राजश्री सरदेसाई प्रां कुडाल व माहालानिहाय याकडे होता तो श्नेहामुलें इस्तादास सोडून दिला त्यांही जूर बाधून मुलकाची उस्तवारी करावी कलम १

१०

खोरजुवे पनालें ताा डिचोली या दोन्ही गावचा मजकूर खोरजुवे राजश्री सरदेसाई प्रा कुडाल व माहालानिहाय याकडेस आहे त्याचे वाटेस फिरंगी इस्तादाने जाऊ नये कलम १

११

पनाले हा गाऊ राजश्री सरदेसाई प्रा कुडाल व माहालानिहाय याणी श्नेहामुलें फिरंगी इस्तादास कुलकानू कुलबाव दिले होते तेथ कोट बांधू नये मेट ठेवावे कलम १

१२

मौजे पिर्ण ताा बारदेस फिरंगि इस्तादाने पनाले ताा डिचोली या गावा मुबादला राजश्री सरदेसाई प्रा कुडाल व माहालानिहाय यास कुलकानू कुलबाव दिल्हा असे भोगावा कलम १

१३

मागील प्रसंग जे जाहाले आहेत ते उभयपक्षी स्मरण न करिता श्नेह येकनिष्ट चालवावा आण प्रसगे ठाकेल ते उभयपक्षी साहित्य करावे कलम १

१४

येणेप्रमाणें सदरहू तहनामे करार केले आहेत ते उभयतर्फेने सारोधार चालावे

सदरहूप्रमाणें चौदा कलमे तहनामे करार केले असेत छ २९ माहे मजकूर जिल-काद या तहनाम्याची कलमा ईज्यानेबाही मान्य केली आसेत जंजिरे गोवा बतारीख २ माहे मार्स सन १७८०

लिईंत वहुगुण कामत लिगे दे इस्ताद कोंदी दे सादुमिल विजेर

२९
श्री

याद हाली उभयेंपक्षां करार जाहालियाप्रमाणें पालावी याचा तपसील

खोरजुंवेचा कोट राजेश्री सरदेसाई याणी मोडावा यैसा निश्चय केला आहे परंतू तहनामेमधे लिहिता कार्यास न ये याकरिता याद लिहिली आहे जें कोट याणी मोडावा मोडलेनंतर इस्ताद तर्फेने ना पाडे ता बारदेस हा गांऊ कुलबाब फुलकानू राजश्रीस दिला असे म्हणून सिंयोर कोंदी साहेबाचा कागद राजेश्री सरदेसाई यांचे नांवचा पाठवावा कलम १

नकद रुपये करार केले असत २५००० पंचवीस हजार तेणेप्रमाणे करावे कलम १

हाली राजेश्री नागसावंत सरदेसाई यांस फिरंगियानी निरोप द्यावा राजश्री सरदेसाई याणी वाट सोडावी यैसा करार केला आहे कलम १

राजेश्री सरदेसाई यास स्नेह जाहाला तेव्हा बहुमानास द्यावे कलमे

२ घोडी उभयेतांस

व वरकड भेटेचा जिनस

त्याप्रमाणे राजेश्री सरदेसाई यांणी भेट मोबदला द्यावी तपसील

१ घोडा उतम

वरकड भेट

{ ३० }
{ श्री }

तहनामा इस्तादांतर्फेच्यां मुदेचा जाब

इस्तादातर्फेच्या व राजश्री [मो. जा.*] सरदेसाई यांचा श्नेह चालत होता मध्यें काहीं विक्षेप आला होता त्यास येकबालपन्हा कोंद दे सादुमिल विजुरे याचे मुदतीमध्यें मागुतीं तह जाहाला होता त्यास येक बात्नेने तफावत आली याकरितां हाली येकबालपन्हा मार्केज दे लोरी साल विजुरे यांकडे राजश्री [मो. जा.*] सरदेसाई यांचा श्नेह येकलासी वेकिलाफ होऊन उभयपक्षीं प्रजा नादावी याविसीचे राजश्रीकडील मुदे तपसील १ रू

फोड सोंधेकरांकडील मराठे याणी घेतले तेंव्हां मराठे व सरदेसाई यामध्यें परस्पर तफावत आलिया पाहून घेतील त्यामध्यें इस्तादांतर्फेने पडों नये कां जे इस्तादाचें अनुमतें घेतले नाही याकरितां २

येखादे वतनदार इस्तादाचे तर्फेस वास्तव्य करून आहेत त्यांचे वतन सालाबाद चालले प्रा राजश्री [मो. जा *] सरदेसाई चालवितील यास संदेह नाही ३ रू

इस्तादाचे मुलकांतील सावकारी उदेमी राजश्री [मो. जा.*] चे तर्फेस उद्योग वेवसाव करतील व पडांग्या पडव होडी भरून आणतील व खुशगीनेही वेवसाव करितील त्यास कार्डाचा तोसीस होणार नाही आणि सालाबाद जकात कानूनप्रमाणे घेतील जाजती जलाल होणार नाही ४ रू

आरब हे इस्तादाचे गनीम याकरिता त्यासी श्नेह होणार नाही व त्यांस आश्रयहीं देणार नाहींत जे इस्तादातर्फेचे गनीम ते राजश्री [मो. जा. *] सरदेसाई याचे येसे जाणावे तेच रीतीने इस्तादातर्फेनेंही चालावें ५ रू

फिरंगी सोलदाद व जानुराल इस्तादाकडील पलोन या मुलकामधे येतील व युध्यामधें सांपडले असतील ते द्यावेयास संदेह नाही त्यांस कौल अभये देऊन न्यावे ६ रू

इस्तादाचे मुलकांतील रयेतीस या मुलकीं कोणही या तर्फेचे नागवितील व लुटतील तरी रास्ता मनसुबी करून जे त्या रयेतांचें घेतलें असेल तें त्याचे त्यास द्यावे यास संदेह नाही आणि खून आथवा घायाल करितील तर गुना पाहून सरे तो नतीजा देतील यास संदेह नाही त्याचप्रमाणेंही इस्तादानर्फेनेंही चालावे ७ रू

फिरंगाणांतील इस्तादातर्फेचे खापरी व पादरिणी बंदी गुलाम या मुलकामधें पलोन येतील आणि दखल होतील ते देणेविसी आक्षेस संदेह नाही आणि आसतील तेही देविले जातील आणि कोणी मुलकामधे आपणास ठेऊन घेतील तरी त्यावरून त्याची किमत

करऊन त्याप्रमाणे दविले जातील आणि इस्तादांचे मुलकांतून पलोन आला आणि दखल न होता परभारे गेला तरी दिवाणास पुसावयास समंध नाही [का जे स्वल्प कार्यासाठी अल्पबुधी लोक श्नेहास आंतर } ना { आणतील याकरिता ८

मौजे खोरजुवे व पनाळे हे पुरातन भतग्रामामधील ठिकाणे हे प्रख्यात आहे हे आमचे आम्हास द्यावे हे बोली बहूत वेला इस्तादातर्फेनें जाहाली होती सेवटचेही तहमधे व पुणेचेही तहमधे करार जाहाला होता त्याहीमधें पनेले मुबादला मौजे पिर्णे होतें व इस्तादातर्फेने दिलेच आहे व मौजे खोरजुवे हे हाली इस्तादातर्फेने घेतले आहे ते येकबालपन्हा मार्केज यांही राजश्री सरदेसाइ याच्या श्नेहावर नजर देऊन द्यावे हे वाजीब आहे आणि ते न होई तरी त्या मुबादलेस दुश्रा गाऊ नेमिला म्हणजे पाहिजे*] तसा सौरस होतो आणि लौकीक उभयेपक्षी बराच आहे तेणेकरून आइदा हे संस्थान इस्तादांच्या महद कार्यास पाहिजे तेव्हा अनकूल हो[इल *]

...वडेचे इग्रज व पाद्रीचें वर दाहा हजार आसर्फेये [खर्च*] जाहाला या कलमाची निभावणी तेच मुदतीस होऊन चुकली आहे १०

दर साली दोन घोडे आगर त्याचे किमतीचे दर येकास आसर्फी पाचसेप्रा द्याव्या हे कलम सुधे चालिले नाही याविसी विक्षेपही बहुत वेल आला हे कललेच आहे याउपरी जो तह करावा तो बेकिलाफ असावा त्यात देवघेवची कलमे गुंतली म्हणजे विक्षेपास कोणही समयास आंतर येते याकरितां येसीं कलमे तहमधे नसावीं याउपरी जो तह व्हावा तो सारोधार चालावा म्हणजे यांचे आमलामधें मुदे सिध जाहालें त्यांचा लौकीक बहूत थोर राहातो ११

हाली येकबालपन्हा मार्केज यांही नवे सिरिस्ते मुदे लिहिले आहेत त्यांचा जवाब पहिले कलम लिहिलेप्रमाणे करार] रू १ लिहावे

राजश्री सरदेसाइ यांची सरकारची ज्याहाजे हर दोन बंदरी जाणार येणार त्यांस इस्तादाचे आरमारानी मुजाइम होऊ नये त्यावरील निशाण व पत्र पाहून जाऊ द्यांवी आण काडतासही [मागितलेवर] द्यावी पैका घेऊ नये [सरकारी तरांडी मात्र यांस] रू २

तिसरे कलम याचा मकसूद सिरीचे आकार कलमांमधें आला आहे रू ३ करार होणे आहे

चवथे ४ कलम लिहिलेप्रमाणे करार आणि सिरींचे आकरा कलमामधेंही तफसील आहे ४ रू करार होणे आहे

बारदेसामधील फिशानीचे सेवटी बारदेसचे रयतीने पनास हजार आसर्फिया दिल्या त्या फिरोन याव्या आणि मागुती तह जाहाला असतां बिघडला त्यामुळे बहूत नाशाड जाहाली त्याकरिता आणिखी पनास हजार आसर्फी द्याव्या म्हणून तरी तह

बिघडला त्याचा सबब सांगावा तरी स्नेहास विपर्यासच राहातो प्रस्तूत येथील विचार सर्व तेथ ठाऊक आहे त्यासारिखा विवेक आजम मनत्रेल ...... राल हे येकबालपून्हा मार्केज [कोंदि] विजुरै यापांसी रदबदल करून ...... कडील अनकूल ते जरूर करितील त्यास रजावंद आहूं ५ रू करार होणे आहे

इग्रजांमधील घंटा आणि लगाडत भांडी व आला पंचरसी व लोखंडी व मोडती दोही प्रसंगी आणिल्या त्यामधील ज्या हाजीर असतील त्या देऊ घाटा व काही जिनस उणा जाहाला त्याची बाजपूस करूं नये कांही नकद देणार तेथच धरावे ६ रू करार होणे आहे

मौजे मये हा गाऊ व नदीसारदीची सेतें तहद्दीस...आसनोडपासून खोरजुवेचे व पनालेचे कोटाचे व नदीमधें मचवे व बरकिनीचा गोला पडतो तेथपावेतो यावे म्हणून तरी तो गाऊ व सदरहू खाजनेकरून भतग्राम म्हणून या मुलकास नाव पावला आहे यामधील डिचोली कसबा मात्र व बाकी रान व डोंगर कोणी प्रयोजनास येतो ऐसे आहे तेव्हां ये जिनसी बोली घालावी उचित नाही कां कबूल करायाची गोस्टी न्हवे डिचोली माहाल म्हणजे तेवढाच यैवज हें कलतच आहे ७ करार होणे आहे रू

येसोबराऊ देसाई ता॥ पेडणे याचे हकइनाम इस्तादास यावें त्याचे पोटीं संतान नाही आणि तो हरामखोरही जाहाला त्यांचा पालकपुत्रांस काही सरेना म्हणून तरी त्यांचे हक वतन येकाचेच न्हवे पिडी दर पिडीने भोगावें म्हणून पादशाही फर्माने आहेत, त्यास आन्यथा करितां कैसे येते आणि त्याचे वारीसदारही उदंड माहालीं आहेनच आणि या प्रांतीं हिंदू लोकांमधेंही पालकपुत्रास भोगावेयास आधिकर आहे रु ८

जेव्हां तह करार तेव्हां निभावणी होईलच त्यास संदेह काये आहे यास बोलीस हलवर्णचे कोटाचा मजकूर कशास पाहिजे कराररदाद जाहाले म्हणजे निभावणी होतच आहे ९

बारदेसची गुरं न्हेली आहेत ती यावीं त्यांत. इस्तादाचे तर्फेचे लोकानी या मुलकातील न्हेली ती यांवी म्हणून तरी जेव्हां फेर मांबदला जाहाला तेव्हां काये म्हणौ [न*] उभयेपक्षी श्नेह योजिला तेव्हां किरकोली विचार काढावा हे उचित न्ह [व्हे *]

[पना*] स घोडे हाली यावे त्यांत दर सालीना दोन यावे ते यात मजरा पडतील [येक *] सेभर हजार असरफिया मागितल्या त्याहीपेक्षा नाशाउ जाहाला वि ...... तें म्हणून तरी इकडेस जे घोडे आहेत ते राज्यरक्षावयास थोडकेच होता [त *] याकरिता कोणही जोरावारा ही गोस्ट मान्य करावी लागते याजकरितां इस्तादांतर्फेने आमचेंच द्रव्याने कितेक वेला घोड विकत देऊन या राज्याचें कल्याण इछीतच होते तैसेच हालीहीं ठांकेल तें मदत करावी आणि करितील यैसा भरोसाही आहे जे गोस्ट उकाला न होई ते कलम बोलायास वाजीब न्हवे रू ११

सिवाडी व पडांग्या मचला (वा) व सौदे इस्तादाचे वासलांचे धरून न्हेले आणिले ते आमचे बंदरी आसतील ते दिल्हे जातील व पुढें इस्तादाद याचे वासालांचे तरांडियास येकंदर मुजाइम होणार नाही १२

हाली हा तह करार होतो हा करार जाहाला म्हणजे याचप्रमाणे सारोधार चालावे आणि जेवढे तहनामे मागां होऊन गेले आहेत ते मागुती उभयेपक्षी भोगवटेस बोलीस आणू नयेत रू १३

अकरा हजार असर्फिया येकबालपन्हा कोंदि दे सादवेमिल यांहीं सोडिल्या तो सबब पत्रीं लिहितां विस्तार होतो ते कलम मागुती पुसायास शुक्त नव्हे कां तो मजकूर तेच फोडतरीमधेंच आहे रू १४

सदरहू मुदेतील सोलावे कलम लिहिलेप्रमाणे करार १६

सदरहू सतरावे कलम लिहिलेप्रमाणे करार १७ रू

तह व्हावा म्हणून अजम मनवेल मुविरवेल जेनराल यांहीं कलमे लिहून दिलीं याचा जवाब हा जातो तो येकबालपन्हा मार्केज यांस विदीत करून व जे रदबदली करावी ते रीतीने करून अविलंबे उतर कलोन करारदाद सिध होई तो विचार करून मागुती भेटीस कोण तो दिवस नेमून सत्वर लिहावे

बारदेसचा मुलूक मेवटींच्या भांडणामुले उभयतर्फेने खराब जाहाला असतां तेथील रयेतीकडून पनास हजार असुर्फी देवविल्या त्या हाली फिराऊन द्याव्या याचे कलम लिहिले तर राजश्रीनी येकबालपन्हा मार्केज विजुरै यांचा श्नेह अंगिकारावा हें चितांत आणून सदरहू पनास हजार असुर्फी द्यावयास रजावंद होत आहेत १

इस्तादातर्फेची लोखंडी भांडी व घांटा व लगाडत भांडी व वरकड पंचरसी भांडी व वरकड जिनस न्हेला म्हणून या कलमामधें लिहिला तर भांडी लोखंडी व पंचरसी पैकी हाली साठ हाजीर आहेत तीं दिलीं जातील वरकडांचे पैकी रास्ता किमतीचे होतील ते दिले जातील इस्तादातर्फेचे भांडे किती सारीं ती कलवावीं २

घांटा प्रस्तुत हार्जीर आहेत त्या दिल्या जातील वरकड हाजीर नसतील त्यांचा [पैका *] च दिला जाईल ३

[मसलतीबदल] घोडे पनास द्यावे [ते खंडात मजरा] म्हणून तर राजश्री सरदेसाई यांच्या मुलकांत घोडे उत्पन्न होत नाहीत आण जे आहेत ते राज्यरक्षण करावे. यापुरते आहेत त्यांतील घोडे देता नयेत आणि येकबालपन्हा मार्केज यांचा श्नेह राजश्री सरदेसाई याहीं अंगिकारिला यास्तव पंचवीस घोडेचे किमतीचा पैका मागां राजश्री सर-देसाई यांणी इस्तादाकडून अजम फ्रांसिस्क पिरेर जेनराल यां गुजरातीने घोडे विकत घेतले होते त्याप्रमाणे किमतीचे पैके देऊं घोडेंचे कलम याउपरी बातील जाहालें मागां-पुढां उजुर नाही १

मौजे मयें देखील खाजन सेतांचें कलम लिहिलें तर तें मान्य करवत नाही कां जें डिचोली माहालचे वंदिस्तीस सारे माहालचा यैवज पुरवत नाहीं आण तो मारीं यैवज म्हणावयास तेवडाच याकरितां वाजीब नाही उभयपक्षी श्नेह दृढ होतो तेव्हां आपले असें [समजावे] उभयपक्षी समजावें १

येसोबा देसाई तो पेडणे याच्या वतनाचा मजकूर लिहिला तर त्यांचें वतन माहाल तो पेडणेमधे आण राजश्री सरदेसाई यांचा अंमल याकरितां मान्य करवत नाही कां जें त्याचे गोत्री वारीसदार उदंड आहेत येसाबा देसाईही त्यांस वतनसमंधीच चालवीत होता हालीही त्यांस चालवावें लागतें आण चालतच आहे १

हाली हा तहनामा करार होतो यामधें जे तर्फेने तफावत पडेल तर उभयपक्षीं येकवेल मात्र ज्याहीर करावें तहप्रमाणें निभावणी करून घ्यावी यास उलंघन जाहालें तर परस्पर निशा करून घ्यावा आण हाली तहनामा जो करार जाहाला त्याप्रमाणें हरदू तर्फेनें सारोधार चालावें बाकी तहनामे जे असतील ते उभयपक्षींचे बातील

[या पत्राच्या मूळ पाठांत कांहीं मजकूर प्रथम लिहून नंतर तो खोडला आहे. असा मजकूर या ठिकाणीं चौकटी कंस घालून दाखविला आहे.*]

सु. ११४७ जखर १७ } ३१ श्री {श. १६६८ आषाढ वद्य ५ {इ. १७४६ जून २६

[वा. शि.*] ” श्री ० शिद्धेश्वर शाहू । राजाधिराजस्य सदासिवसुतस्य । च वातु । रायस्य मुद्रेयं नित्यं । विजयवर्धिनी ।

तहनामा राजश्री जयराम सावंत व राजश्री रामचंद्र सावंत भोसले सरदेसाई पा कुडाल माहाय सुहूर सन सबा आर्बैन मया व अलफ छ १७ जमादिलाखर मुा नरगुंद मारफत राजश्री रामाजी नारायण वितपसील

१ खंडणी वरघाट व तलकोकण प्रांते जाली तर तुमची वाटणी दर सदे रुपये १७ सतरा देऊं तुमचा जमाव समागमे असावा तपसील

१ प्यादा वरघाटे ३००० तीन हजार व — गेल्यानंतर याची दुपट प्यादे ६००० साहा हजार असावे कलम

१ राऊत वरघाटी २५० अडीचसे व घाटाखाली ५०० पाचसे असावे कलम

२

१ जमावाची कलमे २ येकूण कलम १

१ घाटाखालील प्रांत साधेल त्याची सरदेशमुखी दर सदे १० दाहा रुपये प्रमाणे द्यावे

१ सिवेश्वरचा कोट तो माहालसुधा पंचमाहाल साधल्यानंतर तुम्हास देऊ माहाल १ येक

१ बहुमान हती येक दसऱ्यास देऊ

१ साष्टी बारदेस साधल्यानंतर गाव १२ तेरा तुम्हास देऊ

५

येकूण कलमे पाच करार केली असत तहनाम्याप्रमाणे वर्तावे छ मजकूर [वा. मो. *] लेखन सीमा

३१
श्री

यादी तहनामां अजम जैराम सावंत भोसुले व [त *] था रामचंद्र सावंत भोसुले सरदेसाई प्रागणे कुडाल व म्हालानिआये यांमधे व हजरत इस्तादामधें तह बनाव होऊन करारदाद लिहून सिकेनसीं दिला त्यामधील कांहीं कलमांची बोली राहिली ते त्या कलमामधे बयावार आली नाहीं अजम जनराल तपे बारदेस मनवेल सुवारचेल यांकडील अजम रघुनाथ दलवी तथा अजम पांडुरंग विश्राम यानीं करार केली होती तेणेप्रमाणें ती कलमें सुदीं लिहून घेऊंसी इस्तादातर्फेनें हईगई जाहालें जें आपुले तर्फेनें तहनामा लिहून देतें समई कलमाचें कलम सुदें लिहून देवितो येसें कबूल केलें याजकरितां लिहून न्हेल्या तहनामेंखाली सिक्याजवल स्वह्ना फिर [मा *] विली जें कांहीं कलमांची बोली अजम जेनराल तपे बारदेस यांपासी करार जाहली ते क [ल *] माची कलमास सुदी तपसिली आली नाहीं ते बोलीप्रमाणें चालावें इतुकें लिहून तहनामां दिला त्यास आजी यक वरूस अदीक होऊन आलें तरीही इस्तादातर्फेचे आले नाहींत राजेश्री [मो. जा. *] सरदेसाई यांतरफेने निभावणी होत आली याउपरी तरी तहनामें कलमांचें कलम सुदें होऊन यावे वाजीब काय कां त्या तहाचे अमल चालायास पाहिजे विनाश्रेहास विपरियास यऊंसी पाहील याकरितां तहनामा सुदा होऊन आला म्हणिजे जागोजाग त्याचे आमल चालउसी हुकूम सागावा लागतो आण राहिली निभावणीही करावी लागतीं या करिता त्वरेस मोल नाहीं विकलमांचा तपसील

४

चौथे कलम करार जाहालेचा बयाज [मो. जा. *] इस्तादाचे जेवढे रयताची तरांडी समुद्रामधें व तडास उदेगास फिरत असता व हरकोणीही बाबे राजेश्री सरदेसाई

यांच्या आरमाराने मुजाईम होऊं नय हा करार [मो. जा. *] कांहीं दिवस गेले नंतर *अजम जेनराल ठाणेच्या* कोलियासाठीं रदबदल करीत होते पण आमीं करार केलें नाहीं कां ते मुबैच आहेती करितां

१२

नालं घाटाच्या कलमांचा करार केला होता जें [मो. जा. *] नाला सिध असतील त्या घ्याव्या बाकी राहिल्या त्यात बुडल्या न्हेतां व मराठे यांस वेच जाहाल्या वजा करोन बाकी राहातील त्याचे पैके आमच्या चितानरूप द्यावे त्यास [मो. जा. *] हाली दिवाणच्या वस्तू त्याची धारणेप्रमाणे फारीक करायास पाहिजे म्हणोन बेरीज तंत लिहून दिली आहे ते कलम सुदे करायास पाहिजे घाटाची बेरीज अजम जेनरालाने थिराविलेस अनमान करितां नये ते गोस्टींस राजी आहू

१३

तेरावे कलम करार केले होते जें [मो. जा. *] सिध तहनामें अणवा पाठविले प्रमाणें लिहून घ्यावे कोणीं गोस्टीविसें अनमान न करणे हजरत इस्तादास सेताच्या तुकडेचे काय सेंबधे घ्याल ते फिरोन देऊन मागुती आणिक इस्तादा तर्फेने प्राप्त होतील हे बोली ते यकीच कडीस राहिली तदनंतर लोकीक सपादणा करायाकारणें कांहीं किंचित बेरीज धरोन खजना तीनी तुकडे सकेरी पईर बतोर्ल भोगवटे दखल घेतली आहे ती सोडोन देऊन बेरीज वरुसासी येक हजार अस्रुफिया इस्तादास याव्या तेथ धरोन सेताबाबती व सिरीचा हजार यैस्या वरुसेचे वरुसीं फारीक करावा हा करार केला तेणेप्रमाणे वारुन सेताचे तुकडे सोडोन देऊन बेरीज थाराऊन घ्यावी

१४

चौदावे कलमामधें यसोबाराऊ देसाई पेडणे याणे देणे म्हणौन बजरी व म्हाखजन यैसी दोन खाजने घेतली आहेती [मो. जा. *] बोलीकरिता करार केलें आहे जें त्याणे देणे कांम्र बारदेस ते देणें फारीक होग तंव तीं दोनही खाजने भोगवटेसी असावीं तदनंतर फिरोन घ्यावीं म्हणौन त्यास अद्याप त्यासी काय देणें हे यकही कलविलें नाहीं आण खाजनाचा खोत खाजना न्हेऊन व जरी गावही लुटितो आणि म्हासूल न्हेतो व सेजारची सेताही कापून आणितो व ते सेताची कुले म्हणौन ते म्हालच्या रयतासीं उपद्रव देऊन मुलक घोसितो यामुले निसंदेह स्नेहास अंतर येईल ते गोस्टी सहसा होऊ नय ती खाजना यैन जिनस सोडोन घ्यावीं आणि देणे ठीक करावें तें देऊसी सारी देसकत यसोबाराऊ याची कैद करोन देणे फारीक करविलें जाइल त्याखेरीज राजेश्री [मो. जा. *] सरदेसाही ही फारीक करायाकारणे लमीक होत आहेती देणें मात्र बेरीज रास्ता थाराऊसी पाहिजे ते न करिता बोलीस अंतर करोन उगीच खाजना बलकाऊन घ्यावी आणि कजियास फिरावें यांत काय आहे उगीच लोकाची वस्ती आपणास कसी भोगतें याचा निर्वाह लवकर होऊसी पाहिजे

१५

पंद्रावे कलम [मो. जा. *] दिचोलीचे मुकामीं तह जाहाले आलीकडीस जेवडी तराडी राजेश्रीच्या आरमारांने घेतलीं आहे ती म्हालसमेत तो फारीक करिता हिसेबी कागदपत्री सुरू सरकारी जाहाला तो अजम जेनराल याचे व राजेश्री दलवी व सबनवीस याचे चितानरूप वारावे

इतुकी बोली कलमाच्या कलमांसी लिहून तह सुदा करोन घ्यावा तेणे प्रमाणेनी राजेश्री [मो. जा. *] सरदेसाईयां तरफेनें उरली निभावणी करणार व जागोजागां आरमारास हुकूम {म} करणार आहेती

या खेरीज तहा भाइरचे बोली

मौजे मय मधील सेत सोंमणांचा कांतोर तो काही इस्तादास भोगवटेस दिला नाहीं व मागितलाही न्हवता मधे उगीच पिकऊन न्हेत आहेती तो गावांचा गांवास फिरोन द्यावा कलम १

हजरत इस्तादास अजम सरदेसाई यानी घ्यावे तहाप्रमाणे त्यात वजा करायाचा तपसील

उभयपक्षी तह जाहाला असतां वजरी म्हाखजनाची पैके न्हेली वजा करावीं कलम १

तैसेस सोमणाच्या कांतराचे पीक न्हेले ते मजरा द्यावें कलम १

पैर व सकेरी बातोर्ल हेही पीक न्हेले तेही फारीक त्या रयतांस करायास पाहिजे कलम १

जैसाची सोमणाचा कांतोर

ह्या कलमाची बेरीज करोन मजरा द्यावीं का राजेश्रीनें त्या रयतांसी देविले आहे काही राहिले ते देऊसी पाहिजे याकरिता रयतां गुजारत बेरीज थाराऊन मजरा दिले म्हणजे ते रयतेचा राहिला गुता वारिला जातों

इस्तादामधे व राजेश्री [मो. जा. *] सरदेसाई यामधें तह जाहाले असता केसोबा कुस्टराऊ यानी लुटोन न्हेलें त्याचे जाबिते जात आहेती ते जिनस त्या पासोन घेवऊन ज्याचा त्यास देववावा हे जरूर आहे कां इतुकेने जाहाले तहाचे लोकीक साजिरें होऊन अजम मानवेल सुवार राजेश्री दलवी सबनवीस याचा स्रमाचे सार्थक होते ते ना जाहाले या उभारा तहाचा बरा होत नाहीं

पुरातन रीतीप्रमाणे भेटीस घोडा दिला फिरोन घ्यावा हालीही भेटीस घोडा देता बोली फिरोन घ्यावा करार करो रवाना केला होता तेणे प्रमाणे घोडा भेटीस फिरोन घ्यावा कलम १

३३
श्री

यथोन तहबनाव व्हावा याची कलमेची अणवा तुमापासीं पाठविला होता भरोन तेणेच प्रमाणे आपल्या भल्या मनुश्यापासी देऊन पाठवा म्हणौन त्यामधें संदेयात्मक कलमेची याद राजेश्री नारायणभटा याजबरोबर पाठविली ते यैन जिनस अजम मनवेल सुवारवेल यांस दाखऊन व भट अजमाची व जेनराल याचा मुकाबिला करोन उभयतांची बोली होऊन करारजाद अजमानें सांगितली याचा बयान

दुसरे कलम यामधे लिहिले होते जे सियौर विजैरे दों रुद्रिगाचे मुदतीमधें तह बनाव जाहालेची अकरा, कलमें हाली आहे ती असतां मागुती तीच दुबार कशास पाहिजेत म्हणौन [मो. जा.*] तर त्यात तुमचे काय नासतें मजकूर तर यकच वेर्थ रदबदल कशास १

दुश्रें कलम राजेश्री सरदेसाई यांतर्फेचीं तरांडी काही खुद अथवा हर कोणीं जागां लोकाच्या तरडियाबरहुकूम स्वारी करो नय त्याचा अर्थ पाहतां राजेश्रींचे आरमार यकजात फिरों नये यैसें जाहालें हे कसें होते म्हणेन तर [मो. जा.*] त्या कलमाचां भावार्थ जो यथील साउकारी तराडी हर कोणी बदरी जाती यती व कोणीहि उदिगि(मी)-यांचें यथे येते त्याचे वाटेस न जावें व दुसरे हर कोणीया बरोबर फिरोन सदरहू तराडेस उपसर्ग न करावा व इस्तादाचे कोटकिलेखाली नां फिरावें इतुके वर्ज करोन पाहिजे तेथें समुद्रामधें फिरोन आपुला कार्यभाग करोन घेणें २

साहावे कलमाचा मजकूर जे जंगी जमेदार ते खेरीज म्हणऊन लिहिले तर ते गोस्टी उभयतांस समान असावी म्हणोन लिहिलें तर [मो. जा.*] ते गोस्टी तुमाच सारिखे कबूल केली आहे परत यकादा भला मनुश मातबर जमेदार असतो त्यास द्यायास कसा होतो याकरितां तशा मनुशांस मात्र वेगला [ला*]विलें आहेती ६

पनास हजार असुफरीनया तुमी बोलिलेप्रमाणें निभावणीं करोन घेतील [मो. जा.*] न परतू तहनामेमधे अणवापाठविले प्रमाणे लिहावें ९

तेणेचप्रमाणे पदरा हजार अशुफी नासाड जाहालेबाबती मनास अणावा पाठविला त्यात मना आहेती परत पदरा मात्र बोलिले मुदतीस द्याव्या परत तहनामा भरोन पाठविता मसुदेच प्रमाणे पाठवावा याविसे अजमांचा कागद जात आहे १०

[समासांत नि*] १२ सनद

नालघांटा याची याद लिहून पाठविली तेणेप्रमाणे कर (करार) करावे म्हणौन तर [मो. जा.*] ते गोस्टी तुमच्या चितानरूप निर्वाह करोन द्यायास अजमाचे हाती आहे तुमची गोस्टी उडवितील यैसें नाहीं १२

[समासांतनि*] १३ हे कलम. जगजाहीर आहे

संकेरी पैर बतोर्ले या खजनामधें हकदार इनामदार आहेती तेखेरीज म्हणौन लिहिले तर [मो. जा.*] तुमी स्वज्ञः फर [मा*] विली फेर तहनामेमधें उचार करावा अणीक लागत नाहीं. १४

यसोबाराऊ देसाई याचा मजकूर लिहिला तर [मो. जा.*] त्याचाहि जबाब सिरीं लिहिला तोच १५

[समासांत नि*] सनद १५

पडांगिया सवदे सिबाडाचा मजकूर लिहिला तर [मो. जा.*] ते गोस्टी अजम जेनराल या हाती आहे. ते तुमी मिलोन इतेथें कराल तोच होईल बोलिले गोस्टीस अंतर होईल हे नाहीं १६

बारदेश मुलुकामधें तीनी वेल धामधुमी जाहाले पैकी यक वेल सारा निर्वाह जाहाला असतां मागुतीं कौलाबाबती व खोतीबाबती व तंबाकूबाबती दिवाणास यावे म्हणोन व राजेश्री यासी कर्ज घेतले म्हणौन रयतापासी मागतील ते गोस्टी होऊन मागुतीं त्या रयतास उपद्रव लागों नये याकरितां लिहिले आहे [मो. जा.*] तर दिवाण तर्फेने उपस्वर्ग बादो नय तेथील रयतेचे देवघेव वाजबी तो देवऊंसी संदेह नाही तेच रीतीने यथीलही देववावें १७

दारूगोले सियोर वास्क फरनाथ सेजर दे मिनेज विजरें मुदतीमधें जे धारणेने विकत देत होते तेच धारणेन द्यावी म्हणौन [मो. जा.*] तर हाली जसी लागते ते धारणेने देतील अगले घेणार नाहीत १ १९

नधीकिनारेस मेठा ठेवावी म्हवे त्यास पुरातन जागेनी ठेवावी लागतात नूतन ठेवीत नाहीत म्हणौन तर [मो. जा.*] ते गोस्टीस राजी आहेती

आरमाराविसे व भाडणच्या तराडियाविसे पाटी दुसरे कलमामधे जबाब दिला आहे तो करार

येणेप्रमाणे अजम जेनराल तपे बारदेस यानी तुमी सागोन व लिहून पाठविले यादी राजेश्री नारायणभट याची त्याची आमागुजारत रदबदल होऊन करार जाद सांगितला तो तुमास सनद दखाल पाठविला आहे हा व त्याची यैन जिनस किताबत पाठविले ते घेऊन हे तालीक यथोन रा़ो भोगण कामती याची दस्तूरीची त्याचेच दस्तूरी भेरोन रवाना करोन देणे

इ. १७६०; } सावान २९ }

३४

{ श. १६८५ वैशाख शुद्ध १ { इ. १७६० एप्रिल १६

अजम ज्यार्ज पोकाक...डमीर दाम महबत हू

दर्‍ शाहामत अवाली मर्तबत उबह [त व म*] आली मंज़िलत समुवलत मकान [मो. जा.*] बादज शौक मशमहूद राये मवाकत येखतिजाय आंकी मुलातिफा मरसुल केला तो नेकसाहत पोहचून खुशवख्ती हासील जाहाली आ अवालीपन्हांसी व हबशि यांसी मुनाकिशाची सुरत दरपेश रूनुमा व्हावयास ईजानेब फार दिलगीर असो बिनाबराहा मुनाकिशा दूर व्हावा हे दिलज्यासी च्याहावें दोस्तीस लाजीम असे हबसी इंग्रेजाचे कदीम दोस्त हे आपले मकानी कायेम खुशाल राहात ते करावे म्हणोन कलमीं केलें अैशास अजम रिच्यर्ड बोचर प्रजादित गोवर्नदोर जनराल माजी बंदर मुंबई यांस इतला देऊन आजी तीन वर्षे मसलत केली इंग्रजाचे पातशाहीत येकासी करार जाला तोच सर्वा सरदारासी होऊन गेला आ शाहामतपन्हाचा व ईजानेबाचा मुस्तकीम येखलास ईजानेबाचा दुशमान तो आउंबहतपन्हाचा दुशमान या मनसुबियांनी आ शाहामत-पन्हानी ईजानेबाची मसलहत ईनसरामास पोहचवांवी हबसी कुमक सरजाम मागत असतां माजी जनराल यांणी उदेरीचे वख्ती न दिल्हा जे तर्फैनच्या येखालासास लाजीम ते केलें ईजानेबाचे दोस्तीहून हबशी यांची दोस्ती आऊंबहत पन्हास ज्यादा आहे अैसे नाहीं फिल हाल पातशाहीं सनद जंजीरा मै ताळूका ईजानेबाचे सुपूर्द करणें म्हणोन फर्मान येऊन पोहचला आंउबहत पन्हांस बराये मुलाहिजा सनदहीं पाठविली जाईल जंज़िरा बमै ताळुका इप्तिदायेपासून पातशाही आहेत सनदबमोजीब ईजाने-बाचे सुपूर्द करावा आशाहामत पन्हा ईजानेबाचे यखलासमंद आहेत व पातशाही फर्मानाच्या इतायेत व इन्कियात चालत आले आहेत त्यास कसूर व खिलाफ करील त्यास सजा व नतीजा पोहचवावा सर्व उमेदियांस खुसूस आं उबहतपन्हांस लाजीम बल्के यैन फर्ज खुलासे कलामज्यात ईजानेबाचे बरामतकार होये त्यातच कोसी करावीं हबशी पातशाही नवकर खावंदाचा हुकूम न मानील तर नवकरीवर हर्फ आहे सरकस चाकरास कसी सजा पोहचवावी हे रिवाज आ शाहामतपन्हाचे फिरकयात जर वुल मसल आंहे रा छ २९ साबान जियादा काय लिहीणे हे किताबत

[पाठीवर*] Nana's letter to Admmiral Pocock—the 20th May 1760 dated 15th Ap.

सु. ११६२ जवल २६; }
इ. १७६१ डिसेंबर २४ }

३५

{श. १६८३ मार्गशीर्ष वद्य १३
{इ. १७६१ डिसेंबर २४

नकल फिरंगियाचे तहची [नि. *] विद्यमान रघुनाथ शामराव [पत्राचे वेष्टणावर शेरा*]

तहनामा करारदाद येकबाल व इजलाल पन्हा सिन्योर कोदी विजुरे व कापिता व जनराल दा इंदिये व आजम श्रीमत राजश्री खेम सावंत भोसले सरदेसाई प्रा। कुडाल व माहालानिहाये यांमध्यें व रफाआतपन्हा सक्रतार्य दो इस्ताद बेल चियोर जुजे वास दे कारवाल व इजतदस्तगाहा रघुनाथ शामराव या उभयेता कारभारी याणि आपलाल्या कुल येखतयारीबरहुकूम सख्यसौरसाचा तहनामा फैसल केला बतारीख २४ माहे देजेंब्र सन १७६१ उर्फ छ २६ माहे जमादिलावल सन इसंने

येकबाल व इजलाल पन्हां सिन्योर मनवेल साल दाज्य ये आलबुर्के कोंदी दा येग कापीतां व जनराल दा इंदिये यांसी श्रीमत राजश्री खेम सावंत भोसले सरदेसाई प्रा। कुडाल व माहालानिहाये यांणि कर्तव्यतफावतीमुले आनुताप येऊन आग्रहाचा उपक्रम पुनः पुन्हा करून आपणांदिमत राजश्री रघुनाथ शामराव यामारिफते ज्याहीर केलेवरून पेसजीचे तह कितेक वख्ती बिगाड केलेचे विस्मरण करावे औसे खातिरेस आले याजकरितां कृपाल होऊन आश्रयामध्यें आजम राजश्री सरदेसाई यांसी आंगीकारोन जे त्यांचे वडील सर्वदा हजरत इस्तादाचा आधार प्राप्त पावले होतें त्याच प्रमाणें हाली सिरिस्तेच्या मुदेनसीं चालवावे हेंच चित्तांत आणिलें बितपसील कलमें

हजरत ईस्ताद यामधें व आजम श्रीमत सरदेसाई यांमध्यें जे पेसजी हर कोणही क्षुद्र बिगाडाचे प्रसंग होऊन गेलें ते सर्व दु [त *] र्फा विस्मरण होऊन आविछिन्नभावें श्नेह संदर्भ चालावा तो हजरत ईस्तादांसी चालऊस आजम श्रीमत सरदेसाई आपण व आपले वौशपरंपर देशकत आधिकारी वरून येकनिष्ठेने सर्वदा वर्तुंस कबूल करीत आहेत कलम १

हाली करारदादावरून मागां फैसल होऊन गेलें तारीख ७ माहे आब्रिल सन १७१२ उर्फ छ १ माहे रबिलावल सुा। इसंने आशर मया आलफ व तारीख २५ माहे वोइतुब्र सन १७५४ उर्फ छ ७ माहे मोहरम सुा। खमस खमसैन मया आलफ बतारीख २५ माहे जुल सन १७५९ उर्फ छ २ माहे ज़िल्हेज सुा। तिसा खमसैन मया आलफ या तहच्या कलमापैकी हालीच्यात कांहीं मजकूर कमज्यादा करून तरकड कलमें राहिलीं आसतील ती कुलसारोधार उभयेतानी पालवीं कलम २

सदरहू तहनामा सन १७५४ फैसल जाहाला त्यांतील दुसरे कलमामध्ये क्रिस्तांव

सप्रदाये आपले शास्त्र अभ्यासून सांक्रामेत चालऊस पाद्री मिस्योनार्य यास जागा नेमून द्यावयास आजम श्रीमंत सददेसाई यांही कबूल केलें आसे औसेंही असतां देवदेवतार्चन शात्रधर्म सुधामत चालोस क्रिस्तांव संप्रदाये आसेल तेथ इग्रज बाधोस जागा द्यावयास आजम सरदेसाई रजावंद होत आहेत कलम ३

कुल सोलदाद व खापरी व गुलाम वगैर हजरत इस्तादाच्या राज्यातून पलोन आजम सरदेसाई यांच्या मुलुकास जातील त्या सर्वांस जे सीले भाले व हर कोणही वाडबिशाद नेतील ते आधीकरून वोपून द्यावयास आजम सरदेसाई यांचे देशकत आधिकारी कबूल करीत आहेत मशारनिले आदमीस खून माफ आसे याच बमोजीव आजम सरदेसाई व त्यांचे देसकत आधिकारी यांचे सिपाई वगैर आंकित हजरत इस्तादाच्या राज्यामधें येतील ते वोपून द्यावयास हजरत इस्ताद कबूल करीत आहे कलम ४

आजम श्रीमत राजश्री सरदेसाई यांच्या आरमाराचे सरदार समुद्रांत फिरोन हजरत इस्तादाच्या जत्फाचे व बदरींचा वगैरे जागेतील तराडी सावकारी चालऊस येत जात होती त्यांस मोठा उपद्रव देऊन आपहार करू लागले त्यामुळें मागां विक्षेप येऊन येवढा आतिशये जाहाला याजवास्ते आतःपर महत आरमाराची स्वारी येकंदर मना करितों व थोर तराडींही हजरत इस्तादाच्या रजावंदीविना घडवीत नाहीं म्हणून आजम सरदेसाई कबूल करीत आहेत तेच वजा हजरत इस्तादाचे राजधानीचे कबजाचे बंदरी हर कोठीलहीं तराडीं साहुकारीचे आमदरफ्तीस किंवा भलते प्रसंगी माहालमता घेऊन येतील जातील त्याची लूटलबाडी न करितां येकदर वाट काडीत नाहीं म्हणूनही लम्रीक होत असेत आण समुद्राच्या स्वामित्वपणें हजरत इस्ताद ज्या तराडियास कौल देत आहेत तो पालायास व पालोन देववावयास तैसेच इस्तादाच्या वासालाच्या तराडियास कौल घे औसा आग्रह व वासाल मजकूर मागतील तरीही देणार नाहीं म्हणून आजम सरदेसाई कबूल करीत आहेत ५

हजरत इस्तादाची व यांच्या वात्सालांची तराडीं आजम सरदेसाई यांचे बंदरी जातील त्यांची जकायेत आगर हर कोणही कानुबाव घेऊनये साहुकारी मामल्यान जातील तरी सियोर विजुरै दों रुद्रिग दा कोस्त यांच्या अमलामधे सन १७१२ तह करार जाहाला त्याचे कलम ३ मध्यें उत्धार आलेप्रमाणें जकायेत मात्र रवाजबरहुकूम घ्यावी परंतु तर्फेत येणें जाणेची व साहुकारीची राहादारी लागोन निःसंशये चालावें कलम ६

पेडणें माहालपैकीं सेतें माहाखाजन व खाजन व जरी व मौजे मथ पैकीं सेतें पैर व वातोर्ल व सकेरी खोरजुवेचे किलेच्या मानाखालील सियोर विजुरै मारकेज दे केरिसाल याच्या कारकिर्दीच्या तहनामेतील कलम १३ व १४ मधें सेतें मजकूर इस्तादास वोपून दिलीं आसेत त्याचे भोगवटेकरितां पुन्हां आनमान नसावें याजवास्ते

आजम सरदेसाई आपण व आपुले देशकत आधिकारी यांपासून सदरहू सेताच्या सलासमंद सोडा(डो)न हजरत इस्तादाच्या जफतास शास्वत भोगावयास वोपून देत आहेत ७

आजम राजश्री कृष्ण सावत भोसले सरदेसाई यांस तहत करार केलेंप्रमाणें हर सालीना दोन हजार रुपयें द्यावयास आजम राजश्री सरदेसाई लमीक होत आहेत ८

हजरत इस्तादाच्या फजदार यालास हर सालीना च्यार हजार आसूर्फी द्यावयास आजम श्रीमत सरदेसाई लमीक होत आहेत ये बाबे इस्तादाचे मर्जीमवाफीक व राज्यांतील राहणवाला सारुक जामीन द्यावा सदरहू बेरिजेत हर सालीना दोन घोडे आरबा आगर त्याची कीमत हजार आसुर्फी केण द्यावयास आजम राजश्री सरदेसाई यांही पेसजी करार केला होता तें कलम मजरा आसे कदाचित सदरहू बेरीज येकादे साली फारीक करून न देतां उरले तरी बेरीज मजकूर फारीक करून द्यावी म्हणून हजरत इस्ताद यांणी आजम सरदेसाई यास येक दोन वेल मात्र कलमी करावें ते बमोजीब त्याही फारीक न केलें या त्या येवजी मौजे नारवेपैकी सेत डोणसी व हिंदले व डीगी व मौजे वाइगणीपैकी वाइगणी सेत इतुकी हजरत इस्ताद यांणी खुद आपणीच आपुल्या जप्तखालीं वोपून घ्यावीं त्याजविसीं आजम सरदेसाई आपण व आपले देशकत आधिकारी याही तर्फेने जाजीलग पुढा सेत मजकूरचा सर्व इलाखा सोडून इस्तादास देतील ९

कुल देसाई हजरत इस्तादाचे वासाल यांणी आपुलाली कुल देसकत हक वतन इनामा ज्यास जे येणे ते त्याणी वसूल करून घ्यावे सदर्हू बमोजीब पाडून द्यावयास आजम सरदेसाई लमीक होत आहेत आण देसाई कृष्णाजी जसवंतराव याचे देसकतीविसींचा मजकुराचा कजिया निवडून त्याची देसकत त्या दुमाले होईपर्यंत मारनिलेस आखेरी आजम श्रीमत सरदेसाई यांचे मुलुकी मध्यस्तमारीफते सदरहू देसकती पैकी जो ऐवज द्यावयाच करार केला तो हर सालीना रुपये १२०० आक्षरी बारासे रुपये राव मारनिले दुमाला करावे कलम १०

देसाई सूर्याजी सेणवी सूर्यराव व आनपूर्णा देसाइण याची म्हाल डिचोली येथील देसकत पुर्वील सनदीप्रो व हाली तारीख १६ माहे मजकूर उर्फ छ १७ जमादिलावल सादर जाहालेप्रो सारोधार पालोन द्यावयास आजम सरदेसाई लग्नीक होत आहेत कलम ११

हजरत इस्ताद याणी आजम श्रीमंत सरदेसाई यास ताो पेडणें व ताो डिचोली व तपे साखली माहाल खोतीस देऊन म्हासूल घेत होते त्यास हाली खोती माफ करून सदर्हू माहाल हजरत इस्ताद श्रीमत सरदेसाई यांच्या कबजाच्या कबजास देत आहेत ताो डिचोली पैकी मौजे मये ज्याहपन्हा हजरत भीस्त निशान पादशासाहेबीं ज्यास मेसें

केले आसे तो कुल गाव खेरीज करून हाली ज्याप्रो मेर्से भोगितो त्याच बमोजीब त्यात इस्तादयास सरहद भोगून आली तेही देखील कोट मजकूर देत आहेत आण भाडी व सर्व भाडणाचा सामान व जखिरा इस्तादाचा सदरहू किलेत आसेल तो कुल काढोन हे राजधानीमधें आणावा आण हे मुदे रवाजबरहुकूम जगविख्यात केलेनंतर सदरहू ठाणीं सोडून द्यावी कलम १२

हजरत इस्तादाच्या हुकूमाविना नदीकिनारेचे सरहदीस चौकी अगर मेटे आपण ठेवणार नाहीं व बाधणार नाही आथवा हर कोणीही ठेवितील तरी त्यासही रजावंद होणार नाही म्हणून श्रीमंत सरदेसाई लग्नीक होत आहेत यांत प्रथुक विचार केलेया बेबनाव होईल १३

हजरत इस्ताद यांस आजम सरदेसाई यांणी माहाल मजकूरचे खोतीपैकी आखेरीच्या काडतेलाच्या २५००० पंचवीस हजार आसुर्फ देणे आहे त्यास मुदत दिली पाहिजे म्हणून आजम सरदेसाई यांणी ज्याहीर केलेवरून येक साल मुदत दिली जाती सदरहू बेरीज माहे नोवेंब्रू सन पेस्तर १७६२ उर्फ सलास तिसैन(?)मया आलफमधे फारीक करून घ्यावया वास्ते आजम सरदेसाई यांणी इस्तादाच्या राज्यातील राहणवाला इस्तादाचे मर्जीमवाफीक सारूक जामीन द्यावा कलम १४

हजरत इस्ताद याणी आजम श्रीमत सरदेसाई यांचे माहाल मुलूक काबीज केलें पासून तपे पडणें येथील जकायेत कालवाली तरीवर स्थापून घेतली हाली तपे मजकूर वोपून देता तिकडे आजम सरदेसाई जकायेत मजकूरची मोबादला दुजी जकायेत बसऊन घेत आले हे नूतन कानू इस्तादास आयोग्य आपुले वासाल वगैरे साहुकार माहादाण बारदेस येथे देऊन आणखी घ्यावें हे मुनासीब नव्हे याजवास्ते ते कानू जकायेतीची त्यागून तपे बारदेस येथील माहादाण मुलूक मजकुराची कावजाद करावयाचे आगोदर चाललेंप्रमाणे चालऊन पाळूस हजरत इस्ताद लग्नीक होत आहेत तेच बमोजीब आजम सरदेसाईंही नूतन कानू जकायेत वगैरे स्थलीं न बसवितां पूर्वप्रमाणे चालऊन घेऊस सर्वदा कोताई न करितां लग्नीक होत आहेत इस्तादाने कोलवाल तरीवर जकायेत घेत आले तेप्रमाणे माहे मायू उर्फ जेष्ट मास पर्यंत खोती लावीली आसे तो पाळून मग वोपून घ्यावी १५

आजम सरदेसाई यांस रक्षणेंकारणें दारुगोला पाहिजे आसे हजरत इस्तादाच्या खातिरेस येईल तेव्हा रास्ता किमत घेऊन इदास्तानें दारुगोला द्यावा कलम १६

आजम श्रीमत सरदेसाई यांस जे वख्ती आपलें किल्यांच्या सामानास भलता जिनस पदार्थ इस्तादाच्या बंदीतून न्यावयाचे आगत्य होईल तरी रजा द्यावया कारणें आगोदर ज्याहीर करावे रजा देविली जाईल कलम १७

हजरत इस्तादयाची भाडणी तराडीं यानी राजश्री सरदेसाई यांच्या भाडणी व

साहूकारी तराडियांवर इस्तादाच्या गनिमाचा आगर भलते दाडगे यांचा खिसा पडेल तरी सर्व साह्यता करावी परतू सरदेसाई यांच्या तराडीयानी इस्तादाचे रवाजेबरहुकूम कौल घेऊन फिरावें येणेंच प्रो इस्तादाच्या तराडियास प्रसंग वोढवले या आजम सरदेसाई यांच्या तराडीयानी सर्व साह्यता करावी आण येकमेकांची तराडी भाडणी व साहुकारी सुखरूप येकमेकांच्या बंदरी येऊन जाऊन आपली आनुकूलता करून घ्यावी परंतु भलती आंतराई येसा विचार बहूत तराडी येऊन घेऊन यैसे नसावें कलम १८

हाली सख्यसौरसाचा तहनामा सारोधार पालोन रयेत लोकाची वृधीनादणूक व्हावी हे जरूर याजबदल आजम सरदेसाई सलतनदपन्हां राजे सोंधे यांसी हजरत इस्तादास मकूल होऊनं येकवटोन येकानगीने स्नेहसौरस पुर्ता चालऊस लमीक होत आहेत या मजकूरास हजरत इस्ताद आपण दरम्याने पडोन आपला आश्रये सर्व काल साह्य राजे मजकूर यास पाहिजे होईल ते वख्ती करूस करीत आहेत कलम १९

येणेंप्रमाणें हा तहनामा उ [भ*] ये तर्फेने आविच्छिन्न आढल करार केला आसे याबरहुकूम सिरिस्ते कलमें केलें त्यातील हर कोणही मुदेस तफावत नसावी ती आलेया जे तर्फेस आनुभव येऊन विषाद दिसेल तिकडून येरी तर्फेस येक वेल मात्र ज्याहीर करावे कीं हाली तहनामेस आंतर आले त्याची निभावणी करून सीरोधार पाळून देणे म्हणून आणि मग ज्याहीर केलें असतां निभावणी सरे तैसी न होईल तरी जे तर्फेस विषाद दिसोन येईल त्यांही आपणास वाटेल तैसा विचार करून निभावणी संपादोन घ्यावी म्हणून हजरत इस्ताद व आजम सरदेसाई यां उभयेतर्फेने करारमदार केलेंप्रो चलण-वलण न करितां पालावें सरदेसाई आपण व आपले वौश देसकत आधिकारी याकडून पाळून देतों आसे कबूल करीत आहेत २०

हाली या तहनामेच्या दोन तालका आपल्या निशाणमुद्रा घाळून दुरूस करून यैकी येक हजरत इस्तादाच्या सक्रतारीमधें आसावी व दुसरी आजम श्रीमत राजश्री सरदेसाई यांच्या दप्तरी यावी त्यांत तपसिलवार कलमें केलें तें कुल आविच्छिन्नभावे दढोत्कारे आनमान न पावतां सीरोधार सख्यसौरसाचा तह पालोन यावे या कारणें मागील सर्व बिगाड व विषादाचे प्रसंग येकदर विस्मरण उभयेतर्फेन करून स्नेहभावे आविछिन्नपणें दढोतरप्रकारें दुतर्फा वर्तावे छ २६ माहे जमादिलावल सुहूर सन ईसने सितैन मया आलफ

सु. [११*] ६५ शाबान ७ | ३६ श्री | श. १६८६ माघ शुद्ध ८ इ. १७६५ जानेवारी २९

[बा. अ. वा. शि.*]

राजश्री खेम सावंत भोंसले सरदेसाई प्रा कुडाल माहालानिहाये गोसावी यांसि

दं अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य प्रति राजश्री [मो. जा. *] उपरी तुम्हीं विनंति पत्र पाठविलें ते प्रविष्ट होऊन लेखनाभिप्राये अवगत जाहाला जंजिरें सिधुदुर्गास इंग्रेज व राजश्री रामाजी माहादेव ऐसे जलमार्गी जाहाजावरून येकायेकीयेऊन जंजिरेसी दुर्बुधी धरून मेंढा व सर्ज्याकोट हस्तगत करून जजिरेवरी मारगिरी करीत आहेत हे वर्तमान आम्हास डिचोलींस कलतांच येथून कूच करून जंजिरेच्या उपराले फौजसुधा जात आहों म्हणून विनंतिपत्री लिहिलें त्यावरून स्वामीस परम संतोष जाहाला ऐशास तुम्हीं पुरातन वतनदार तुमच्या वडिलानी स्वामिकार्यें केली आहेत हाली तुम्हीं जमावानिसी जंजिरे मजकुरास सामील होणे आणि हुजुरून राजश्री येसाजी सिंदे सुभेदार जमावसुधा पा आहेत ते सविस्तर आज्ञेप्रमाणें सांगतील त्याप्रा कार्य करणें [नि*] जाणिजे छ ७ माहे शा [वा*] न सुा खमस सितेन [नि. *] बहुत काय लिहिणें [ष. मो.*] मर्या देयं विरा जते

सुरू सूद बार समत सूद बार

सु. ११६८ रमजान २ | ३७ श्री | श. १६८९ माघ शुद्ध ४ इ. १७६८ जानेवारी २३

[वा. वा. उलट्यानचा शि.*] राजाराम नरप। ती हर्षनिधान माध। वराव बल्लाळ मु। ख्य प्रधान।

राजश्री खेम सावंत भोंसले सरदेशाई प्रां कुडाल माहाये गोसावी यांसि

दं अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य [मो. जा.*] श्री माधवराव बलाल प्रधान आशीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहिणें विशेष प्रां मजकुरी ब्राम्हण मुलीचा पैका घेऊन लग्न करितात यैसा लौकिक फार आहे यैशास हे गोष्टी शास्त्रविरुद्ध कदापि करू नये यास्तव हें पत्र सादर केलें असे तरी तुम्हीं प्रां मजकुरी वगैरे आपणांकडील ताळुकियांत तमाम ब्राम्हणांस ताकीद करून कन्येचे धन घेऊन विवाह न करी तें करणें आणि जो धन घेऊन लग्न करील त्यास परिछिन्न शासन केलें जाईल तुम्ही येविशीं येथास्थित बंदोबस्त करणें मुलीचें धन घेऊन लग्न करील त्यास ब्रांम्हणांकडून अपांक्त करऊन वालीत घालवणे [नि.*] जाणिजे छ २ रमजान सुा समान सितैन मया व अलफ [नि*] बहुतकाय लिहिणे [वा*] लेखन सिमा

इ. १७६८ } आक्टोबर १० }

३८
श्री

{ श. १६९० भाद्रपद वद्य ३०
{ इ. १७६८ आक्टोबर १०

तालीक

तहनामा सौरसाचा तेरीख २४ माहे दजेंब्रु १७६५ सनी फैसल जाहला याचा जिनोधार करार येकबाल व इजलाल पन्हा सियोर दों जुवाव जुजे द मेर गोवर्णदोर कापितां जनराल दो इस्ताद दा इंदे यामध्ये व आजम खेम सावत भोंसलें सरदेसाई प्रात कुडांल व माहालानिहय यामध्ये ता। १० माहे वेतुव्र सन १७६८ शाहमतपन्हा सक्तार्य दो इस्ताद येरीक जुजे येकदाजे बाने विदसिर्न व आजम अनंत रामचंद्र सबनीस व इजतआसार सिदो पंडीत व दताजी प्रभू मतकरी सातरडे व नांरायेण मलजी उभयेतर्फेचे वकील आपापले कुल येख्तरीबरहुंकूम कलमाची वाजपुसीस आणोन त्यामधीला कांही कंमज़िआंदा केलची त्रितपसील

येकबाल व इजलाल पन्हा सियोर दो जुवाव जुजे द मेल दरगाहा आस्मानूं ज्याह-पन्हा पादशाहा साहेबाचा कोशेल जोर व गोवर्णदोर ये कापितां जनराल दो इस्ताद दा इदे यांचा द्रुढ निशां जाहला की आजम खेम सावंत भोसले सरदेसाई प्रां कुडाल माहालानिहाय याच्या चिती माहे दजब्रु १७६१ संनी सौरसाचा तह करार जाहला तो सारोधार चालवावा याचा काही मा।र राहिला तो {तो} ही सुदारून घावा यैस सागून पाठविल याजवरून उभयेतर्फेच नादनूक वास्ते निकालस मणोदय दर्शविले म्हणौन करुणापूर्वक आंगिकारीत आहेत

१

सदरहू सौरश तह मारी करार केलबरहुकूम आजम सरंदेसाई यानी येकभावे सारोधार स्थिर चालऊन घ्यावा यांत आजम संरदेसाई याचे मुलूंक व कबजातील राह-णारवाले पासून भलत्यास ठीक विचार होऊन बिगाड होऊन केल आणि आपणाकडून नव्हे या व त्यावरून यैशा सबब सांगूस कारण नाही

२

सौरसाचा तहनामा मा।र ता। छ २४ माहे दजेब्रु १७६५ सनी करार जाहाल्यां-मधील कलम ५ व कलम ९ व कलमे १० हे पुर्ती पाळून दिल्हीं नाहीत यैस आजम सरदेसाई याचे खातरस आले काजे कलमे ५ याजविशी हजरत इस्तादाचे वासाद सावकार याच्या तरांडियास कौल न घावा जर येकादा सावकार आपल्या तरांडियासी आतमसंतोष कौल [अपूर्ण*]

मु. ११७० रमजान २९ } ३९ श्री { श. १६९१ माघ शुद्ध १ इ. १७७० जानेवारी २७

[पत्राच्या शेवटीं डाव्या अंगास ले. ३७ प्रमाणें ' मुख्य ' शब्द कमी असलेला शि. व मो.*]

राजश्री खेम सावत भोसलें सरदेसाई प्रां कुडाल वगैरे मोहाये गोसावी यांसि

र्दु अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य [मो. जा.*] श्री माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणौन स्वकीय कुशल लिहीत जाणें विशेष गोपालजी आंगरे तुमचे प्रांतात राहून गुदस्तापासून सरकारताल्लुकियात उपद्रव करू लागले त्यावरून सरकारचे अमलदारानी तुम्हांस येविसी लिहिले तेव्हा तुम्ही बदोबस्तहि केलात असे असोन मागती गोपालजी आंगरे तुमच्या मुलकातून सरकारचे ताल्लुकियास तोसीस लावितात म्हणौन मामलेदार हुजूर लिहितात अैशियास तुमची येकनिष्ठा सरकारात असता आंगरे तुमच्या माहालात राहून उपसर्ग लावितात आणि तुम्ही त्याचे पारपत्य करीत नाही हे उतम नसे तरी पत्र पावताच गोपालजी आगरे याचा शोध करून धरून हुजूर पाठवून देणे व पुन्हा त्याचा सरकारताल्लुकियात काडीमात्र उपसर्ग न होये ते करणे [नि. *] जाणिजे छ २९ रमजान सुा सबैन मया व अलफ [नि.*] बहुत काय लिहिणें

} ४० । { इ. १७७२ सुमार

हजरत इस्ताद व अजम खेम सावंत भोसले सरदेसाई पा कुडाळ यांमधें शाश्वत सख्य होऊन यावयाचा करिणा विता

अजम सरदेसाई खेमसावंत ज्याप्रमाणें आपले पूर्वज रामचंद्र सावंत सरदेसाई यांही ते २५ वोईतुब्र १७५४ वरुसी सियोर विजरै कोंद दे आल्व यांकडे केले तहनामेत डिचोली माहाल व साखली माहाल व हलवर्णचा कोट सोडून दिला त्याच तहनाम्याचा पुन्हा क़रार ते २६ जुलै सन १७५९ वरुसीं सियोर विजुरै कोंद दा यगयांकडे अजम सरदेसाई खेम सावंत यांणी केला त्याचप्रो हालीही अजम खेम सावंत भोसले सरदेसाई डिचोली माहाल व साखली माहाल व हलवर्णचा कोट हजरत इस्तादांस सोडून देत आहेत यांत अजम सरदेसाई खेम सावंत संदेह धरणार नाहींत कां तर सदरहू माहाल व कोट फिराऊन घ्यावयाची योजणा सुधामत प्रकारे योजितात म्हणून व वर्तमानकालींच्या गोवर्णदोरापासून सदरहूप्रमाणें सदरहू माहाल व कोट फिराऊन देवत नाहीं म्हणून याचे सबबेचें कारण काय तें अजम सरदेसाई यांस दखल आहे यावर ज्या

उपायें करून ते २४ देजेंब्र १७६१ वरुसींच्या तहनामें वरून प्राप्त जाहाले त्याच उपायें प्राप्त होतील या भरवसेने राहवेयास सरे

हजरत इस्ताद २४ देजेंब्र १७६१ वरुसींच्या तहनामेच्या साऱ्या कलमांत जें जे लिहिलें तें पाळून देऊस कबूल आहेत याखेरीज तेच तहनामेच्या १८ व्या कलमामधें लिहिलेचा विशेषात्कार केला जातो जें उभय तर्फेनें येकमेकास आपआपल्या जमावानसीं ठाकेल त्या प्रो जेवढा जमाव देऊस अनकूल पडेल तो समय व दिकतपरत्वे देऊन कुमक केली जाईल परंतू जेव्हा यरोपीनासांव म्हणजे विलायती टोपीकर यांवर विरुद्ध वाजबी व गैर वाजबी उपयोगास होईल तर हजरत इस्ताद सदरहू जमावाची कुमक देऊस लग्नीक होणार नाहींत

हजरत इस्ताद यांस इछा जें तगा व सल्ला आसावा आण व्हदाचे मूल पुढें नासून जावें याजकरितां मागील खंडणा आजम सरदेसाई याणी द्यावी ते नीतीने हजरत इस्ताद याणी घेऊस सरे ते माफ करीत आहेत अकरा वर्षाचीं हर साल च्यार हजार असुरफ्याप्रो चोवेच्यालिस हजार होत आहेत याच बरहुकूम या तहाची तेरीख-पर्यंत जोरीनें जे जे घेतले त्याची किमतही माप केली आहे त्याचा तपसील या बाऱ्या कागदीं आहे ज्याप्रो सियोर विजरै कोंद दे आल्व या कडे तहनामा केला त्याप्रो

अजम सरदेसाई याची योजणा आहे जे डिचोली माहाल व साखली माहाल व हलवर्णचा कोट पादशासाहेबी आपणास फिराऊन द्यावा यविषईं प्रथक गुद्यानें लिहिलें जाईल आणि हालीचे गोवर्णदोर आपले विद्यमाने अजम सरदेसाई याचें पत्र पाठवितील व अजम सरदेसाई यांचे उपयोगी व ममतेचे रहस्यें लिहून पाठवितील

हजरत इस्ताद यांकडील सोलदाद पळून अजम सरदेसाई याच्या प्रांतात जातील ते वोपून द्यावें व उभय तर्फेचे गुलाम बंदी व वर्कड माणूस पळून गेले आले वर बौ नेल्या वस्तूसहीत वोपिलें जातील

हजरत इस्ताद हलवर्णचा कोट वेगला करून पेडणें माहालामधें जें भोगवटेस आहेत ते सर्व अजम सरदेसाई यास सोडून देतील कां जे हें सेवटी हालीच्या गोवर्न-दोरच्या मुदतीमधें काबीज केलें होतें म्हणून वाईडोंगर मोरजी वगैर पेडणीच्या रयतीस अजम सरदेसाई यांच्या थोरपणावरून काही उपसर्ग बाधणार नाहीत कांतर ते रयत अजम सरदेसाई यांवर बदलाम जाहाले नाहीत शमशर जोरी पासून हजरत इस्तादाचे अंकित जाहाले होते म्हणून

अजम सरदेसाई आपल्या मुलूकांत क्रिस्तांव लोकांचा धर्म तेथे क्रिस्तांव लोक आहेत त्यांस चालऊस देतील आणि मिसीयोनार पाद्री यांस सुरक्षीत चालऊन पुरातन सता होती त्यांत कमी करणार नाहींत व क्रिस्तांव लोकांची करणे व ऊस्तवारी करूं देतील आण इग्रजीही बांधू देतील.

हजरत इस्ताद याचे वसाल जे देसाई आहेत त्याच्या देसगतीचा माहासूल अजम सरदेसाई यांच्या मुलूकांत आसेल तो त्यास वसूल करूंस देतील कां तर उघड गोष्ट आहे जे इछेसारखे उभयतर्फेमध्यें सख्य होऊन येका प्रांताच्या खावदापासोन दुसरे प्राताचे रयत उतमपणच्या गुणानुभवास पावले आसतां हजरत इस्तादाचें वसाल देसाई आपापल्या देसगतीच्या मासुला खेरीज नसावे कांतर दोस्तदारांच्या व घरोब्याच्या संस्थानांत चाकरी करून आहेत म्हणून

डिचोली साखली व कांसरपाल येथील जकादीस अजम सरदेसाई यांच्या तर्फेने जाजती वगैररी न होता येक जकाद पुरातन चालिले प्रो सारोत्धार चालू दिले जाईल

प्रथक पत्रीं कलम

हजरत इस्ताद अजम सरदेसाई यांच्या गर्जेवर नजर देऊन च्यालीस हजार रुपे कर्ज देऊंस संदेह धरणार नाहींत ते अजम सरदेसाई याणी ६ साहा वर्षांमधें फारीक करून द्यावे त्या बेरीजेचे कतबे पत्रें करून द्यावे व त्यास फारीक करून ऐवज नेमून द्यावा ते अजम सरदेसाई यांस सुलभ होऊस पेडणें माहालचा दस्त नेमून द्यावा त्या प्रो सदरहू कर्जाचे फारीकातीस साहा सालांमध्यें दरसालास सदरहू माहालच्या माहासलाचा चौथा वांटा हजरत इस्ताद वसूल घेतील आणि पुढें कांहीं या मजकुरांत संदेह किंवा व्यवहार न येणें बदल अजम सरदेसाई यांणी सदरहू माहालची खोती हजरत इस्ताद आपला वसाल करार करून सांगतील त्यास द्यावा या गोस्टीस अजम सरदेसाई संदेह पावणार नाहींत कां तर सदरहू माहाल खाईम भोगवटेस आपणाकडेस चालतो म्हणून परंतू अजम सरदेसाई याच्या चितांत माहाल हजरत इस्तादांच्या वसालास खोती न द्यावा आणि चौथा भाग म्हालच्या म्हासलाचा नेमून ही न द्यावा आसें मानिल तेव्हा आजम सरदेसाई सदरहू रुपयांचे बेरीजेस बारा धनवंत जामीन देऊन रवाज बरहुकूम कालांतर देऊस लगीक होतील

सु. ११७३ जवल २८ } ४१ श्री. { श. १६९४ श्रावण वद्य ३० इ. १७७२ आगस्ट २८

[पत्राच्या पाठीवर ले. ३९ प्रमाणें शि. व मो.*]

राजश्री खेम सावंत भोसले सरदेसाई पा कुडाल व माहाये गोसि

ई अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य [मो. जा.*] श्री माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष तुमचे निष्ठेचा मजकूर राजश्री विसाजी केशव व मोरो गिरमाजी याणी हुजूर निवेदन केला तो

कलला अशास पहिल्यापासून तुम्ही सरकारचे लक्षात आहा पुढेहि याप्रोच लक्ष धरून चालाल तुमचे निष्ठेची खातरजमा आहे तिगस्तापासून गोवेकर फिरंगियाने सरकारचे लक्ष सोडून मनस्वी वर्तणूक करितो हे ठीक नसे तिकडील बंदोबस्त तुमचे हातून करावा हे सरकारचे लक्ष तरी तुम्ही मन घालून बंदोबस्त करणे सरकारातूनही पुस्तपन्हा होईल येविसी सविस्तर राजश्री नारायेण भास्कर याजवल सागून पाठविले आहेत हे सागता कलेल तुमचे कदीम लोक आहेत त्याचे समाधान करून सरकार-उपयोगी पडेत ते करणे [नि*] जाणिजे छ २८ जमादिलावल सुा सलास सबैन मया व अलफ [नि*] बहूत काय लिहिणे

४२
तालीक

{ श. १६९६
{ इ. १७७४

याददास्त मुदे इस्तकबीर कैतान दे मेल विजुरई तागायत दों जुवांव जूझे देमेल गोवेर्नोदोर पात्रे तंवं जाहाली हकीकत जाहीर व्हावी बिताा

कैतान दे मेल विजुरई हे राजधानीस आले त्याणी ईजानेबांकडेस फोंडें प्रांत होता तो बलकरीने घेऊन सवदेकार यास दिला व डिचोली महालातील खोरजुवें गांव व पनाळें हे दोनही इस्तादाकडेस ठेविलीं व आग्रोणेचा कोट मोडून लोक मारिले व ईजानेबांचा मुलूक दर्याकिनारेचा कुलीं आरमार पाठऊन जाळोन भंगविला हे त्याचे मुदतीत जाहाले कलम १

दों रुद्रीग दा कोस्त याचे मुदतींत हर सालिना घोडे दोन नाहीं तर हजार असर्फी हर सालिना खात्री म्हणोन लिहोन घेतलें तें कलम आजपरीयेत तैसेंच चालिलें कलम २

जुवाव दे सालदा ज्य याचे मुदतीत डिचोलीचा कोट घेऊन व माहाल कुलीं वोस केला नाग सावंत सरदेसाई यांस हाती धरून कोट मजकूर त्यास देऊन आमचा नाग-वावयास लाविला कलम ३

मार्केज दे कैरीसाल विजुरई इंदीस आले त्याचे मुदतीत ईजानेबांतर्फेची तीन सेतां सयेंतील व म्हाखाजन व बोजरीचे खाजन येकून पांच घेतलीं तीं अजोन इस्ताद भोगत आहे कलम ४

मार्केज हलोर्ण विजुरई इंदीस आले त्याचे मुदतीत दिचोलीचा कोट व हलवणेचा कोट व रेडीचा किला व तेरेखोलचा कोट व निवतीचा किला व आवाडेचा कोट व मोरलेंचा गड घेऊन व कुलीं आरमार व भाडीं व रेडीचे किलेवरील सर्व संरंजाम व बरकंड कोटकिले सर्व संरंजाम व रेडीचा किला वोलीस दिला त्यावरील माहाल सर्व

मोजदाद करून इस्तादाने आपलेकडेस ठेवणीदाखल ठेऊन घेतला किला } किला } देते समई सर्व यावें हा करार केला असतां फिरून किला ईजानेबांकडेस बहूत वर्सांनी दिला वरकड काहीं दिलें नाहीं इस्तादाकडे तैसेंच अद्यापवेर राहिलें आहे व बहूत वर्षें माहालमुलूक वोशाड पाडला व वसांत जाहालेली इस्तादास भोगली कलम ५

कोंदी दे आल्व विजुरई इंदीस आले त्याणी रेडीचा किला व निवतीचा किला ईजानेबांस देऊन वरकड इस्तादातर्फेस ठेऊन घेतलें कलम ६

त्या उपर गोवेर्नोदोर तिग जण अमले करावयास लागले त्याचे मुदतीत मराठेनीं ईजानेबांच्या राहिल्या मुलुकावर चाल केली त्या समई ईजानेबीं अर्ज इस्तादाकडेस केला कीं आमंचे माहाल व कोट इस्ताद भोगतो आम्ही पडोसीचे राहाणवाले आमंचा राहिला मुलूक त्यावर गनीम आला तर इस्तादाने आपल्या पडोसीकरांवर नीतीन साह्य करावयास सरे त्यात माहाल व किले आमंचे इस्तादाने घेतले त्यामुलें आम्ही निर्बल पडलों ऐसें जाणोन मराठे येऊन आल्यावर इस्ताद आमंचा अभिमान धरून साह्य जेव्हां न करी तेव्हां पडोसीकरांचें अगत्य इस्तादास नाहीं ऐसें कळों आलें आपल्या बलानें मराठेसीं ईजानेब जुजोन त्यांस पराभव पाऊन आपला किला सिधगडही त्याकडून घेतला आपल्या समयास संकटास इस्ताद जेव्हां साहित्य न करी आण माहाल व कोट अनभवितो यास्तवं ईज्यानेबीं हा मजकूर इस्तादास कलऊन मग आपले माहाल काबीज केले कलम ७

त्याउपर कोंदी दायग विजुरई इंदीस आले त्याचे मुदतीत ईजानेबीं आपल्या श्रमाची हकीकत अर्ज पुर्तुगालास लिहून पाठविली तेथून अलंमपन्हां मेहरवान होऊन आमंचे किले व माहाल आम्हांस देविले असतां कोंदी दायग यांणी कोट तेरेखालचा मर्दनगड पुढा घेणार या साहित्यास भौसुले पाहिजेत या कारणास्तव कोटे तेरेखोलचा ठेऊन घेऊन हलवर्ण व दिचोलीचा कोट दोनही दिले तेरेखोलचा कागद करून दिला जे मर्दनगडची मसलत जाहालेनंतर सोडोन देऊं म्हणोन कागद करून दिला त्याउपर मर्दनगडाची मसलत इस्तादाने केली त्या समई ईजानेबांकडील जमाव इस्तादास जितुका पाहिजे तितुका नेला वरकड भारी फौज साखळीस ठेविली निमित्य जे मराठेची कुमक येईल म्हणून त्याच समई गोपालराव बरवे राघोबादादाचे मेहुणे येऊन दाखल जाहाले व त्यांचे बंधू बाजीराव बरवे हे भारी फौजेनसीं घाटमाथां आले असतां ईज्यानेबीं घाट बंद करून गोपालराव बरवे यासिच रखवाली करून साखळीसच ठेऊन घेऊन मर्दनगड इस्तादास हस्तगत होतांच गोपालराव बरवे यांची समजाविसी करून इस्तादास भेटून घालविला ईजानेबांचा जमाव प्रख्यात इस्तादाकडेस मर्दनगडास गेला व फौज कुमकेस उतरूं दिली नाहीं बजमाव आपणास साखळीत रखवाळीस ठेविला सर्व केर्तुत्व मर्दनगड जावयाचें भौसुले यांणीं केलें म्हणोन गोपालराव बरवे याणी जाऊन पुनेस जाहीर केलें त्यामुलें अद्यापवेर मराठेचा आरोप ईजानेबांवर तसाच राहिला पुढां फोंडे प्रांत घ्यावयास

धुलप फौजेनसीं आला तो मार्ग उतरावयास मागत असतां दिला नाहीं फोंडेंप्रांताची व वरकड खबरदारी मार्गाची करणेंविसीं इस्तादातर्फेस वारंवार सूचना पुरविली आण धुळपास घाट चडऊन आपले लोक बरोबर देऊन घालविला मर्दनगड तालुका व तो प्रांत इस्ताद कुलीं अनभवितात मराठेकडील दावा आम्हांकडेस राहिला असे ऐसे असोन कोट तेरेखोल अद्याप इस्ताद देत नाही पाऊसकाल सरतांच कोट मजकूरचें सामान आणोन कोट स्वाधीन करावा म्हणोन इस्तादाची वोडद तेरेखोलच्या कोटास लागली होती त्याउपर इंग्रेज रेडीस आला त्या समई आमंचे व इंग्रेजाचें युध्य होऊं लागलें असतां इस्तादातर्फेनें आमंचें साहित्य केलें नाहीं आणि गावतळें व कणियाळें आपले कडेस घेतलें व आमंची गुराब आरवंदेस होती ती नेली व त्याच समई कोट हलवर्ण इंग्रेज घेईल तो मोडावा म्हणून इस्तादातर्फेनें सागणें पावलें तें आम्हीं मान्य केले इस्तादाने कोट मोडोन सामानही नेलें तेच वक्ती जैतोजी राणा यास डिचोलीच्या कोटास भाडावयास लाविला पेडणेचे वतनदार यांकरवी पेडणें माहाल पारका केला दोनही माहालची खराबी करविली त्याप्रमाणे त्याच्या अमलांत जाहालें याखेरीज आम्हांकडून दीडलक्ष असरफी फजेदास घेतली कलम ८

त्याउपर दो जुवाव जुजे देमेल गोवेर्नोदोर जाहाले त्याच्या अमलांत त्याणी पेडणें व डिचोली माहालचे वतनदार आपले खालीं करून आम्हांकडस भाडावयास लाविले व माहालही आपल्या वासालांस देविले व माहालचा वसूलही सबब लावून इस्तादाकडेस घेतला व वतनदार या करवींही खावविला व इस्तादाच्या जमावासही मुशाहिरा माहा-लातील पैका देवविला व माहालचे रयेतीस नागऊन खराब केली त्याच्या अमलामध्यें माहाल सुरळीत आम्हांस भोगूं दिला नाहीं व त्याच्या अमलांतील बाकी अजोन गोपाल सेणवी धुमा व पेडणे माहालचे वतनदार यांकडेस आहे ती अद्याप येत नाहीं डिचोलीचा कोटही त्याणी इस्तादाकडेस घेऊन सेवट सबब लाऊन पैका ५३८९८ असरफी फजेदास घेतली आहे कलम ९

आतां मोहिबा हे राजधानीस आले मोहिबांचे गूण व कर्तुत्व व थोरपण व नीतीस खरेपण व भूतदया सर्वगुणी संपन्न ही ख्यात आम्हीं बहुतमुखीं ऐकिली व निदर्शनास ही आली तेव्हां आम्हांतर्फेची कुलीं हकीकत इा तागायेत आजपरियंत इंदीस विजुरई आले व गोवेर्नोदोर जाहाले त्याच्या त्याच्या अमलामध्यें आम्हांतर्फेस जो अतताप जाहाला तो मोहिबांस सर्व कलावा यास्तव सदरहु कार्याकारण तफसीलवार कलमे लिहिलीं आहेत हीं मोहिबीं विवेकांत आणावीं मुख्य गोष्ट आजपरियेंत वडिलापासोन इस्तादाचे पडोसीचे हरयेक समयास इस्तादाच्या कार्यास उपयोगी पडणार व पडलेही आहेत असें असोन ज्याणी हे राजधानीस अमल केला त्याणी आणखी काहीं केलें नाहीं ईजाने-बांचेच दुमालेस लागून प्रांतही ईजानेबांचा दौलत खराबीस लाविली परंतू ईजानेबांच्या वडिलांपासून आजीलग इस्तादाकडेस महद अंतर पडों दिलें नाहीं समयपरत्वें पडोसीच्या

विचारामुळें किंचित अंतर पडोन आले असलेया त्याच समईं परिहर करून पुढां इस्तादाच्या श्नेहांत वर्तत आलों ईजानेबांच्या राज्यावर परकी गनीम कितेक वेळां चढाई करून आले परंतु इस्तादाकडोन साहित्य घडोन आलें नाहीं आपल्याच बळावर त्यासीं लडाई करून पराभव पावऊन पुन्हां इस्तादाचा श्नेहाची जोड केली ईजानेबांतर्फेचे वतनदार तेच इस्तादाचे वासाल याणी आपलीं वतनें पुरातनपासून अनुभऊन सुखरूप राहावें तें न करितां इस्तादामध्यें व ईजानेबांमध्यें येकादे समईं विपर्यास आला त्या समयांत आपला स्वार्थ जिकडून होईल तिकडेस मिलोन उभये प्रातांत पुडावके करून रयेतीस नागवितात येणेप्रमाणे आजीलग करीत आले पुढांही तेंच कर्म करावयास चुकणार नाहींत याचप्रमाणे त्याणी उभयेपेक्षीच्या कज्यांत नूतन वतनें साधिलीं आहेत हें मोहिबीं पुर्तें विवेकांत आणावें पुढांही उभयतर्फेत विपर्यास येतो म्हणोन वाट पाहतात व त्या आच्यरणामध्यें आहेत ज्या पक्षास स्वार्थ होईल तिकडेस मिलतील उभय पक्षी कलह लाववयाचे मार्गापासून व पुढां हे वतनदार यामुळें इस्तादासही स्वार्थ नाहीं व ईजानेबांसही यामुले उभय पक्षींची मुलकाची व रयेतीची खराबीच होत आली आहे इस्ताद व ईजानेब पहिल्यापासून अक्त्रीम येकदिलपणे वर्तते तर इस्तादाचीही किफायेत उदंड होती व ईजानेबांचीही होती हें उभय पक्षीं चित्तांत दुतर्फाही न आणितां अभिमान करून विरोधच वाढवीत गेले त्यामुळें ईजानेब बहूत खराबीस आले व इस्तादासही बहूत हाण होत गेली परतू इस्ताद बहू समर्थ ईजानेब संस्थानिक ईजानेबांचे फौजेचा खर्च भारी व मुलकाची जमे थोडकी खर्च पुरवत नाहीं त्यातील ऐवज इस्तादाकडेस गेला बाकी राहिले माहालात इस्तादाच्या आश्रयेंकरून वतनदारानी पुडावके करून रयेत नागऊन माहाल खराबीस आणिलें परंतू ईजानेबीं आजपरियेंत सर्व कसाला सोसून आपली फौज कमी होऊं न देतां राखोन पर्की गनिमासीं आपल्या जोरेनें पराभव पावऊन इस्तादाच्या पडोसीस आजीलग श्नेहभावें राहून पुढां हीच उमेद ईजानेब हीच धरीत आहेत जे इस्तादाच्या मनोदयानुरूप येकांदे मातबर काम करून दाखवावें तेणे करून नूतन मेर्से व इनाम पावावें हे ईजानेबाचें दृढ मानस आहे तेव्हां कदीम आपले इस्तादाकडेस राहिलें आहे ते इस्तादानें ईजानेबांस थोर मन करून यावें तेणेंकरून ईजानेब इस्तादाचे पडोसीस सदा सर्वदा हुशार राहोन येकभावें इस्तादासी वर्ततील तेणेंकरून परकी गनीम इस्तादांचे सर्दीस पाऊं देणार नाहींत हेंच किफायेत इस्तादाची आहे ईज्यानेब अंतःकर्णपुरस्कर इस्तादासीं अनकूल आहेत तेव्हां नूतन सिबंदी इस्तादास ठेवावी लागत नाहीं व परकी गनिमाचाही संदेह वागवावा लागत नाहीं हेच किफायेत इस्तादानें आपली आण अथःपर ईजानेबीं आपलें सर्व चितांतील होतें ते मोहिबांस उघड कळावें याकरितां लिहून पाठविलें असे आजीलग ईजानेबांतर्फेनें याप्रकारें लिहिलें नाहीं याचें कारण जें इस्तादातर्फेचे अमल चालवीत होते त्याकडौन सुधामत होणार नाहीं यास्तव लिहावयाचें कारण नाहीं आतां मोहिबांचा विस्वास

ईजानेबांचा भरवसा दृढ दिसोन आला जे इस्तादाचे स्वहित राखोन ईजानेबाचाही कार्यभाग मनोदयाप्रमाणे सदरहू कलमे लिहिलीं आहेत तीं विवेकांत आणोन नीतीन सुधा करून देतील हा भरवसा ईजानेबीं दृढ धरून निघानीचें लिहिणें ते लिहिलें आहे मोहिब लिहिला मजकूर विवेकांत आणोन करितील हा निशा ईजानेबांचा आहे कदाचित कोणी लिहिल्या मजकुरात विपर्यास सागून मोहिबांच्या चितांत संदेह आण्तिील तर ईजानेब आपल्या निखालसपणे मोहिबाच्या वचनात आहों हा खातरनिशा असों द्यावा तेव्हां संदेह आणावयाचें कारणच नाहीं ईजानेबाचे सरदार व मातबर लोक व फौज मोहिबांची व ईजानेबांची मुलाकत होईल ते वख्तीं मोहिब पाहतील तेव्हां मोहिबांचा निशा होऊन संतोष पावतील इस्तादाच्या व ईजानेबाच्या विरोधामुळें ईजानेबाची दौल [त *] खोरीस आलियामुळें ईजानेबाचें दौलतीस कर्ज बहूत जाहालें आहे हेंही मोहिबांस मालूम असावें या समयांत इस्ताद व ईजानेब येकदिल होतील आण मसलतीचा अंगेज करितील तर पादशाही काम मातबर व्हावयास समय हाच आहे कलम १०

येकून कलमे दाहा लिहिली आहेत याखेरीज ईजानेबांतर्फेचे मुदे आलाहिदा लिहिले आहेत

सु. ११७५ रमजान ६	४३ श्री	श. १६९६ कार्तिक शुद्ध ८ इ. १७७४ नोव्हेंबर ११

[ले. ३७ प्रमाणे शि. व मो. *]

राजश्री खेम सावत भोसलें सरदेसाई प्रां कुडाल वगैरे माहालानिहाय गोसावी यांसि

ई अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य [मो. जा.*] स्नो माधवराव नारायण प्रधान आसिर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष पत्र पाठविले ते प्रविष्ट जाहले गोव्यास नवा फिरंगी लडाईचे सामान सरंजाम व हजार बारासे फिरंगी माणूस बरोबर घेऊन आला आहे त्याचा इरादा सरकारचे स्थलाचे गला पडावयाचा आहे. येविसीची तहकीक बातमी आली म्हणौन विस्तारें लिहिलें ते विदीत जाहले अैशास मुदाम बातमी आणून स्नेहाचे जागा लिहिले व राजश्री जानराव धुलप यासही विजैयदुर्गी आरमाराचा बंदोबस्त करून सावध राहावयाविसी पत्र पाठविले उतम केले पहिलेपासून स्नेहघरोबा चालत आला आहे त्यास हेच उचीतर आहे तुमचे लिहिल्यावरून धुलप मारनिलेस आज्ञा करून आरमाराची तयारी दरोबस्त सामानसरजाम मजबूद करविला असे विजैदुर्ग वसई साष्टी वगैरे बंदर किनारियाचे गड कोट किले

यासही खबरदार राहण्याविशी पत्रें सादर केली असत गोवेवाले याची बातमी तुम्हांकडे आहेच इकडे व खुलपास लेहून पाठवीत जावी तुलाजी आंगरे याचे लेक तुमचे प्रांतात राहून लोक ठेवितात तेव्हां सरकारचे ताळुकियात उपसर्ग करणार असे दिसते त्यास ते तुमचे ताळुकियात राहून इकडे उपसर्ग करावयास लोक ठेवीत असता तुम्ही ठेऊ द्यावें मना न करावें हे गोष्ट उतम नाहीं जरब देऊन त्याजला आपले ताळुकियातून घालवणें आगर धरणें हे जरूर तुम्हासच केले पाहिजे तरी उपद्रव न होये ते करावे [नि*] रा। छ ६ रमजान सुा। खमस सबैन मया व अलफ [नि*] बहूत काय लिहिणे

पौ छ २५ रमजान

मार्गशीर्ष; सवाल १	४४ श्री [नि*] रामचंद्र	श. १६९६ मार्गशीर्ष शुद्ध २ इ. १७७४ डिसेंबर ५

[पत्राच्या शेवटाकडून आठव्या ओळीच्या डावीकडे बा. वा. शि.*] श्री सीतारा । मचरण राम । चद्र नीळक । ठ शरण

राजश्री खेम सावंत भोसले सरदेसाई पाा कुडाल माहालानिहाय गोसावी यांसि

र्द सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य [मो. जा.*] श्रा। सुबराव कृष्ण अमात्य हुकूमतपन्हा आसिर्वाद विंनति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन केलें पाहिजे विशेष आपण पत्र पाठविले तें पावौन बहूत संतोष जाहला राजश्री राम सावंत भोसले याजसमागमें लोक देऊन पाठविले ते जमावसुधा येऊन पोंहचले समयास आजपावेतो साहित्य होऊन संस्थानचें संरक्षण आपणांकडून होत आले तदन्वयेंच येकात्मतेचे ठाई व्हावें हेंच उत्तम इकडील वर्तमान तरी राजश्री रघुनाथ पंडित कासारबारी चढोन फौजसुधा आवरंगाबादचे नजीक आले वरचेवर फौज ठेवीतच आहेत राजश्री सखारामपंत व नाना फडनीस फौजेचा जथ पाहून दर्शनास जाण्याच्या उद्देशे कार्तिक वद्य पंचमीस निघोन डेरादाखल जालें सिंदे होलकर यांजकडील वकील अद्याप याजपासीच आहेत यांच्या त्याच्या भेटी होऊन सळूख व्हाव येसें बोलतात यात ईश्वरइछेनें घडेल ते प्रमाण धणियांचा मुकाम करवीरीच आहे जमाव इचलकर्जीच्या रोखे पांच सात हजार रवाना केला आहे इकडेस उपद्रव न व्हावा येविसी पुरंदराहून पत्रें आली आहेत याउपरी काय मजकूर घडेल तो पाहवा होईल तो लेहून पाठवू कलले पाहिजे [नि. *] रा। छ १ माहे सवाल [नि. *] बहूत लिहिणे तरी सूज्ञ आसा [वा. *] लेखनावधी मर्यादा

पौ छ ९ सवाल [याप्रमाणेंच सोम सावंत यांस पत्र *]

सु. ११७५ जिल्काद १६ } ४५ श्री { श. १६९६ पौष वद्य ३ इ. १७७५ जानेवारी १९

[पत्राचे शेवटीं ले. ३९ शि. व मो. *]

राजश्री खेम सावंत भोसले सरदेशाई प्रा कुडाल वगैरे माहाये गोसावी यांसि

दं अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य [मो. जा.*] श्री माधवराव नारायण प्रधान आशीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणें विशेष त्या प्रांती जदीद लोक ठेऊन सरकारांत आणावयाबा हुजुरून रा बालाजी माहादेव पाठविले आहेत तरी मारनिले तुमच्या तालुकियातील लोक ठेऊन आणितील त्यास आणू देणें दरमियान कोण्ही अडथला करील त्यास करू न देणें व लस्करांतून कुमकेस लोक पाठवावयाबदल तुम्हांस पत्रें गेलीं आहेत त्यास तेही लोक याजबराबरी पाठवणे जाणिजे [नि. *] छ १६ जिल्काद सुा खमस सबैन मया व अलफ [नि.*] बहूत काय लिहिणें

पो छ ८ जिल्हेज

सु. ११७५ जिल्काद २० } ४६ श्री { श. १६९६ पौष वद्य ६ इ. १७७५ जानेवारी २३

[पत्राच्या पाठीवर आरंभीं ले. ३९ प्रमाणें शि.*]

राजश्री खेम सावंत भोसले सरदेशाई प्रां कुडाळ वगैर माहाये गोसावी यांसि

दं अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य [मो. जा.*] श्रो माधवराव नारायण प्रधान आशीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहिणे विशेष साष्टीचे मसलतीस तुम्हाकडील लोक पाठवावयाविशीं लस्करचीं पत्रें आलीं होतीं तीं पाठविलींच आहेत तरी जलदीनें लोक येऊन पोंहचेत तें गोष्टी करणें वरकड फिरंगी अरमारानशीं जंजिरे विजयेदुर्गाकडे आला आहे देवदुर्गच्या बाऱ्यावरी आहे म्हणून बातमी आली आहे हैदर व अंगऱ्याचे मूलही सामील आहेत म्हणून वर्तमान आहे येशास जंजिरे मजकुरी बेहबूदी हशम व फौज वगैरे येथास्थित आहेच व तुम्हीं त्या प्रांती जंजिरे मारालगते आहां याजकरितां कदाचित् फिरंगी दुष्ट बुध्दीस प्रवर्तल्यास त्यास तुम्हाकडून पायबंद चांगले रीतीनें बसे ते करणे वरकड तेथें आला असेच जाहाल्यास तेथील मजबूदी असतां आणिखी फौजा गाडदी रवाना केले जातील तुम्हींही आपल्या जाग्याची सावधता करून फिरंग्यांचे पारपत्य येथास्थित होयें ते करणे विजेदुर्गाकडे फिरंग्यानी गडबड केल्यास तुम्हीं परिछिन्न बारदेस लुटून पस्त करणें आणि याप्रों तुम्ही करून लेहून पाठवणे म्हणजे ताबडतोड फौजा रवाना होऊन येथास्थितच पारपत्ये केले जाईल सारांष तो

दुष्ट बुध्धीस प्रवर्तून सरकार तालुकियात घसघस केलिया वेलाशक बारदेशात [उतरणे येथून *] फौजा रवाना केल्या जातील जाणिजे [नि.*] छ २० जिल्काद सुा खमस सबैन मया व अलफ [नि.*] बहूत काय लिहिणे [ब.*] लेखन सिमा

पो छ ९ जिल्हेज

जाब सूद

सु. ११७५ जिल्काद २१ } ४७ श्री { श. १६९६ पौष वद्य ७ इ. १७७५ जानेवारी २४

[पत्राच्या पाठीवर आरंभीं ले. ३९ प्रमाणे शि. व मो.*]

राजश्री खेम सावंत भोसले सरदेसाई प्रां कुडाल वगैरे मााहाये गोसावी यासि:

दं अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्री माधवराव नारायण प्रधान आर्सीर्वाद उपरी येथील कुशल जाणौन स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष वाडीहून गंगाजलनिर्मल सखूबाई सिंदी याजकडील कारकून गोवेकर फिरंगी याणी बोलाऊन नेला आहे म्हणोन हुजूर विदित जाले त्यास त्याणें होऊन सखूबाईकडील कारकून बोलाविला तेव्हा त्याचे मनातील भाव पहिला स्नेह सरकारात आहे व पुढेही राखावा ऐसा वाटतो त्यास पेसजी सरकारातून राजश्री कृष्णराव गंगाधर गोव्यास रवाना केले आहेत ते पावले असतील व सखूबाईकडील कारकूनही तेथे आहे तर फिरंगी या उभयेताजवल कसे कसे बोलतो याची बातमी बारीक रीतीने राखावी ऐसियास फिरंग्यानी सरकारांत स्नेहच धरिल्यास कृष्णाजी गंगाधर हुजूर लिहितील कदाचित त्याणी दुष्ट बुध चितात आणून सरकारांत विरोधभाव दाखविल्यास पेसजी तुम्हास लिहिलेच आहे व तुम्हींही आपले जागा मजबूद आहां परंतू सावध रीतीने आपली खबरदारी राखून गोव्यातील बातमी वरचेवर आणून हुजूर लिहीत जावी फिरंगी सरकारांत विरुध धरणार नाहीं कदाचित त्याची बदनजर आढलल्यास लेहून पाठवणे म्हणजे हुजरून तावडतोड फौज रवाना केली जाईल जाणिजे छ २१ जिल्काद सुा खमस सबैन मया व अलफ [नि.*] बहूत काये लिहिणे

पो छ ५ जिल्हेज

इ. १७७५ जून १३ } ४८ { श. १६९७ ज्येष्ठ शुद्ध १५
श. १६९७ मन्मथ ज्येष्ठ शुद्ध १५ } । { इ. १७७५ जून १३

सलाईच्या करारदादाचा तहनामा येकबाल इजलाल पन्हां सियोर दों पेद्र दा कामारा गोवर्नदोर व कपितांव जनराल दा इंद व अजम खेम सावंत भोंसले सरदेसाई यांमधें हसमतपन्हां बालिगादी जनराल येंरीक कार्ल येंरीक व इजत-दस्तगाहां गोविंदराऊ भगवंत या उभयेतां नेमिल्या कारभारी याणी आपलाल्या कुळ येख्तियारी बरहुकूम फैसल केला बतारीख १३ माहे जून सन १७७५ उर्फ शक १६९७ मन्मथ सवत्सर जेस्ट सुध १५ मा

हजरत इस्ताद यांमधें अजम सरदेसाई यामधे स्नेह व सळ चालत होती त्यांत अजम सरदेसाई यांकडून कितेक अंतरें पडलीं त्यापासोन तोडमोड होऊन बिगाड जाहाला तेणेकरून स्नेह असावध केला हें लौकिकीं प्रकटच आहे यावरून येकबाल व इजलाल पन्हां सियोर दों जुजे पेद्र दा कामारा गोवर्नदोर व कपितांव जनराल दा इंद यांस अजम सरदेसाई याणी पुरातन स्नेहांची वृधी करावेविषई कितेक अनुतापाच्या आग्रहे इलति-मास व कबुलाती इजतदस्तगाहां रघुनाथ शामराऊ व इजतदस्तगाहां राम सावंत यांचे मारिफतीने जाहीर केल्या त्या आइकल्याच नाहींत त्यावर सेवटीं इजतदस्तगाहां गोविंदराऊ भगवंत यां मारिफत सदरहू इलतिमास व कबुलाती विदित केल्या त्या अंगी-कारोन पुर्व स्नेहांत बिगाड केलेंचे विस्मरण करून हजरत इस्तादांचे थोरपण दाखवावे-विषई उद्दीत जाहाले हजरत इस्ताद यास येसाचेंच अगर सुधामत चालिलेचेंच अगत्य नहून दुसरा स्वार्थ करणे नाही याजकरितां आपले पडोसियांपासून विस्वासयुक्त स्नेह चालावा नहून आणखी अर्थ निदर्शनास ना आनिता त्यांस पेसजी गैरविस्वास करून वर्तलेची क्षेमा करून काबीज केला होता तो मुळूक फिरून देवविला त्याचा दाखला अजम सरदेसाई यांसही आहेच तेचप्रमाणे हाली हा अढल रीतीचा करारमदार लिहिले मुदेनसीं करून पुर्वील तहनामे करार जाहाले ते पुनरोक्तीने करार करावे ये सबाबेने उभये पक्षी अविस्चिन्न स्नेह चालावा व द्वेपाचा समय येकादर उत्सेदून टाकावा अजम सरदेसाई यांचे पूर्व पूर्वज सर्वदा हजरत इस्तादांचा आश्रये अनुभऊन आले तेचप्रमाणे फुढे चालवावे हे खातिरेस आणून हाली तहनामा करविला बितपसील कलमें

१

हजरत इस्ताद यांमधें व अजम सरदेसांई यामधें जे पेसजी हर कोणही बिगाड होऊन गेले ते सर्व दुतर्फा विसरून अविस्चिन्न स्नेह चालावा तो हजरत इस्ताद आपले तर्फेने व अजम सरदेसांई आपण व आपले वंशपरंपरेचे देसकत अधिकारीवरोन सर्वदा येकनिस्टेने वर्तुंस कवूल करीत आहेत

२

हालीच्या तहनाम्याच्यां करारमदारावरून मागां फैसल होऊन गेले तेरीख ७ माहे

आखरील सन १७१२ उर्फ चद्र १ माहे रबिलावल सूर सन इसने अशेर मेया आलफ व तागायेत २५ माहे वोइतुब्र सन १७५४ वुर्फ छ ७ माहे मोहरम सुा [खमस *] खमसैन मेया आलफ व ता। २५ माहे जून सन १७५९ उर्फ छ २ माहे जिल्हेज सुा तिसा खमसैन मेया आलफ व तारीख २४ माहे दिजेंब्र सन १७६१ उर्फ छ २६ माहे जमादिलावल सन इसने सितैन मेया अलफ यां तहनाम्यांच्या कलमापैकी काही मजकूर हालीच्यांत कमजियादा करून वरकड कलमे राहिलीं असतील तीं कुलीं सारोद्धार उभये-तानी पालावी

३

सदरहू तहनामा १७५४ फैसल जाहाला त्यांतील दुसरे कलमामधें क्रिस्तांव संप्र-दाये आपलें शास्त्र अभ्यासून साक्रमेंत चालऊंस पाद्री मिस्योनार्थ यांस जागा नेमून द्याव-यास अजम सरदेसांई यांहीं कबूल केलें असे यैसेही असतां देवदेवतार्चन शास्त्रधर्म सुधामत चालऊंस क्रिस्तांवसंप्रदाये असेल तेथे इग्रेज बांधूस जागा द्यावेयास अजम सरदेसाई रजावंद होत आहेत

४

कुल सोलदाद व खापरी वगैरे हजरत इस्तादांच्या राज्यातून पळोन अजम सर-देसाई यांच्या मुलुकास जातील त्यां सर्वांस जे सिले भाले व हर कोणही बाडबिसाद न्हेतील ते आंदीकरून वोपून द्यावेयास अजम सरदेसाई व त्यांचे देसकत अधिकारी कबूल करीत आहेत मशारनिले आदमीस खून माफ असे याच बमोजीब अजम सरदेसाई व त्यांचे देसकत अधिकारी यांचे सिपाई वगैरे अंकित हजरत इस्तादाच्या राज्यांत येतील ते वोपून देऊंस हजरत इस्ताद कबूल करीत आहेत या कलमाविसीं निःसीम वादपुसीनें रखिलें जाईल

५

अजम सरदेसाई यांच्या आरमारची सरदार समुद्रांत फिरून हजरत इस्तादांच्या जफ्ताचें बंदरीचीं वगैर जागेतील तराडी साउकारी चालऊंस येत जात होतीं त्यांस मोठा उपद्रव देऊन अपहार करू लागले तन्निमित्ते मागां विक्षप येऊन येवढा अतिशेय जाहाला याज-वास्ते अतःपर लाहान अरमाराची स्वांरी येकंदर मना करितों व थोर तराडी इस्तादांचे रजावंदीविना घडवींत नाही म्हणून अजम सरदेसाई कबूल करीत आहेत तेच वजा हजरत इस्तादांचे राजधानींचे कबजाचे बंदरी हर कोठीलही तराडी साउकारीचे अमद-रफ्तीत किंवा भळते प्रतीं मालमत्ता घेऊन येतील जातील त्यांची लूटलबाड न करिता येकदर वाट काडीत नाही म्हणोनही लमीक होत असेत आण समुद्राच्या स्वामित्वंपणे हजरत इस्तादाद ज्यां तराडियास कौळ देत आहेत तो पाळायास व पाळून देववावेयास तैसच इस्तादाच्या वासालाचे तराडियांस आपळा कौळ घे यैसा आग्रह व वासाव (ल) मजकूर मागील तरही देणार नाही म्हणून अजम सरदेसाई कबूल करीत आहेत

६

हजरत इस्ताद यांचे व यांच्या वासालाची तराडी अजम सरदेसाई यांच्या बंदरी जातील त्यांची जकायेत अगर हर कोणही कानूबाब घेऊ नये साउकारी करूस जातील तर सियोर विजरई दो रुदलिग दा कोस्त याच्या अमलामध्यें सन १७१२ तह करार जाहाला त्यांच्या तिसऱ्या कलमामघे उद्द्रत आलेप्रमाणे जकायेत मात्र रवाज बरहूकूम द्यावी दु [त*]र्फेत येणेजाणेची व साउकारीची रहादारी लागून संशई रहीत चालावें

७

हजरत इस्तादाच्या हुकुमासिवाई नेंदीकिनारेचे सरहदीस चौक्या अगर मेटे आपण ठेवणार नाही अगर बांधणार नाही अथवा हर कोणीही ठेवितील तर त्यासही रंजावंद होणार नाही म्हणून अजम सरदेसाई लग्नीक होत आहेत यांत प्रथक विचार केलेया बेबनाव होऊन येईल

८

हजरत इस्ताद यांची भाडणी तराडियानी अजम सरदेसाई याच्या भाडणी तराडियावर व साउकारी तराडियांवर इस्तादांच्या गनिमाचा अगर भलते दांडग्याचा खिसा पडेल तर सर्व साह्यता करावी परंतु अजम सरदेसाई याच्या तराडियानी हजरत इस्ताद याचे रवाजबरहुकूम कौल घेऊन फिरावें येणेचप्रमाणे हजरत इस्तादाच्या तराडियांस प्रसग वोढवलेया अजम सरदेसाई याच्या तराडियानी सर्व साह्यता करावी आण येकमेकाची तराडी भाडणी व साउकारी सुखरूप येकमेकाच्या बंदरी येऊन जाऊन आपापली अनकूलता गर्ज पडेल तेव्हा करून घ्यावी परंतू बहूत तरांडी येऊन भलता संशई पडे अैसा विचार न करावा

९

रघुनाथ जसवंतराऊ देसाई तो पडणे व गोवीदप्रा देसाई पारसे व अतोबा सेणवी देसाई माद्रे व वरकड देसाई पडणेकर माहादाजी बालकृष्ण नाडकर्णी तो मजकूर व सिवराम सेणवी लाड कपितांव दे सिपाई यांच्या देसगती तैनाती व वित्त विषई पुरातन व हा सेवटील बिगाड अगर तफावत यावे याची पूर्वी सुखरूप भोगवटेने भोगीत होते तो सर्व त्वरित त्यांचा त्यांस अनुभऊ द्यावा आण नव्या मेर्शा किंवा नवी वतने असतील ती भोगू देणेचे सपूर्ण अजम सरदेसाई यांच्या मर्जीखाली उतरत आहे परंतू अजम सरदेसाई आपल्या आबरूस व थोरपणास तीही वतने चालवितील हा भरवसा अजम सरदेसाई यांणी देसाई मशारनिले यांस उपद्रव न करितां नादविले जाईल व हजरत इस्ताद याचे फौजेमधें जे चाकरी करून बहुमान भोगीत आहेत त्यांस ज्यांहा [प*] न्हा [मो. जा.*] पादशाहासाहेब यांचे वासाल यैसे मानून त्यांचें बहुमानयुक्त चालऊन उपकारीक साहित्य करायास व अजम सरदेसाई व देसाई मारनिले यांमधें मागा खिलाफ येऊन बिगाड जाहाले व कितेक गोस्टी घडल्या त्यांचें येकादर विस्मरण

करून आपणा यैसे राज्यकरते समर्थ लोक ज्यारीतीने चालवितात तैसें अजम सर-देसाईही चालऊस कबूल करीत आहेत

१०

येणेचप्रमाणे साखलीचे देसाई जैतोबा राणा व कृष्णोबा राणा यांस इस्तादांचा आश्रये व चाकरीचा बहुमान आहे त्यावरून अजम सरदेसाई याणी मागां घडल्या कृत्याचा विसर पाडून नीतीने चालवावे

११

अजम सरदसाई सदरहू आपल्या थोरपणावर नजर देऊन सूर्याजीराव देसाई तो डिचोली यास हजरत इस्तादाच्या मरयादेवरही नजर देऊन देसाई माारनिकेकाढून आलेच्या व मागील विषादाच्या सबबा आल्या असतील तर त्या विसरून हजरत इस्तादाचे अंकित होऊन आश्रयास आले म्हणून कृपा करून त्याची देसगत तैनात व जो विषये असेल तो सुखरूप भोगू देऊस कबूल करीत आहेत

१२

याजबरहुकूम आनद विश्वासराऊ व ·बल [वं*] त विश्वासराऊ देसाई तो डिचोली हे उभयेता वहू [त*] पुरातन हजरत इस्तादचे वासाल व अजम सरदेसाई यांठाई विश्वासू त्यांच्या देसगतीचा भोगवटा पुरातन व हाली चालतो त्यास अधीक उणे न करिता अजम सरदेसाई नीतीने चालऊस कबूल करीत आहेत

१३

सदरहू कुल वतनवाबा ज्याच्या त्यास अनभऊ द्यावेयास कबूल केले पैकी देसाई पेडणेकर यांस अजम सरदेसाई यांणी आपले चाकरीस जमाव घेऊन स्वांरीस जाणे-बदल तैनात व नेमणूक जे करून दिली असेल तेखरीज असेल कां तर हाली सुधामंत चालणेविसी तरतूद जाहाली आहे त्यावरून सदरहू जमाव व वरकडही अकारण फौज ठेऊन खर्च करायाचे अगर फौज पोसायाचें अगत्य अजम सरदेसाई यांसी नाहीं म्हणून

१४

सदरहू देसाई यांणी अजम सरदेसाई यांकड खोती या कमाविसी केल्या त्या मुदतीचा येथास्थित हिसेबू करून निवल बेरीज होईल ती अजम सरदेसाई यांस देसाई माारनिले याणी फारीक करून द्यावी हे गोस्ट बहूत नीतीची आहे याजकरिता उभये पक्षीचे निरापेक्ष मध्यस्त नेमून सपूर्ण व खरी चोकसी करऊन सनदा पत्रे व वर्कड हिसबाचे दाखले असतील ते मनास आणून नीतीने खरे असतील ते मजरा द्यावे व लूट व बलत्कारे नागावा व नाशाड जाहाली असेल तीही देसाई माारनिले यास मजरा द्यावी येणेप्रमाणे मध्यस्त मजकूर याचे विद्यमाने सदर्हू कर्ज देसाई माारनिले यावर करार जाहालेवर त्याच्या देसकती तैनाती वीतविषये जो असेल त्यावर त्यांच

मध्यस्ताचे गुातीने सरे त्याप्रमाणे वहून घालून सदरहू वतनी येवजपैकी यैवज नेमून दिला जाईल तो अजम सरदेसाई यांच्या देणेचा पुर्ता निशा होऊन फारीक होईपावेतं अजम सरदेसाई याकडे उरावा त्याउपर बरे समजावे कीं जो यैवज आतां नेमून कर्जास देतात तो कर्ज फारीक जाहाले म्हणजे अजम सरदेसाई यांकडून सोडऊन घेऊन देसाई मारनिले यांणी आपला यैवज आडताण्याखेरीज सुखरूप भोगावा

१५

येणेच प्रमाणे गोपाल सेणवी व नारायेण सेणवी धुमे याचा हिसेबू करावा आण ते देणेकरी यैसे खरे जाहाले वर फारीक करणेबदल त्यांचाही दस्त नेमिला जाईल

१६

हजरत इस्ताद याही आपला जमाव ठेऊन बदोबस्त करायाकरिता अजम सरदेसाई मौजे उसगाव सीमसरादेनसीं हजरत इस्ताद यांस देत आहेत परंतू गाव मजकूरचें स्वामित्व व स्थलसता व माहसूल अजम सरदेसाई यांकडे उरत आहे

१७

हां तहनामा होत आहे याचा परिणाम काये म्हणाल तर उभये पक्षी निखालस स्नेहाचा जडाव व्हावा उभयेतांस येकमेकांपासोन अधिकाधिक साह्ये होत जावे याजकरितां हजरत इस्ताद अजम सरदेसाई यास अगत्य पडेल ते समई आपले सर्व बले कुमक करायास कबूल करीत आहेत त्याच प्रमाणे अजम सरदेसाईही इस्तादास सर्वस्वें कुमक देऊंस लगीक होत आहेत

१८

तरेखोल व मयें गांव यां दोहींच्या मजकुराविसी येकबालपन्हा ज्याहापन्हाः [मो. जा. *] पादशाहासाहेब यांस हालिचा तहनामा होऊन हजरत इस्ताद व अजम सरदेसाई यांमधें स्नेहाचा जडाव जाहलेची वखर लिहितील त्याच्या निश्चयावरून मर्जीस येईल ते आज्ञा करतील तेच बरहुकूम गावतलें व कन्याले याविषेई हुकूम फरमावितील अथवा कले जाईल

१९

हा तहनामा करून सख्यसौरश व स्नेह द्रड जाहाला त्यावर नजर देऊन येकबाल व इजलाल पन्हा सियोर गोवर्नदोर व कपितांव जनराल यांही अजम सरदेसाई हर सालीना केण च्यार हजार असुरप्या हजरत इस्तादास देत होते त्यां व मागील मुदतीचा जकायेत हजरत इस्तादास अजम सरदेसाई याणी देणे होती ते देखील सोडली असे त्यावरून अजम सरदेसाई याकुडे हजरत इस्तादास साल वसाल दोन घोडे आरबी अथवा घोड्याचे मोबदलेस येक हजार असुरप्या देऊस कबूल करीत आहेत

२०

येवंच सिरी लिहिलेप्रमाणे उभयतर्फेने अविश्चिन अढल स्नेह करार केला असे यास सिरिस्ते कलमे केले असे त्यातील कोणही मुदेस तफावत येणार नाहीं हा भरवसा तैशामधे अतर येईल तर जे तर्फेस अनुभव येऊन विषाद दिसेल तिकडून येरीतर्फेस येकवेल मात्र जाहीर करावे कीं हाली तहनामेस विक्षप आला त्याची निभावणी करून सारोद्वार पाळून द्यावें म्हणून त्यावर जाईर केलें असता निकाल सरें तसा न होईल तर जे तर्फेस विषाद दिसोन येईल त्यांही आपणास ठांकल तैसा विचार करून घ्यावा हें हजरत इस्तादाच्या तर्फेने कबूल होऊन अजम सरदेसाई सदरहू करारमदार केलेप्रमाणे चलणवलण न करितां पाळायासी आपण व आपले वंश देसकत अधिकारी कबूल करीत आहेत

२१

हाली या तहनाम्याच्या दोन तालिका आपआपल्या निशाणा व मुद्रा घाळून दुरुस करून त्यापैकी येक हजरत इस्तादाच्या सकतारीमधें असावी व दुसरी अजम सरदेसाई यांस पाठऊन द्यावी त्यांत तपसीलवार कलमें केलें तें मजकूर कुल निखालस चितें व दुडोक्तोर अनमान न पावतां सारोधार सख्यसौरसाचा तह पाळून यावया कारणे मागील सर्व बिगाड विषादांच्या प्रसंगाचें विस्मरण उभेयेतर्फेने करून स्नेहभावें ऐक्य दुतर्फा वर्तावें निवीस्तन दर जागा गोवा बतारीख व सन मजकूर

४९

श्री

तालीक खत फरगी

मुदो

येकबाल व इजलाल पन्हा सिन्योर दो जुजे पेद्र द कामरा गोवर्नदोर व कापितांव जनराल दा इंदे यासी आजम सरदेसाई खम सावंत भोसल यानी कर्तव्यतफावतीमुळे आनुताप येऊन आंग्राहाचा उपक्रम पुनः पुन्हा करून आपणादिमत वकील इजतदस्तगाहां रंघुनाथ शामराऊ हे राजधानीहून निघोन गेला व इजतदस्तगाहा गोविंदराव भंगवत हली राजधानीमध्ये आहे या मारिफत जाहीर केल्यावरून पेशजीचा तह कितेक वख्ता बिघाड कलेचे विस्मरण करावे यैस खातरस आले याजकरिता कृपाळू होऊन आश्रयामध्ये आजम सरदेसाई यासी आंगिकारोन जे त्याचे वडील सर्वदा हजरत इस्ताद याच्या आधार प्राप्त पावले होत त्याजप्रमाणे हली सिरस्तेचे मुदेनिसी चालवावे त्याच्या चितात आणिली बितपसील कलमे

१

हजरत इस्ताद यामध्ये आजम सरदेसाई यामध्ये जे पेशजी हर कोण्ही क्षुद्र बिगाडीचे प्रसग होऊन गेले ते सर्व दुतर्फ विस्मरण होऊन आविछिन्नभावे श्नेहसंदर्भ चालावा तो हजरत इस्तादांसी चालऊस आजम सरदेसाई आपण व आपले वशपरंपर देशकत आधिकारीवरून येकनिष्ठेने सर्वदा वर्तूस कबूल करीत आहेत

२

हाली करारदादावरून मागां फैसद्ध होऊन गेल तारीख ७ माहे आबलील सन १७१२ वाजीब उर्फ छ १ माहे रबिलावल सुा इसने आशेर मया व आलफ व तारीक २५ माहे वैतुब्र सन १७५४ उर्फ छ ७ माहे मोहोरम सुा खमसैन मया व आलफ तारीख २५ माहे जुले सन १७५९ उर्फ छ २ माहे जिल्हेज सुा तिसा खमसैन मया व आलफ व तारीख २४ माहे देजब्रू सन १७६१ उर्फ छ २६ माहे जमादिलावल सन इसन सैतैन मया व आलफ या तहच्या कलमापैकी हलीच्यात काही मजकूर कमजियादा करून वरकड कलमे राहिली आसतील ती कुल सारोध्तार उभयेतानी पाळावीत

३

सदरहू तहनामा सन १७५४ फैसल जाहाला त्यांतील दुसर कलमामध्ये किस्ताव संप्रदाये आपले शास्त्र आभ्यासून साक्रामत चालऊस पाद्री मिस्योनीर्ये यास जागा नमून द्यावयासी आजम सरदेसाई याही कबूल केल आसे यैस आसतां :देवदेवतार्चन शास्त्रधर्म सुदामत चालऊस किरस्तव संप्रदाये आसंल तेथ इग्रज बाधूस जागा द्यावयासी .आजम सरदेसाई रजावंद होत आहेत ॥

४

कुल सोलदाद व खापरी गुलाम वगैर हजरत इस्तादाच्यां राज्यातून आजम सर-देसाई याच्या मुलकास जातील त्यां सर्वांस जे सिलेभाले व कोण्ही बाड बिशादा नेतील ती अदीकरून वोपून द्यावे यासी आजम सरदेसाई व याचे देसकत आधिकारी कबूल करीत आहेत मारनिले आदमीस खून माप आसे याबमोजिब आजम सरदेसाई व त्याचे देशकत अधिकारी याचे शिपाय वगैरे आंकित हजरत इस्तादच्या राज्यात येतील ते वापोन द्यावयासी हजरत इस्ताद कबूल आहेत ॥

५

आजम सरदेसाई याच्या आरमाराचे सरदार समुद्रात फिरोन हजर्त इस्तादाच्या नफराचे व बंदरीची वगैरे जातील तरांडी सावकारी चालऊस येत जात होती त्यास मोठा उपद्रंव देऊन आपहार करू लागले त्यामुळे मागां विक्षेप येऊन येवढा आतिशय जाह्ला

याजवास्ते आतःपर याउपर आरमाराची स्वांरी येकंदर मना करितो व थोर तरांडीही आजरत इस्तादांचे रजावंदी विना घडवत नाही म्हणून आजम सरदेसाई कबूल करीत आहेत तेच वजा आजरत इस्तादाचे राजधानीच कबजाचे बंदरी हर कोठीलही तरांडी साहुकारीचे आमदरफ्तीस किंव्हा भलते प्रसगी माहालमता घेऊन येतील जातील त्याची लूट लबाडी न करिता येकंदर वाट काढीत नाहीत म्हणून ही लगिक होत आसेत आण संमुद्राचे स्वामित्वंपणे हजरत इस्ताद ज्या तंराडियास कौल देत आहेत तो पाळावयास व पाळोन देववावयास तैसच इस्तादाच्या वासिलाच्या तराडियासी आपुला कौल घे ऐसा आग्रह व वासाल मारर मागतील तरीही देणार नाही म्हणोन सरदेसाई कबूल करीत आहेत ॥

६

हजरत इस्तादाची व यांच्या वासालाची तरांडी आजम सरदेसाई याच्या बंदरी जांतील त्याची जकायेत आगर हर कोण्ही कानूबाब घेऊन नये साहुकारी काफल्यास जातील तर सिंन्योर विजुरे दो रुद्रोग दा कोस्त याच्या आमलामध्ये सन १७१२ तह करार जाहला त्याचे कलम ३ मधे उतधार आले प्रा जकायत मात्र रवाज बरहुकूम घ्यावी हरद्द तर्फेत येणेजाणेची व साहुकारीची राहादारी लागोन निःसंशय चालावे ॥

७

आजम सरदेसाई यांही हजरत इस्तादास हर सालीना च्यार हजार आसरफी केण द्यावे यासी लगिक आसता सालगुदस्ता पैका फारीक करून दिल्हा नाही तेणवरून बेरीज भारी होत आसे त्याचें दोस्तीवर नजर देऊन सदरहू बेरीज फारीक करांवी ती सोडिली आसे परंतू आजम सरदेसाई याही हर साळीना केणीपैकीं दोन घोडे आरबी निःसंशय देत जावे आगर आसरफी येक हजार हे केण पूर्वील यास्तव सोडिता नये ॥

८

आजम सरदेसाई हजरत इस्तादास मौजे उसगांव त्याचे सर्व सरहदी चतुरसीमानसी काहीच कम न करिता वोपून देत आहेत इस्ताद आपुले कबजास धरून रखवालीस जमावही ठेऊन तेथील पार जरब दस्त करून आजम सरदेसाई याचे अंकीतापासून येकदा तफावतीचा समये वोढवतो तो मना करावां यांकरिता ॥

९

पडणेकर देसाई यांसी त्वरीत त्याचे कुलवतन कुल वीतहक वगैरी कानूबाब त्यास सोडून द्यावी हे औखरी बिगाड आगर तफावत होऊन यावे याचे आगोधर भोगीत होते त्याच बंरहुकूम त्याचे दुमाले करऊन सुखरूप आनुभऊं द्यावां याखेरीज मारनिले यासी काहीच आतिशये न करिता दरगाहा आस्मान ज्याह पन्हां पातशा [मो. जा.*] साहेबाचे वासाल याचे कुटुंबाचे हजरत इस्तादाचे फौजमध्ये चाकरी करून भूशण भोगिले प्रो त्यासी विवेक करावाा देशाई वतनदार मारनिले याही आजम सरदेसाई यापांसी

खोत्या कमाविसी केल्याचा हिशोब करावा येथास्थित याजवास्ते वतनदार मार उभये तर्फेचे निरत मध्यस्त याचे गुजारतीने राहारास्तीने निवल बेरीज करावी त्यांत हीसाब पडथलतां मारनिलेस कूट नागावां केला वतने आमानत केली भुमभुमकेची वसगूक कमाविसी करू दिल्ही नाहीं त्यामुले त्यास धोका आला ते कुल मजुरा द्यावे आणि हिसेबू येथास्थित होऊन मारनिले देणेकरी होतील तर मध्यस्त मार याही आसूंक बेरीज यैसी करार करून वतणदार मारानिले यांची देशकत व हकवतन वगैरी बाब्यांचा दस्त आजम सरदेसाई यांस हवाला त्यांही कुल बाकी मध्यस्तं काहडून नेमितील ती फारीक होयपासून करार करून हवालेबरहुकूम फारीक करून घ्यांवी आण कुळ आजम सरदेसाई यांसी फारीक होताच वतनदार मारनिले यागी निसंशये आपुले वतनाचा दस्त हली नेमून दिल्हा तो आनुभवीत असावां याजप्रा गोपाल सेणवाई धुमा व त्याचे बंधू नारायण सेणवाई धुमा याचा हिशोब करावा आण ते देणकरी आसे खर जाहलेया त्याचा दस्त नेमिला जाईल { नेमिला जाईल {

१०

कृष्णोबा राणा जैतोबा राणा देसाई सांखली याच्या बंधू हा इस्तादाचा वासाल याजवास्ते मारनिलेस आजम सरदेसाई यांही व यांच्या वडिलांही मारनिलेस इनाम आगर मेर्से करून दिल्हे आसतील त्या चळणवळण त्यांत काही न करिता सुखरूप भोगू द्यावे ॥

११

आज हजरत इस्तादाच्या हुकुमाविना नदीकिनाराचे सरहदीस चौकी आगर मेटें आपण ठेवणार नाही व बांधणार नाही आथवां हर कोण्हीही ठेवितील तरी त्यासही रजावंद होणार नाही म्हणून आजम सरदेसाई लमिक होत आहेत यात प्रयुक्त विचार केलेया बेबनाव होईल ॥

१२

आजम सरदेसाई यांस जे वख्ती आपले किलेच्या सामानास भळता जिनस पदार्थ इस्तादाच्या नदीतून न्यावेयाचे आगत्ये होईल तर रजा द्यावेकारणे आगोदर जाहीर करावे रजा देविली जाईल ॥

१३

हजरत इस्ताद यांची भांडणी तरांडियाणीं आजम सरदेसाई याच्या भांडणी व सावकारी तरांडियावर इस्तादांच्या गनिमाचा आगर भलते दाडगा यांचा खिसा पडल तरी सर्व साह्य करांवी परंतू आजम सरदेसाई यांच्या तरांडियानी हजरत इस्ताद याचे रवाजे बरहुकूम कौल घेऊन फिरावे येणेचप्रा इस्तादाची तरांडियास प्रसंग वोढवल्यास आजम सरदेसाई याच्या तरांडियानी सर्व साह्यता करावी आणं येकमेकाची तरांडी

भाडणी व साहुकारी सुखरूप येकमेकाच्या बंदरी येऊन जाऊन आपलाली आनकूलता करून घ्यांवी परंतू भलती अंतराई ये औसा विचार बहूत तरांडी येऊन घडेल ऐस नसावे॥

१४

आजम सरदेसाई यासी रक्षण कारण दारूगोला पाहिजे ऐस हजरत इस्तादाचे खातीरेस येईल तेव्हा राहाता किमत घेऊन इस्तादाने दारूगोला द्यावा ॥

१५

सेवटी हली तह कराराच्या दढोत्कारे मिठी पडोन परमस्तिरतेन येकवटता हजरत इस्ताद आजम सरदेसाई यासी कबूल करीत आहेत आण हजरत इस्तादाच्या महत्वावर नजर देऊन वा जगत्राचे सुख नांदणुके कारण आजम सरदेसाई आपले मुलकाचे सरहदीवर गाव मणेरी आगर ते जागेमध्ये हजरत इस्तादाचा येक जमाव पांचेसे लोकाचा ठेऊस कबूल होत आसंत आण जमावाच्या सिपायांसी व त्याच्यां वोफिसियालास व त्याचीया कोमदांतीस आजम सरदेसाई आपुल्या सरकारातून मुशाहिरा आपणं व आपुले आमंली वौश होतील दुढोत्कोर दरमाहे आथवा दर तीन मह्निनेनी दिरंग न लाविता पुस्तैद करून देऊस रजावंद होत आसेत

१६

येणप्रमाण हा तहनामा उभये तर्फेने आविछींन्न [नि. *] आढळ करार केला आसे या बरहुकूम सिरस्ते कलम केली त्यातील हरकाण्ही मुदेस तफावत नसावी आलीया जे तर्फेस आनभव येऊन विशाद दिसेल तिकडून येरी तर्फेस येकवेळ मात्र जाहीर करावे की हाली तहनामेस आंतर आले त्याची निभावणी करून सारोधार पाळून देणे म्हणून आणि मग जाहीर केले आसता निभावणी सरे तैसी न होईल तर जे तर्फेस विशाद दिसोन येईल त्याही आपणास वाटल तैसा विचार करून निभावणी संपादून घ्यावी म्हणोन हजरत इस्ताद व आजम सरदेसाई या उभये तर्फेने करारमदार कलप्रमाणे चलणवळण न करिता पाळावे सरदेसाई आपण आपले वंश देशकत आधीकारी याकडून पाळून देतो यैसे कबूल करीत आहेत

१७

हाली या तहनामेच्या दोन तालका आपलाल्या निशाणमुद्रा घाळून दुरुस करून पैकी येक हजरत इस्तादाचे व सक्रतारीमध्ये आसावी व दुसरी आजम सरदेसाई याचे दप्तरी आसावी त्यात तपसिलवार कलमे केले ते कुल आविछिन भावे दुडोतर आनमान न पाहाता सारोधार सख्य संरसाचा तह पाळोन यावे यास कारण मागील सर्व बिगाड व विशादाचे प्रसंग येकंदर विस्मरण उभये तर्फेने करून स्नेहभावे आविछीन्नपणे दुतर्फा वर्तावे

५०
श्री

यांद कलमे तहनामे लिहिले त्यातील करार दूर

कलमे करार

१ पहिले कलम लिा॥प्रों

२ दुसरें कलम लिा॥प्रों

३ तिसरें कलम लिा॥प्रों

४ चौते कलम क्रिस्ताव संप्रदाये असतील त्याचे शास्त्रधर्म चालवावा

५ पाचवे कलम कुल खापरी व सोलदाद व गुलाम व हर कोणी उभये तर्फेचे असतील ते द्यावें ते करार

दूर सातवे कलम लिा॥ त्यात इस्तादाचे कौल घ्यावे आणि सरदेसाई याचे न घ्यावे आण उभय तर्फेचे अरमारास उभयेतानी साहेता करावी म्हणोन लिा॥ त्यास उभये ताचे कौल उभये-ताचे सावकरानी घ्यावे आण रहदारी करावी व येकमेकास साहेता करावी आण सिळूक उपद्रव करू नये म्हणोन कलम करार

दूर नवे कलम रघुनाथ जसवतराव देसाई ता॥ पेडणे व कुलीं वतनदार याची वतने कैलासवासी फोंड सांवत माहा-राज याचे कारकिर्दीस चालिले प्रो॥ चालवावी नूतन देऊ नयेत म्हणोन कलम करार

७ सातवे कलम सन १७१२ चे तहनामेत लिा॥प्रा॥ करार

९ नवे कलम लिा॥ त्यात इस्तादातर्फेचे कौल सरदेसाई याचे वासालानी घ्यावे

कलमे दूर

६ आरमारचे कलम लिा॥ आहे ते न लिहावें

८ आठवे कलम नदी सरादीस मेटे अगर चोक्या ठेऊ नयेत म्हणोन लिा॥ त्या उभयेतां खुलासा होतो तेन्हा ते कलम तहत लेहू नये

११ अकरावे कलम जैतोजी राणे व कृष्णाजी राणे देसाई साखळीकर याचे वतन पुरातनप्रो॥ चालऊ यैसा करार परंतू तहनामेत कलम दूर

१५ पधरावे कलम तहत लेहू नये

१६ सोलावे कलम तहत लेहू नये

१७ सतरावे कलम तहत लेहू नये

म्हणोन लिगो ते दूर करून वरकड करार

१० दाहावे कलम रखुनाथ जसवंतराव देसाई तो पेडणे हे वासाल याचे वतन व व [र*] कड वतनदार याची वतने कैलासवासी फोड सावत महाराज याचे कारकिर्दीस चाललेप्रो चालऊ म्हणोन कलम करार

१२ सूर्याजीराव देसाई तो डिचोली याचे वतन पुरातन कैलासवासी याचे कारकिर्दीस चाललेप्रों चालवावे म्हणोन कलम करार वरकड तपसील लेहू नये

१३ येणेच प्रो आनंद विश्वासराव व बलवंत विश्वासराव याचे वतन चालवावे म्हणोन कलम करार

१४ कलम चौदावे लिोप्रो करार

१८ अठरावे कलम लिोप्रो करार
[या नंतर मो. जा.*]

२० कलम विसावें पुरातन प्रो पाचसे रुा घोडेचे द्यावे ते करार

२१ येकविसावे कलम लिाप्रो करार

सु. ११७७ जिल्काद ७ } ५१ श्री { श. १६९८ मार्गशीर्ष शुद्ध ९ इ. १७७६ डिसेंबर १९

० श्री ० । राजारामनरप । तिहर्षनिधान मा । धवराव नाराय । ण प्रधान
[पत्राच्या पाठीवर वरीलप्रमाणे शि. आणि शेवटीं व जोडावर दोन मो. *]
राजश्री खेम सावंत भोसले सरदेसाई प्रा कुडाल वगैरे मोहाये गो यांसी
दं अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य [मो. जा.*] श्नो माधवराव नारायण प्रधान आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणे विशेष सुकनिधान पतीत

कोकणात जंजिरे रत्नागिरीस अटकेत होता त्यास तेथील कमाविसदाराकडील कारकून सिवाजी आपाजी वगैरे ब्राम्हण मिलोन तोतियाची बेडी तोडोन कोकणामध्ये दंगा माडला त्यावरून हुजुरून फौज पाठवून तोतियास व त्याचे मिलाफी (?) सिवाजी आपाजी वगैरे होते ते धरून आणून त्याची पारपत्ये केली परंतू तोतियाकडे कोकणातील व देशातील जागाजागाचे ब्राम्हण गेले होते त्याचा सोध करून ज्याणी तोतयाचे पंक्तीस प्रत्यक्ष अन्नवेव्हार केले असतील त्याजला व तोतियाची श्रावणी ज्या ब्राम्हणानी केली ते व श्राधपक्षाचा क्षण ज्याणे घेतला आहे त्या ब्राम्हणास तूर्त प्रायश्चित द्यावयाचे नाही त्याणी कोणाचे पंक्तीस व त्याचे पंक्तीस कोण्ही अन्नवेव्हार करू नये याचे पंक्तीस ज्याणी अन्नवेव्हार केले असतील त्यास व त्याचे संसर्गियास येथोक्त प्रायेश्चित मार्गसीर्ष कृष्ण चतुर्दसीस देऊन शुध करावे याप्रो निश्चयें करून हे पत्र तुम्हास सादर केले असे तरी येविसीचा शोध कुडाल वगैरे माहाल येथे करून ज्याणी पतित तोतयाचे पंक्तीस प्रत्यक्ष अन्नवेव्हार केले असतील त्याणी व तोतियाची श्रावणी ज्या ब्राम्हणानी केली व श्राधपक्षाचा क्षण ज्याणी घेतला आहे त्या ब्राम्हणानी कोणाचे पंक्तीस व त्याचे पंक्तीस कोणी ते शुध होत तोपर्यंत अन्नवेव्हार करू नयेत याप्रो ताकीद करून वरकड संसर्गियास मार्गसीर्ष वद्य चतुर्दसीस द्यावयाचे कलम बितपसील

पतित पंक्तीस जे जेविले त्याचे पंक्तीस ज्याणी अन्नवेव्हार केला असेल त्यास

येक वेल केला असेल त्यास अर्ध प्राजापत्य प्रायेश्चित १	बहूत वेला केला असेल त्यास मुडणपूर्वक प्राज्यापत्य प्रायेश्चित १

पतितपंक्तीस जे जेविले त्याचे पंक्तीस ज्याणी अन्नवेव्हार केला असेल त्याची पंक्ती ज्यास जाली असेल त्यास

येक वेल पंक्ती जाली त्याची पंक्ती ज्यास येक वेल जाली असेल त्याजला उपोषणपूर्वक पंचगव्य व बहूत वेल जाले असेल त्यास पाद प्राज्यापत्य प्रायेश्चित १	बहूत वेला पंक्ती जाली त्याची पंक्ती येक वेल ज्यास जाली असेल त्यास पाद प्राज्यापत्य प्रायेश्चित व बहूत वेला जाली असेल त्यास अर्ध प्राजापत्य प्रायेश्चित १

सदरहूचे संसर्गी असतील त्यास पंचगव्य कलम १

येणेप्रो येथाशक्ती प्रायेश्चित देवऊन शुध करवणे आणि शुध केल्याचे वर्तमान व याखेरीज ज्याकडे दोष बहूत असोन थोडका ऐसे मिथ्या बोलोन पंचगव्य घेतले ऐसे म्हणेल अगर याप्रो बोलोन घेईल त्याजपासून गुन्हेगारी सरकारांत घेऊन त्याची नावनिसी हुजूर लेहून पाठवणे सर्वत्र प्रायेश्चित येकेच दिवसी सदरहू तिथीस द्यावयाचा

निश्चये केला असे तरी सदरहू लिहिल्या तिथीस प्रायेश्चित देवणे [नि*] जाणिजे छ ७ जिल्काद सबा सबैन मया व अलफ [नि*] बहूत काय लिहिणे [प. मो.*]लेखन सिमा ?

पो छ १२ जिल्हेज सन सबा सबैन

बार

---

५२ १७७४–१८०७

श्री

नकल फिरंगी याजकडील यादची

जाबसाल येकबालपन्हा सियोर गोवर्णेदोर कपितांव जनराल यांही अजम गोविंदराव लक्ष्मण याणी कलमे शमसर तकुबीच्या बाबावस लिहून दिल्हीचा बिता।

१ अजम खेम सावंत भौसले सरदेसाई याणी माय गवस उसपाचा खरा देसक याचे हवाली उसप पहिल्याप्रो करोन त्यास ते देसकतीचे जागी अक्ष न धरितां ठेवावा त्याजबा। जलदीनें राजश्री सरदेसाई मारनिले याणी दोनसेहे ते पाचसहे पासून जमाव पाठऊन उसपाचा बंदोबस्त करावा मारनिले माय गवास उसपास निरबंधत्वे पोंहचताच जलदीने येकबालपन्हा सियोर गोवर्णेदोर कपितांव जनराल इस्तादांचा जमाव उसपास आहे तो तो काडवतील व मारनिले माय गवस याणी राजश्री सरदेसाई यांसी मर्यादेन चालावें कलम

१ पेडणेंचे रयेत व लोक यास आपली माहाली जावयास आज्ञा देतील जाणारास अडथला होणार नाही व राजश्री सरदेसाई याणी त्याचा आक्ष धरून अतिशाई त्यास करीत नाही आसे करारात आणोन निशा सांगावा

१ इस्ताद हलर्णाचा वसूल घेत नाही लक्ष्मण जसवंतराव याचा गाव त्यास सरे तो आनभवितो पेसजी भोसले यांच्या तहांत त्या देसकास साहित्य करावयास लम्रीक जाहाला आहे तेव्हां त्याचे देसकतीचा वसूल अपहारून घेऊ नये येणेप्रो बनत नाही तर हे कलम पुढे पुर्त्या तहनामेत निवडावयासी ठेवावे इस्ताद पेडणे माहालचा वसूल घेत नाहीत त्याचप्रमाणे घेणार नाहीत कलम

१ दोघे भट व हज्याम व गैर राजश्री सरदेसाई याचे मुलुकाचे धरून आणिले आसतील त्यास इस्ताद माघारे यावयास लावतील परंतू सरदेसाई याणी रघुनायक वडिये यास हवाली करावे व सिदबाराव व हिरे प्रा देसाई यास माघारे यावे अथवा त्याकडून दांडागावे न व्हावयासी लम्रीक व्हावें कलम

१ पागनीस व गैर त्याचे सामानसुधा इस्तादांनी मोकले करितील परंतू राजश्री

सरदेसाई याणी रघुनायक वडिये यास व मारनिले उभयतां मोटास देसाई यास सदरहू लिहिल्याप्रो करार करावा येणेप्रो परस्पर उभयतांही येक समई हलवर्णास किंवा नारव्यास हवाली करावे

साहावे कलम लिाप्रो मान्य

सातवे कलम लिाप्रो मान्य

आठवे कलम लिाप्रो मान्य

१ हे कलम तहनामा निखालस होते समई निवडले जाईल

दाहावे कलम मान्य

अकरावे कलम येकुनातीचें मान्य

सु. [११*] ७७ फाल्गुन वद्य ७	५३ श्री.	श. १६९८ फाल्गुन वद्य ७ इ. १७७७ मार्च ३१

पौ छ १ रविलावल सन सबास बैन

राजश्री खेम सावंत भोसले सरदेसाई प्रा कुडाळ व माहालानिहाये साहेबाचे सेवेसी

दे सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमांन्य [मो. जा.*] श्री बलवंत-राव गोपाल रामराम विनंति येथील क्षेम ताा फाल्गूण वद्य ७ परयेंत साहेबाचे कृपेकरून वर्तमान येथास्थित असे विशेष साप्रत आपणाकडून पत्र येऊन परामर्ष होत नाही तर यैसे न करावे सदैव येणारा समवेत पत्र पाठवोंन ममतेची वृधी करावी श्रीमंत मातुश्री [मो. जा. *] बाईसाहेबाकडील सौरष्याचा विचार आपण करून दिला आहे परतू चितवृति अद्यापि येकरूप होत नाही येविसी वरचेवर मातुश्री बाईस पत्र पाठवोन आमचे ठाई ममता खचित राहे तो अर्थ करावा साहेबी चितावर धरून जे काम केले तें सिधीस बाईकडून जाई येविसीचा बदोंबस्त कागदीपत्री करावा आम्ही सर्व प्रकारे पहिलेपासून साहेबाचे आहो तेथे विस्तारे लिहावे यैसे नाही राजकी मजकूर राजश्री हरिपंत फौजसुधा पुणेहून स्वार होऊन सिधटेकास आले येका दो रोजी कूच करून कर्नाटक प्रांती जाणार बाा चालीस हजार फौज आहे राजश्री माहादजी सिंदे मातुश्रीचे भेटीस श्रीगोध्यास आले होते पाच च्यार रोज बाईजवळ होते पुणेहून कारकून बोलावे-यास जाबगावी आला याजकरितां आज्ञा घेऊन जाबगावी गेले आपणाकडील काम-काजाचा मजकूर राजश्री विनायेक केशव याणी सविस्तर सागितला तेणेप्रों राजश्री माहादजीबावांस निवेदन केलां आम्हींही आठ चौ रोजी ते गडास गेलेवर जाणार तेथून सविस्तर लिहून पाठवू श्रीमंत राजश्री [मो. जा. *] दादासाहेब यास आणावे यैसा

मनसबा राजश्री मोरोपंत फडणीस याचे विद्यमाने इम्रजही समंतास आहे राजश्री सखाराम॰ पंत व राजश्री नाना फडणीस व मोराबा यैसे यकचित जाहाले पुढे लिाप्रो करणार [नि*] बहुत काये लिहिणे [नि*] कृपा लोभ असो दीजे हे विनंती

सु. [११*] ७७ रवल ५ } ५४ श्री { श. १६९९ चैत्र शुद्ध ७ इ. १७७७ एप्रिल १४

विशेष साप्रत पत्र येऊन कुशलार्थ कलत नाही तर यैसे नसावे सदेव पत्र पाठवून संतोषवीत जावे यानतर हैदराकडील प्रबलता दिवसेदिवस विशेष होत चालली याविसीचा धरबद आपलेकडून व्हावा तो अध्यापवर काहीच होत नाही यैकण्यात मात्र फौजा नेमणुका जाहाल्या आहेत परंतू करनाटकच्या रानी येऊन त्यास दहशत पोचत नाही यावरून काय समजावे आमचे सरादीनजीक त्याचा पायबद लागला तेव्हां ये विसीचा विचार करवा लागतो तेव्हा आपणास कोणी मनस्वी इकडील धशास्तव सागणार येथ्यास हैदराचे पारपत्याचा विचार कसकसा केला ते साध्यात लिहून पाठविलें पाहिजे करनाटकचा बदोबस्त होऊन फौजा जलद आलेस आपले उपयोगी आण आम्हासही उतम असे लिहिला प्रकार ध्यानी आणून उतर सत्वर पाठवावे राजश्री पंत प्रधान याचे स्नेहाटांई इकडून दुसरा अर्थ आहे यैसे नाहीं रा छ ५ रबिलावल सन सबा सबैन

सदरहूप्रो कागद पुणेस

१ रा माधवराव पंडित प्रधान

१ रा सखारामपंत बापू

१ रा बालाजीपंत फडणिवीस

३

सु. [११*] ७७ रवल २२ } ५५ श्री { श. १६९९ चैत्र वद्य ९ इ. १७७७ मे १

[पत्राच्या पाठीवर ले. ५१ प्रो शि. व मो.*]

राजश्री खेम सावत भोसलें सरदेसांई प्रांा कुडाल व गैर माहालान्हिाये गोंसावी यांसि

ई अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य [मो. जा.*] श्री माधवराव नारायण प्रधान आशीर्वाद उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणें विशेष तुम्ही पत्र

पाटविले तें प्रविष्ट जाहाले करनाटक प्रांती हैदरखानाचा दंगा बहूत जाहाला आहे याज-करिता लौकर फौज रा। होऊन पारपत्य आल्यास चागलें म्हणोन लिा। ते निवेदन जाहालें ऐशांस हैदरखानास नतीजा देऊन करनाटक प्रांतीचा बंदोबस्त करणे हें जरूर जाणोन नबाब निजामदौले बाहदूर व राजश्री हरी बलाल फौज तोफखाना गाडदी जंगी सामान-सुधा त्या प्रांती जाऊन पोहचलें आहेत राजश्री रामचंद्र गणेश फौजसह कोल्हापूरचे मसलतीस आहेतच राजश्री माहादजी सिंदेही तिकडे रा। केले असेत. हें कोल्हापुराकडे जाऊन तेथील फडशा लौकरच उरकूनं रामचंद्र गणेशही करनाटक प्रांती जातील येकूण पंनास साठ हजार फौज त्या प्रांती जाऊन पोहचलियांस हैदरखानास सहजात जरब बसऊन बंदोबस्त करितील वरकड तुम्ही दूरंदेश आहा पहिल्यापासून दूरंदेशपणे पाऊल टाकीत आला त्याचप्रमाणें असावें हेच फार तुम्हास उपयोगी पडेल हा अर्थ चितात आणोन करणे ते समजून करीत जाणं जाणिजे छ २२ रौवल सुा सबा सबैन मयां व अलफ [नि*] बहूत काय लिहिणे

पौ। छ ३ माहे राकर सन सबा सबैन

---

१७ जिल्हेज	}	५६ श्री	{ श. १६९९ पौष वद्य ५ इ. १७७८ जानेवारी १७

पौ। छ २९ जिल्हेज समान सबैन

चिरंजीव विजईभव राजमान्य राजश्री खेम सावंत भोसले सरदेसाई प्रांत कुडाल व माहालाणिहाये यांसि प्रती सकूबाई सिंदे आसीर्वाद उपर येथील कुशल ता। छ १७ जिल्हेज येथास्थित जाणौन स्वकीये लेखन करीत असिले पाहिजे विशेष बहूत दिव [स जाले आ*] पणाकडील पत्र येऊन वर्तमान कलत नाहीं त्यावरून चित सापेक्षित आसे तरी सविस्तर लेखन करून संतोषाते पावीत आसावे यानंतर चिरंजीव राजश्री माहादजी सिंदे याजला श्रीमंतानी राजश्री येसाजी सिंदे याजकडील मोहीम सांगितली त्यावरून ते त्या प्रांतास गेले आहेत कजियां लागलाच आहे त्यास तुम्हाकडे चिरंजीवानी मुजरद कासीद याजसमागमें पत्रें तुम्हाकडे पांठविली कीं तुम्हाकडील लोक मदतीस यावे भ [ला म*] नुष मातबर कोणी यावा या आर्थी पाटविली आसता तुम्हाकडून त्याजकडे न आले व साहित्यहि न जाले याप्रमाणे आम्ही येथे यैकिले त्यास हे काये सध्या प्रसंग कोणे रीतीचा हा तुम्हास वाकीफ आहेच हे कार्य श्रीमंताचे आधीच त्याची आनास्था तुमचे ठाई आहेच आणि सध्या साहित्याचा प्रकार न घडल्यास पुढे द्वेष आधिकच वाढतो ऐसा विचार आहे या-करिता तुम्हाकडून साहित्य जरूर व्हावे आपण म्हणतील की येसाजी सिंदे आमचे शेजारी रात्रदिवस त्यासी समंध तेव्हा विरुध्ध कैसे करावे त्यास हेही प्रमाणच परंतु उभये

पक्षीचाही स्नेहवाद राहे यैसा आर्थ घडला पाहिजे याकरितां मातबर ग्रहस्त पाठऊन उभय पक्षीचा जाबसालही केला तरी उतम परंतू केवल कोणीच न पाठविले आणि उभयेताचे कैसेही हो यैसे म्हणून स्वस्छ राहाल तरी कोणी चैन पडू देणार नाहीत उगीच निमित्य ठेवतील याकरिता येथे बहूताचे मते सला ठ[रा*]ऊन लिहिले असे तरी सदरहूप्रमाणे जरूर करावे म्हणजे चिरंजीवासही संतोष आणि श्रीमंताकडीलही पेच उडतों यैसा प्रकार उतम जाणून लिहिले आसे या कामाबदल चिरंजीवाकडून मातबर माणूस लोक न्यावयाकरिता येईल त्यासमागमे तुमचे लोक यांवे त्यास चिरंजीवाच्या चिती कीं उतर आलें नाही तेधवा भला मनुष कैसा पाठवावा यैसा संशये त्यास याकरिता आधी तुम्हास लिहिले तरी सदरहू आन्वये ध्यानी आणौन उतर पाठवावे त्याप्रमाणे चिरंजीवास लिहून पाठऊ त्याकडून भला मनुष तुम्हाकडे येईल त्याबरोबर लोक तुम्ही द्यावे आंगाऊ सूचनेस्तव तुम्हास लिहिले आसे तुम्हाकडील मातबर जो येईल तो उभये पक्षीची संधान रक्षूण वरचेंवर तुम्हाकडे लिहीत जाईल त्यावरून जे जे समई जो विचार करणे तो करीत जावा परंतू लोक पाठवावयास आनमान जाल्यास उपयोगी नाहीं तुम्ही खुद यावे यैसे चिरंजीवाचे मानस फार आहे परंतू तुम्हास श्री [मो. जा.*] ची आज्ञा नाहीं या आर्थी न येणे जाले तरी चिंता नाही परंतू ग्रहस्त व लोक पाठविले पाहिजेत सारांश श्रीमंताचा पेच उडून स्नेह होये आणि चिरंजीवाची ममता आधीक वाढावी तैसेच येसाजी सिंदा सिंवधडा त्याचेही आंतर रक्षूण आपल्या स्वस्छानाचा बच्याव होऊन ये दुसऱ्याचा उपद्रव न लागे यैसी मसलत पोख्त ठरऊन जे करणे ते कीजे निदान पक्ष मातबर कोणी योजनेत न आला तरी सरदार व लोक पाठऊन तुमच्या तर्फेचे रा। बाजी भिकाजी चिरंजीवाजवल मर्जी संपादून व सर्व मजकुरास माहीत आहेत त्यासच आपण लिहिल्यास सदरहूप्रा॥ प्रसंग संपादतीऊ यैसाही प्रकार आहे यांत आपल्यास उतम दिसेल ते कीजे [नि*] पत्रार्थ ध्यानी आणून आपल्याही घरवां विचार पुर्तेपणे मनन करून श्री [मो. जा.*] ची आज्ञा घेऊन जें करणे ते करावें [नि*] कलल पाहिजे बहूत काय लिहिणे लोभ कीजे हा आसीर्वाद

चैत्र वद्य ४ रवल १७	५७ श्री [नि*] रामचंद्र	श. १७०० चैत्र वद्य ५ इ. १७७८ एप्रिल १६

[ले. ४४ प्रमाणें शि. व मो.*]

राजश्री खेम सावत भोसले सरदेसाई पा। कुडाल व माहालानिहाय गोसावि यांसि

ई सकल गुणालंकरण अखंडितलक्षुमीअलंकृत राजमान्य [मो. जा.*] स्नौ॥ सुबराऊ कृष्ण अमात्य हुकूमत पन्हा आसिर्वाद विनंति उपरी येथील कुशल जाणौन

स्वकीय कुशल लेखन करीत गेले पाहिजे विशेष सांप्रत आपणांकडून पत्र येऊन वर्तमान कलत नाहीं यैसे नसावे सदोदीत पत्र पाठऊन कुशलोतर व्रत लिहीत आसावें यानंतर इकडील वर्तमान तरी राजश्री माहदजी सिंदे फौजसुधा करवीरास आले दोन तीन महिने जाले हरयेक प्रकारे येश संपादावें लौकिक विरुध्ध नसावा मोर्चेबंदी अगर मारगिरीमुळें आंतून बोलण्याच्या आर्थें कारकून आले त्यास पाटील बावानी तहरहाचें करारात आणून राजश्री पंत प्रतिनिधी व आंम्ही येकत्र होऊन करारमदार करणे तो करून उपरांत शह निवारण करावा यैसे निश्चयांत आलें त्यावरून स्वारीची सिधता आज चैत्र वद्य ४ स मलकापुरास आलों प्रतिनिधी पंत याची आमची भेटी जाहली राजश्री बालाराव दिवाण-ही आले यांचेही दर्शन जाले बोलणेचालणे होऊन जो ठराव होईल तो मागाहून लेहून पाठऊं आगोदर आपणाकडे ल्याहावे तर सर्व मसलत आठां दिवसांत घडोन आली तन्मुळें त्वरा होऊन लिहोन कळविलें नाहीं साहित्य तेथून व्हावे हा पूर्वापार रुणानबंध परंतू सडे स्वारानिसीच त्वरेमुळें आगमन जालें कलावें [नि*] रा छ १७ रविलौवल [नि*] बहूत लिहिणे तरी सुज्ञ आसा

पौ छ २१ रवल समान सबैन

पौ सु. [११*] ७९ जखर १९	५८ श्री	श. १७०० आषाढ वद्य ५ इ. १७७८ जुलै १४

राजेश्री खम सावत बावा भौसुले सरदेसाई पाा कुडाल व माहालानिहाये गोसावी यांसी

ई अखडितलक्ष्मीआलक्रत राजमान्ये [मो. जा.*] श्नौ नरसिगराव माधव सरदेसाई ताा अजरे रामराम विनति येथील कुशल जाणून श्वकीये कुशल लेखन आज्ञा केली पाहिजे विशेष आपला निरोप घेऊंन आलो ते प्रजेन्याचे सुखरूप घरी पोहचलो इकडील राजकी वर्तमान म्हणावे तर राजश्री सटवोजी भोसुले हिगलजेवर येऊन उतरले होते प्रजेन्य पडला यामुले इकडील मसलत सोडून हुकेर प्राती जाऊन पाच चार जागे घेऊन हुकेरीमधे ठाणें घातले येमकर्णमुर्डीकडे यावयाचा मतलब आहे यानतरी कितूरकर याणी सुपे ताा घेऊन मनूर प्रात खानापूर येथे मुकाम केले आहे त्याजकडील दोन तीन हजार फौज येऊन शापूर ताामधे येळूर काा ठाणी घातली व साबर काा व कागती व उचगांव आदीकरून तमाम ठाणी घातली किणी काा मात्र उरली आहे तेही येका चार दिवसात घेतील शापूर बेलगावच्या जोऱ्यामुले बल धरून मात्र आहे चदगडपरयेत येणार यैसी वदंत आहे आणि राजमडलची फौज ते मिलोन आजरे प्राती येणार यैसे वर्तमान आहे पुढा ईश्वर काये करितो पाहावे पेसजीचे मसलतीस आपण जमाव पाठवून माहाल

मजकूरचे ठाणे रक्षिले होते आण सध्याचे प्रसंगी भरोसा आपला आसे तदनंतरी हैदर नाईक याचा मुकाम जालेहालावरच आहे काही फौज येऊन मनोली व संदुतीची ठाणी घेतली वरकड फौजा बदामी प्रातात आहे येणेप्रमाणे बातमी आसे ही आपणांस विदीत व्हावी यास्तव लिहिली आसे [नि*] बहूत काय लिहिणे [नि*] कृपा लोभ असो द्यावा [नि. बा.*] हे विनंती

पौ छ १९ जमाखर तिसा सबैन

सु. [११*] ७९ शाबान १६	५९ श्री	श. १७०० भाद्रपद वद्य २ इ. १७७८ सप्टेंबर ८

पौ छ १० रमजान तिसा सबैन

राजश्री खेम सावत भोसले सरदेसाई पा। कुडाल { मा } माहालानिहाय गोसावी यांसि

दं अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य [मो. जा.*] श्री बालाजी जनार्दन आसीर्वाद विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जावे विशेष तुम्ही पत्र पाठविले ते पावोन लिहिला मजकूर सविस्तर कलला जिनस पाठविला तो येणेप्रमाणे

——— सुमारी

३ लाकडी खडावाचें जोड

१ छत्री ताडपत्री

१ गजिफा

—

५

येकूण पाच सुमारी पाठविली ती पावली हैदरखानाचे पारिपत्याचा मार लिहिलांत त्यांस त्याचे पारिपत्याची तयारी होत आहे तुम्हीही तयारीत असावे राजश्री भगवतराव शंकर यास तुम्ही पत्र लिा होते ते मारनिलेनी दाखविले मजकूर कलला त्यास येविसीचें सागणे ते मारनिलेस सागितले आहे ते तुम्हास लिहितील त्याप्रमाणें तुम्ही आपले जागा काईम राहावे [नि*] रा। छ १६ साबान बहूत काय लिहिणें लोभ असो दीजे हे विनंती

मु. [११*] ७९ शाबान २२

६०
श्री [नि*] रामचंद्र प्रा

श. १७०० भाद्रपद वद्य ८
इ. १७७८ सप्टेंबर १४

पौ छ १० रमजान तिसा सबैन

राजश्री खेम सावत भोसले सरदेसाई प्रा कुडाल माहालानिहाय गोंसावी

ई सकलगुणालंकरण अखडितलक्षुमीअलंकृत राजमान्य [मो. जा.*] श्रो सखारामराव घोरपडे रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणोंन स्वकीय कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष आपण पत्र पाठविले ते उतम स [म*] ई प्रविस्ट होऊन शतोष जाहाला ऐसच निरंतर आपणांकडील सविस्तर लेहून चित सतोषवीत असिले पाहिजे इकडील राजकी वर्तमान म्हणावे तर राजश्री माहादजी सिंदे करवीरचे सरदे असतां माघारे पुरधरी राजश्री मारोबा व राजश्री तुकोजी होलकर वगैरे सरदार यांणी मनस्वी खेल करून पनास हजारपर्यंत फौज मिलवून तिकडून अविदास आणवून राज्यास आपाय आरभिला त्याजवर राजश्री हरिपंताकडे [फडके*] वगैरे यांणीहि फौजेचा जथ करून त्याची भेट घेऊन सर्वत्र मिलवून खेलात होते त्याचे पारस रा नारो गणेश होलकर याचे दिवाण व राजश्री विसाजी नारायेण बिनी व पुरधरे यास अटकेत ठेऊन मोरोबास नगरास कैदीत ठेविला हे प्रसगी हजर होते म्हणोन काहीसी राज्याची बाकी अज तागायेत राहिली सर्वत्र कार्यभागी जे करणे ते याचे विचारे मसलत करीत आहेत याज उपरी कर्नाटकाची वगैरे मसलत होणे ते होईल तूर्त राजश्री परशरामभाऊ याची मात्र पुढा तोडावर रवानगी जाहाली आहे आपलेकडील कामकाज जे असेल ते उलघडोन घेणे समय चांगला आहे हा समय पुढा येणेचा प्रकार कलतच आहे हाली विसाजीपंत याची मखलासी करून सोडले पाच लक्ष रुपये घेतले वरकडही आपल्या लक्षास लागतात त्याची मखलासी करून सोडीत आहे वरकड अधिकोतर ल्याहावेसा प्रकार नाही रा छ २२ माहे शाबान बहूत काय लिहिणे लोभ कीजे [नि*] खडावाचे जोड व छत्री पाठविले-प्रमाणे पावली हे विनंती

सु. [११*] ७९ शाबान २४

६१
श्रीगजानन

श. १७०० भाद्रपद वद्य १०
इ. १८७८ सप्टेंबर १६

पौ छ १० रमजान तिसा सबैन

श्रीमंत राजेश्री [मो. जा.*] सरदेसाई साहेबाचे सेवेसी विनती सेवक जिवाजी बलाल विज्ञापना विनती येथील कुशेल ताा छ २४ साबान मुाा पुणे साहेबाचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे यानंतर महाराजाने कृपा करून पत्र पाठविले ते पावले व श्रीमंत राजेश्री सिंदे यासी पत्रे पाठविली ती पावली ती त्यांस प्रविष्ट करून उतर घेऊन

सेवेसी पाठविले आहे पावेल सेवकाचे पत्री आज्ञा इकडील वर्तमान लिहावे त्यास मागा सेवेसी लिहिल होते त्या अलीकडील प्रकार तर राजश्री मोरोबा दादा व बच्याबा वगैरे सर्व एकत्र जमा जाहाले होते ते निराले ठिकाणी राहावे यैसे ठरावात आले आण दादा फडणीस बहुलास भीमेचे कांठी राहिले होते बच्याबा सासवडी वरकड मडली होलकर याच्या लस्केरांत होते त्यास त्याणे इग्रेज याचा वकील माष्टीण पुणेयात होता त्यासी फितूर करून पलऊन लाविला ते वर्तमान सर्व यास कलले तुम्ही दसरा जाहाला म्हणजे फौज घेऊन यावे आम्ही तुम्हास सामील होऊ म्हणोन करार केला त्यासी आणतो पुणेयातून निघोन गेला तेव्हां याणी चौवकसी केली माष्टीण जायास कारण काय त्यावरून हे वर्तमान फुटले कारकून प्रभू याचे मौा बोलणे जाहले तोच कबूल जाहाला तेव्हा होलकर याचा दिवाण नारो गणेश व अपाजीपत गोधलेकर व गोपाल नाईक ताबेकर व गैरे होते त्यास फौज हरिपंत फडके हुजुरात घेऊन चडाई करून गेले आज यास हातात घ्यावे नाही तर कार्याच नाही तेव्हा

पौ छ १० रमजान तिसा सबैन श्रीगजानन २

पुरवणी श्रीमंत राजेश्री [मो. जा.*] सरदेसाई साहेबाचे सेवेसी विज्ञापना विनती

होलकर तयार होऊन गोटाबाहीर उभ राहिले सिदे इकडून तयार होऊन गेले त्यास सांगितले तुम्ही त्यास देणे कार्याची गोष्ट नव्हे तेव्हां नारो गणेश वगैरे सर्व होळकरांनीं दिल्हे ते घऊन हे मागारे आले त्या [णे*] नारो गणेश मात्र सिदेकडे ठेविला वरकड त्याणे नाना फडनीसाकडे न्हेऊन बज्या केल्या मोरोबा दादा यास आणायास सिदे याची फौज पाच हजार गेली अगोदरच याजवर चडाई केली तेच दिवसी मोरोबा दादा याजला वेडा दिल्हा अगोदर च्यार घटका अटला सिवनेरीस गेला खासे बाइका सुधा व मूल सडे होते निघोन सिवनेरीस जाणार होते फौज पोचली त्याजबरोबर लोक पाचसे होत त्यापैकी आटल्याबरोबर दोनसे गेले बाकी तीनसे येकाडे होते लडावा मारावा मरावा यैसे मानस होते त्यास साम दड भद करून हस्तगत करून आणले आण नगरच्या किल्यात ठेवले बच्याबा चदन वदनावर ठेविले वरकड धरले होते त्यास दंड केला नारो गणेशाची खडणी केली आण जामीन घेऊन मोकले केले होलकराची दिवाणगिरी गगोबा तात्याच्या मुलास सागितली विसाजीपंत हिंदुस्थानात सुभे होऊन गेल होते त्याचा मुलूक सर्व घेऊन त्याची खडणी जाहाली सरजाम दूर केला पागा हस्ती सरकारात आणले सदासीव रामचद्र याजवर चौवकी बसली होती त्या [स*] सिदे याणी सोडविला आज चौवकी उठवून च्यार रोज जाहाले येणेप्रमाणे

पौ छ १० रमजान तिसा सबैन श्रीगजानन ३

पुरवणी श्रीमंत राजेश्री सरदेसाई साहेबाचे सेवेसी विज्ञापना विनती

मोरोबाच्या पक्षात होते त्यास केले हाली नाना फडनीस व बापू सिदे कारभार करितात हैदर नाईक कृष्णेपर्येत आला होता त्याजवर फौजा पाठवावे त्यास हाच बखेडा जाहाला

होता हाली दसरा जाहला म्हणजे कर्नाटकात फौजा रवाना करणार व श्रीमंत राजेश्री दादा साहेबाकडे कारकून सिदे याणी रवाना केला आहे त्यास आणावे येसे आहे त्यास येतील तर सिंदे पुडे जाऊन आणतील गादीचा व सिकेचा खावद श्रीमंत राजेश्री माधवराऊ हे भाऊसाहेब कारभार करीत होते त्याप्रमाणे करावा या गोष्टी मान्य करून आले तर आणायास हे जाणार दुसरे इंग्रेज बगाल्याहून सुरतेस येतात ते छैत्रपुरापावते व पायउतारा आले आहेत पुडे यणार त्यास ते पुढे येतील तर इकडून फौजासिंदे होलकर याच्या जाणार याप्रमाणें वर्तमान आहे सेवेसी कलावे याकरिता लिहिल आहे हे विज्ञाप्ति

सु. [११*] ७९ सवाल ५	६२ श्री	श. १७०० कार्तिक शुद्ध ६ इ. १७७८ आक्टोबर २६

पौ छ १२ सवाल तिसा सबैन

राजश्री खेम सावंत भोसले सरदेसाई पा। कुडाल व माहालानिहाये गोसावी यासि

दं सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य [मो. जां.*] श्री नारोबा बाबूराव फडनीस पा। शाहापूर नि॥ सरकार आसीर्वाद विनंती उपरि येथील क्षेम ता। छ ५ सवालपावेतो मु॥ तुरुकवाडी येथे सुखरूप असो विशेष पा। शाहापूर हा मुलूक कितूरकर देसाई याणे घेतला आहे त्यास येथील मामलेदार मिरजकर याच निसबतीने होते ते जागा जागा राहिले आहेत त्यास पा। मजकुरी ठाणी घालावयाकरिता येथील तमाम जमींदार आपले लगामी लाऊन घेतले आहेत {अ} आमचे साहित्यास किले बेलगाव येथील कारभारी आहेत याजकरितां आपणास लिहिले आहेत तरी आपण मनावर घेऊन दोन अडीच हजार जमाव पाठवावा व सत्वर आठ रोजात हेरेस येऊन पोहचल्याने कार्य होईल हेरेस उपराल्यास पाठविला आहे म्हणौ[न*] लौकिक करून पाठवावा आम्ही लिहिले मजकूर कोणास कलो न द्यावा लोकास पोटास आम्ही देऊ व आपला लौकीक श्रीमतापासी होईल अपला जमाव आल्याने पुढेहि कितूरकराचे प्रातात धामधूम करणार याजकरिता आपणाकडे कारकून सखाराम अनंत मुदाम पा। आहे येथील सर्व मजकूर मुखता विनंती करिता विदीत होईल बहूत काय लिहिणे विनंती

सु. [११] ७९ जिल्काद १०	६३ श्री [नि.*] हेरब	श. १७०० मार्गशीर्ष शुद्ध ११ इ. १७७८ नोव्हेंबर ३०

राजश्री खम सावत भोसल सरदेसाई प्रा। कुडाल व माहानिहाये गोसावी यांसि

दं सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्यं श्री सदासीव माहादेव आसीर्वाद विनंती उपरी छ १० माहे जिल्काद मु॥ स्वारी लस्कर जाणौन स्वकीय कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष आम्हास श्रीमंत साहेबाचे बोलावणे आले त्यावरून

कार्तिक शुा १ निघोन गेलो श्रीमंताच्या भेटी जाल्या ये समयी आपणाकडील निखाल-सता येकनिष्टपणें आहेत व आमचेही बहूत प्रकारे चालविले त्याजवरून श्रीमंताची आज्ञा जाली जे तुम्ही त्यास लेहून कितेक सरकारचे काजाकामाचा बदोबस्त करून घ्यावा म्हणून आज्ञा त्यास तालुके धारवाड येथील अमल दरोबस्त नवाबाकडे गेला करवीर संस्थानाकडू[न] पेशवाईची वश्रे दिली ते समई सरजामास किले दिल्हे तेथील अमल तालुके धारवाडाकडे लावून दिल्हा होता धारवाडच गेले तेव्हा किले सहजच तजावजा जाले त्याचा उपाये येथून बदोबस्ताचा करावा तरी कार्य थोड मसलत मात्र करावी त्याजवरून हे कार्य आपलेकडे श्रीमंताचे विचारे करून करवावे तुमचे संस्थानाचे लगते अथवा त्याचे सरजामात तुमचेच सरजामात चालत आहेत हें काम दुसरे याचे हातून केल्यास कलह मात्र उत्पन्न करावा हे जाणोन तुम्हासच मसलत सागौन तुमचे हतून करावे तुमचे मुदें जे असतील ते सरकारातून उगवावे संरोंशही राखावे येविसी भवानजी हुजरे सरकारचे आले आहेत हे कचेपके वृत सागितील त्याजवरून कलो येईल सारांष चाकरीचे दिवस हेच प्राप्त जाले आहेत यात जो बज्यावून दाखवील तेच उपयोगी पडेल साप्रत्य हुजूर लडाईचा प्रसंग प्राप्त जाला आहे इंग्रेजानी आपणाकडील दारूगोला व हर येक सामान लडाव घेतले आहे परंतु सरकारात ही सामान असावे त्यास आपले प्राती मालवणपावेता गोले धवड करितात तो माल विजेदुर्गरत्नागिरीपावेतो जात असतो तरी तिकडील जावयाचा मना करावा सरकारचे स्वारीकडे दाह हजार गोला लागेल त्यापैकी आपणाकडून किती तयार होईल त्याचा अजमास ल्याहावा त्याप्रो पैका सरकारातून पाठवून गोले नेऊ दारूचेहि अगत्य आहे त्यास अपले दारूखाना चालू आहे किंवा नाही तेही ल्याहावे मुंबैहून सामान आणिल्यास दारू होईसी असल्यास लेहून पा सामान पाठवून देऊं आणि दारू तयार करवावी हाली त्या किल्यास तीतूरकर (कितूरकर) देशाई याचा उपद्रव लागला आहे त्याचे सरजामाचे गाव बंद केले त्यामुले त्याचे भावभगतीस लागले आहेत आपणांस कचेही कललेच असेल त्याचा अमल कोकणांत उतरल्यास कलहासच कारण हे ध्यानात आणून पत्राचे उत्तर त्याप्रो श्रीमंतास विनंती करून सरजाम पावता करू बहूत काय लिा लोभाची वृधि सर्वदा करीत जावी मुले मनुषे (?) त्या प्रा आहेत त्याचाहि परामृश घ्यावा हे विनती

पौ छ १९ जिल्काद तिसा सबैन

सु. ११८० }
सवाल २१ }

६४

श्री

{ श. १७०१ आश्विन वद्य ८
{ इ. १७७९ नोव्हेंबर १

० श्री ५ । राजाशा । हुनरपनिह । षेनियानसाध । वरावनाराय । णप्रधान

[वरील प्रमाणें पत्राचे पाठीवर शि.*]

राजश्री खेम सावत भोसलें सरदेसाई प्रां कुडाल वगैरे मोहाये गोसावी यांसि

दं अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रौ माधवराव नारायण प्रधान आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणे विशेष ताा कलानिधी निाा राा मोरो विश्वनाथ याजकडील ठाणे चंदगडे कितूरकर देसाई व करवीरकर याचा जमाव येऊन ठाणियास उपद्रव लागला आहे त्यास येशवंत विठल व होनजीनाो सावत हे वाडी प्रांतातून हजार माणसाचा जमाव घेऊन जाऊन ठाणे चंदगडे यानजीक कितूरकर देसाई याच्या जमावास मिलाले आहेत याजकरिता येविसीची परवी तुम्हाकडून होऊन त्याचे पारपत्य करावे ते न केले म्हणौन विदीत जाले अैशियास सरकार तालुकियात उपसर्ग करीत असता त्याचे पारपत्याचा प्रकार तुम्हाकडून होत नाहीं हे गोष्ट उचित नाही हाली हे पत्र लिहिले आहे तरी तुम्ही आपलेकडून जमाव पाठवून येशवंत विठल व होनजीनाो सावत व कितूरकर याचे चांगले तऱ्हेने पारपत्य करून याउपरी ठाणे मास व किल्यास हरगीज उपद्रव न लागे ते करणे उपसर्ग लागल्यास मदत पाठवून सरकारतर्फेचा उपराला करीत जाणे [नि*] जाणिजे छ २१ सवाल सुाा समानीन मया व अलफ [नि*] बहुत काय लिहिणे [ब] लेखन सीमा

पौा छ ११ ज़िल्काद समानैन

}	६५ श्री	{ श. १७०१ इ. १७७९ नंतर

तहनामा करारदाद

ज्याहापन्हा पादशाही पुर्तुगाल याचा व श्रीमत राजश्री सरदेसाई यांमधे हर वख्त कसूर आल्या समई उभय पक्षीचा डाव पडल्याप्रमाणे बहुत वेल तहनामे होत आले परंतू सरदेसाई याचा किला तेरेखोल व मौाजे मये व खाजने व गैर इस्तादापासीं राहिलीं तेव्हा आपल्या विशयावर ममता राहती यास्तव किलाफास वारंवार कारण [होते*] हाली अजम अकरम दो फेदरीक गिलेर्म देसोईज गावर्नादोर कपिताव जनराल जजिरे गोवा इदीस दाखल जाले न्यायप्रतिपालक किसान लोकाचे चालावयावास्ते करुणावंत पदोसी यांचे कल्याणाइई तत्पर आकील श्रीमंत सरदेसाई ज्याहापन्हाचे आश्रयाचे त्याचे राज्यांतील विशई ज्याहापन्हाकडे गेल्याने बहुतसा लाभही नाहीं याजकरितां सरदेसाई याचा किला व गाव व खाजने व गैर देऊन कैलासवासी श्रीमत [मो. जा.*] फोंड सावंत भोसले याचे कारकिर्दीत तह जाला आहे त्याअन्वये उभय पक्षी निखालस चालल्यास दोस्तीत बिघाड यावयास कारण पडणार नाहीं याकरितां त्याप्रोा घडाव । मध्यें वहिल

परवे तह जाहाले लक्षांत आणो नयेत याजकरिता [अपूर्ण; पाठीवर*] कलमे बिता [मो. जा.*]

ज्याहापन्हा पातदशाही पुर्तुगाल याचा व श्रीमत राजश्री [मो. जा.*] सरदेसाई यांचा पुरातन घरोबा चालता आहे त्यास छुळक लोकांपासून हर येक कसूर येऊन उभय पक्षी लढे पडतात याजकरितां मागां जाल्या गोष्टी उभय तर्फेने खातरीत न आणिता सेजारधर्मावर नजर देऊन पहिले श्रीमत [मो. जा.*] कैलासवासी फोड सावत भोसलेयां कारकिर्दीत तहनामा जाला आहे त्याअन्वये हर दुतर्फा करार करून निखालस चालल्यास दोस्तीत बिघाड पडावयास कारण पडणार नाही याकरितां त्याप्रमाणे तह करार करावे बितपसील

[पान*] २

१ इस्तादांस हर सालिना घोडे दोन अगर घोडेची किमत असुर्फिया १००० येक हजार पुरातन यावी त्यास अलिकडेस वहिलपरत्वे तहनामेमधें च्यार हजार असुर्फी यावी म्हणोन लिहून घेतली आहे त्यास उभये पक्षीच्या स्नेहावर नजर देऊन हें कलम मखलास करावें

६६

}

{ श. १७०१
{ इ. १७७९ नंतर

हजरत इस्ताद व राजश्री खेम सावंत भोसले सरदेसाई पां कुडाल व माहालानिहाये यांमधें शाश्वत सख्य सौरसाचा तहनामा येकबालपन्हा दो फेदरीक गिलेर्म देसोजे गोवर्णदोर ये कपिताव जनराल दा इस्ताद दे इद जंजिरे गोवा व राजश्री सरदेसाई याची मुलाखत होऊन केला तहनामा यैसा जे

हाली तहनामा करार जाहालेप्रमाणे उभये पक्षीं चालावे मागील जे तहनामे जाहाले ते दुतर्फा समईपरत्वें यास्तंव पुढां उभये पक्षी आकुत्रीम चालावें म्हणौन ते तह दूर करून हा तहनामा करार केला असे तपसील कलमे

हजरत इस्ताद व राजश्री [मो. जा.*] सरदेसाई सीमपडोसी तेंव्हां उभये पक्षींची दोस्ती याजकरितां हर येक प्रसंगी उभये तर्फेने येकमेकांस आपापल्या जमावानसी ठांकेल त्याप्रमाणे जेवडा जमाव देऊन अनकूल पडल तो समई व दिकतपरत्वें देऊन कुमक केली जाईल व दारुगोल्याचेही साहित्य केले जाईल परंतू जेव्हा येरोपिनासाव म्हणजे विलायेती टोपीकर यांजवर विरुद्ध वाजवी व गैर वाजवी उपयोगास होईल तर सदरहु इस्ताद जमावाची कुमक देऊन लमीक होणार नाहीत कलम १

हजरत इस्ताद यांस व राजश्री [मो. जा.*] सरदेसाई यांस इछा जे तगा व सला आसावा आण द्वंदाचे मूल फुडां नासून जावे याजकरिता मागील खडणा राजश्री [मो. जा.*] सरदेसाई याणी द्यावी ते हजरत इस्ताद माफ करीत आहेत आकरा वर्षांची दर सालीना अशुर्फी ४००० च्यार हजारप्रमाणे आसुर्फी चवेचालीस हजार होत आहेत याजबरहुकूम या तहची तेरीखपर्यंत जोरीने जे जे घेतले त्याची किंमतही माफ करीत आहेत २

हजरत इस्ताद यांजकडील सोलदाद व खापरी राजश्री सरदेसाई याच्या प्रांतात जातील पळून त्यास वोपून द्यावे व राजश्री [मो. जा.*] सरदेसाईतर्फेचे गुलाम व बंदी व वरकड माणूस पळून गेले आलेवर इस्तादतर्फेने बाार न्हेल्या वस्तूसहित वोपून द्यावे ३

राजश्री [मो. जा.*] सरदेसाई याच्या मुलुकांत किरिस्ताव लोकांचा धर्म तेथे क्रिस्ताव लोक आहेत त्यास चाळऊस देतील मिसियोनार पाद्री यास सुरक्षीत चालऊन पुरातनप्रमाणे चालवितील त्यांत कमी करणार नाहीत इग्रजही बांधू देतील ४

हजरत इस्तादाचे वासाल जे देसाई आहेत त्याचा देशकतीच्या म्हसूल राजश्री [मो. जा.*] सरदेसाई याच्या मुलुकात असेल तो त्यास देतील त्याचबमोजीब देसाई मारनिले याचे भावबंद व खुद राजश्री [मो. जा.*] सरदेसाई यांचे पदरी आहेत त्यांची वतने डिचोली व साखली माहाली आहेत त्याचा म्हासूल यावा तो हजरत इस्ताद वसूल करून देतील ५

डिचोली सांखली व कासारपाल येथीळ जकायेत पेशजी सदरहूं माहाल इस्तादांकडेस होते त्यासमई जकातीचा म्हसूल राजश्री [मो. जा.*] सरदेसाई यांजकडेस चालत होता त्याबमोजीब उभये पक्षी चालावें ६

फिरगणातील उदेमी व वेपारी पडव व तरांडी वरोन वित घेऊन येतील व वरकड खुसगीने उदेमवेवसाव जिनस आणतील त्यास राजश्री [मो. जा.*] सरदेसाई याजकडून ज्याजती करू नये जकात सालाबादप्रा घ्यावी त्याबमोजीब राजश्री [मो. जा.*] सरदेसाई याच्या प्रांतातील कोणी इस्तादाच्या राज्यात उदेमी जिनस घेऊन जातील त्यास ज्याजती करू नये रवजबरहुकूम जकात घ्यावी ७

राजश्री सरदेसाई यांचे आरमारची गलबते हर येक प्रसंगी इस्तादाचे बंदरी आश्रेस गेल्यास त्यास आश्रा देऊन साहित्य करावे त्याचबमोजीब इस्तादातर्फेची आरमारची गलबते राजश्री [मो. जा.*] सरदेसाई याचे बंदरी समई आलेस आश्रा देऊन साहित्य करावे ८

उभये पक्षीचे दुस्मान आसतील त्यांचे हर येकविसी उभये तर्फेन साहित्य न व्हावे ९

[नि*] हजरत इस्ताद ते २४ देजेब्रू सन १७६१ वहसेच्या तहनामेच्या कलमापैकी कमज्यादा करून वरकड कलमे राहिली आसतील ती पाळून देऊस उभये पक्षीं कबी [क*] होत आहेत १०

[नि*] हजरत इस्ताद पेडणे माहालामधें जे भोगवटेस आहे ते सर्व आजम सरदेसाइ यास सोडून देतील का जे हालीचे गोवर्णदोराचे मुजतीमधे काबीज केल होते ते ११

[नि*] येणेप्रमाणे तहची कलमे उभमे उभयपक्षी करार केली असेत त्याप्रमाणे उभयपक्षी सारोत्धार चालावे उभयतर्फेने चलणवलण होऊ नये या तहाच्या दोन तालका आपापुल्या निशाणामुद्रा घालोन दुरुस करून येक हजरत इस्तादाचे सक्तारीमधे आसावे दुसरी अजम सरदेसाई याचे दफ्तरीस आसावी

सु. [११*] ८२ रजब ४ } ६७ { श. १७०३ आषाढ शुद्ध ६
इ. १७८१ जुन २७

श्रीमन्माहाराज राजश्री छेत्रपती यांस विशेष स्वामीनी आज्ञापत्र पाठविले तें प्रविष्ट जाहलें लिहिला भावगर्भ कलला किले प्रसिधगडचा मजकूर म्हणावा तर यामागा गडकरिया स्वाधीन किले राखत होते हुजूरचे हवालदार आले तरी त्याच्या अनुमते वर्तणूक करीत गेले तेव्हां किले मजकुरास फितूर अगर गडकरियापासोन बेइमानी कधीच जाहाली नव्हती अलीकडेस हवालदार व मामलेदार जे जाहाले त्याणी कदीम गडकरियाचा काइदा ठेविला नाही व प्रांतातही मनेश्वी कानवा वगैरे रयेतीवर उपद्रव करीत चालले येविसी स्वामीस इकडून लेहून पाठविले परंतु स्वामीकडून बंदोबस्त न होये त्याचप्रमाणें गडकरियास नाना ते प्रकारे छेडाछडी करून त्या लोकाचा गैर इतबार मानून त्यास श्रम देऊ लागले त्यामुळे गडकरियापासून बेइमानीचा अर्थ घडो लागला येक वेल मेहमाना याणे फितूर केला येक वेल आणखी दहावीस गडकरी मिलोन त्याणी केला ते अजोन बाहीरच आहेत तेही येत्नात असतील त्याउपर राजश्री महादजी सिंदे कोलापुरास आलें ते समई फितूर करणारानी केला तेव्हा गडकरियास वोज पडत चालली सर्व भिस्त किलेंची गडकरी यावर ते समाधानपणी ठेविलेवर बेइमानी का करितील त्यास श्रम बाधू लागला त्याजमुले त्या लोकापासून यैशा गोष्टी घडूं लागल्या भूदरगडचाही मजकूर याच रीतीचा जाहाला आम्हाकडेस आले होते आम्ही त्यासी कितेक दिलासेच्या गोष्टी सांगोन त्याची खातरदास्त स्वामीकडून होऊन ते पुरानप्रमाणें स्वामीसी वर्तावे यैसे सागोन रवाना केले परिणामी त्याणी चिकोडीचा जमाव आणून किलेवर घेतला भूदरगडास तिसरेचा पाई न सिरावा यानिमित्य जमाव पाच

हजार तयार करून रवाना करावा हे तरतुदीत असतां अगोदर जमाव चिकोडीचा किलेस आला तो इकडेस प्रसिधगडकरी याचाही मनोगत भूदरगडकरी याचप्रमाणे निदर्शनास येऊ लागला तेव्हां किला राहत नाही यैसा निशा जाहाला व गडकरी यातीलही बोल लागले कीं किला पुनेकरास देतात तोहि शोध केलेने खरें वाटले त्यास प्रसिधगडसारिखा जागा परकियाचे हाती पडलेने या संस्थानास अपाय येदअर्थी तेथील बंदोबस्त करावा लागला अम्हास मुजरद किला घ्यावा हे आवड असती तर पेसजी किला राजश्री जिवाजी विश्राम यांणी घेतला ते पदरीचेच होते किला आम्हा स्वाधीन करीत होते परंतु आम्हांस कशास पाहिजे जिकडेचा तिकडेत जावयाचा हेतु तेच घडले आता तरी आम्हास त्याचे प्रयोजन काये परंतु गडकरी व हवालदार याचा हर्शामर्श चालतो तेव्हां किलेस अपाये खामखा घडेल हे जाणोन किलेचा बंदोबस्त करावा हे मानस गडकरी व मामलेदार याचे करतुत्व सुटणार नाही तेव्हां कलहास कारण किला जबरदस्ताचे हाती पडलेने मग आमच्या प्रातास अपायें होइल याजकरितां स्वामीनीच किला आम्हा स्वाधीन करावा म्हणजे गडकरियासहीं रजावदीने राखून किला जतन करऊ सर्व प्रकारें आम्ही व हे संस्थान स्वामीचे तेव्हां स्थळ आम्हा स्वाधीन केले परकीकडेस गेले नाही जेव्हा स्वामी पाहिजे म्हणतील तेव्हां हजीरच आहे आम्हीच स्वामीचे म्हणविलेस किलेसीच विनाभाव मानावा यैसा विचार नाही पूर्वापार स्वामीचे निष्टेने आहे तोच भाव आमचा प्रमाण आहे लिहिली विनंती स्वामीनी ध्यानी आणोन आज्ञा करीतील त्याजप्रमाणें वर्तणूक करू रा। छ ४ रजब इसने समानैन.

} ६८ {

श्रीमंत राजश्री सरदेसाई व इस्ताद यांमधे तह जाहालेपासून सरदेसाई यांकडून सारोधार केल्या कराराप्रमाणे चालोन आले आहे इस्तादाकडून बोललेप्रमाणे आजवर होऊन येत नाही कलम १

फिरंगी सोलदाज व खापरी पळून येतात त्याविसीची जाहाजे सांपडले ते इस्तादांकडेस रवाना केलेच असतील पुढांही जे पळून येतील तेही यावयास अंतर होणार नाही सरदेसाई यांच्या प्रांतात हर कोठे चोरून राहातील तर ज्याचा सिदी त्याणे शोध लाऊन विदीत करावे म्हणजे धरून त्याचा त्या स्वाधीन केला जाईल

आजादीद गोवर्नदोरे याच्या तरांडेचा मजकुराची जात्र सरदेसाई यांच्या आरमारान आणिल नाहीं पेसजी इस्तादाकडून लेहून आले ते वख्ती वाजपूस केली तेव्हा हिरोजी नाईक मालवणाचे सर्दास आहे त्याचे मागे रीन आणिले यैसा करार जाहाला आहे यास्तव

तरांडेचा विंशई याची याद लेहून तांडलास पाठवाव म्हणजे सरदेसाई याकडून माणसें त्याबार केऊन हिरोजी नाईक यांजकडेस पाठऊन बेगुर्ले तरांडेचा निर्गम करून देईन यैसी आज्ञा केली जाईल ३

मयें गाव मेर्से इस्तांदाकडून दिला आहे मेरसे आहे तोंपर्यंत सरदेसाई यांणी करारप्रमाणे पालावी परंतू सरदेसाई याच्या अमलांतील जेव्हां तेव्हां तेथील इनसाफ करायाचा आधिकार सरदेसाई यांचा आहे अंसी रुपये घेतले आहेत ते फिराऊन द्यावे म्हणून तर सरदेसाई याणी म्हसलापैकी घेतले नाहीत मेर्सेच्या यैवजांतीलहीं घेतले नाहीत कुलकर्णी याचा मुशाइरा यावा त्यास प्राप्त न होई याजकरितां घेतले असतील मेर्सेच्या यैवजातील नव्हेत यैसे दिसतें घेणाराचा व तेथील मिरासदारांचा रुजू मोच्या करऊन { वाजबी { वाजबी घेतले तर न द्यावे गैरी घेतले असतील तर ताकीद करऊन देविल जातील सरदेसाई यातर्फेने इस्तादाकडेस सहेजहेतू जाणार त्यास रुजू मोजा करणेविसीं सरदेसाई आज्ञा करितात दुसरा मजकूर मयेगाव इस्तादान मेर्से दिला परंतू येथील गादी रेंदेरास इस्तादाच्या आमलात भोगत होती मेर्सेकरास भोगत नव्हती यैसे आसतां आज साहा वर्षांचा यैवज रेदांराचे लावणी इस्तादातर्फेची जमा आहे त्याप्रमाणे साहा वर्षांचा म्हासूल सरदेसाई यास पावतो मुर्वतीमुले आजवर ठेविला तथापि इस्तादांस मागील सालीचे देणे पूर्वील करार आहे त्यात मजरा पडेल हा अर्थ समजोन वसूल घेतला नाही पोकळ सेणवी धुमे याणी यैवज तकूब करणेविसीं सरदेसाई यांच्या कारभारियाची चिठी नेली होती त्याजवरून आजलग तकूब आहे याची निशा करावी ४

सोमणाच्या कांतराचा जवाब तर सरदेसाई यांच्या अमलांतील जमीन नसली तर इस्तादांतर्फेन लिहितात तें प्रमाण आहे आण सरदेसाई यांच्या अंमलाच्या गांवची जमीन असून फसऊन खातात आण इस्तादांस लटकें समजावितात त्यांचे पारपत्य इस्तादांकडून न होतां पुन्हां त्याजविसीं सरदेसाई यांजकडेस सांगणे येतें यावरून अपूर्व वाटतें जमिनीची सीमा येक इस्तादातर्फेची किंवा येक सरदेसाई यांतर्फेची नेमून तिसरा धनी नसतां ज्याचा इलाखा त्या दरबारांत कुंबले (?) देऊन भोगवटा करावा हे वाजबी असून गैरवाजबी राहाट करितील त्यास इस्तादांचा व सरदेसाई यांचा तह होऊन उभय राज्याची सीमा जमिनीची साक्ष मोजेने आहे तेथे इस्तादांतर्फेने चौकसी सोमणाच्या कांतरांविसीं करावी म्हणजे सहज निशा होऊन येईल सरदेसाई यांची जमीन तों खरीच आहे परंतू इस्तादांचा निशा होतांच आज पाच वर्षांचा म्हासूल कमाविसी करणारा कडून इस्तादांतर्फेने देववावा कलम ५

इस्तादांकडेस चाकरीस गेले त्यांच्या कबिल्यांस तोसीस केलें म्हणून लिहिलेचा जवाब जे सरदेसाई यांकडेस चाकरीस असून न पुसतां भलतीकडेस जातात सरदेसाई यास दुसमान बहूत आहेत त्यांकडेसही जातात तेव्हां वाजपूस न केली तर याच प्रकारें जातील आण दुसमानास मिलतील आण सरदेसाई याच्या राज्यातील माहेत सांगून

दुसमानाकरवी कमर बांधवितील याप्रमाणे उदंड वेळ मागां त्याच लोकांनी केलें आहे पुढां करायास अंतर करणार नाहीत यास्तव वरच्यावर पारपत्य करऊन गेलेले त्यांस माघारीं आणवावे लागतात इस्तादांचा व सरदेसाई यांचा स्नेह चालतो तेव्हां जाणारानी सरदेसाई यांची रजा घेऊन इस्तादाकडेस जावें सरदेसाई रजा द्यावयास अंतर करणार नाहीत जे चाकरीचें लोक असतील तेंखेरीज नाकून परकडे जातील त्यांणीं रजा घेऊन जावें पुढा तरी जातील त्याणी रजेखेरीज जाऊं नये तथाप इस्तादाकडेस पावले तरी कोणकोण ते सरदेसाई या तर्फेस कललेवर त्यास तोसीस होणार नाही तहनामेमधे कलम पांचवेमधें लिहिलें आहे त्याप्रमाणें चालावें ६

इस्तादांतर्फेचें वसाल यांणी सरदेसाई यांच्या तर्फेस खोतिया केलेल्या रद जाहाल्या म्हणून लिहिलें तर हा कालपर्यंत दिलेली खोती मना जाहाली नाही आण ज्याणी इस्तादांस मना केली म्हणून सांगितलें असेल त्यास इस्तादाने अगत्य सरदेसाई यांकडेस पाठवावे म्हणजे सरदेसाई यांचा निशा होईल कलम ७

पहिले दोन साला खंड इस्तादास द्यावा त्यापैकीं कांही बाकी राहिली आहे म्हणून लिहिलें तर वाजवी बाकी राहिली ती देऊस सरदेसाई अनमान करीत नाही परंतु पैका सरदेसाई यांकडून झाडेनसी पावला आहे रघुनाथ शामराव व इस्तादांतर्फेचे साहुकार यांचा रूजू मोजा करून ज्यांकडस थारले आसतील त्याकडून इस्तादास पावत करावे म्हणून हाली हेजीब जाणार त्यास सरदेसाई आज्ञा करितात कलम ८

वर्षासन द्यावें त्याचा जवाब सरदेसाई यां तर्फेने करार केला आहे तो खराच आहे पाळाई थोर पैका कांही दिवस राहिला तरी चालेल येकादे समई पाछाई चाकरीचा मजरा करून माफ करून घेणार याप्रमाणे पूर्वीही माफ करून घेतलें आहेत इस्तादांचे रुणानुबंधी म्हणून जेव्हां सरदेसाई घेतात तेव्हां इस्तादांचा पैका राहिला तरी चिंता नाही यैसे समजोन व खर्च सरदेसाई यांचा भारी तेव्हां इस्तादांकडून माहाल घेतले त्याचे रखवालीस व तेथील ठाणेस व त्या माहालच्या वतनदारांस व कुळी हशम त्या माहालचें इतुक्यासच त्या माहालचा यैवज पुरे न होई त्यांत माहालांतील खाजने व मेनें गाव इस्तादाकडेस राहिलीं आहेत व माहाल वेरजेसही कमी आला निमित्य इस्तादांतर्फेस आसतां खोतिया करणारानी मिरासदार रयेत मोडली व झाड व माड आंब्रे फणस मारून नेले त्यामुले जमे बुडाली पुन्हा आमदानी व्हावयास किती काल पाहिजेत यास्तव वर्षासनाचा पैका सरदेसाई यांकडेस राहिला आहे भर आमदानी माहाल होने ते मुदतींत सालीना पाचसे रुपये द्यावे याप्रमाणे करार त्यास हाली सर्व अनपत या प्रकारची असतां दोन हजार रुपये पाववेयास तफावत होती न द्यावे यैसे सरदेसाई म्हणत नाही परंतु लिहिला अर्थ इस्तादाने ध्यानी आणून पूर्वील बेरीज पाचसे रुपये करार करून आजवर राहिले घ्यावे दीड हजार माफ करवावे तेणेकरून सरदेसाई

संतोषी होतील यास माफ करायास सरदेसाई यां तर्फेने मर्दनगडचे मसलतीसही साहित्य जाहालेच आहे व पुढाही इस्तादाच्या कार्यास किमपि अंतर करणार नाहीत हा मजकूर सध्या उरकावा आण पुर्तकालाचा उजूर असला तरी येकबालपन्हांही याजविसी अर्जी लेहून सरदेसाई यां तर्फेची पुर्तकालास पाठऊन लिहिलेप्रमाणे मना करवावें आण पांचसे सालीना करार करावे कलम ९

इस्तादांच्या वसालांची देसकत पालावी म्हणून लिहिलेचा जबाब तर ज्याप्रमाणे चालत आली आहे त्याप्रमाणे चालते आपआपणात वारिसदार भांडून आपली वतने खराब करितात त्यास इस्तादाचे आश्रयास जे आसतील त्यास उभय पक्षी ताकीद करवावी न यैकून भांडतील आण वतन खराबीस आणतील तर त्यांसच नाहीसें होईल सरदेसाई याणी ज्याचे वतन त्यास सोडून दिलेच आहे त्याने संतोषे अनभवावे कलम १०

इस्तादास पाहिजे तेव्हां कुमक द्यावी याचा जबाब तर उभय पक्षींच्या संस्थानावर गनीम येऊन जुंजू लागला तर उभय पक्षीं सर्व प्रकारें येकयेमेकाच्या साहित्यास जमावनसी व सुधी मार्गे अंतर न करावे संस्थानावर कोणी जुंजत नसतां दुसरे जागा जाऊन जुजणार जाहालेया जमाव द्यावा त्यास आपलें स्वहीत होत असेल तर अलबता द्यावा आण आपणास मागांपुढा बाधक होईल असें असल तर न द्यावा न दिला म्हणून उभय पक्षी विशाद न मानावा कलम ११

येणेप्रमाणे इस्तादांकडून लेहून आले कलमाचा जबाब सदरहू लिहिला आहे सरदेसाई या तर्फेचा मुदेचा तपसील इस्तादांकडेस पेसजी राजश्री जिवाजी विश्रांम सबनीस यां मार्फतीने इस्तादास ज्याहीर जाहालेच आहे त्याची निभावणी करणेवास्ते इस्तादांकडून हाली राजश्री सदासिव नारायण चिटनीस यास पाठवावे म्हणून लेहून आलेवरून मारनिलेस रवाना केले होते ते जाऊन तीन मास तेथ राहून कार्यभाग उरकून न देता सबबेवर घालून मारनिलेस रवाना केले हे गोष्ट इस्तादाच्या महत्त्वास उचित नव्हे मातबर माणूस मुजरद कागद पाठऊन न्यावे आण कार्येभाग उरकून न देतां रवाना करावे येणेकरून जाणाराचा लौकिक जनात उतम होत नाही हे मालूम व्हावे वास्ते कलमे केले असें १२

सु. ११८४ (?) जिल्काद ७	६९ हु	श. १७०५ आश्विन शुद्ध ९ इ. १७८३ आक्टोबर ४

तालीक अर्जी समानैन

अजम अकरम दो रोंद्रिक गिलैप देसोज गावर्नदोर व कपितांव जनराल दा ईंद दाममोहब्बत हु

दं अमारत व अयालत पन्हा शौकत व हिसेमत दस्तगाहा [मो. जा.*] अजो गोविंदराव लक्ष्मण सलाम बाजद सलाम येथील नेकी जाणोन मोहिबी कार नेकी कलमी केली पाहिजे दिगर माहिबी किताबत पाठविली ती पावोन कलमी केला मार तो माळूम जाहाला राजश्री सरदेसाई याजकडील मुद्याचा जवाब कलमी आलाहिदा कागद पाठविले तेही पोहोचोन अर्थांतर ध्यानी आला जे लिहिल ते मागील तहनामेचे अश्रयेच लिा असेल प्रमाण आहे परंतू सीमपडोसी संवस्थान हरवख्त बिघडाबिघड होऊन समयपरत्वें परस्पर साधनें करीतच असतात याचमुळे उभय तर्फेत किलाप वाडोन पुन्हपुन्हा बिघाडास कारण होते ही गोष्ट नसावी यार्थी श्रीमंताही मध्यस्थरीतीने जे लडे असतील ते दूर करून उभयेता स्नेही तेव्हा सीरोद्धार मित्रभावे चालोन दोही संवस्थानाचा बऱ्याव असावा याजकरिता मुजरद येथे आमची रवानगी केली त्यापेक्षा याचा विचार बोलणे तो समक्ष बोलता येईल लेहून दिलेले पुन्हा सरदेसाई मागतात म्हणौन शब्द ठेवावा तर हा पथ बहुता ठाई आहे त्यामुले दुशण ठेवावे असे नाही परंत त्यातही सारासार सेर नसेर विचार आहे कलावे आपण सोमवारी मौजे नेरले येथे जाणार भटणार जाहालिया तुमचे इशारतीप्रमाणे नेमाल ते रोजी तरांडी पाठवणेत येतील म्हणौन लिा तर आपले भेटीस बहूत दिवस जाहाले आणि जाबसाल जलदी उलगडून आपलेस हुजूर जाणे जरूर तेव्हा आपण असतील तेथे यावेचे लागेल याजकरिता लवकर आपले येणें पणजीस येका दो रोजात होईल तर तैसेच ल्यावे मग नेरलास येण्याचे कारण नाही आणि अधिक रोज लागल्यास यावे लागेल बुधवारी तरांडी पाठवावी रा छ ७ जिल्काद ज्यादा काये लिहिणे हे किताबत

७०

सु. ११८५ शाबान	श्री नकल	श. १७०६ आषाढ इ. १७८४ जून-जुलै

हजरत इस्तादांमधें व राजश्री [मो. जा.*] सरदेसाई पा कुडाल व माहाला-निहाय यांमधे बिघाड जाहाला त्याच्या तहसौरसाकरितां श्रीमंत राजश्री [मो. जा.*] पंतप्रधान यांणी राजश्री गोविंदराव लक्ष्मण यासी गोंव्यास रवाना केले ते दाखल होऊन बोलीचालीचा संदर्भ लागला असता पुर्ता सुलूख होई तव समशर तकूब करून नवदीगर होऊ नये आसा करार केला त्यास उभय पक्षीं परस्परसी वतुर्क होऊ लागले ते दूर होऊन तह करार होईपावेतो नवीन करारानतर जाहाले करमाची मखलासी करून बंदिस्ती व्हावी आण उभयतर्फेची रयेत बेवसवसा मुलुकाची लावणी संचणी करून नांदावे यावा कलमें बिताा

१ सदरहू करारानंतर इस्तादानी उसपास आपला जमाव पाठऊन बंदोबस्त केला आहे कीं डामे गवस मवास इस्तादांकडेस कुत्रिम करून आहे त्यास देतात म्हणोन तर इस्तादानी आपला जमाव उसपातील काढावा भोसुले यांणी उसप जागा डामे गवस यास देऊ नये पेसजीप्रो ठाणेचा बंदोबस्त सरदेसायां· निसबत होता तसा आसावा कलम

१ पेडणे प्रांतीचे चाकरमाना व रयेत लोक बारदेस प्रांती आले आहेत त्यास प्रांत मजकूरचे लावणीसंचणीबा निरोप देऊन प्रांतांत रवाना करावें कलम

१ पेडणे माहाल सरदेसाई यांचा त्यांजकडे चालतो त्यांतील गांव मौजे हलवर्णे हा रा लक्ष्मण जसवंतराऊ देसाई ता पेडणें याचा मोकासा म्हणोन इस्तादानी त्यास दिला तर तो गाव सरदेसाई यांजकडेस अनभऊन आलेप्रो सरदेसाई यांचे जत्फीस आसावा कलम

१ इस्तादांतर्फेचे देशक यांणी दाडगावे करून मौजे गालेल ता बांदे येथील दोघे ब्राम्हण व येक हज्याम धरून आणिले आहेत त्यास सोडोन द्यावे यासिवाई कोणही कुलें आगलीं आसतील तर सोडावी कलम

१ इस्तादाच्या निरोपानें लग्नाकरितां पागनीस व त्याबाचे ग्रहस्त वाडीहून इस्तादांचे ताळुकेत आले त्यास अडथळून ठेविले त्यास सोडून द्यावे वाडीस रा रघ सेणवी राईबंदरकर याचा नातू व रा सगुण नाईक गोव्याहून गेले त्यास ठेऊन घेतले होते त्यास भोसले यांणी सोडून दिले आहेत कलम

१ पुढां पुर्तुगाली जाबसाल येऊन तह ठरे तववेर व्यारीउदेगी वगैरे काजकामानिमित्य येणार जाणार त्यास उपसर्ग आसों नये अटकाव न व्हावा तसाच इस्तादतर्फेचे येतील जातील त्यास अटकाव होऊ नये कलम

१ रा सिदबाराऊ व हिरेप्रा देसाई ता भतग्राम हे इस्तादांकडेस मवास होऊन दांडगांवे करितात तर त्यांकडून सरकारतर्फेने दांडगावें इस्तादांचे ताळुकेंत होऊ नये इस्तादांकडून किंव्हा इस्तादतर्फेचे देशकांकडून भोसले यांचे प्रांतांत दांडगावें न व्हावे रयेत लोकानी उभय तर्फेतील सुखरूप लावणीसंचणी करून बेवसवसा आसावे कलम

१ यासिवाई लाहानथोर जाबसाल जे आसतील ते पुर्ता तह पुर्तुगाली जाबसाल सतानावर येणार आहेत ते आलेनंतर जाबसालाचा ठराव व्हावा हा करार कदाचित तें न आले आणि प्रतिवर्षी तारू येते त्यावरून अगर कोणत्याही जाहाजावरून पुर्तुगाली आज्ञा येईल तेव्हां जाबसाल निवडावे त्याआगोदर उभय तर्फेचे रयेतीने बेवसवसा वसांत करून मुलुकाची लावणीसंचणी करावी जाजती जलाल उभयतर्फेने होऊ नये कलम

१ नवे काबजादीत इस्ताद याणी रयत लोकांस व गैरे यास पुरातन चालत आहे त्याप्रो किमपि नूतन न करितां चालवावे नवीन प्रकार भलतेविसीही करूं नये कलम

१ नवे काबजादींतील कुले व खंडालेहून रघू नाइकवाडिया यास रा सिदबाराऊ वहिरेप्रा याणी धरून न्हेले त्यास ताकीद करून ती कुले व रघू नाइकवाडिया यास रवाना करावे कलम

१०

येकून कलमे दाहा सदरहू लिहिलेप्रो कोणही तारवावरून पुर्तुगाली जाबसाल येऊन उभय पक्षीचे लढे उरकून मखलासी होऊन निखालस तहनामा होईतवपर्यंत दिक्कत नसता चालावे याबा उभय पक्षी वोलीस कोणही लयाख मनुष्य यावे काही तजाउजू सदरहू लिहिलेत उभयताकडून घडल्यास वोलीनी जाबसाल करावा त्या वोलीच्या मनुषाचे योग्यतेनुरूप बहुमानयुक्त चालऊन रितीने ठेवावे येणेप्रो राजश्री गोविंदराव लक्ष्मण वकील दिा राजश्री [मो. जा.*] पंतप्रधान यांचे विद्यमाने करार केला आसे सुा खमस समानैन मया आलफ छ [मो. जा.*] शाभान

सु. [११*] ८६ शाबान १	७१ श्री	श. १७०७ ज्येष्ठ शुद्ध २ इ. १७८५ जून ९

पो छ ७ शान सीत समानैन

अखंडितलक्ष्मीआलकृत राजमान्ये राजश्री राजे खेम सांवत भोसले भाहादर सरदेसाई पां कुडाल व माहालानिहायेनी गोसांवी यांसि

सेवक लखमगौडा सरदेसाई पां खानापूर राम राम विनंती उपरी येथील कुशल तागाईत छ १ शाभान अवधारोन स्वकीये स्वानंद लेखनाज्ञा निरोपिली पाहिजे विशेष अलीकडेस आपणाकडून पत्र येऊन परामर्ष जाहाला नांही तरी असें न करितां सदैव पत्रागमनी परामर्ष घ्यावया साहेब सुज्ञ विवेकी आहेत यानंतर आपल्या पुण्येप्रतापे लडोन सडा हस्तगत जाहाला आम्ही आजवर केरीस होतो समयामुले संकटास्तव त्वरा होऊन फिरंगियांच्या ठिकाणी जावे लागले त्यास काल जेष्ट शुा १ पदे दिवसी केरीहून निघोन मुलेमाणसासुधा सडेस आलो आहो साहेबास कलावेबदल लिहिले आहे तदनंतर इकडील राजकी वर्तमान श्रीमंत पेशवे यांची फौज बदामीस परीघ घालून बैसली होती इतकेंत सवणूरकर नवाब याणी श्रीमंतास सागोन पाठविलें जे टिपूमिया याकडील दाहा पंधरा हजार बार व च्यार हजार स्वार सौणुरास येऊन चवक्या देऊन बसले आहेत आपणास कबिलेसुधा

धरून न्हेतात यां समयी तुम्ही कुमक करून सोडऊन घेतलेस आपले पदरी पडणार त्यावरून बदामीहून श्रीमंतानी पन्नास हजार फौज सवणुरास रा करून दिली त्याणी जाऊन अविंदाकडील फौज लुटून फस्त केली सात आठसी माणूस बंद धरून आणिली पांच च्यार सरदार चांगले नामांकित सांपडलें नवाब यास कबिलेसुधा बदामीस घेऊन गेले अविंदाकडील कांही तोफखानाही सांपडला त्यावर बदामीही घेतली बदामीच्या किलेचा बंदोबस्त करून फौज धारवाडास छावणीस येणार अविंदाची फौज सोधेबिदनूरची झाडी धरून आहे मागोन होईल ते वर्तमान शेवेसी लिहून पाठवितो बहूत काय लिहिणे कृपा असों दिली पाहिजे [नि बालबोधींत*] हे विनंती

सु. [११*] ८६ जिल्हेज २९ (३० ?) गुरुवार

७२

श्री

श. १७०७ कार्तिक शुद्ध १
इ. १७८५ नोव्हेंबर ३

पौ छ ३ मोहरम सीत समानैन

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्येया विराजित राजश्री राजे खेम सावत भोसुले बहादर सरदेसाई प्रांत कुडाल व माहालानिहायेनी गोसावी यांसि

ई श्री नीलकंटगौडा सरदेसाई पां खानापूर राम राम विनंती येथील कुशल ता छ २९ जिल्हेज गुरुवार प्रसरा (?) प्रहर जाणऊन लेखनी आज्ञा निरोपिली पाहिजे विशेष पेसजी टिपूखान यांची फौजेचे वर्तमान सर्व लिो च होते सद्या कितूरकर याणी आपले तर्फेची जमाव तयार करून श्रीमंताकडेस ठाणी त्यापैकी देशनुरावर चाल करून ठाणे सोडणे असे लाविले तेव्हां ठाणेतील लोकांनी अधिकउणे जाबसाल सागितला तेव्हां त्यास यांस मारामारी जाहाली कितूरकर याकडील दाहापांच ठार दाहापांच जखमी जाहाले दोन घोडी ठार पडली इलाज न चाले असे पाहून माघारे कितुरी गेले तेव्हां पुढे मसलत खामखा आम्हांकडेस यावे असी तजवीज करून सिध्दतेत आहेत आज उद्या खामखा गाव घालतात आजवरी या मंडणाचे साभिमानी आपण विस्वतोमुखी आहे पत्र विनंती ध्यानी आणून दोन सद जमाव दारूगोलीचे साहित्य पाठवावयास आज्ञा व्हावी लक्ष पत्राचे जागा हे पत्र समजोन येस द्यावे आम्ही आपले असों समई खासा कागद मिलाला नाही राग न करावा बहूत काय लिहिणे कृपा करावी टिपूखान यांची फौज कितुरावर चार आणी मात्र आली आहे श्रीमंताच्या राज्यात अद्यापी हात लाविला नाही त्याच्या दाबावरी हे कामकाज करावयास पाहातात हे आपणास कलावे याकरितां लिो आहे बहूत काये लिा कृपा लोभ करावा [बाळबोधीत नि*] हे वीनंती

सु. ११८६ सफर २४	७३ श्रीशंभुः तालीक सिकेचे कागदाची	श. १७०७ मार्गशीर्ष वद्य १२ इ. १७८५ डिसेंबर २७

राजश्री खंडेराव दरेकर सरलस्कर गोसावी यांसि

ई सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य[मो. जा.*] स्नौ राजे खेम सावंत भोसले बाहादर सरदेसाई पा। कुडाल व माहालानिहाये राम राम विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन केले पो विशेष आपणांकडोन पत्र येऊन साकल्य वृत कलों यत नाही तर सदैव पत्री कुशल वृत लेहून संतोषावाप्ती होय तें करावे यानंतर अजम टिपू सुलतानखां याजकडील फौज नरगुद घेऊन धारवाडचे आसपास होती तदोतर ती फौज कितुरास येऊन कितूरकर देसाई यास अस्वासन देऊन देसाई त्याचे विस्वासादर जाऊन स्वस्थ होता त्यास दकलपणी (?) देसाई व त्याचे कारभारी यास धरून क(कि)तूरचे ठाणे यवनाचे फौजेने हस्तगत केलें त्यानंतर खानापूर व बागेवाडी व सबगाव व बेलगावाचे तनखेतील येक दोन गावी व कलानिधी तालुकेतील येक दोन गावी यैसी राजश्री पंतप्रधान याचे तालुकेंत यवनाकडील फौजेने ठाणी घातलीं परंतू कोणी त्याजवर गोलागोली उडविली असा प्रकार नाही यवनाची फौज शर होऊन आपला काबू साधीत चालला तिकडील प्रांतांतील मनुष्यास धीर न पुरे तेंव्हा जागा मिलेल तेथे चाललें यवनाचे परिमार्जन होणेयाची पैरवी राजश्री पंतप्रधान याजकडून व्हावी ती अद्यापवेर नाहीं तेव्हां मनुष्यास अवसान न पुरे तिकडून ढील कोणत्या अर्थे घातली हे मसलत ज्याचे ते जाणेंत कितूरकर याची ठिकाणे असतील ती यवनाची फौज घेत आहे यैसे त्यांचे म्हणणे असेल परंतू कितूरकर देसाई जाहाला तरी संस्थान राजश्री पंतप्रधान यांचे पदरचें आण तालुका सरकारचा लगता यवनाची प्रबलता जाहालेस उतम कीं काय हा सर्व मजकूर राजश्री बालाजीपंत नाना व राजश्री हरिपंत तात्या यांस कलावा परभारेही त्यास बातमी आहेच परंतू इकडून लेहून वर्चेवर पत्रें पाठवीतच आहों त्यास उतर कांहीच कलत नाही हाली यवनाची वर्तणूक म्हणावी तर सर्वत्र ठाऊकच आहे हिंदू धर्मास येक छत्र राजश्री पंतप्रधान ईश्वरेही त्यास सर्व प्रकारें सामर्थ दिलें आहें कासीरामेश्वरपावेतों येक छत्र त्याणीं केलें तूर्त यवनाची प्रबलता जाहाली यांत हिंदू धर्माचा लोप व्हावा असा समई प्राप्त जाहा [ला*] याचा विचार राजश्री पंतप्रधान यांही करावा व तुम्ही च्यार मानकरी मताःबार आहां त्याही त्यांस समजोन सांगोन यवनाचे परिमार्जन होई ती मसलत घ्यावी हेच तुम्हा सर्वत्रांस उचीत आहे याजकरिता हे पत्र मुजरद लेहून पो आहे आशास जेणेंकरून वरघाटचे रानी त्यांच्या फौजा येऊन यवनाचे फौजेचे परिमार्जन होई तो विचार करावा आम्हीं तुम्हांस केवल इकडील साहित्याचे उपयोगीं लिहिले आसे ध्यानी न आणावें या संस्थानचे सरादीस संनीध जाणोन इतका प्रकार

लिहिला असे समजाल तर हे संस्थान त्याचे घरोबेतील तेव्हा त्याहीच साहित्य करावें आणि आम्हासही भरोसा त्यांचाच आहे परंतू यवनाची फौज बेलगाव लगत्यास आली तेव्हां पुणेकडून फौजा येऊन याचा बंदोबस्त व्हावा म्हणजे गोरगरीब मनुषास अवसान पोह्चोन समई इकडीलहीं साहित्य घडेल यास्तव लिा आसे राजश्री पंत प्रधान यांही आपले तालुकेचा बंदोबस्त न करिता हिंदू धर्माचा लोप होऊन यवनास शेर करावे हे त्यांचें चिती असलेस मग इतरांस भगवंत आहे जें घडेल तें पाहातच असतील यैस्यास च्यारहीं अर्थ तुम्ही सर्व मिलोन आज पावेंतो लौकीक संपादून इभ्रत मिलविली त्याची वृधी होय तो विचार करावा यवनाची फौज तीन च्यार हजार बार व स्वार व तोफा यैसी जाबोटीस येऊन जाबोटीचे ठाणें हस्तगत केलें ठाणे च्यार दिवस दम धरोन लढले परंतु उपरालेवाचून काय करितील हेही वर्तमान आपणास कलावे यदर्थी लिा असे ता छ २४ माहे सफर सुा सीत समानैन मया व आलफ [नि*] हे विनंती

सु. [११*] ८६ रवल | ७४ श्री [नि*] व्यंकटेश | श. १७०७ पौष शुद्ध २ / इ. १७८६ जानेवारी २

राजश्री राजे खेम सावंत भोसले बाहादर सरदेसाई प्रां कुडाल व माहालानिहाये गोसांवी यांसि

ई सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्यं [मो. जा.*] श्री व्यंकटराव नारायण आसीर्वाद विनंती उपरी येथील कुशल जाणौन स्वकीये कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष अलीकडे आपणाकडून पत्र येऊन कुशलवृत कलत•नाही तरी येसे नसावे सदैव पत्र पाठवून संतोषवीत असिले पाहिजे यानंतर टिपूखांन याजकडील फौज येऊन सध्या तूर्त सब्यास मोर्चे दिल्हे आहेत पुढे खाली उतरावे ही मसलत त्यांची आहे येवि-सीच्या मसलतीची तरतूद आपण योजिलीच असेल त्यास हाली येविसीच्या मसलतीकरिता राजश्री [मो. जा.*] पंतप्रधान यांजकडून राजश्री गोपालराव यांस आपणाकडे रवाना केले आहेत तरी तेथील आज्ञेप्रा मशारनिल्हे आपणापासी बोलतील तो अर्थ ध्यानांत आणून कर्तव्यता करावी मशारनिलेच्या बोलण्याचे अर्थ राजश्री [मो.जा.*] प्रधानपंताच्या उपयोगी आणि आपले उपयोगी नाही यैसे नाही त्यास या प्रसंगी आपण पुर्ती मसलत अंगावर घेऊन पैरवी केल्यास आपलाही नक्ष राहून पुण्याकडील लक्षही पक्केपणे आपल्या हातांस लागेल त्यांत खासगत कामेही बारीकमोठी असतील ती सहजांत घडोन येतील याजकरितां लिहिला अन्वये ध्यानांत आणून उद्योग करावा पुण्याकडील बारीकमोठे लढे असतील ते चितात न आणितां बाजी मारून वेश घ्यावे यातच सर्व अर्थ आहेत ते सिध होतात रावजी आपल्या पदरचे व सरकारच्याही पदरचे त्यापक्षी सर्व प्रकारें बरदास करून

लौकिकांत चांगले दिसोन यांचा निर्वाह तेथे घडे आणि आपल्याकडे गेल्याचे सार्थक होये तो अर्थ केला पाहिजे [नि*] रा। छ १ रौवल [नि*] बहुत काये लिहिणें लोभ करावा [नि*] हे विनंती

पै॥ छ ५ राखर सीत समानैन

सु. ११८६ रवल १२ | ७२ श्री | श. १७०७ पौष शुद्ध १४ इ. १७८६ जानेवारी १३

[ले. ६४ प्रमाणें शि. व मो.*]

राजश्री खेम सांवत भोसले सरदेसाई प्रां कुडाल व माहाये गोसांवी यांसि

ईं अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य [मो. जा.*] श्रो माधवराव नारायण प्रधान आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें विशेष ता। सडे येथे फतेअलीखान याचा जमाव येऊन मोर्चेबंदी करून सडेकर देसाई यास सख्ती केली आहे त्यास सडे तुमच्या प्रांताचे सरहदेवर घांटमाथा त्यापक्षी तुम्ही सडेकराचा उपराला केलाच असाल तेथे शत्रूचा दखल जाल्यास आसपास व तुमचे ताळुक्यास पायबंद तें ठीक नव्हे याजकरितां सडेकराचा उपराला करून फतेअलीखांन याचे फौजेचे पारपत्य करावे व पारगड भीवंगड सरकारचे किले घांटमाथा आहेत त्याचा मदतउपराला करून त्या रोखावर जमाव पाठऊन बंदोबस्त राखावा [नि*] जाणिजे छ १२ रौवल सुा सीत समानीन मयां व अलफ [नि*] बहूत काय लिहिणे

पौ॥ छ ३० रबिलावल संध्याकाली सन सीत समानीन

सु. [११ *] ८६ रखर १९ | ७६ श्री | श. १७०७ माघ वद्य ६ इ. १७८६ फेब्रवारी १९

राजश्री खेम सावंत भोसले सरदेसाई प्रां कुडाल व माहाये गोसावी यांसि

ईं अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य [मो. जा.*] श्रो बालाजी जनार्दन आशीर्वाद विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें विशेष तुम्ही छ ३० (र)बिलौवली पत्र पाठविले ते पावले लिहिला मजकूर कलला टिपूचे फौजेचे वर्तमान पेशजी आपणांस लेहून पाठविलेंच आहे त्यास त्यांणी सडे घेतले [ते*] व्हा सस्थानचे सरहदेस शह प्राप्त जाहाला मो [ठे*] संकट प्राप्त जाहाले त्यास आपले-

करून साहित्य होऊन बचाव [होये ऐसे*] केले पाहिजे म्हणोन व श्रीमंत माहाराज राजश्री [मो. जा.*] छत्रपती स्वामी करवीरवासी करवीराहून ······ शे प्रसिद्धगडी आले येविसीचा तपसीलवार मजकूर लिहिला तो कलला ऐशास [आपली*] पत्रें पेशजी आली होती त्याची उतरे पाठविली ती पोहचलीच असतील टिपूचे फौजेने सडे घेतले त्यास येविसीचे बंदोबस्तास राजश्री जिवाजी गोपाल रवाना केले ते लौकरच जाऊन पोहचतील तुम्हीं त्यांणी एक विचारे होऊन घाटाचा वगैरे बंदोबस्त राखोन मजबुतीने राहावें राजश्री तुकोजी होलकर यांचीही रवानगी शाहापूर बेलगांवचे सुमारें केली आहे आता तिकडे शत्रूचे फौजेचे बल होणार नाही आमची व नवाबाची भेट माघ वद्य द्वितीयेस जाली याउपरी मसलत होऊन लौकरच टिपूचें पारपत्य होईल करवी [रवासी*] माहाराज स्नानास आले होते ते माघारे गेलेच असतील वर्तमान वरचेवर लिहीत जावे रा गोपालराव रामचंद्र येथून तुम्हाकडे रा केले ते जाऊन पोहच [ले*] चे तुमचे पत्र येत नाही त्यांस माारनिले पोहचले असतील सविस्तर सागितल असेल त्याप्रो लवकर तरतूद जाली पाहिजे उतर सत्वर पाठवावे [नि*] रा छ १९ राखर बहूत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंति

पौ। छ ७ जौावल सीत समानैन [कागदास बरेच ठिकाणीं मोठीं छिद्रें पडलेलीं आहेत *]

सु. ११८६ जवल १४	७७ श्री	श. १७०७ फाल्गुन वद्य १ इ. १७८६ मार्च १५

तालीक

राजश्री खेम सावंत भोसले सरदेसाई प्रात कुडाल वगैर माहालानिहाये गोसावी यांसि

दं सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य [मो. जा.*] स्नेो तुकोजी होलकर राम राम विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत असावें विशेष आपण पत्र पाठविले पावोन लेखनार्थ अवगत जाहला श्रीमंत महाराज राजश्री छत्रपति याजकडील फौजेचा मार लिहिला त्यास आपले लिहिल्यावरून महाराजाकडील वकील येथे आहेत त्यासी येविसी बोलणे ते बोलून त्याची व येथील पत्रें माहाराजाकडे मुजरद जासूद जोडसमागमे रवाना केली आहेंत अतःपर आपले फौजेस माघारे बोलाऊन घेतील गुता पडावयाचा नाही याउपरी आपणंही जमीयेतसुधा यासुमारे सत्वरच यावयाचे करावें रा छ १४ जमादिलावल सुा सीत समानैन मया व अलफ बहूत काय लिहिणे लोभ कीजें हे विनंति

सु. ११८७ } ७८ { श. १७०८ पौष वद्य ३०
रवल २८ } श्री { इ. १७८७ जानेवारी १९

[ले. ६४ प्रमाणें पण उलटा 'न' असलेला व वा. शि. व मो.*]

राजश्री खेम सावंत भोसले सरदेसाई प्रां कुडाल व माहालानिहाये गोसावी यांसि

ई अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य [मो. जा.*] श्री माधवराव नारायण प्रधान आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणोंन स्वकीय कुशल लिहीत जाणें विशेष तुम्हीं प्रांत करवीर येथील किले रांगणा घ्यावयाचा फितूर केला होता हें वर्तमान श्रीमंत माहाराज राजश्री [मो. जा.*] छत्रपती स्वामी यांस करवीरास विदित जाहाल्यानंतर बंदोबस्त केला व तुम्हांकडील फितूरी लोकही धरिले व तुम्हीं किले मजकूर व किले मालवण या दोहीं किल्यामध्यें तिपणकडा व वेतालखडी येथे हाली चिन्याची तटबंदी बांधिली आहे व लाकडाचा मेढा घालून लोकांचा जमाव करून किल्यास व करवीर प्रांतात उपसर्ग करितां हदमहदूदेप्रो चालत नाहीं म्हणोंन हुजूर विदित जाहालें त्याजवरून हें पत्र तुम्हांस लिहिलें असे तरी किल्याचे फितूर करून करवीर प्रांतात उपसर्ग करितां हे गोष्ट ठीक नसे याउपरी सरकारांतून हैबती उगला व रघोजी रानवडा खिजमतगार पाठविले असेत यांचे गुजारतीनें तटबंदी व मेढा पाडून टाकणें हदमहदूदेप्रो चालत आल्या बमोजीब चालणें तुमचे काय लढे असतील ते माहितगार कारकुनाबराबर सांगोन हुजूर पाठवणें समजोन घेऊन आज्ञा करणें ते केली जाईल तोंपर्यंत करवीर प्रांतात कोणेविसीं उपद्रव न करणें फिरून बोभाट येऊं न देणें जाणिजे [नि*] छ २८ रबिलावल सुा सबा समानीन मया व अलफ [नि*] बहूत काये लिहिणें

पो छ १७ राखर सबा समानैन मुा किले यशवंतगड

पौष शुद्ध ५ इंदुवार } ७९ { श. १७०९ पौष शुद्ध ५ (६)
} श्री { इ. १७८८ जानेवारी १४

चिरंजीव विजईभव राजश्री राजे खेम सावंत भोले बाहदर सरदेसाई पा कुडाल माहलानिहये यासी प्रति सखुबाई सिंदे आनेक आसीरवाद उपरी येथील कुशल ताा पौष शुा ५ इंदुवारपावेतो येथास्थित आसे विशेष आलीकडे तुम्हाकडून पत्र येऊन वर्तमान कलत नाही त्याजवरून चित चिंतातूर जाहाले तरी येसे न करावें वरचेवर तपसिले वर्तमान लेहून संतोषवीत आसिले पाहिजे यानंतर करवीरकर यानीं फितुराने नरसिंगड घेत [ला*] आणि पुढे संस्थानास उपद्रव करणार ये विशईचा मजकूर पुण्या [हून*] कारकून करवीर-कर याजकडे रवाना केले आहेत आणि त्याजकडील वकिलासही सरकारातोन निक्षूण ताकीद जाली आहे मागाहून येथून राजश्री गोविंदराव भागवत यासीही पुण्यास राा केले

ते काल जाऊन पुण्यास पावलें करवीरकर याजविशई दरबारातील बदोबस्ताविशई कालजी न करावी तेथील मात्र संस्थानाची बदोबस्ती पकेपणे घाटतोंडची वगैरे लोक ठेऊन करावी बेफामीने किला फितुराने गेला पुढे तरी बहुत बहूत सा[व*]धानी करून बदोबस्त संस्थानाची राखावा कचा मजकूर ताबडतोब वरचेवर लिहीत जावा सर्व प्रकारे आपले-कडील चिंता प्राप्त जाली आहे पुण्याहून गोविंदराव गेल्यानंतर पत्रे आली नाहींत येक दोन रोजात पत्रे आली म्हणजे तेही रो तुम्हाकडेस करून देऊ पेशजी पुण्याची पत्रे आली ती तुम्हाकडे रो केली आहेत पोहचली असतील सारांश अर्थ की संस्थानाची सावधानी राखोन वरचेवर वर्तमान लेहून पाठवीत जावे बहुत काय लिहिणे हा आसीरवाद

पौ छ २२ राखर समान समानीन भोमवार चोथा प्रहर

सु. [११*] ८८ रखर १७ (रविवार) | ८० श्री | श. १७०९ पौष वद्य ५ इ. १७८८ जानेवारी २७

तीर्थस्वरूप मातुश्री [मो. बा.*] मामीसाहेब सिंदे वडिलाचे सेवेसी

अपत्यसमान राजे खेम सावत भोसलें बाहादर सरदेसाई पा कुडाल व माहालानिहाये दंडवत विनंति येथील क्षेम तागायेत छ १६ रबिलाखर जाणून स्वकीयें स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजें विशेष इकडील वर्तमान जाहलेलें मागील तागायेत छ १२ राखर मंगलवारपासोन लेहून पाठविले आहे त्याजवरून निवेदन जाहालेच असेल आलीकडेस करवीरवासियाचा मुकाम नादोस नजीक मालवण येथे होते तेथून इकडील किला भरथगड येथे फौजमुधा जाऊन तल किलेखाली दिला आहें किलेंकराची व त्याची मारगिरी होत आहें राजश्री गोविंदराव भागवत यांजला श्रीगोदेहून पुणेंस रवाना केले पूर्वी कारकूनही पाठविला होता त्यास माहाराजाचे फौजत कारकून पाठविला आहें तें माहाराजासी विनंति करोन सावतांकडील बदोबस्त करून देतील बदोबस्ताविसीचा उद्योग चाललाच आहे म्हणोन वडिलास राजश्री हरिपंत तात्या यांचे पत्र आलें तेच वडिली येथे पाठविला तें पावलें कारकून आला म्हणावा तर माहा-राजानी निपनखडी व वेतालगडीविसी खिजमतगार व कारकून आला त्याचे बोलणे दोही ठाणेतील सिबंदी काढोन पाच माणसें ठेवावी हे व कागदीही तोच आशये त्यास आम्हास राजश्री पंतप्रधान यांचे लक्ष राखणे हे सर्वोपरी त्याअर्थें दोनही मेढेतील सिबंदी काढून पाच माणसें ठेवावी हा करार करोन चिठ्या दिल्या करवीरवासी फौज सुधा घाटमाथा मागारे स्वस्थलास जावें आणि कराराप्रो सिबंदी आणावी त्यास करवीर-वासी नारूराहून घाट चढोन निकहूनच घोटगेचे घाटानें नरसिंगडाखाली उतरोन हेरडवेहून

मालवणचे नजीक तळ दिला तेव्हां कारकून व खिजमतगार याचे बोलणेस फेर पडला तेव्हां सिबंदी मेढेतील कसी काढावी ही विवचना प्राप्त जाली करवीरकर याणी वेतालगडीस येऊन मारामार करू लागले ते समई कारकून व खिजमतगार येथे आम्हापासी होते त्यासी आम्ही पुसिलें कीं तुम्ही बोलता हे काये आण तें घाटाखाली उतरोन पुन्हां कलह करू लागले तेव्हा तुमचें बोलणे कोठे राहिले त्यास कारकून व खिजमतगार याणी आम्हासी सांगितले कीं वेतालगड व तिपनखडीची सिबंदी सरकार आज्ञेप्रो पाच माणसे ठेऊन वरकड काढावी माहाराजास घाटावर घालवणे आम्ही करितों हा आग्रह केला तेव्हा आम्ही दोनही कडेस मागती चिठ्या देऊन कारकून व खिजमतगार व इकडील माणसे देऊन घालविलें तिपनखडीचे लोक इकडील आज्ञेप्रमाणें आलें वेतालगडीचे लोक पावेतंव अगोदर त्याणी गडी घेतली कारकून व खिजमतगार त्याचे लस्केरात गेले ते तेथच असतां तुर्त भरथगडाखाली फौजेचा तळ देऊन बसले आहेत तेव्हा कारकुनाचा व खिजमतगार याचा प्रकार काहीच समजत नाहीं आण पुणेहूनं माहाराजाकडील बंदोबस्त होऊन कलह सावतासी होऊ नये असा बदोवस्त केलेचे उतर वडिलास हरिपंत तात्याचे आले यातीलही अर्थ न समजे यात काये समजावे वडिलाचे लिहिणें तंव धीर अवसान न साडावा पुणेहून बदोबस्त करवीरकराकडील होईल तुम्ही आपलेकडील लोकास अवसान देऊन आपला बदोबस्त पका राखोन त्यास ठासून धरावे त्यास वडिलाचे लिहों अन्वये येथून बदोबस्तास कसूर तंव नाहीं परंतु हे लोक कोकणें त्याचे राऊताचा व गैर लोकाचा भरणा भारी इकडेस लोक व राऊत नवें ठेवावी तर सिबंदीचा खर्च बहूत पडतो द्रव्याची गैर अनकूलतां हे वडिलास दखलच आहे तशामधें हजार बारासेपरयेत परदेसी लोक व सेदोनसें परयेत राऊत नूतन ठेविलें आहेत इकडील लोकाचे अवसान म्हणावे तर नादोसीस करवीरकराचा तल होता तेथे हजार दीड हजारपरयेत इकडील लोक त्याजवर चालोन गेले होते ते समई त्याचां याचा लढाई जाली त्याचे राउताचा भरणा अधिक पाहून या लोकानी अवसान टाकून चौघे चौकडेस जाहलें करवीरकर याजकडेस इकडील रा। सोम सावत भोसलें व सिवराम जिवाजी सबनीस व माये गवस उसपकर व दामे गवस उसपकर व हेवालकर व पाये सावत भोसले व माणगावकर जथेतील दोन आा येणेप्रां सापडली आहे या लोकानी तंव केवल अवसानच टाकिली पुढां राजश्री पंतप्रधान यांजकडील भरोसा म्हणावा तर तिकडील उतरच येत नाही त्याचे कारकुनाचा प्रकार तर ते प्रतक्ष त्याचे लस्केरात राहून या गोष्टी घडतात पुढां याचा विचार कसा करावा तें वडिलीं लिहावें येक भरोसा आम्हास वडिलाचा तूर्त प्रसंगी या संकटातून निवारण करणार दुसरा कोणी वडिलावाचून नाहीं हे ध्यानी आणोन वारंवार वडिलास लिहितों परंतू वडिलाचे आश्वासन कागदीपत्रा येतें यात संस्थानचा बचाव होत नाहीं हे पष्ट समजोन पत्रदर्शनी वडिली माजे व संस्थानचे अगत्य असलेय फौजेनसी कोव्हा हर तरेने करवीरकरास तंबी पोहचून शेह निवारण होई असे केले पाहिजे या गोष्टीस रात्र दिवस न म्हणता त्वरा करोन उपराला करावा तो उपयोगी पडेल यावर वडिलास माजी लिहिणेची सामा

जाली माहाराजातर्फेचे साहित्य करणेविसी विजयेदुर्गकरी यास ताकीदपत्रें आणली आहेत त्यास अंतरयामी विजयेदुर्गकरी लोकही रात्रभागी पाचसातसें करवीरकराचें लस्केरात सेपनास असे म्हणता येतात राजश्री वेंकटराव इचलकर्जीकर याजकडीलही लोक त्याजकडेस आहेत आम्हांस राजश्री पंतप्रधान यांजकडील भरोसा त्यास त्याचे ताळुकेतील हा विचार घडतो हे वडिलास कलावे यात जसीं वडिलास कलेल तसी पैरवी करून संस्थानचा व माजा बच्याव करावा [नि*] छ १७ राकर रविवार समान-समानैन थोर सकाळ

[पुन्हा काही जागा सोडून खालील मजकूर*]

कितां कागदं

विशेष इकडील सविस्तर लिहिणे ते आलाहिदा पत्री लिहिले आहे त्याजवरून निवेदन होईल यां मसलतीमुले सिबदींचा खर्च भारीं पडलो आहे याविसीं वडिलाकडून साहित्य जाहालेविना बच्याव होत नाहीं म्हणोन विनंतिपत्रे लेहून पाठविले त्यास आद्याप वडिलाकडून साहित्याचा प्रकार न जाला येसेयास वडिली चितांवर घेऊन काही नख्तीची साहित्य लवकर केले पांहिजे येविसी मार्गप्रतीक्षा करीत आहे साहेबी हैगे येकदर न करावी याउपर आंत पाहावा यैसे वडिलास उचित नाहीं कृपा केलीच पाहिजे हे विज्ञापना [नि*]·छ १७ राकर समान

सु. ११८८ रखर १९ श. १७०९ प्लवंग पौष वद्य ७ इ. १७८८ जानेवारी २९	८१ श्री	श. १७०९ पौष वद्य ७ इ. १७८८ जानेवारी २९

तह सुलूख करारदाद येकबाल व इजलाल पन्हा सिंयोर फ्रांसिस्क दा कुंज्ययेमिनेज गोवर्णदोर ये कपितांव जनराल दो इस्ताद दे ईद व श्रीमंत राजश्री राजे खेम सावंत भोंसले बाहादर सरदेसाई पां कुडाल व माहालानिहाय यांमधे रफाअतपन्हा सकतार्यो दो इस्ताद सेबस्तियांव जुजे फेरेरे बरोंला व राजश्री विसाजी माहादेव या उभयता कारभारी याणी आपापले कुल येख्तियारी बरहुकूम सौरसाचा तह सुलूख फैसल केला बतारीख २९ माहे जनरे सन १७८८ छ १९ रखर सुा समान समानैन मया व आलफ प्लवंग सवत्छर शखे १७०९ पौष्य वद्य ७ मी बितपसील.

येकबाल व इजलाल पन्हा फ्रासिस्क दा कुंज्ययेमिनेज गोवर्णदोर ये कपितांव जनराल दा ईद यांसी श्रीमंत राजश्री राजे खेम सावंत भोसले बाहादर सरदेसाई पा। कुडाल व माहालानिहाय यांणी राजश्री विसाजी माहादेव यांवरून निखालसी ज्याहीर केली त्यावरून कदीम मुदेचा तह बेबनाव करीत चालले विस्मरणांत घेऊन आज हजरत

इस्तादांची दोस्ती पुन्हा श्रीमंत राजें बहादर यांसी देऊन त्यांचे बडे आश्रा पावले त्याच-प्रमाणे हाली शर्तनामेवरून त्यासी द्यावेयाचा सिधांत केला बितपसील

१

आज हजरत इस्तादांमधे व श्रीमंत राजेबाहादर यामधे पेशजीं हर कोणी फिलाफ आलेले लढे होऊन गेले ते येकदर नस्तनाबूद करून उभये तर्फांत येकरंग मुलूख निस्प्रयल्वे चालावा ते श्रीमंत राजे बाहादर खुद आपण व आपणाकडील वंशाधिकारी हजरत इस्तादांसी हरतऱ्हेने निष्ठेने वर्तोस कबूल करिताहेत श्रीमंत राजे बाहादर यांचे तालुकेतील राहाणवालेपासून खलता-बिगाड होऊ सके तेव्हां आपणापासून नव्हे हे आगर ते वरून होतो असें सबब सांगोस कारण नाहीं

२

आज हजरत इस्तादामधे व श्रीमंत राजे बहादर यामधे ता। ७ माहे आब्रिल सन १७१२ छ १ माहे रबिलौवल सुा इसने अशर मया व अलफ व ता। २५ माहे वैतुंब्र सन १७५४ छ ७ माहे मोहरम सुा खमसैन मया व अलफ व ता। २५ माहे जून सन १७५९ छ २ माहे जिल्हेज सुा तिसा खमसैन मया व आलफ व ता। २४ माहे देजेंब्रु सन १७६१ छ २६ माहे जमादिलौवल सन इसने सितैन मया व आलफ तहनामे फैसल जाहालेचे आधारें हाली तह करारात आणिला आहे अशास यामधें जो नवीन प्रकार केला आसे तो खेरीज करून बाकी मजकूर सदरीचे तहनामेतील हेच तहवरून पुन्हा करारात असेत.

३

पाद्र मिस्योनार्य यांस व श्रीमंत राजे बाहादर यांची रयेत क्रिस्तावांस क्रिस्तावांचा महजब आपुले तालुकेंत चालू देऊस श्रीमंत राजे बाहादर रजावंद होत असेत इम्रज आहे ती राखून आणखी पाहिजे जाहालिया बांधूस निरोप देविला जाईल देवधर्म सांकामेत किमपि तसदी न करितां चालू देऊसही रजावंद होत असेत.

४

कुली सोलदाद खापरी व गुलाम वगैरे आदमी हजरत इस्तादांचे तालुक्यांतून श्रीमंत राजे बाहादर यांचे तालुकेत पळून जातील त्यांस सिले व हर कोणी बिगाद घेऊन जातील ते सुधा माघारें द्यावे त्याणी खुदांसी आगर खावंदासी हरामखोरी तकसीर केली नसेल तर त्यास खून माफ आहे याजप्रा। श्रीमंत राजे बाहादर यांजकडील व त्याचे वंशज राज्याधिकारी याकडील पेंदे वगैरे अंकित हजरत इस्तादाच्या तालुकेंत पळून आलिया येथून नसेच देविले जातील जमातदार व बलत्काराविना आपखुसी जे किरिस्ताव होतील ते मात्र खेरीज करीत आहेत

५

श्रीमंत राजेबाहादर याकडील कुली जंगी आगर सावकारी तराडियांस हजरत इस्तादांकडील जगी तराडियाणी हजरत इस्तादाचे गनीम व तस्कराचे पारपत्याबदल कुमक मदत द्यावी श्रीमंत राजेबाहादर यांकडील सावकारी तरांडियाणी हजरत इस्तादाकडील कौल घ्यावा ते नसता येतील तर कुमक मदत पावणार नाहीत गनिमाप्रमाण दस्त केली जातील

६

याजप्रमाणे श्रीमंत राजेबाहादर यांकडील जंगी तरांडियाणी प्रसंगास हजरत इस्तादाकडील तराडीयास कुमक करावी हजरतांकडील तरांडी घेऊं नयेत हजरत इस्तादाकडील कौल घेतले तराडी हजरतीचे रयेतीची नसली तरी आगर त्याच बंदरातून निघतील आगर बंदरांत येतील त्याची वाट काढू नये

७

हजरत इस्तादाकडील व श्रीमत राजेबाहादर याकडील बंदरे उभये तर्फानील सावकारीची आमदरफ्ती दुतर्फा उत्कृ आसावी जंगी तरांडी गैरविस्वास न दिसे तितुकीं खुशाल बंदर मजकुरी यावी

८

हजरत इस्तादाची व त्यांचे रयेत वासालांची तरांडी श्रीमंत राजेबाहादर यांचे बंदरी जातील त्याकडील जकायत व लाजिमा व कांही कानू घेऊ नय सावकारी बेपारास जातील तर सियोर विजुरे दो स्त्रीग दा कोस्त यांचे आमलामधे सन १७१२ तह कलम ३ मधे करारांत आलेप्रमाणे मात्र रवाजबरहुकूम जकायेत घ्यावी

९

हजरत इस्तादांचे रयेत वासालाकडील साउकारी येकाही तरांडियास अजम राजे बाहादर यांकडील कौल त्या तर्फेने मागितलेयाही देऊ नये

१०

येकबाल व इजलाल पन्हा गोवर्णदोर ये कपितांव जनराल दो इस्ताद यांसी श्रीमंत राजेबाहादर याणी सांगून घेतले की तह बता। २४ माहे दिजेंब्र सन १७६१ मधील ९ वे कलमात करार केला की हजरत इस्तादाचे सरकारास दरबारस खंडणी द्यावी आसुर्फी ४ च्यार हजार ते द्यावयास दुर्घट त्या करारावरून तसदी होती खंडणीची मागील कुली बेरीज देऊन आढवणा याकरिता फारीक करून आली नसे त्यास दोही कलमान कम आसाव्या म्हणोन त्यावरून येकबाल व इजलालपन्हाही पेस्तर किलाफाचे सबब मना करावेबाबे व आजम राजे बाहादर यासी आपणापूर्वील आमलदारांही सर्वद औदार्यतेने करून चालविले वजा वर्तावे म्हणौन सिधांत केला कीं १७१२ सनी तहात

करार केलेप्रमाणे येक हजार आसुर्फी दरबारास खंडणा द्यावी व पेशजीची मुदतीची फारीक केली नसे ती हजरत इस्तादाचे सरकारास द्यावी पैकी आर्द बेरीज श्रीमंत राजेबाहादर यास माफ करीत आसेत

११

श्रीमंत राजेबाहादर यांस व त्याचे वंशज्य राज्याधिकारी यांस हजरत इस्ताद कबूल करीत असेत की माजूजइलेनी निष्ठेने भावपूर्वक अंकितपणे हजरती कदरवंद मलिका पुर्तुगाल मंद जिलहू साहेबासी चालविया या हजरत फिदिलिस्म साहेबाचे आसमान आश्रयात हमेशा ठेवितील आजम राजेबाहादर यांस त्याचे गलिमासी कज्या वोढवेल तर हजरत इस्ताद तंत धरून त्यास बाधक न बाधविता कज्या वारून जाऊस नरतूद करितील आण येकलासचे राहाने फैसल न होईल तर दर्यातून आगर खुसगीने जेथवर जावेयास आनकूल लोकजमाव चालऊन जावेयास दुर्घट न होईल तर समशेरजोरीने कुमक करितील माहाराज करवीरवासी यांकडील फौज श्रीमंत राजेबहादर याकडील तालुक्यात आहे ती आपली माहाराज याणी माघारे काढावेबदल हालीचे वख्ती हजरत इस्ताद सदरचे प्रमाणे वर्तेतील

१२

अजम राजेबाहादर यांस कैवर रक्षणेबद्दल किंवा जरूर असे दिसेल तेव्हा हजरत इस्ताद रास्ता किमत घेऊन दारू व गोले देतील हालीचे प्रसंगास माहाराज करवीरवासी यांकडील फौजेनी श्रीमंत राजेबा[हा]दर यांचे तालुकेयात दंगा माडिला आहे त्यास हजरत इस्ताद सामान सरंजाम व नख्त मिळून पनास हजार रुपयेची मदत करीत आहेत त्यात पेशजीचे खंडणीपैकी हजरत इस्तादास श्रीमंत राजेबाहादर याणी द्यावी आर्धी बेरीज १३२२७॥ रुपये जमा असोन बाकीपैकी सामानाचा जाबता हे तहस लाविला असे त्यातील आर्ध सामान देऊन दुसरे आर्द सामान माहाराज करवीरवासी व अजम राजेबाहादर यासी लडाई लागली असे ते उरेल तर दिले जाईल आण खंडणीचे बाकीचे सदरहू बेरीज व सामानाची कुल किमत वजा करून बाकी थारेल ती नख्त सवेच दिली जाईल

१३

हे तहनामेवरून अजम राजेबाहादर यांस किफायेत होती ती त्यांही खातरेत आणोन आपणाकडील व आपले वंशज राज्याधिकारी याकडील इलाखा न ठेविता माहालानी व किलेनी हलवर्ण व डिचोली व साखली व माहाल पेडणेतील तक्षीम हजरत इस्तादाचे समशराने काबीज केलेचे सारोधार हजरत इस्तादास सोडून देत असेत याजशिवा पेडणे माहालातील रहीन तक्षीम अनुभवीत असेत ती हजरत इस्तादास सर्व काल सोडून देत असेत त्याप्रमाणे सारोधार कुलो दर बंदगी हजरती राजगी फिदलिस्म पुर्तुगाल मदजि लहू साहेबाचे तेथील तर्फा व वाडिया व

ग्रामानी व जिरायेत व बागायेत व सारे जकायेत आमलास चालावे देवब्राम्हणाचे धर्मादाऊ व वतनदार किंवा हकदार व इनामदार व दुमाला सदरीचे पेडणे माहालांतील हली सोडून दिले तक्षिमेमधे राहाणवाले आसतील आण हजरतीस निष्ठा सौगन करउतील त्याचा भोगवटा चालविला जाईल सोडून दिले तक्षिमेतील सरकारी बागापैकी दोन हजार शाची मात्र दर सालीना बेरीज बाहीर ठेविली असे तेप्रमाणे चौकसी करून सदरीचे दरबार सबबेचा मुबादला अजम राजेबहादर यांस करीपासून हजरत इस्ताद त्यांस दरबारस बेरीज मजकूर कबूल करीत असेत

१४

हजरद इस्ता(दा)चे हुकुमेविना नदीकिनारेचे सरादीस चौक्या अगर मेटे ठेवणार नाही व बांधणार नाहीत आथवा हर कोणी ठेवितील तर त्यासही रजावंद होणार नाही म्हणौन अजम राजेबाहादर कबूल होत आहेत यांत प्रथुक विचार केलेया बेबनाव होईल जकायेतीचे वसलाची बाबे राजेबाहादर याकडील जी मेटे काही जागे आसतील ती खेरीज आहेत

१५

श्रीमंत राजेबाहादर यास ज्या वख्ती आपले किलेचे सामानास भलता जिनस इस्तादांच्या नदीतून न्यावेयाचे आगत्य होईल तर रजा द्यावयाकारणे आगोदर ज्याहीर करावे रजा देविली जाईल

१६

देसायानी आदमी ३ हिरेप्रभू व सिदबाराव व चंद्रोबा राणा याणी अजीलग जुलूम व नागावे केले माफ आहेत त्याणी कबिले व आप्तसुधा यावें हजरत इस्ताद त्यांचा अंगीकार करितील चंद्रोबा राणे याणी हजरत राजगी साहेबास अंकितपणा सौगंध केले नसें तें करावें व दुसरे दोघांनी सोगंध केलें असता अंतर केले याजवास्ते पुन्हा अंकित-पण सौगंध करावे म्हणजे त्याकडील वतन जे असेल तें त्याणी अनभवीत जाणे

१७

याजप्रमाणे देशाई गोविंदजी जसवंतराऊ याणी हजरत इस्तादात यावे दर बंदगी हजरतीस निष्ठासौगंध करिताच देसकतीविशी देसाई लक्षुमणजी जसवंतराऊ याजकडेस पैगाम लाऊन हा वेव्हार वतनदारामधे येतदर्थी रीतरवाज चालोन आलेप्रमाणें निभावणीत आणिला जाईल

१८

येणेप्रमाणे हा तहनामा उभय तर्फेने अविछिन केला असे याबरहुकूम शिरिस्तें कलमी केले त्यातील हर कोणही मुदेस तफावत नसावी ती आलेया जे तरफेस अनभव येऊन विशद दिसेल तिकडून येकी तर्फेस येक वेल मात्र ज्याहीर करावें कीं हाली तह-

नामेत अंतर आले त्याची निभावणी करून सारोधार पाळून देणे म्हणून आणि ज्याहीर केले असतां निभावणी सरे तैसी न होईल तर जे तरफेस विशाद दिसोन येईल त्याही आपणास वाटेल तैसा विचार करून निभावणी संपादून घ्यावी म्हणून हजरत इस्ताद व श्रीमंत राजश्री राजेबाहादर या उभय तर्फेने करारमदार केलेंप्रमाणें च्यलण न करितां पाळावें श्रीमंत राजे बाहादर आपण व आपले औश राज्याधिकारी यांकडून पाळून देतों येसे कबूल करीत आहेत

१९

हाली या तहनामेच्या तालिका आपापल्या निशाणामुद्रा घालून दुरूस करून पैकी येक हजरत इस्तादांचे सक्रतारीमधे आसावी दुसरी येक श्रीमंत राजश्री राजे-बाहादर यांचे दफतरी यावी त्यांतील ठुडोतकारे सख्य पाळून यावे याकारणे मागील सर्व विघाड व विशादाचे प्रसंग येकंदर विस्मरण उभये तर्फेने करून स्नेहभावे आविस्विन्न-पणे दुतर्फा वर्तावें रा। गोवा तारीख मजकूर

विसाजी माहादेव [लिहून खोडले*]

सरकारातून सिकेनसी तह करून फिरंगी याजकडे दिला त्याची नकल

[शेवटच्या कागदावरच्या पाठीवर*] वियनान विसाजी माहादेव सिवेश्वरकर १७८८

रजब २	८९ श्री	श. १७१० चैत्र शुद्ध ३ इ. १७८८ एप्रिल ९

[पाठीवर वा. शि.*]

श्री । ज्योति स्वरूपच । रणी तत्पर राणो । जी सुत माहादजी । शिंदे निरंतर

राजश्री राजे खेम सावंत बाहादर भोसलें सरदेसाई प्रांत कुडाल माहाये गोसावी यांसि

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य [मो. जा.*] स्नो माहादजी सिंदे राम राम विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष आपण दोन तीन पत्रे पाठविली ती पावली बादशाही मरातब पाठविला त्याप्रमाणे सरकारातून आयाप लिहिण्यात येत नाही व मरातबविषई करवीरवाले याणी मनात विषमता मानून फौज पाठऊन आमचे मुलकात उपद्रव करून हेरे ताळुका येथील ठाणें घेतले आहे व पुढे उपसर्ग देणार व गोवेकर फिरंगी याणी आम्हाकडील डिचोली वगैर जागा घेतल्या आहेत त्याजविसी आपली लिहिली वरचेवर सरकारांत अली परंतु त्याज-कडीलही बंदोबस्त होऊन येत नाहीं यास्तव लिा आहे त्यास ये वेसी आणखी पत्रे येऊन बंदोबस्त होय ते जाले पाहिजे म्हणौन व गैर मार लिहिला तो सविस्तर कलला

येसियास आपण लिहिल्यावरून राजश्री बालाजीप [त *] नाना व हरिपंत तात्या व गोविंदराम यासी येथून पत्रे लेहून पाठविली आहेत ही पुण्यास पाऊन यात्री म्हणजे बंदोबस्त होऊन येईल आणि मरातबही सरकारातून लिहिण्यात येईल चिंता नाहीं येथूनही परभारा वरचेवर लिहिण्यात आले आहे व पुढे येईल आणि बंदोबस्त होईल [नि *] रा छ २ रजब [नि*] बहुत काय लिहिणे लोभ कीजे [नि*] हे विनंती [वा*] मोतब सूद

पौ छ १३ सवाल तिसा समानैन मो वोटवणे

सु॰ ११८८ रजब २ 　　　　　 ८३ 　　　　　 श. १७१० चैत्र शुद्ध ३
　　　　　　　　　　　　　 श्री 　　　　　 इ. १७८८ एप्रिल ९

नकल

राजश्री गोविंद राम गोसावी यांसि

ई अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य [मोजा॰*] स्नो॰ माहादजी सिंदे दंडवत सुा समान समानीन मया व अलफ राजश्री खेम सावत भोसले सरदेसाई प्रात कुडाल व माहाये यासी बादशाही मरातब पेशजी घेऊन पाठविला त्याप्रो॰ तुम्ही राजश्री बालाजीपंत नाना यासी बोलून सरकारातून लिहिण्यांत येई ते करणे व करवीरकर याणी कलह उपस्थित केला आहे त्यास ताकीद सरकारातून करून बदोबस्त होये ते करणे व फिरंगी गोवेकर याणी सरदेसाई याजकडील जागा ठाणी घेतली आहेत तेही त्याचे वकिलास ताकीद होऊन सोडून देवणे येविसी वरचेवर तुम्हास पत्रे लिहिण्यात आली असे असता आद्याप सरदेसाई याजकडील कामाचा बदोबस्त होऊन येत नाहीं म्हणौन विदीत जाले त्यावरून हे पत्र तुम्हास [पाठविले आहे*] तरी येविसीं तुम्ही राजश्री बालाजीपंत नाना यासी बोलून सरकारातून बादशाही मरतबा लिहिण्यात येई ते करणे आणि सरकारातून करवीरकर यासी व गोवेकर फिरंगी याजकडील वकिलास ताकीद निक्षूण करून सरदेसाई याजकडील जागा ठाणी त्याणी घेतली आसतील ती सोडून देवऊन हर येकविसी त्याचे मुलकात उपद्रव न करीत ते करणे येविसी येथूनही राजश्री नाना यासी लिा आहे त्याप्रा तुम्ही याजकडील कामाचा बदोबस्त होये ते करणे जाणिजे छ॰ २ रजब बहुत काय लिहिणे हो विनंति

सु. ११९० जखर २३ } ८४ श्री { श. १७११ फाल्गुन वद्य १० इ. १७९० मार्च १०

[ले. ७८ प्रमाणे शि. व. मो.*]

राजश्री खेम सावंत भोसले सरदेसाई प्रां कुडाल माहालानिहाये गोसावी यांसि

दें अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य [मो. जा.*] श्री माधवराव नारायण प्रधान आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत जाणें विशेष मार्गे पेणपो। खालासे येथील समस्त ब्रांम्हण याणी हुजूर येऊन निवेदन केले कीं श्रीमंत कैलासवासी नारायणरावसाहेब यांचे कारकिर्दीत परभूचे कर्माचरणाविषई सरकारातून ठराव करून दिल्हा त्याप्रो त्याणीं वर्तावे ते न करिता आपला धर्म सोडून मनश्वी वर्तणूक करून चोरून ब्रम्हकर्मे करितात येविसी त्यास ताकीद होऊन बंदोबस्त जाला पाहिजे म्हणोन त्याजवरून मनास आणिता पेशजी कैलासवासी तीर्थरूप रावसाहेब यांचे वेलेस चौकसी होऊन परभूचे वर्तणुकेविसी कलमांचा ठराव जाला त्याप्रो त्याणीं सरकारांत कतबा लेहून दिल्हा यातील कलमे बितपसील

१. वैदिक मंत्रेकरून कांहींच कर्मे करणार नाही
१. वैदिक मंत्र जे येत असतील त्याचा उच्चार करणार नाही
१. भाताचे पिंड करणार नाही
१. देवपूजादिक विहित कर्मे पुराणोक्त मंत्रेकरूनच करू व ब्रांम्हणभोजन आपले घरी करणार नाही
१. शालग्राम पूजा करणार नाही
१. ज्या देवास शूद्र जातात त्या देवास आंम्ही जाऊ
१. ब्राम्हणास दंडवत मोठ्याने म्हणत जाऊ व आपले जातीतही दंडवतच म्हणत जाऊ
१. वैदिक ब्रांम्हण व आच्यारी व पाणके व शागिर्द ब्रांम्हण व ब्रांम्हण बायेका चाकरीस ठेवणार नाही व आपले घरीही ठेवणार नाही
१. आमचे जातीमध्यें आपले संतोषे पाट लावितील त्यास आम्ही अडथला करणार नाही

९

येणेप्रों नव कलमे लेहून दिल्ही असतां परभू आपले घरीं चोरून ब्रम्हकर्मे करितात यामुले पेणकर ब्रांम्हणाचा व यांचा कजिया वाढोन परभूचे घरची सर्व कर्मे बंद जाली त्यास येविसीचा हालीही विचार करिता परभूचे कर्माचरणाविषई पेशजी चौकसी होऊन कलमे ठरावून दिल्ही आहेत त्याप्रों याणी वर्तावे ते न करितां आपले

धर्म सोडून चोरून मनश्वी वर्तणूक करिता हे अनुचित पेशजी कलमे ठराऊन दिल्ही आहेत तींच योग्य षिष्टसंमत ठरोन पुण्यात परभूची घरे आहेत त्यांस हुजूर ताकीद करून हे पत्र तुम्हांस सादर केले आहे तरी माहाये येथे परभूची घरे असतील त्यांस निक्षूण ताकीद करून सदरहू कलमाप्रो वर्तत जाणें यांत जो कोणी आंन्यथा वर्तेल त्याचे बरे वज (जे)ने पारपत्य करून गुन्हेगारी घेत जाणे [नि*] जाणिजे छ २३ जमादिलाखर सुा तिसैन मया व अलफ [नि*] बहूत काय लिहिणे

पौ छ २ जिल्हेज इहिदे तिसैन

जवल १६ } ८५ श्री { श. १७१२ पौष वद्य १ इ. १७९१ जानेवारी २१

[ले. ८२ प्रमाणें शि. व मो.*]

राजश्री राजे खेम सावत भोसले बाहादर सरदेसाई प्रांत कुडाल व माहाय गोसावी यांसि

ई सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य [मो. जा.*] स्नो माहाद(जी) सिंदे राम राम विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष आपण पत्रे पाठविली ते पावली करवीरकरानीं मुलकात उपद्रव करून इकडील किलेकोट जागा घेतल्या आहेत त्याचें बंदोबस्ताकरिता पुण्याहून सरकारचे कारकून व हुजरे करवीरास आले आहेत परंतू आद्याप बंदोबस्त होऊन येत नाही त्यास येविसी पुण्यास रामजी पाटील यांसी लिहिण्यात येऊन सत्वर बंदोबस्त होऊन येई ते करावे म्हणौन लिहिले ते सविस्तर कलले यसियांसी आपणा [कडी*] ल बंदोबस्ताविसी येथून पुण्यास राजश्री बालाजीपंत नाना व रामजी पाटील यासी वरचेवरी लिहिण्यात आले त्यावरून रामजी पाटील याणी नाना यासी बोलून सरकारातून करवीरास कारकून पाठविलाच आहे तेंथून लौकरच मुलकाच्या सोडचिठ्या घेऊन देतील म्हणून रामजी पाा याणी येथे लिहिले होतें त्याप्रो सत्वरच बंदोबस्त होऊन येईल चिंता नाही येथूनही अगखी लिहिण्यात अले आहे रा [नि *] छ १६ जा।ल [नि *] बहूत काय लिहिणे लोभ कीजे [नि *] हे विनति

पैा छ २३ रमजान इहिदे तिसैन

सु [११*] ९२ सफर १ } ८६ { श. १७१३ आश्विन शुद्ध ३ इ. १७९१ सप्टेंबर ३०

श्रीमत राजश्री [मो. जा.*] राजेबहादर सरदेसाई साहेबाचे शेवेसी

आज्ञाधारक रामचंद्र नीलकंठ विज्ञापना ताा छ १ माहे सफर मुकाम लस्करनजीक चितोड प्रांत उदेपूर जाणोन साहेबाचें कृपेकडून सेवकाचे वर्तमान येथास्तीत असें विशेष

साल गुदस्तां गगांराम व रामभट यांबार पत्रें आली त्यांची उत्तरें सेवेंसी पोहचलीच असतील सांप्रत आज्ञापत्र येऊन वर्तमान कलत नाहीं तर सदैव पत्र पाठऊन साभाल करावयांस धणी समर्थ आहेत जैपूरवाले मारवाडवाले व इस्मालबेग फौजसुधा तयार होऊन जैपुरच्या मेढेवर मुकाम करून होते त्याजवर राजेश्री गोपालराव रघुनाथराव व जिउबादादा फौज पलटणें देऊन त्याजवर रवा केले उभयेताची लडाई जाहाली शत्रूने सिकस्त खादली येजमानास येश आले त्याची फौज पलोन मारवाड प्रांती गेली माघाऊन सडी फौज उभयेता सरदार मारवाडास आलें तेथें दुसरी लडाई मेडतेवर जाहाली राहटोड पांच च्यार हजार कामास आले बाकीची फौज राजा बिजेसिंग याजपांसी पलोन गेला ते समई सलुखावर घालोन आजमेरचा किला देत होता परंतु घेतला नाही तुम्ही घेतला त्याप्रमाणें मोर्चे लाऊन आम्हीं किला घेऊं आण मग किला आम्ही घेतलेवर जे बोलणे ते बोलूं येसा जाबसाल वकील आला त्याजकडे सांगोन पाठविला त्याउपर किला हस्तगत करून खांसा स्वारी पुस्करावर गेली त्याचे याचें बोलणे जाहाले आणखी लाखा दो लाखांची ज्याहागीर दिली यासिवाई खंडणी पासस्ट लाख टराव केला तूर्त दहा पांच दिले बाकीचें वाइदे मुदती यावे याजप्रमाणें जैपूरचा वकील येऊन मामलत चुकविली येक वरीस पर्येत आजचा दिवस ता। पांच सेर साहा सेर धारण जाहाली त्यामुलें फौजेची फारच खरावी जाहाली परंतू श्रीमतांनी सर्व जागां यश मिलविलें तेथून निघोन आशाढ मांसी मेवाड प्रांती आले श्रीराणाजी याच्या व श्रीमंताच्या भेटी जाहाल्या उदेपूरच्या संस्थानामधें सोला उमरावामधे आठ पटाइतानें बखेडा केला मुलूक वसत नाही याजमुले सहा आणे राणाजीचे व दाहा आणे श्रीमताचे याप्रमाणें करार ठरला फौजे ठेऊन बंदोबस्त करून उजैनीस सत्वरच जाणार आहेत येथील बदोबस्त करून समागमे फौज देतो तुम्हीं येथें राहाणें म्हणौन सागत होते परतू आम्ही मान्य केले नाहीं कबूल करावे तर मुलूक बेचिराख सिबंदीस पैसा मिलणार नाहीं हा पुर्ता विच्यार ध्यानी आणौन कबूल केले नाहीं राजश्री जिउबादादा निरोप घेऊन जावया लागले ते समई आम्ही राजेश्री आबा चिटणीस व बालाजीपंत येव्हल्यारी व दादा येसे येकत्र करून संस्थानाविसीचा जाबसाल केला येजमान साहेबी आज्ञा केली जे तुम्हीं स्वारीस जावे मशारनिले आम्हाबार आहेत स्वारी देसी गेलेवर हा जाबसाल करून मग मसलत करणें ती करूं याप्रमाणें बोलणें खचित जाहाले आहें मोर्चेलाचें निमित्य आले याचा अभिमान धण्यास आहें परंतू आपण स्वारीस जातो यास्तव विनंती केली आहे म्हणून निरोप घेतला आबा व बालाजीपंत याणी तुम्ही गेला तरी बाप [ले] क येथे आहेत कोणे गोस्टीविसीं मागील कालजी न करावी येविसीचे अगत्य आम्हास आहे म्हणौन फारच खातरजमा केली आहे साहेबाचें पुण्यप्रतापेकडोन श्रीमन देसी आलेवर सर्व बदोबस्त होऊन येईल सेवकाचे हाते सरकारचाकरी होईल त्यास आतर होणार नाही सरकारची पत्रे गेली आहेत त्याजवरून सविस्तर विदित होईल इकडोल वर्तमान गंगाराम कचे पके सेवेसी श्रुत करील हे विज्ञापना

पो। छ १२ राखर इसने तिसैन सुक्रवार

सु [११ *] ९३ शवाल १८ } ८७ श्री { श. १७१४ ज्येष्ठ वद्य ५ इ. १७९२ जून ९

[ले. ८२ प्रमाणें शि. व मो.*]

राजश्री राजे खेम सावंत भोसलें बाहादर सरदेसाई प्रांत कुडाल माहालानिहाये गोसावी यांसि

ई सकलगुणाअलकरण अखडितलक्ष्मीअलंकृत स्नो माहादजी सिंदे राम राम विनंति उपरी येथील कुशल जाणौन स्वकाये कुशल लिहीत असावे विशेष स्वारी दर मजल पुण्यास श्रीमंताचे दर्शनाकरिता जात आहे दशमी बुधवारी भेटी होतील तेथे गेलियावर आपलें प्रकर्णी बोलणे पडल त्यास आपले व करवीरकराचे सिरस्ते पूर्वापार कसे आहेत त्याचो माहितगारी असली पाहिजें याकरता आपणास लिहिले आहे तरी पत्र पावताच मागील वहिवाटीचे कागदपत्र व सरकारात पडला जाबसाल त्याची पुरवणी करी असा माहितगार प्रहस्त आपलेकडील लौकर रवाना करावा म्हणजे बोलण्यास ठीक पडेल रा छ १८ शवाल [नि *] बहूत काय लिहिणे लोभ कीजे [नि *] हे विनंति

पौ छ २२ मोहरम सलास तिसैन

सु. ११९३ सफर २१ } ८८ श्री { श. १७१४ आश्विन वद्य ८ इ. १७९२ आक्टोबर ८

नकल आसल बमोजी

राजश्री राजे खेम सांवत भोसु[ले] बाहादर सरदेसाई प्रा कुडाल व माहालानिहाये गोसावि यांसि

ई अखडितलक्ष्मीआलंकृत राजमान्यें स्नो [मो.ना.*] माधवराव नारायेण प्रधान आसीरवाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लिहीत जाणें विशेष पातशाहानी आम्हास राजे बहादर मरातीब व दोन म चेलें पाठविली आहेत त्याप्रमाणे सरकारांतून चालविलें पाहिज म्हणोन तुम्ही विनंती केली त्याजवरून राजेबहादर मरातीब व मोर्चले दोन सरकारातून करार केली असेत तरी सदरहूप्रमाणें चालवणे जाणिजे छ २१ सफर सुहूर सन सलास तिसैन मया व अलफ बहुत काय लिहिणे मार्तंब सिका

पौ छ २७ शौवल सलास तिसैन

राजश्री बाजी कृष्ण म्हाजन याजकडून नकल आली

रखर २० } ८९ श्री { श. १७१४ मार्गशीर्ष वद्य ७ इ. १७९२ डिसेंबर ५

[ले. ८२ प्रमाणें शि. व. मो.*]

राजश्री राजे खेम सावंत भोसले बाहादर सरदेसाई प्रांत कुडाल व गैर माहाय गोसांसि

दं सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य [मो. जा.*] स्नो माहादाजी सिंदे रामराम विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष तुम्ही पत्र पाठविले ते पावले लिहिला मजकूर सविस्तर कलों आला ऐसियांसि करवीरकर राज्याकडील वकील येथें येऊन सरकारांत करार करून गेले आहेत कीं पंधरा रोजी तुमचे किलेकोट मुलुख सुधा सोडून देऊ त्यास मुदतीं प्रो सोडचिठ्या घेऊन येतील न आल्यास फौज पलटणे तोफा सरंजाम रवाना होऊन बंदोबस्त लौकरच होईल याउपरी दिवसगत व्हावयाची नाहीं याविसी सविस्तर कृष्णाजी महादेव लिहितील त्यावरून कलेल रा छ २० रावर [नि*] बहुत काय लिहिणे लोभ कीजे [नि*] हे विनंति

पौ छ ५ जमादिवल सन सलास तिसैन

सु [११*] ९३ जवल १० } ९० श्री { श. १७१४ पौष शुद्ध १२ इ. १७९२ डिसेंबर २५

[ले. ८२ प्रमाणें शि. व मो.*]

राजश्री राजे खेम सावत भोसले बहादर सरदेसाई प्रांत कुडाल वगैरे माहाये गोसावी यांसि

दं सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य [मो. जा.*] स्नो माहादजी सिंदे राम राम विनंति उपरी येथील कुशल जाणौन स्वकीये कुशल लेखन करीत असावे विशेष आपण पत्र पाठविले ते पावले लिहिला मजकूर कलो आला राजश्री नारायणराव जिवाजी व बाजी कृष्ण व कृष्णाजी माहदेव याणी सविस्तर मजकूर श्रुत केला येसियासि करवीरकर याजकडील वकील याणी राजश्री बालाजीपंत नाना यासी करार करून गेले त्यांस येथून नेट लागल्यामुळे आपणासी जाबसाल लाऊन समजावे असा अर्थ त्याणी योजून माळवणास गेले वकीलही सोडचिठ्या आणावयास गेले त्याचा जाबसाल तुम्हा-कडील समजल्यावर चिठ्या घेऊन येतील याप्रो न जाल्यास फौज पलटणे रवाना होऊन [नि*] बंदोबस्त होऊन येईल [नि*] रा छ १० जमादिवल [नि*] बहुत काय लिहिणे लोभ कीजे [नि*] हे विनंती

पौा छ ४ जाखर सलास तिसैन

सु. [११*]९३ रजब १२ } ९१ श्री { श. १७१४ फाल्गुन शुद्ध १४ इ. १७९३ फेब्रुवारी २४

चिरंजीव राजश्री राजे खेम सावत भोसले बाहादर सरदेसाई प्रांत कुडाल व माहाये यांसि

माहादजी सिंदे असीर्वाद उपरी येथील कुशल जाणौन स्वकीय लिहीत जाणे विशेष तुंम्ही पत्र पाठविले ते पावले पत्रावरून व राजश्री नारायण रावजी व जिवबाजी कृष्ण व कृष्णाजी माहादेव यानी विदीत केल्यावरून सविस्तर कलले यैसियासी करवीरकर याजकडे सरकारातून कारकून सोडचिठ्या आणावयाकरिता पाठविला होता त्यासी करवीरकरानी नीट जाबसाल न करिता सोडचिठ्या दिल्या नाहीत यावरून हाली सरकारांत विनंती करून राजश्री परशरामपंत भाऊ याची रवानगी फौज सुध्धा करावयाचे ठराविले आहे लौकरच येथून कूच करून जातील याउपरी दिवसगत न लागता तुमची ठाणी व प्रांत सोडून देतील चिता न करणे [नि*] रा। छ १२ रजब [नि*] बहूत काये लिहिणे हे आसीरवाद

ग्यास [नि]

पो छ ९ साबान सलास तिसैन

सु. [११*] ९३; फाल्गुन वद्य ११ } ९२ श्री { श. १७१४ फाल्गुन वद्य ११ इ. १७९३ मार्च ८

श्रीमंत राजश्री [मो. जा.*] राजेबहादर सरदेसाई साहेबांचे शेवेसी

आज्ञांधारक बाजी कृष्ण म्हांजन वेंगुर्लेकर कृतानेक विज्ञापना ता। फालगुण वद्य ११ मु॥ लस्कैर नजीक पुणे येथे साहेबांचें कृपेकरोन सेवकांचे वर्तमान येथास्थित असें विशेष साहेबीं छ १६ जमारचे आज्ञापत्र पाठविले ते छ २७ जमारी पावोन सनाथ जाहालो पत्रीं बहूतच विस्तार कीं येथून कालानरूप समजोतीस पत्रें लिहितो व कितेक येथील समर्पक असेल तैसे ल्याहावे म्हणोन आज्ञा यैसियास आजपर्यंत पत्रें लिहून केवल कालहरण करावे यांत तरी मजकडेस कारण काय साहेबांची आंज्ञा येक दोन पत्रीं आली की कचें पक्के ल्याहावें त्यावरून येथे जसजसा कारभार घडत गेला त्या आंन्वये सेवेसी लिहीत गेलों करवीकर याणीं लबाडी करून दिवसगत घेतलेमुळें येथे दोहीं दरबारी त्यांची साख उडोन पुढें त्यांचे पारपत्यच करोन साहेबाकडील किले कोट प्रांत सोडून देणेयाविसी फौजा पाठवाव्या तेव्हां श्रीमंत राजेश्री [मो. जा.*] नानानीं आग्रहें राजेश्री परशरामपंत भाऊ यांस फौजसुधां तोफखाना देऊन रवाना केले आहेत श्रीमंत राजश्री [मो. जा.*] पाटील बावा श्रीच्या दर्शनास गेले असते तर इतुकें दिवस लांबण न पडती तूर्त देशीं महर्गता भारी आंण फौज रवाना करावी तरी

नाना व तात्याचा आग्रह की आपण सावंतांचा मुलूक सोडवून देवितों यास्तव त्यांचे-ही ऐकणेच आंण न जाहालेस पुढा श्रीच्या दर्शनास जाणें तेव्हां सहजांत पारपत्य करोन साहेबांच्या चितानरूप होईल यैसे येथे श्रीमंत दरबारी व हे दरबारचे मुछ्दी व राजश्री रामजी पाटील आग्रहें बोलतात ते सविस्तर वरचेवर मी लिहितों व राजश्री कृष्णांजी-पंत गोड करून लिहितात यैसीही आंज्ञापत्रीं जाणविलें त्यास मारनिले पंत दोहीं दरबांरी आजपर्यंत गोडीनेच बोलून साधन करितात त्यास विलंब लागल्यामुळें इकडील लिहिणेंस सबब यैसे मानून निक्षून लिहिणेंविसी हाली आज्ञांपत्रीं तर थोरला कारभार साहेबांचे संस्थान सुटणें आंण श्रीमंत थोर थोर या जाबसालात आहेत केवल मीच लेहावें त्या आंन्वये पुढा विचार करावा आसा अर्थ काय थोरली मसलत निकड केल्यास कोणत्या आंगे कल बसेल यांस्तव जे कर्णे ते विचारे व्हावे येदर्थीच आदेशा वरकड राजश्री सातबा आपांस लिहिलें आहे व राजश्री लाडकोबा चिटणीस येथून गेले आहेत मुखवचनी निवेदन करितील व कृष्णांजीपंत सर्व हकीकत सेवेसी लिहितील ती साहेबानी ध्यानी आणोन जे आंज्ञा कर्णे ते करावी श्रीमंताचे लंग्न फाल्गून वद्य नवमी बुधवारी चौदा घडी दिवसास जाहाले साहेबांचे तर्फेनें कृष्णांजी माहादेव वकील यांणी आहेर केला चिरंजीव मामानें पत्र पाठवावे म्हंणोन येक दोन पत्रीं आंज्ञा आंली त्यावरून चिरंजीव मामानें पत्र घेऊन पाठविले आहे सेवेसी प्रविष्ट होईल होलकर यांचा व आपले सरकारी वैमानस होऊन कलह जाहला हे वर्तमान पेशजी सविस्तर लिहिलेच होते हाली पुन्हा कटकट होऊन जैपूर प्रा:थीं आपले कडील फौजचा व त्यांचा पधरा कोशाचा आंतर आहे फुढा येथूनही वकील मिलापाचे गेले आहेत कसकसे ठरल ते पाहावें सेवेसी श्रुत होय हें विज्ञापी

पौ छ ९ साबान सलास तिसैन

९३

शाबान १	नकल श्री	श. १७१५ चैत्र शुद्ध २ इ. १७९३ मार्च १४

राजश्री रामजी पाटील जाधव गोसावीं यांसि

दं अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य [मो.जा.*] स्नो माहादाजी सिंदे राम राम विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणें विशेष राजश्री राजे खेम सावंत भोसले बहादर सरदेसाई प्रांत कुडाल व माहाय यांजकडील किले टाणीं जागा करवीरवाले याणीं घेऊन उपद्रव करीत आहेत त्याच्या बंदोबस्ताविसीं येथून राजश्री बालाजीपंत नाना यासी व तुम्हासी लिहिण्यांत आलें तुम्हीही त्यासी बोलण्यांत आणिलें त्यावरून पुण्याहून सरकारातून कारकून हुजरे करवीरास गेले आहेत आसे आसोन

आद्याप सरदेसाई याजकडील बंदोबस्त होऊन यत नाहीं म्हणोन कललें त्याजवरून हाली राजश्री बालाजीपंत नाना यासीं पत्र लिाों आहे त्यास तुम्हीही बोलून सरकारांतून करवीरवाल्यांस पत्रें ताकिदीची पाठवून तेथ वकील त्याजकडील आसेल त्यास ताकीद निक्षूण करऊन सरदेसाई यांजकडील किले ठाणी जागा त्याणी घेतल्या आहेत त्या झाडून सोडून देऊन पुन्हा कोणेविसी उपद्रव न करीत तें करणें यविसी पूर्वी वेंचेवर लिहिण्यात आलेच अहे त्यास नाना यासी बोलून ठाणी लौकर सुटेत तें करणें रा छ १ साबान बहुत काय लिा हे विनंती मोर्तब

[समासांत ‘ सिका ’ शब्द लिहून जागा दर्शविली आहे*]

सु. [११*]९३ शाबान ६ — ९४ — श्री — श. १७१५ चैत्र शुद्ध ७, इ. १७९३ मार्च १९

चिरंजीव राजश्री राजे खेम सावत भोसले बहादर सरदेसाई प्रांत कुडाल व माहाद्ये यासि

माहादजी सिंदे असीर्वाद उपरी येथील कुशल जाणौन स्वकीय लिहीत जाणे विशेष तुम्ही पत्र पाठविले ते पावले करवीरकर याणी वाइदे मुदती बहुत केल्या परंतू आद्यापी मुलूक सुटोन संस्थानचा बंदोबस्त होऊन येत नाहीं येविसी व माहायात्रेस जावयाचा विचार केला आहे म्हणौन वगैरे लिहिले ते कलले येसियासी करवीरकरांचा जाबसाल बोलण्यात पाबला पडत चालला तेंव्हा सरकारात बोलोन फौज पाठवावयाचे ठराऊन राजश्री परशरामपंत भाऊ याची रवानगी फौजतोफासुधा ठरली या उपरी येथून लौकरच निघोन तिकडे येतील वरचेवर इकडून निकडीस कमती नाहीं संस्थानचा बंदोबस्त होऊन येईल चिंता न करावी बिनकौली तराडे सापडले त्याजविसी ईग्रजाचा तंटा लागला आहे म्हणौन लिा त्यास येविसीं इंग्रजाकडील वकील येथे आहे त्याजला ताकीद केली आहे त्याणे मुंबईस लेहून चौकसी करतो असे उतर केले तुम्हीही वाजबी असेल तसे करावे वरकड जावजी गायकवाड येथून पाठविले आहेत सविस्तर सांगता कलेल [नि*] रा छ ६ साबान [नि*] बहुत काये लिहिणे हा आसीरवद

पैा छ २३ साबान सलास तिसैन

सु. ११९५ रवल १५ } ९५ श्री { श. १७१६ आश्विन वद्य २ इ. १७९४ आक्टोबर १०

[पाठीवर वा. शि. *] श्री । ज्योतिस्वरूपच । रणी·तत्पर मल्हार । जी सुत दवलतरा । व शिंदे निरंत । र

राजश्री हिरेपरब देसाई ताा साखली गोसावी यांसि

र्‍ई अखंडितलक्ष्मीअलंकृत राजेमान्य [मो. जा. *] स्नौ दौलतराव सिंदे राम राम विनंती उपरी येथील कुशल जाणौन स्वकीय लिहिणें विशेष राजश्री राजे खेम-सावत भोसले बहादर सरदेसाई प्रांत कुडाल व माायें याजकडील माहल प्रात डिचोली साखली वगैरे गोवेकर फिरंगी याणी दाबिले आहेत त्यास हाली जमाव करून सावत आपले माहल सोडवितात तरी तुम्ही आपले जमावानसी सामील होऊन माहल सोडविणे येविसी सविस्तर सावताकडील वासुदेव नारायण व मिर्नोजी गणेश तुम्हांसी बोलतील त्याप्रो साहित्य करणे राा छ १५ रौवल सुाा खमस तिसैन मयां व अलफ [नि*] बहुत काय लिहिणें [नि. *] हे विनंती [वा. *] मोर्तब सुद

सु. १२०० जवल १६ } ९६ { श. १७२१ आश्विन वद्य ३ इ. १७९९ आक्टोबर १६

[ले. ९५ प्रमाणें शि. व मो. *]

राजश्री राजे खेम सावंत भोसले बाहदर सरदेसाई प्रो कुडाळ वगैर माानिहाये गोसावी यासि

र्‍ई सकल गुणालकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य [मो. जा. *] स्नौ दौलतराव सिदे राम राम विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष सन सलास तिसैनात आपणाकडील आरमाराने इग्रजाचे जाहज तांदुल वगैर माल-मुधा सिकस्त करून रेडीचे खाडीस आणिले जाहजावरी मातबर मनुष्य होता त्यास ठार मारिला यामुले इग्रजाचा पेच आपणाकडे आला तेव्हां येथें आपली पत्रें आली ते समई तीर्थरूप कैलासवासी माहराज यागी ईग्रजाचे वकिलास सांगितले की याजविसीचा जाबसाल इकडून होईल तुम्ही परभारे संस्थानास उपसर्ग करू नये म्हणून त्यावरून ते अजताा राहिले परतु हे गोष्टीस सात वर्षे जाली इग्रज जबरदस्त त्याचा लढा तोडावयाची आपण काही कालजी केली नाही हेच आपूर्व हाली त्यांणीं जाहजे गोव्यास राा करून जमाव खुसगीस उतरला आणि येथे दखल केले की आम्ही आपला ऐवज परभारें संस्थानाकडून फडशा करून घेतो असा जाबसाल त्याचा निकडीचा समजला याजकरितां

पंधरा दिवसाचा वाइदा करून हे पत्र आपणास लिहिले आहे तरी कोणे प्रकारे इंग्रजाचा लढा चुकवून देऊन पुढे त्याचे बंदरचे तरांडे येकदर मारुन आणू नये असी अपले आरमारास ताकीद करावी इंग्रज जबरदस्त त्यासी कलह लाविल्यान ते चैन पडू देणार नाहींत प्रसंगोचीत विचार करून संस्थानाचा बचाव करावा येविसीचे आपणाकडील राजश्री विसाजी माहादेव येथे आहेत त्यांसी बोलण्यांत आले आहे ते लिहितील [नि *] रा। छ १६ जोवल [नि *] बहुत काय लिहिणे लोभ कीजे [नि *] हे विनंती मोर्तब

सु. १२०५ } ९७ श्री { श. १७२६–२७ इ. १८०४–५

नकल

याद श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपती स्वामी यांजकडून कामे उलघडून यावी सुा खमस मयातैन व आलफ

चिरंजीव राजश्री बाबा साल गुदस्ता किले यशवंतगडास होते त्यांस राजश्री रत्नाकरपंत राजाज्ञा फौजसुधा करवीराहून येऊन किल्यावर लोक चडऊन किलेचा बंदोबस्त करून चिरंजीवास बा। घेऊन करवीरास गेले त्यास किलेवर लोक आहेत ते उतरून किला आमचा आम्हा स्वाधीन व्हावा कलम १

चिरंजीव राजश्री बाबा यांस करवीराहून मालवणास जागा देऊन रवाना केले ते लोक ठेऊन प्रांतात मनेश्वी सिलसिला करितात तो दूर व्हावा आण चिरजिवास कुटुबांत रवाना करावया स्वाम समर्थ कलम १

माहाराजानी चिरंजीव म्हणविले त्या पक्षी चिरंजीव राजश्री बाबा यांचा पुस्तपन्हा न करितां संस्थानातील बखेडा दूर होऊन लेंक म्हणविल्याप्रमाणें चालवावे [कलम १*]

बादशहानी मरातब व मोर्चेल दिल्याप्रमाणें स्वामीनी कृपा करून करार करून देविली पाहिजेत कलम १

किले प्रसिध्धगड व जंजिरे सिधुदुर्ग व मनोहरगड याचा तनखा प्रा। कुडाल येथें पुरातन चालत आहे त्यास अलिकडेस किलेचे मामलेदार याणी नवीन बाब बसवून रयतेस उपसर्ग देतात त्यासी कैलासवासी फोंड सावंत भोसले यांचे कारकिर्दीस चालत आल्या आन्वये चालावे नूतन अलिकडेस कानूकाइदे असतील ते दूर करावे याविसी हुजुरे देऊन बंदोबस्त करावया स्वाम समर्थ कलम १

मालवण ता। मसुरे व सिवापूर क॥ नारुर येथील येवज आम्हाकडे चालत आला यास अलिकडे जंजिरे सिंधुदुर्गकरी व मनोहरकरी हरकत करितात त्यास जंजिरेकर व किलेकरी याणी हरकत

किले भरथगड व नरसींगड व निवती व कोट वेगुर्ले व कोट कुडाल येथील तोफा वगैर दारुदागिना सन समान समानैनचे साली न्हेला तो माहाराजानी कृपा करून यावया स्वाम समर्थ कलम १

पेसजी प्रांतातील येवज वसूल पडला आहे सन तिसा समानैन पासून सन अर्बा तिसैन तागायेत तो कृपा करून माहाराजानी देवावा तूर्त वोढीत आहो कृपा केल्यास परिहार होईल कलम १

करू नय पुरातनप्रमाणे चालावे व आजपर्यंत गावी वसूल येणे तो गावकरी याणी घ्यावा याविसी गडकरी यास ताकीदपत्र यावयास स्वाम समर्थ कलम १

किले नरसीगड येथील तनरव्याचा येवज वरघाटची खेडी किले भूदरगड-खालील येथे यावा तो सुदामतपणी येत नाही त्यास ताकीद होऊन सुरलीत वसूल देत ते करावया स्वाम समर्थ कलम १

हेरे निा जकायेत हनमंता मार्गास पाटगाव येथे पुरातन यावी ती अलिकडेस चालत नाही ती सुदामतपणी चालविणेविसी आज्ञापत्र यावया स्वाम समर्थ कलम १

येकून दाहा कलमें संपऊन यावी छ १९ रार

सदरहूप्रो याद रा। कृष्णाप्पा म्हाजन याजबो चिरंजीव राजश्री राजपा बाबाजी पाटगे याजकडेस पाठविली आहे

सु. १२१३ मोहरम ५ इ. १८१३ जानेवारी ९	९८ हु	श. १७३४ पौष शुद्ध ७ इ. १८१३ जानेवारी ९

पौ छ २९ मोहरम सलास अशर

अजम अकरंम [मो. जा.*] भोसले सरदेसाई प्रां। कुडाल व माहालानिहाये दाम मोहु

ई रफाअत व माआलीपन्हा शौकत व हिशमत दस्तगाहा मलान येतीजाद दोस्तां [मो. जा.*] अजी दिल येखलास रैट हनराबल सर इवन नेपिन बारोनेट प्रजिदेंत गोवर्नदोर जंजिरे मुंबई सलांम बादज सलाम मकशूफ राये तवदुद पैराये गर्दानद के सरकार कंपनी इंग्रेज बाहादूर यांसी आं मोहिबी मुल्क सिपुर्द केला आहे म्हणोन आलीशान कपितान इसकैलरई नवे गोवे यांही सरकारांत इजहार केले त्यास तो मुल्क स्वाधीन घेऊन तेथील कारभार चालवावया करिता इजतनिशा मेस्तर-—यांसी हे पत्र देऊन रवानगी केली आहे तर मशारनिल्हे यांची चागली प्रकृत वर्तणूक आहे ती खाति-

रात आणून ज्या कामगिरीवर त्याची रवानगी केली आहे तो अर्थ सादावयाकरिता हर बाबेत आपण मदती कराल ही खातरजमा असे दीगर आजपर्यंत दरम्यान हरदू सरकार नाखुशीचे जबाबसवाल होऊन आले होते ते ईश्वरकृपेनें येकंदर दूर होतील आणि सांप्रत उभये पक्षी येखलास जाहाला आहे तो खातिरात आणून दोस्तीचा पाया मुस्तहकीम व मजबूत तुम्ही कराल ही खातरजमा असे कारण की यांत दोहां सरकारचा फायेदा असे यानंतर मोहिबी येकीन जाणावे की कोण्ही मोहिबांची रैयेत जंजिरे मजकुरी किंवा सरकार कंपनीचे मुलकात व्यापार करावयाकरिता येत असल्यास स्वस्तपणें सुखे यावें ज्याप्रमाणें सर्व बेपाऱ्यास सरकारांतून मदती व पन्हा होत असतो त्याप्रमाणें होत जाईल आणि कंपनी [कागद फाटला अक्षर लागत नाहीं*] ...... आमदरफ्ली ठेवीत जातील त्यांस आपणही सदरहूप्रमाणे रियायेत व आमन याल ही खातिरनिशा असे रा छ ५ माहे मोहरम सुा सलास अशर मियातैन व अलफ मुताबिके ताो ९ माहे ज्यानीवारी सन १८१३ इसवी ज्यादा काये लिाा प्यार मोहबत असो दीजे हे किताबत ईवन नेपिअर [इंग्रजी सही व सेक्रेटरी व भाषांतरकार यांची सही*]

९९

जबल २ } श्री {
मसुदा

श्री मन्माहाराज [फाटले] ...त्रपती स्वामीचे सेवेसी

विनंति सेवक खेम सावंत सरदेसाई प्रो कुडाल व माहालानिहाये कृतानेक विज्ञापना ताा छ २ माहे जोवलपर्यंत माहाराजाचे कृपावलोकनेंकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विनंति प्रार्थना ऐसी जे किले प्रसिध्धगडासी सेवकाकडून अमर्यादा घडली तनमुले हुजूरची ....खराबी जाहाली तेव्हां संदर्भ लाऊन विवेक केला या उपरी स्वामीचा राज्यांसी व किले प्रसिधगड व किले मनोहरगड व किले बहिरवगड व जजिरे सिधुदुर्ग वगैर कोट किले स्वामीच्या राज्यांतील यांसी हर येकविसीं सेवकाकडून उपसर्ग होणार नाहीं किले प्रसिध्धगड व जजिरे सिधुदुर्ग व किले मनोहरगड हे तिन्ही स्थलाच्या तनख्यांत व पंचमाहाल सालसी वगैर येथे सेवकाचा ऐवज पूर्वमर्यादि प्रो

आज्ञा—क व किले कोट व जंजिरे यांसी दुष्टबुधि हर येकविसी सेवकाकडून घडणार नाहीं व कोणी धरितील त्याचे मिलणीत मिलणार नांही हे चितात दृढ जाणोन विनंतिपत्र सेवेसी लिहून दिल्हे आहे यांत सेवक अंतर करील तरी श्रीकुलस्वामीची व सेवकाचे स्वधर्माची शफत असे सेवेसी श्रुत होये [नि*] हे विज्ञापना

१००
श्रीविठल

रमजान ३० }
शनिवार }

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्रियाविराजित राजश्री आबासाहेब सरदेसाई प्रागणें कुडाळ व मांहालानिहायेनी गोसावीं यांसि

ई सेवक जयाजी राणें राम राम विनंति उपरी येथील क्षेम तागायेत छ ३० रमजान सेनवार मुा वेळीस अवधारोन स्वानंदलेखनांज्ञा केली पाहिजे विशेष साहेबांची आज्ञा वंदन करून आलों त्याप्रमाणें सरकार काजकामांवर लक्ष ठेऊन तीर्थस्वरूप वापला यांचे मन मांनाऊन अंतर्याम मिळऊन घेऊन रहश्यानें तेसतर सोडोन जातात आणि फुडां धणीं कामांठाई निष्ठेन वर्तणूक करितात असा निशा करून घेतला परंत त्यांचें लक्ष तीर्थस्वरूप दादांचा जाबसाल होऊंन यावा यावर गुंतोन खटातोप करीत असेत त्यांस आम्हीं अर्ज साहेबांपासीं केला आहे त्याप्रमाणें समजाऊंन देऊंन त्यांच्या चिताची निखालस्ता केली माणसें फिरंगणांत गुंतलेमुळें फिरंगेकडे तुंटकेपंण करिता येत नाही त्यामुळें अंतर मांमसाहेबापासीं गुंतऊन वर गुजारणींस वास्तव्य करणें प्राप्त जाहाले तसें करून काळहरण करितों असा बोलणेंचा करार होऊन तीर्थस्वरूप नावेस गेलेस तर प्रांत हमखास करून घेतला धामसेंस फिरंगियाचे समजाविसीमुळें च्यार दोन दिवस राहूंन मग खांडेपारीं जावें असें बोलिलो आहूं निरोपान खांडेपारी न्हेलें तर उतमच जाहालें न जाहालेस निमित्यास मारामार केलीसी करून घालवावे असा बोलणेंचा करार आहे रात्रीचा बंदोबस्त होणें त्यास मेटां टेऊन करावा जाहाला तर सराद लांब मेटांस जमांव अधिक गुनवावा लागतो फिरंगेचे लक्ष मिर्गापासून स्वारी घाळीन उठवावयाचें आहे त्यामुळें जमाव विस्कळित न करितां येक जागीं बंदोबस्त करून असावें स्वारी चौकडा येक समईच करून च्यारीकडील जमांव उठवावा असी योजनां करीत आहे म्हणून वर्तमांन येकण्यांत आलें आहे येथील बंदोबस्ताविसी आज्ञां जाहालेप्रमाणें करावयास येईल भीमगडकरी ममतेस घेतलेवर सरादीचा बंदोबस्त होतो याकरिता अंतरयाम सुव करून त्यास मिळऊं घेतले आहेत दाणा पुरवावा याविसीं मार्गासी कौल देऊन मारनुलेचे तर्फेने बैल यावयाचा करार केला आहे शंभर जमाव किले निा चा चाकरीस करार केला आहे लोकांचा सेरा व नांइकांचा व कारकुनांचा धारऊंन खर्ची पाठविली म्हणजे जमाव उतरून येणार गडकरी व आम्हीं सर्व वतनदार येकमतें वर्तोन फिरंगेचा प्रांत घोसावा याप्रमाणें बोलणें जाहाले आहे काजकांम त्यां॰ कडोन जाहालेवर किलेचें स्वहित होणें असें त्यांचें बोलणें पहिलेपासून साहेबांकडेस जाहालें आहे त्यांकडोन कारंण जाहालेप्रमाणें ध्यानीं आणून घेऊन मनोहर करणार धणीं समर्थ आहेत गडकरी यांची पत्रें आलीं बजिनंस पाठविलीं आहेत हे बाडबारसेस स्वारी करणेची तरतूद केली होती पणं खेडीं उठली परंत ते तरतुदीत आहे राजश्री हरेप्रभू देसाई

येथ असलेस तर तुम्हास उतम होते फार (?) लिहावया शक्त नाही कृपा व ईमान असावी [बालबोधांत *] हे विनती

१०१

सवाल ७ } हु आलमगीर {

खान अलीशान आसतखान दिवाण हजरत शाः [मो. जा.*] याही राजेश्री राम दलवी यांस लिहिलें हासिबुल हुकूम

जुबदेथुल अशबाह वल आकरान खुलासेथुल इमसाल बल अयान राम दलवी मौकीफ बाशेद

मकसूद सांप्रत मशरवतपनाः सेख माहमद याणे तुमचे बरे नियेत दर्गाःचे कारबादियांविदमानें हुजूर जाहीर केलें त्यावरोन बंदानवाजी फर्माऊन सैख मास रजा फर्माविले आहे जे तुम्हास बिसालतमरतबत बाहदुरखान यांनजीक आणावे पादशाही हुकूम सादीर जाहालें आहे जें ई लिहिले पावतांच आपला खातिरजमा करोन उमेदवार होऊन खान मानुले नजीक येणे बरें प्रकारें मेहर्बानी होईल ये बाबे हुजूरचे बहूत ताकीद जाणावे तेरीख ७ माहे सौवाल

सवाल ८ } १०२ {

खान आलीशान लुत्फुलाखान यांहि राजेश्री राम दलवी यांस लिहिलें

सुज्याअत व जलादत दस्तगाः जुबदेथुल इमसाल वालाशाः राम दलवी माहफूज बाशेंद

मकसूद ऊंकी मशखत व रफाअतमाब सेख माहामद बक्षी व वाकानिगार दंडा-राजपुरी पादशाही हुकूमवरोन ते तरफेस पावेल व हसिबुलहुकूम तुमचे नावीं सादीर आहे तें पाववील त्यावरोन खातिरजमा करोन बरे फलश्रुतीचे उमेदवार आसोन ईजानिब तरफेचे मेहर्बानी आपणावरी समजोन आपले अहवाल सेख माच्या विदमानें लिहोन पाठवणें विहितप्रकारें हुजूर अर्ज करोन सरंजाम होईल तेरीख ८ सौवाल

जिल्काद २२ } १०३ {
श्री

यादी तह दुतर्फा

कुडाल सुभाचा दुतर्फा निमेनीम कलम १

पंचमाहालपैकी ठाणी साखली व मणेरी व साटरे उसगाव हे च्यार कोट पाडावे कलम १

सालसीचे वाटे नव जावे दिवाणच दिवाणाकडे चालो द्यावे वरघाटें समध नाहीं कलम १

शाहू राजियाकडे राजकारण राखो नयें कलम १

पंचमाहाल सुभा भिवगड दोन तकसिमा दिवाणास येक तक्षीम सावताकडें कलम १

बादेचा कोट घेतला आहे तो करार दिवाणाकडे कलम १

नख्त बारा हजार रुपये सध्या दिवाणास द्यावे ते लस्कर रेडीहून कूच होऊन दुसरिया तलावरी द्यावे कलम १

राजश्री [मो. जा.*] स्वामीच्या पायासी येकनिष्टपणे वर्तावे कलम १

येणेप्रमाणें आठ कलमें करार करून तह केला असे जाणिजे

छ २२ जिलकाद [ब.*] लेखन। सीमा समु। लसती

} १०४ {
हु

सावंत अजम अकरम खेम सांवत सरदेसाई पा। कुडाल दाम मोहुबत हू

ई सुज्यांअत व शाहामत इंतिवाहाः हशमत व शौकत दस्तगाहाः [मो. जा.*] बादज दुवा मोहुबल मोकसूद ऊ की येथील नेकी बनजर जाणान मोहिबी अपुल खुसी खबर कलमे इशार केले पाहिजे दीगर अम्ही मोहिबासी करारदाद केला होता त्याबरहुकूम हजूर दरगाहाःचे बंदगीस अर्जदस्त व वाका व नवाब बहरमदखान यास किताबती व कबिलास किताबती यैसे लिहून पाठविले त्या गोस्टीस वीस रोज जाहले पादशाहजीस अर्ज पोहचला दोनी च्यारी रोजात अमचा अदमी येणार आहे यैसियास मोहिबाचा वकील हजूर आहे त्यानी अपणास हे काही खबर लिहिला होता की नाही लिहिले असेल तरी बहूत लवकरी खबर लिहून पाठवणें अगर वकील लिहिले नसल तरी मुदाम माणूस हजूर पाऊन खबर आणवणें आम्हापासी अदमी येताचे लिहून पाठवितो हाली पादशाहानीस अर्जदस्त व वाका कुल हकीकत लिहून हाजी अहमद बराबरी तुम्हापासी पाठविले असे या बराबरी पात्र माणस हवी देऊन बेलगाव[त*]लग बहूत सिताब पोहचाऊ

देणें अणि पेसजी तुम्हास लिहिले होते कीं कबिलाकारणे दोनिसे रुपये लस्करास पाठवणें यैसियास ते तुम्ही रवाना केलेच असाल हाली याबराबरी दरबारखर्चकारणें तीनिसे रुपये कबिलेपासी बहूत सिताब पाठविल्हे म्हणजे तुमचे मजुरा बहूत होईल यावरी तुम्ही दाना आकील असा तुम्हाकरिता हें काम हाती धरील असे तुमचे मनात कैसे अहे हे कळत नाहीं मी मोगल होईन तरी येक वेळ होता की नव्हता यैसे करून तुमचे सर्फराजी करीन हे गोस्टीचा तूर्त इतबार असो देणें अपले इमान इतबार कैसे आहे ते लिहून पाठवणें त्यावेगळ भरवसा वाटत नाहीं अमचा इमान खरा आहे आणि यानी येथे तजवीज केला होता त्यावरी गनिमाचा वकील आला होता त्यासी भाक भरवसा दिल्हा की अम्ही हिकडून येतो तुम्ही जमावानसी तिकडून यावे मधे तुम्हास नेस्तनाबूद करावे यैसे बेइमानाने करार केला आहे तुम्ही अपले जागा बहुत खबरदार असेत जाणे अम्हास कळले वर्तमान लिहिले असे अणी परगणे मजकुरावरी अमचे वरात अकरासे रुपयेचे आहे त्या बाबे करीमखान फौजदार यास लिहिले असे व बजिनस वरातही पाठविले असे तरी ते गावगना यैवज करून देतील अपण चौघ माणस अमचे मा। लक्ष्मण सेणवीबराबरी देऊन पैके तहसील करून पाठविल्हे पाहिजे अम्ही येथून दरबारखर्चास काहीं पाठवावे तरी दिलगिरीकरिता हाताखाली नाही यैसियास मोहिबी हे कागद हजार कागदाचा जागा मानून तीनिसे रुपये अलबता अलबता पाठऊ [न*] देणे जाहले तरी वरातपैकी वजा करून घेतल पाहिजे तुमचे भरवसान हे काम हाती धरील असे अमचे कामाचे जरूर तुम्हांस आहे इनशाला ताला पधरा रोजामधे जमेदाराचे नावी व अमचे नावी हुकूम येतो अगर नवा फौजदार येतो हें येकीन समजण अपले खातीरजमा असो देणे बाजे हकीकत मा। लक्ष्मण सेणवी जाहीर करिता येक बयेक माळूम होईल तुम्ही व हे उभयेता बोलण चालण असेल ते करणे दुसरेस जाहीर होऊ न देणे तुम्ही खासा कागद वाचून फाळून टाकणे ज्यादा काये लिहिणे प्यार मोहुबत असो दीजे हे किताबती तुम्ही अपले जमावानसी तयार असोन आम्हास लिहून पाठवणे हे किताबती

} १०५ {

सुजायेत व स्याहमत इतिबा खेम सावत सरदेसाई मामिल कुडाल व माहालानिहाये दरी विला तुम्ही साखलीस मुकाम केला खूब केले हाली हजुरून येकबाल मज [?*] बर्खूरदार अजमखान याचे हमराहा पाच हजार स्वार देऊन रुकसती केले असेती ते येऊन पोहचेत तोवरी तुम्ही साखलीसच राहने अमा तुम्हानजीक जमीयेत मुतल थोडी असे व हाली सुजायेत स्यार राम दलवी वगैरे यास ताकीद करून जमीयेती माकूल तुम्हानजदीक होये ते कीजे हकीकती रुयेदाद होईल ते रोजीना हजूर पाठवीत जाने मो।

} १०६ {

पातस्या स्याहजादे

रफायेती व माली पंन्हा सुजायेत व स्याहमती इतिबा खेम सावत सर [दे *] साई महालानिहाये तरफ तलकोकन इजहाये आ की इजती असार रामाजी नायेक वकील येही हुजूर येऊन हकीकती जाहीर केली त्यावरून [मो. जा.*] अर्ज पोहचाऊन निस्यान तुम्हाबद्दल तयार करऊन ठेविले असे व तुम्ही पेशजी येक दोनी मोर्तबे लिहिले होते कीं अपन मुलाजमतेस येऊन येसियास हाली तुम्ही येऊन मुलाजमती करने तुमचे वास्ते [मो. जा.*] हजूर लेहून कुली सरजाम सरफराजीचा केला जाईल हाल वस्न असे यामधे येऊन अपले बेहवूद करून घेतलिया बेहेतर असे अम्ही तुम्हास अज रूये येखलास लिहिले असे पेशजी दूरदस्त याकरिता मातल केली हाली आम्ही तुमचे जागा नजदीक आलो असो वख्त दौलतखाहीचा असे आलबता हजूर येऊन मुलाजमती करने तुमचे हमराह जे ल्याक मन्सफ असतील त्यासही सरफराज के खातिरजमा करून हजूर येऊन मुलाजमती करने यामधे बेहवूद व सरफराजी

} १०७ {

राम राम०॥श्रीमद्दत्तात्रेयादि गुरवे नमः

पातशाहा आजमशाहा

०र्द श्रीमंत उत्तमगुणपरिपूर्ण सौज्यन्यैकनिकेतन राजमान्ये राजेश्री खेमसावंत देसाई पा। कुडाल गोसावी यांस प्रति कान्होजी राजे प्रभानवलीकर [मो. जा. *] येथील क्षेम जाणऊन स्वकुशल लेखन कीजे उपरी अम्ही आजीवरी कर्नाटक प्रांतीं पातशाही कामावरी होतो सांप्रत [मो. जा. *] बराबरी तैनात केले लस्करदाखल होऊन १५ दिवस जाहले येसियास तुम्ही लोकी कमरबंदी करून सभाजीसीं भांडता हे ऐकोन बहुत समाधान वाटले वासना होती की तुम्हाकडे माणूस पाठऊन वर्तमान घ्यावे तव रा। रामाजी नाईक ठाकूर तुमचे तर्फेने भेटले त्याच्या मुखें सविस्तर वर्तमान कलो आले तरी मोगल दीनदुनियांचे [मो· जा. *] थोर आहेती यासीं रुजुवात करून खिजमत करून दाखविलियाने परम ऊर्जित असे अम्हीही येथे प्रसंगी असो तुमचे वडिलांपासून जैसा स्नेहभाव व आप्तता चालिली अहे त्यास अंतर न पाडणे इकडूनही अंतर पडणार नाहीं कितेक आप्ततेचा बुधिवाद रा। रामजी नाईक ठाकूर यास निवेदन केला आहे त्याचे लिहिलियावरून कलो येईल सकलप्रकारे समाधान राखून व निशान सिरी धरून सत्वर येथें येणे विशेप काय काये लिहिणे इति मर्यादा [पा। ... *] हे विनंती

१०८

राजेश्री खेमसावंत सरदेसाई गोसावी यासि

दं श्रीमतु प्रहुडप्रतापदिनकर खडेस्वरी सदायेशवंत आखडितलक्ष्मीप्रसन राजमान्ये [मो. जा.*] स्नेहाकित राजश्री आचलोजी राजे [मो. जा.*] विनती उपरी येथील क्षेम जाणौउनू स्वकीये लेखन केले पाहिजे विशेशु रा। साबाजी सैनवै याबराबर पत्र पाठविले लिहिले की अपन हजूरतीचे कदम पाहावयाची उमेद धरुनू घाटावर आलो हे येकोनू आम्ही बहूत खुशाल जालो हजरत परमेस्वराचें ठाई आहेती तुमचे बहूत बरें होईल विशेश लेहावे तर तुम्ही जाणते लोक आहांत जाणताच विचार केला आहे विशेश काये लिहिणे हे विनती

१०९
श्रीराम

राजश्री खेम सावत भोसले सरदेसमूख पा। कुडाल गोसावी यास

दं श्रीमत अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य विराजित [मो. जा.*] स्नेह पूर्वक वासुदेव व बालकृष्ण हरी कृतानेक असीरवद उपरी येथील कुशल जाणौन स्वकीये कुशल लेखन केले पाहिजे यानतर गोसावियांचे गुनानवाद तुकोजी जासूद याने बहूत काही येथे सागितले त्यावरून बहूत समाधान जाले तरी गोसावियाची तारीफ तैसीच आहे यावरी मागे तुम्ही रा। छत्रसालजीचे मारफातीने अर्दास पाठविली होती ते अर्दास हजरती [मो. जा.*] स बहूत प्रकारे अर्थ सागून समजाविले त्यानी हुजूर पातशाजीस लिहिले तेथून मों यास फर्मान सिध करविला व यास लिा। जे तुम्ही त्यास वस्त्रे व निशान पाठविजे तोवरी फर्मान मागून पाठवून तुमचे मतलब वतन जागीर व तनखा हाल व बिरादरीची जागीर व बाजे यैसी येथे आलियावरी सरजाम होतील त्यास येथे खेस्टानी आम्हास आज्ञा केली की तुम्ही फलाणियास वस्त्रे घेऊन जाणे आणि त्यास येथे घेऊन येणे म्हणौन आज्ञा जाली त्यास आम्ही यावे तरी मार्ग कठीण त्याहीवरी प्रजन्यास्तव पुढे राजजी नाईक यावा। निशान पाठविले ते तुम्हास पावेल त्यावरी राउली त्याचा अभिप्राव मनास आणोन तारलेपावेतो येक भले मनुश व काही हशम यैसे पाठविजे आम्ही मागून सिरपाव व फर्मान घेऊन येऊन कलले पाहिजे कितेक प्रकारे हसबलअमर दिदवी पाठविला आहे त्यारून कलो येईल व भेटीनतरे वर्तमान कलेल तुकोजी व राजजीना। जासूद जबानी वर्तमान सागेल त्यावरून कलो येईल याचे उतर लौकरी पाठविले पाहिजे अबदुलाखान पणी यासहि तगीर करून समाधान असिले पाहिजे बहूत काये लिहिणे कृपा निरतर असो दीजे हे विनति

११०
श्री

राजश्री खेम सावंत भोसले सरदेसाई प्रा कुडाल व मााहाये गोसावी यासि

दं अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य [मो. जा.*] प्रति राजश्री राजा शाहू छत्रपति उपरी कसबे खारापटण येथे ठाणे ठेवावयाचें विशी तुम्हास आज्ञा केली आहे तरी लस्करचा व हशमाचा जमाव मोख्तसर सरदाराबा देऊन तेथे मजबूत ठाणे ठेऊन रयेतीचे संरक्षण करून रागणेकरास तंबी पोहचावणे तुम्हाकडील जमावास ऐवज पाहिजे याकरितां खारापाटण तर्फेचे चौथाईचा यैवज देऊन माहलास अलाहिदा सनद सादर केली आहे त्याप्रा यैवज घेऊन ठाणियाची मजबूदी करणे [नि*] जाणिजे बहूत काये लिहिणे [अष्ट.*] मर्यादा विराजते [पाठीवर अ. शि.*] बार सुरू सुरू बार.

१११
हु

अजम खेम सांवत भोसले सरदेसाई प्रांा कुडाल व महालानिहाय सलमहु

दं सुज्याअत व अवाली निशयां रफीयुलकद्र बुलेंदमकान [मो.जा.*] अजी टामस मास्टिन ईस्कोयेर सलाम बादज सलाम [म*] हवल मकसूद आ की येथील खैर तो छ १० माहे जमादीसानी जाणून दोस्तदारीं आपली श्यादमानी कलमें करीत गेले पाहिजे दिगर मौजे बंदर वेंगुरले येथील पाटेल व कुलकर्णी यांणी ईजानेबांकडे जाहीर केले कीं मोहिबी गांवगना रयेतेकडून चवलपटी घेऊन पेस्तर सालीं वसलांत बाद देणार म्हणून अर्या होऊन आले त्यास मोहिबी आपलेच मुलकातून चवलपटी घेतल्याने सजावर आहे वरकड बंदर वेंगुरले येथील चवलपटी घेऊन पेस्तर साली बाद देणार मौजे मजकूर पेस्तर सालापासून दरोबस्त सरकार कौंपनीकडेस होऊन सरकारांत वसूल घेईल तेव्हां चवलपटी सरकारांत मजुरां देणार नाहीं ते समई गरीब रयेत मध्येंच बुडते मोहिबी मेहरबानी करून वेंगुरल्याहून सिपाई माघारी न्यावे चवलपटीचा तगादा वगैरे न होये तें केले पाहिजे फाल गोपाल भैरव वेंगुरलेकर येऊन ईजानेबांस अर्ज केला कीं अजम शंकर सावंत यांचे सिपायांनीं विठो लख नाईक याची लेक बनाम येमनी पोट जाहले म्हणून वाडीस नेऊन ठेविली आहे त्यास तिचा नवरा गोपाल भैरव पोट जाहले त्याची हरकत न करितां रजोवत असून मोहिबी नजरबंद केली पुढें तीस सरकारची बंदी करणार हे गोष्ट मोहीबा लायेक नसे हरयेक गरिबांपासून अंतर पडतच आहे तो क्षमा करावा लागतो न कले हे सर्व मोहिबांस जाहीर आहे किंवा मध्येंच दुसऱ्याने कोनह्णी केले असेल तर मोहिबी चितांत घेऊन येमनीची मुक्तता करावी न केलियाने ईजानेब बहूत

दिलगीर होतील हाली बंदर वेंगुरले सरकार कोंपनीस दिल्हे असता हर येक गोष्टीने रयत मजकूर यांसी मोहिबांकडून जलल जाहालियावर लोक परागंदा होतील सध्या ईजानेब येथ असता याप्रो वर्तणूक करिता पुर्ता अर्थ चिती आणून मेहरबानी करून येमनीस सोडून यावे ज्यादा काये लिहिणे हे [किताब्रत*] विनंती

ताजा कलम पेशजीपासून सासष्टकर ब्राम्हण यांही आपला स्वधर्म त्याचे स्वज्ञाती ब्रांम्हणकडून चालवीत होते ते मोहिबी कितेक वर्षे अटक केली त्यामुळें बहूत कुच स्थली बाह्मण व सासष्टकर मुलकातून गयाल जाहालें हालीं ईजानेबाकडेस मशारनिल्हे सासष्टकर ब्राम्हण याही अर्ज केला आहे त्यास मोहिबी मेहरबानी करून त्यांचा स्वधर्म चालवावयास आज्ञा केली पाहिजे.

[लं. व. फार्सी लाखेवरील शिक्यात तामस मास्तिन*]

एकसंबें–शिंदे देसाई

मजकडे पुष्कळ फार्सी व मराठी–मोडी कागद आहेत, त्यांविषयीं काय करावें अशी पृच्छा करणारें श्री. सर्जेराव बाळासाहेब शिंदे देसाई वास्तव्य एकसंबें (चिक्कोडी, बेळगांव) यांजकडून ता. १६–१–६५ चें पत्र आल्यावरून मी पौष वद्य १० ते १२ (जानेवारी २७ ते २९) असे तीन दिवस उपर्युक्त देसायांकडे गेलों होतों. देसाई मोठे उमदे सद्‌गृहस्थ आहेत. त्यांनीं आपले सर्व कागद मला पाहूं दिले, यामुळें या तीन दिवसांत त्यांजकडे असलेलीं जुन्या कागदपत्रांचीं सुमारें ५० लहानमोठीं दप्तरें तपासून त्यांतून ४'१ मराठी–मोडी व १३ फार्सी कागद अधिक अभ्यासासाठी निवडले. तसेच त्यांच्या साह्यानें तेथील एक हकीम श्री. अहमदसाहेब सय्यदसाहेब मुल्ला यांजकडील फार्सी, फार्सी–मराठी–मोडी व मराठी–मोडी असे सुमारें १०० कागद तपासण्यास मिळून त्यांतून दोन निवडले व हे सर्व कागद अधिक अभ्यासासाठीं भा. इ. सं. मंडळांत घेऊन आलों. येथें आल्यावर यांपैकीं मराठी कागद अधिक तपासले व त्यांतील निवडक नकलून येथें प्रकाशित केले आहेत. नकलणें व रुजू घेणें हीं कामें मी व श्री. ना के. जोशी यांनीं केलीं आहेत. श्री. शिंदे देसाई यांचे वडील मोठे परिश्रमी होते असें दिसतें. त्यांनीं माझ्या पूर्वीच आपलेकडील सर्व कागद तपासून त्यांतील कौटुंबिकदृष्ट्या महत्त्वाचे असे कित्येक कागद केवळ बाजूस काढले होते, एवढेंच नव्हे तर त्यांची सूची करून त्यांपैकीं कांहीं त्यांतल्या त्यांत अधिक महत्त्वाच्या कागदांच्या प्रतीहि त्यांनीं आपल्या परीनें करून ठेविल्या आहेत. या कागदांत पेशवाईतील व महत्त्वाचे असे कागद आढळले नाहींत. एकसंब्यास गेल्याच्या संधीचा फायदा घेऊन पुनः एकदा निपाणीकर देसायांच्या थोरल्या पातीचे वारस व जवळच्याच नणदी गांवचे इनामदार श्री. अप्पाजीराव तुळजाराम देसाई यांस भेटलों. त्यांजकडे जुने कागदपत्र असलेच पाहिजेत. पण ते तपासण्याचा योग अजून जुळून येत नाहीं.

सु. १०१२ } ११२ तालीक ३ { श. १५३३-३४ इ. १६११-१२

माहामेरु राजेश्री भोवानी कोवला राचणा देसाई व परवणा बिन रावणा पा। रायेबाग पटेल का। येकशंबे

दा। बो।

राजाई कोम रामणा देसाई व सबाजी बिन रामणा देसाई — रायेपा व परसोजी बिन बसवणा देसाई

पा। मजकूर अज पूजा श्री सरस्वती सुहूर सन इसने अशर अलफ कारणे [मो. ना.*] लिहून दिल्हे अपले अतमसतोश खडपत्र यैसा जे अमचे अहवाल बदल तुम्हासि व बुनियादी कुणबियासी हजरत हुजूर बोलाऊन आणिले होते साहेबी अपणं हुजुरून अमचें मुनसिफी चैघे मोख्तसर कुणबी यानी करीणा याचा हाती दिल्हे जे परसा नाईक देसाई पा। मजकुरी चविधे लेक असेती त्याचे वृती जे असे ते तिघासि धर्मता निवाडा करून देणे म्हणोन तरी समस्तही तिघेचे वाटां निवाडा केले वाटां

बि।

इनाम ठिकण चावर २
यासि वाटा
॰।।१० बसवणा देसाई याचे फर्जदासि
॰।।१० रामणा देसाई याचे फर्जदासि
॰।।१० राणणा देसाई याचे फर्जदांसि
॰।।१० तकसिमेबा। बदर नफर
॰।॰ इकराव्यासि

इनामनी ठिकाणातीवरील पछोडी पैके होन ३० व विस्वे व फसंकी वा पडद परवणा बिन रावणा देसाई पटेल यासि देणे सबब दिवाणी नफराई बदल व महालदार ठेवण

मला थोरले
१ वरील मला रामणा देसाई
१ मधील मळा राचणा देसाई
१ खालील मला बसवणा देसाई

हे पहिले वाटा देसाई असता जाहाले असे
आलाहिदा मला बा। सभाजी देसाई ते बसवणा देसाई याचा फर्जदासि

ते मला गावकीखाली असे याचे फ(म)लाबा। तिघे जणानी देणे

घर तीनी बि।
१ वरील घर बसवगा देसाई याच फर्जदासी

खिजमत करणेबदल दिल्हे असे बाकी जे बाब उरले ते तिघानी वाटून घेणे बाजे लाजिमाती व बाबे जमा व वेगारी व दिवाणीचे तश्रीफ पान व मान परवणा बिन राचणा पटेलासि	१ खालील घर रामणा देसाई याचे १ किा घर राचणा देसाई पहिलेच देसाई असता वाटिले असे

येणेप्रमाणे पटेलगी काा मजकुरीचे वाटा जाहाले पेस्तर देसगती पाा मजकूरचे आलिया तैइनायेत व दिवाणीचे तश्रीफ बसवणा देसाई याचे फर्जदासी द्यावें वरकड देसगतीचे लाजीम वरतना व पटी पछोडी व बाबे जमा व विस्वा व बाजे लाजिमा जे काय येईल ते तिघानी बराबरी वाटून घेणे यैसे निवाडा तिघे जणाचि जाहाली यैसच खानसाहेबाचे बंदगीसी लिहून दिल्हे असे येणेप्रमाणे तिघे भावांनी पेस्तर असावे पेसजीचे जीण जितरूब अवघे नागवून लुटून गेले अता सदरहू वाटा अम्ही अपले अत्मसंतोश कबूल असो यासि कोणी तकरार करतील तो सर्व अन्याई श्रीमृत्यन्या साक्ष हा पत्र सही

गोही

परसोजी बिन वीरगोडा	पायेगोडा
सखरसेटी सखणा	बाबासेटी
सिदगोंडा	भद्रसेटी
केदार परसगोडा	भैरोबा बेडग
बिा तिमा बापोजी मोा	बिा लिंगोजी मुाारु
नवरसपूर	

मु १०१४ जिल्हेज १७ — ११३ नालीक ½ — श. १५३५ माघ वद्य ३ इ. १६१४ जानेवारी १८

खडपत्र बतारीख १७ जिल्हेज बी हुजूर हाजीर मजालसी मोकाम कसबे लाटी पाा हुकेरी

मलीक अता मलीक टाणेदार	नागोजी विस्वनाथ मजमूदार
फत्तूनाईक नाइकवांडी हशम लाट ताा	हुदेदारानी कसबे येकशेबे
	अपाजी ताऊजी
सिदगोडा देसाई	जखरस हुदेदार
जाऊजी राम देसकुलकर्णी	पखगोडा देसाई
सिदगोडा जखगोडा बिराजर पटेल मौजे	मलणा वीरगोडा पटेल काा लाटी

चिंचणी
येलनाईक पटेल मौजे कोजिणी
येलोजी पटेल मौजे
वालकी

काा येकशेबे पाा रायेबाग
विरणा जाव्र भद्रसेटी
गौडा तेली
सबजी जाव्र सभणा हसेटी
गौडा
विठणा मुद्गोडा

भोबगौडा पटेल बिराजर आबगोडा पटेल
मौजे भोज पाा रायेबाग

अज पूजा श्री सरस्वती सुहूर सन अर्बा अशर अलफ जाहाला खडपंत्र यैसा जे परसोजी व वीरगोडा फर्जंद बसवणा देसाई व सबजी फर्जंद रामणा देसाई व परवणा फर्जंद राचणा देसाई व पटल काा येकशबे पाा रायेबाग हे तिघे चिचोर भाई यासि दर साल सन अशरा अलफ यामधे वाटां होऊन खडपत्र जाहाले होते परवणा फर्जंद राचणा पटेलगी करीत होता अपले चिचोर भाई यासि बाा खंडपत्र वाटां येक साला चालविले त्यावरी अपणासि करार पडिले म्हणौन खडपत्रप्रमाणें वाटां चालविले नाहीं याबदल अपणांमधे अपण करकर करूं लागले त्यावरी थल कसबे मजकुरासि तिघे जण येऊन अपुले अपुले अहवाल सदरे हुजूर सागितले यावरी हाजीर मजालसी यानी विचारिले जे अम्ही जे सिस्ती करून ते अइकाल की काये म्हणौन त्यावरी तिघे जणानीं अपले अत्मसतोशें आइकोन म्हणौन कबूल केले मग सभानाइकी पाहिले खंडपत्र मनास आणितां तेणेप्रमाणे भोगवटा चालिले नाही अपणामधे अपण गरगशा करू लागले म्हणौन तकसिम केले पटेलगीचे इनामति व हकलाजिमा बिा

इनाम चावर २॥·		नख्त होनू	
सेत चावर	बाग चावर	४९॥·	
२	·॥·	हकलाजिमा हाली	बाबे जमा
मेह कुडो व पेऊ कुडो व फसकी व		दस्त होनू	होन
प ट ल द म व ह ड प ग ट पा ने (पलखी)		४२	७॥
यामधे जो कोणी पटेलगी चालवील त्यास बिा		देणे	
सेत चावर		नख्त होन ४९॥	
·।·		पैकी होनू १२	
मेव कुडो व पेव कुडो व ह ड प ग ट पा ने व व ट ल द म (पलखी)			
बाकी			
इनाम चावर		नख्त होनू	
२।·		३७।·	

सेत चावर बाग चावर
१॥॰ ॰॥॰
यासि तकसिम तिघासि बराबरी
परसोजी व वीरणा
फर्जंद बसवगोडा

इनाम नख्त होन
चावर १२॥
॰॥॰
॰॥१० सेत
८२० बाग

सबाजी फर्जंद रामणा
इनाम चावर नख्त होन
॰॥॰ १२॥
॰॥१० सेत
८२० बाग

परवणा फर्जंद राचणा
इनाम चावर नख्त होनू
॰॥॰ १२॥
॰॥१० सेत
८२० बाग

येणेप्रमाणे खडिले असे व घराचे वाटा तिनी ठाई बराबरी करून घेणें यात कोणी चुकलिया दिवाणीचे गुन्हागार व गोत्राचे अन्याई हे खडपत्र सही

[नि*] पा मजकुरीचे देसगतीच वाटा बरोबरी जालिया तैइनायेत व दिवाणीच सश्रीप बा सबगा देसाई याचे फर्ज आसो याव वरकड रास करास वाटा तीन तकसीम बराबरी वाटून घेण

सु. १०१८ जवल ५ } ११४ { श. १५४० वैशाख शुद्ध ६ इ. १६१८ एप्रिल २०

दा बाो रायेपा व परसोजी बिन बसवणां देसाई व सभजी रामणा देसाई पा रायेबाग सुा सन समांन अशर आलफ कारणें परवणा फर्जंद राचणा चुलत भाऊसी लिहून दिल्हे अपले अत्मसतोस सुकृत नेम उतर येसा जे देसगत पा मजकूर तुमचे मिरासि वडीलवडिला तागाईत वडील पारंपार देसगती चालविलेवरी साप्रत सभजी रामणाचें देसगती चालवीत होता त्यास न ठके यैसे जाहाला वरातदाराचे तगादा आणि समस्तही लोक अपडाऊ याकरिता त्यास न ठके मग अम्हामधे तुवा बुधिवंत अशेसी यैसे असोन देसगती जाया जाऊ नेदावे म्हणोन तुम्हासि अमचे देसगतमधील समाईक

तुवा होन्‌ ३०० तीनी शेहे सालासि तुम्ही अपले घेऊन सोसावे वरकड जे असते ते तिघाचें वाटा दऊ अवघे झडिती जाहालेवरी देऊन देसाई राखून असिजे देसगतीचें हकबाबपैकी सदर होन ३०० व बाबे जमा व विस्वा यैसे तुमचें खाशेसी दिल्हे असे वरकड रास करास वाटा तीनी तकसिम वाटून

गोही

यायेगोडा पटेल मौजे शडवाल

मालजी पटेल मौजे सिरवल

बहीर भैरगोडा पटेल काा बेडिगे

आम्ही अत्मसतोश देसगत तुम्हास लिहून दिल्हे असो तुम्ही किती दिवस चालवीन म्हणाल तितके दिवस तुम्ही चालविने तुम्ही होऊ न ठकता सोडिलेवरी आम्ही सदरहूप्रमाणे करून हा कतबा सही देसगतीस व पेसकसिस मिरासीस जे पडेल ते अम्ही तिघे मिळून देऊ हा कतबा सही छ ५ जमादिलौवल

११५
श्री अंबाप्रसन

अखंडितलक्षुमीअलंकृत राजमान्ये राजेश्री समणा देसाई पाा रायेबाग व पटेल कसबे येकसंबे गोसावी यासी

स्नेहेंकित आनंदराऊ सिवदेऊ असीरवाद उपरी येथील क्षेम जाणौन गोसावी आपले क्षेम लिहीत गेले पाहिजे यानंतर नणदीच तलावरी लस्केर राहिले होते ते समै भेटी मात्र जाहाली परंतू सावकास बोलणेचालण काहीच जाहाले नाही [त्या]उपरी पाच साहा महिने कोलापूर पनाला धरून लस्कर.........आम्ही शैन्यात ते........ नव्हता तुम्हावरी कसाला पडून सम पावत आसता आम्ही काये म्हणौन }मा{ माणसे पाठवावे म्हणौन पाठविली नाहीत प्रस्तूत राा सिदबाच शैन्ये कनकगिरी प्रातासी आहे बाा जमाऊही फार मिलाला आहे माहाराज राजेश्री [मो. जा.*] छेत्रपतिच लस्कर केरूरावरी आहे कागदीपत्री अनुसंधान हाच लागला आहे राा केदारजी सरनोबतासी पाठवणें म्हणौन लिाा आहे तियानीही केदारबासी पाठवणार अहेती मातुश्री [मो. जा.*] आईसाहेबाच मनी बहूत हेतू आहे की सिदबाच मुदेमाफीक सरजाम करून देऊन त्यासी हाती घ्यावे यैसे भावार्थ आहे श्री [मो. जा.*] दयेने आवघे विवेकच होऊन मनोभीस्ट सिधीसी पावल लस्करसमवेत थोडची दिवसात त्या प्रातासी येणार आहेती चिलमऊ रात्रीदिवस सिदबाच उरावरी बैसली आहे ते हट काही सोडीत नाही थोडे

दिवसात आवघा भावार्थ कलल आणि दोनी लस्कर तेरदाल मुलुकात हरल इंगलीच तलावरी होते ते समै राजेश्री तमाजी परवगोडा देसाई लस्करात होते त्यानी आम्हासी बहुत गला पडल की तुम्हीं अमच घराणेविसी मन घालून आम्हासी राहाण म्हणौन बहूत बहूत गले पडल परतू अम्हासी चिकुडीकराच निरवाव्ह केलेवेगले कोठे रोजगार करणे नाही म्हणौन सागितलवरी येक पुत्रासी तरी आपणाकड देणे सर्व विसिईं आम्ही चालऊ म्हणौन अमचा जेस्ट पुत्र चिरंजीवित शावपासी मागोन घेऊन बाा नणदीसी नेहल आहेती हे वर्तमान तुम्हासी कलल असल मूल तेथे आहे थोड बहूत कुटुंबही तेथे अले अहे तरी आपण येक क्षेणाच आवकाश करून चिरंजीवासी भेटून थोडबहुताने खर्चांविचाचे [परामृश...] करणे तेणेकरून तुम्हासीही हलके होईल तुम्ही व ते...ती वारिता उतम अहे तुम्ही आणि भटाच गुाा साडे तेरसेंच पत्र लिहून देऊन तीनी साल तीनी साडे च्यारीप्रा द्यावे यैस करार केल परतु निर्वाव्ह न जाहाला आम्हावरी कसाला पडला तेणेकरिता तैसची राहिले अता तुम्हासी टाकिलेसारिखे चिरंजीवाचे परामृशे करीत जाणे आहो समणा आम्ही काही द्रव्याची जोडी केली नाही तुम्हा लोकाचीच जोडी केली आहे आम्ही आलियावरी तुमचे पत्रही तुम्हासी देऊ थोडबहुतावरी निर्वाव्ह करू टाकू हे गोस्टी बरे ध्यानासी आणून आपले स्वहित दिसत असल तरी लिा प्रा निरवाव्ह करणे बहूत लेहावे तर आपण जाणते आसा हे विनती

फ. ११०४ आ. जु. ३९ रमजान १ | ११६ | श. १६१७ वैशाख शुद्ध २ इ. १६९५ एप्रिल ५

[आरंभीं वा. फा. शि.*] फर...मुहम्मद मुरीद बादशाह आलमगीर ३०

आज माहल फौजदारी व आमीनी पाा रायेबाग सरकार मजकूर ताां संभाजी वलद नरसोजी देसाई व भिकाजी देसाई व पटेल कसबे येकसंबा पाा सरकार मजकूर सुभा दारुलजफर बिजापूर मालूम बाद सुाा सन ११०४ दरी विला तुवा हुजूर येऊन इलतिमास केले जे मुदतपासून कसबे मजकूरचे जमीन नाकिर्दी पडोन बंजर लागला असे तो किर्दी करणेस ताकत नाही यैसियास साहेब मेहेरबान होऊन कसबे मजकूर पड जमीन आफ्तादा मिजुमले नीम चावर ·॥· जमीन आपणास इनाम करून दिलिया आपण कसबे मजकूर आज जमीन मिाा साल मजकूर किर्दीसिवाये जे काये जमीन ना किर्दी पडिली जाहे ते सुाा पांच साल इाा स [न*] ११०५ ताा सन ११०९ साल बसाल लावनी करून आकारासेहे णव सालेस तमाम सदरहू पड जमीन किर्दी करून मवाफीक कामील बेरीज खालसेचे भरून देऊ व कबसे मजकूरचे कोट बांधोन गनिमास सजा देऊन कसबे मजकूरचे उस्तवारी करून साहेबकामावरी हाजीर आसू म्हणौन

आर्जे खातिरेस आणून कसबे मजकूर पड जमीन बंजर आफताद मिा ·॥· नीम चावर जमीन बशर्त मजकूर इनाम दुमाला केले असे जमीन चेकबंदी करून किर्दी करून बमोजींब इनामदारा पैके देऊन सदरहू कसबे मजकूरचे (?) जमीन साल मजकुरा लावनीखेरीज पड जे काये असेल ते पाच सालमधे किर्दी करून जमा कामील खजाना दाखल कीजे अगर पड जमीनचे ये (से)तास लावनी न केले तर किर्दी जमीन मवाफीक पड जमीन पैके भरून देऊ हेवि [फा.*] बैजा

[नि*] कसबेची पेसगी दोन २ चावर व सरदेसकुलकर्णी यक चावर १ व पटेलगी सदर जमीन मिळऊन २॥१० आडीच चाऊर दस बिगा व पा मजकूर पसगी व इनाम गाऊ घोसरवाड हे कदीम वतनदारी खाऊन सरकारकामावर आसने [फा.*] बैजा

तारीख १ माहे रमजान सन ३९ जुलूसवाला

सु. ११०३ शाबान ६ } १६७ श्री {श. १६२४ पौष शुद्ध ८ इ. १७०२ डिसेंबर १५

[आरंभीं चौ. बा. शि.* राजारामचरणि। अतितत्पर वीरोजी। पतंगराव। नीरतर

कौलनामा अज सुभा राजमान्ये राजश्री विरोजी पतगराऊ वजारतमाब सबजी नरसोजी देसाई पाटील काा येकसंबे पाा रायेबाग सुाा सलास मया अलफ कौलनामा यैसा जे राजश्री भिकाजी परसोजी देसाई पाा माा याणी जोरावारीने देसकत व पाटिलगी घेऊन तुज बाहीर घातले त्यावरून काा मार टाकून बाहीर पडौन दावे करीत असता आम्ही हे प्राती आलो तू येऊन भेट घेऊन आपली हकीकत सांगितली त्यावरून रा भिकाजी परसोजी देसायासि आम्ही बोलाऊन तुमची त्याची बरहुकूम मनसुबी मनास आणून तुमचे तकसिमेस पाटिलगी देऊन समजावीस केली भिकाजीचे तकसीमेस देसगत देऊन उभयेनाचे समाधान केले आहे तरी याउपरी कोणे गोस्टीचा शंशये न करिता काा मारी राहून पाटिलगी करून हक व इनाम जेणेप्रा चालत आले आहे तेणेप्रा खाऊन सुखरूप राहाणे कोणे गोस्टीची चिंता न करणे दर बाब कौल अस जाणिजे छ ६ शाबान [चौ. मो.*] मोर्तब। शुद

सु. ११०६ सफर २९ } ११८ श्री {श. १६२७ आषाढ शुद्ध ९ इ. १७०५ जून ११

राजश्री देशमूख व देशकुलकर्णी पा। रायेबाग गोसावी यासी

अखंडितलक्ष्मीअलकृत राजमान्य [मो. जा.*] श्रो हिंदूराव घोरपडे ममलकतमदार सु॥ सन सीत मया अलफ सवणा पटेल देसाई का॥ येकसबा पा॥ मजकूर यांचे विसी राजश्री कासीराम जमेनवीस व रो॥ मानाजी बागूल व रा॥ उदाजी काटकर याणी विनती केली की अपणास जमावनिसी साहेबी या प्राती ठेविल त्यास साल गुदस्ता ताम्राच्या स्वाऱ्या जाल्या व किती एक लस्करचा उपसर्ग विलायतीस लागोन लोकाच मुकास लुटल यास्तव गंनीम आधिकरू{रू}न देशांतून काढाव आणि विलायती रक्षावी येसा विचार केला त्यास फौजस असेरा असिला पाहिजे व हशमाचा जमाव असावा लागातो त्यास पटेल देसाई मजकुरान कसबे मजकुरी अपल्या फौजस जागा देऊन बेशक (?) व किरकोली सामान साहित्य केली त्यावरून गनिमाच्या फौजा मारून चालविल्या देश रक्षिला पटेल मजकूर स्वामिकार्याचा या राज्यासी येकनिष्टपण वर्ततो ऐसियासी साहेबी पटेल देशमूखच उर्जित करून चालवव त्यास मौज येलगोडे का॥ येकसबा पा॥ मजकूर हा गाव रा॥ मानाजी बागूल यासी मुकासा अहे सांप्रत बहूत दिवस गाव खराब पडला किर्दी मामुरी होत नाही तो गाव इनाम करून दिल्हेया गावाची आबादानी होऊन याचे उर्जित होत म्हणून विनती केली त्यावरून मनास अणिता पटेल स्वामिकार्याचा येकनिष्ट आजी पावतो स्वामिसेवेसी अतर पडो दिल्हे नाही पुढही किती येक कार्ये प्रयोजेन याचे हाती अहेत येसे जाणून मौज येलगुड का॥ यकसबा प्रा॥ मजकूर हा गाव इनाम करून दिल्हे अस तर तुम्ही मौज मजकूरच हकदार व इनामदार खेरीज करून दुमाला करणे आणि व याच्या पुत्रपौत्रादी वैशपरने अविछिन चालवने व वरुषप्रति वरुषि नवेण पत्राचा अपक्षा न करण या पत्राची प्रती लिहून घेऊन मुखे पत्र पटेल देसाई याजवळ परतून दण जाणजे छ २९ सफर

आज्ञापत्र समस्तराजकार्यधुरधर विस्वासनिधी राजमान्ये राजश्री हिंदूराव घोरपडे ममलकतमदार ता॥ मोकदमानी मौज यल

व्यय भाद्रपद शुद्ध १०इंदु सु. ११०७ जखर ९ } ११९ श्री [नि*] सुबराज { श. १६२८ भाद्रपद शुद्ध १० इ. १७०६ सप्टेंबर ६

[चौ. बा. सं. शि. *] श्रीराजारामचरणा। वार्तेर्मालोजीघो।
र्पेरेः। सुतस्य भैर। जेमुंद्रा षण्मुख। स्येव राजते

अभयेपत्र समस्तराजकार्येधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री हिंदूराऊ घोरपडे

ममलकतमदार ताां संभाजी बिन नरसोजी सिंदे देसाई पाा रायेबाग सुहूर सन सबा मया अलफ वेय नाम संवत्छरे भाद्रपद सुध दशमी इदुवारी तुम्ही विनंतीपत्र व हरि साबाजी [मो. जा.*] यासी पाठविले की पाा रायेबाग येथील निमे देशमुखी भरमदेऊ जाधव याची व निमे आपल्या वडिलाची त्यास इगली व मौजे-गेवाडी या दोनी गावीचा हक्क व इनाम जो असल तो भरमदेऊ जाधव याणी आपुल्या निमे देशमुखीच्या वतनास अनभवावे व आपणास निमे देशमुखीस व कसबा येकसबाची पाटिलकीचे वतन देखील तेथील हक व इनाम जे असल ते आमचे आम्ही घ्यावे त्याच्या दोनी गावास आमच्या वडिलास समध नाही व आमचेच कसबा येकसबाच्या पाटिलकीच्या वतनास जाधव यासि समध नाही यैसे पूर्वांपार चा[लत आले आहे] तेणे प्रमाणे सांप्रतीही चालते यैसियासि प्राा येथापूर्वक देशमुखीचे वतन वडीलपण सिका करीतच होता त्यास हसोजीचे पोटी परसोजी जाला त्यास नरसोजी सिंदे देसाई कसबे रायेबागेमध्ये होता त्याच्या घरास परसोजी रायेबागस गेला तो नरसोजी बोलिला की या हो पाटील येकसबचे येसे म्हणताच परसोजी बारा वरसाचा धाकुटा होता त्याच्या मनात कितू बैसोन निघोन गेला तो कसबा इचलकर्जी येथे राजश्री बाजी घोरपड याची पाठी करून चालीस पनास वरुषे दावा करून बाहीरच होता त्यास अदलशाही बुडतेसमई विज्यापुरीहून मिरज प्रांतीचा सुभा राजश्री त्रिंबक कलो हैबतराऊ करून आले त्याची भेटी घेतली त्यास त्रिंबक कलो हैबतराऊ याणी परसोजी सिंदा यासि हाती धरून देशमुखीची सनद करून दिल्ही देशमुखी व पाटिलकी येकसबाची अनभऊ लागले नरसोजी आपला बाप वृध होता तो वारिला आपण लाहान होतो वतनावरी टिकोन राहिलियाने आपल्या जीवास नाश होणार दावा करू लागले तेथे राहता नये यैसे जाणून वतन टाकून मौजे रासिवडे प्रात कोल्हापूर येथे राहून प्राण वाचविला परसोजी आपल्या बलेकरून देशमुखीचे वतन करू लागला अदलशाही बुडतेसमई त्र्यबक कलो हैबतराऊ याचे वियेमाने सनद करून घेतली ते महाराज राजश्री [मो. जा.*] थोरले कैलासवासी स्वामीस देश हस्तगत जाला त्यापासून देशगतीचे व कसबा येकसबाचे पटिलकीचे वतन दोनी तीन वर्षे पावेतो केले सवेच परसोजी मृत्य पावलियाउपरी त्याचा पुत्र भिकाजी परसोजी देशगती व पाटिलकी करू लागला आपण थोर जालियावरी वतनावरी जावे यैसा विचार करून आलो त्यास देशमुखीचे व पाटिलकीचे वतन आपणास लागो न देता दिवाणीची पाठी करून व आपली जोरावारीने वृती आनभविली आपण बहूत काही कटकट केली परतु आगोधर त्याचा चौका बैसोन भोगवटा चालिला यैसियासि वतनदारीचा मामला आजीपावेतो धाकटा होतो दावा साभालवेना म्हणून पर विलायेतीमध्ये जाऊन राहिलो साप्रतही वतनावरी येऊन राहावे टाकून जाऊ नये म्हणून टिकोन राहिलो त्यास देशमुखीचा व पाटिलकीचा वाद भिकाजी परसोजीसी सागितला त्यास हमशाहीं वतनदार देमणा डोगर आजहत देसाई पाो हुकेरी व विरोजी पंतगराऊ याणी आपले समाधान करून भिकाजीस सागितले की पूर्वीपासून

नरसोजीने वतनाचे वडीलपण केले भोगवटा त्याचा चालिला साप्रत त्याचा पुत्र वतनावरी अला आसता त्यास लागो न देता तुज सुटोया होते की काय म्हणून सागात्र्याचे रीतीने व वतनदारीच्या प्रसंगे सागितले त्यावरून कसबा यकसबे येथील पाटिलकीचा कार्येभाग आपल्या गला घातला ते समई त्याचे बल विशष पाहून पाटिलकी आपण करू लागलो देशमुखी भिकाजी परसोजीच करीत होता यसियासि तो देवी गतीने मृत्य पावला त्याचे पोटी दोघे पुत्र जाले येक परसोजी भिकाजी व दुसरा सिदराम भिकाजी त्यास परसोजी वडील पुत्र मृत्य पावला सिदराम येक पुत्र व स्त्री सावित्री आहे पुत्र लाहान बाइकोने नाही ते कथले करून बदराहाः वर्तणूक करिते रयेतीही कोण्ही राजी नाही व दिवाणासीही रूजुवातीने राहावे हा दंडक नाही आपले मनास आल्यासारिखे धामधुमेचा कारभार करिते तरी हे रीती काही वतनदारीची नव्हे यामुळे देशमुखीच्या व पाटिलकीच्या वतनास धका बैसतो व देशही खराब होतो वतन हातीचे जाते यसियासी वडिलानी पूर्वी देशमुखी वडीलपणे आनभविले आहे साप्रतही साहेबी पूर्वोतर करीना मनासी आणून देशमुखीचे वतन आपले स्वाधीन केलिया वतन अनभऊन रयेती रजावंद राखोन दिवाणासी रूजुवातीने राहून वतन अनभऊन म्हणून विनंती केली त्यावरून मनासी आणिता तुम्हा उभयेताचे येक घर त्यास वडील घर भिकाजीच खरे परतू पूर्वी मुलीपासून देशगती तुमच्या घराणियाने केली आहे असे जाणून व भिकाजीची स्त्री सावित्री बदराहाः वर्तते रयेती रजावद नाही व दिवाणासी रूजुवातीने [न*] राहाता देश खराब केला सिदराम भिकाजी धाकटे यसे जाणून पूर्वी तुमच्या वडिलानी वतन अनभऊन वडीलपण सिका तुम्हाजवली आहे येस जाणून व तुम्हास रयेती रजावद आहे देशाची आबादानी होइल तुम्ही येकनिस्टा धरून येकसबाचे पाटिलकीचे वतन करीत आसता ही वर्तणूक केली पुढेही कराल देशाची किर्दी मामुरी जाली पाहिजे यसे जाणून पा रायेबाग येथी[ल] देशमुखी पेशजी निमे तुमच्या वडिलानी केली त्याप्रा साप्रतही तुमचे स्वाधीन केली असे तरी तुम्ही वतन अनभऊन रयेती रजावंद राखोन देशाची आबादानी करून दिवाणासी येकनिस्टपणे राहाटी करणे आणि वतन आपल्या पुत्रपौत्री वंशपरंपरेने देशगतीचे वतन वडीलपण सिका वागऊन सुखरूप राहाणे साप्रत या वतनासमधें तुम्हापासून सेरणी रुपये २००० दोनी हजार रास घेतली असे याचा वसूल देऊन सालाबाद वतनास हक इनाम चालिलेयाप्रा जो असल तो अनभऊन सुखरूप राहणे [नि*] जाणिजे छ ९ जमादिलाखर [नि*] पा हुजूर [चौ. बा.*] लेखनमर्यादा बार [जो. मो.*]

सु. ११०७ } जखर १० }

१२०

श्री [नि*] सुबराज

{ श. १६२८ भाद्रपद शुद्ध १२ { इ. १७०६ सप्टेंबर ८

[आरंभीं ले. ११९ प्रमाणें शि. आणि शेवटीं व जोडावर मो.*]

आज्ञापत्र समस्तराजकार्येधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री हिंदूराऊ घोरपडे ममलकतमदार तां मोकदमानी देहाये पा रायेबाग

काा हवेली रायेबाग

१	काा रायेबाग
१	मौजे मुगेवाडी
१	मौजे जलालपूर
१	मौजे भिरडी
१	मौजे चिचणी
१	मौजे निलजी
१	मौजे एडरावें
१	मौजे नसरापूर
१	मौजे आकली
१	मौजे निडगुदी
१	मौजे बोमनहाल
१	मौजे नागरहाल
१	मौजे सवजुती
१	मौजे मोरब
१४	

काा येनापूर

१	कसबा येनापूर
१	मौजे सेडबल
१	मौजे बणजवाड
१	मौजे कातरहाल
१	मौजे लिगनूर
१	मौजे सलगर
१	मौजे लोकूर
१	मौजे कितूर
१	मौजे कृस्टणहाल
१	मौजे मोलवाड
१	मौजे उगार
१	मौजे इगली
१	मौजे सिवपूर
१	मौजे सिरगूर
१४	

काा येकसंबे

१	कसबा येकसबे
१	मौजे भोज
१	मौजे हानवाड
१	मौजे अकिवाट
१	मौजे घोसरवाड
१	मौजे येलमोड
१	मौजे सिरगांव
७	

काा कुभोज

१	कसबा कुभोज
१	मौजे टोप
१	मौजे हिगणगाव
१	मौजे कविठे सार
१	मौजे मालें
०॥०	सिरगाऊ
५॥०	

काा सिरवल

१ कसबा सिरवल
१ मौजे कविठे गुलद
१ मौजे हेरवाड
१ मौजे कोरोची
१ मौजे तेरवाड
१ मौजे सिराढोण
१ मौजे जावलें
१ मौजे नादणी
१ मौजे कुरुदवाड
१ मौजे अर्जुनवाड
१ मौजे चिंचणी

११

फूट गाऊ आटले
२ कुडचीखाले आटले

१ कुंसगोपी
१ चिटगोपनहली
१ महमदापूर

१ अलमहली नादरियाखाले आटली
१ खामदहाल इगलीखाले

५

काा नादरे

१ कसबा नादरे
१ मौजे अमनापूर
१ मौजे माने चिचणी
१ मौजे हतनौली
१ मौजे राये बागवडे
१ मौजे बेणापूर
१ मौजे हेदरी
१ मौजे खुजेगांव
१ मौजे मोरोलें
१ मौजे राजापूर
१ [मो. जा*]

११

तेरीज

१४ हवेली
१४ येनापूर
७ येकसबे
५॥ कुभोज
११ सिरवल
११ नादरे
५ फूट देह

६७॥

येकून देह साडेसदसस्टी सुाा सन सबा मया अलफ सावित्री देसमुखीण पाा माार इने बदराहा वर्तोन नानाप्रकारे राजकारण करून विलायेतीचा सत्यानास केला यासाटी राा मानाजी बागूल याजकडून तीस नतीजा देविला फुडे विलायेतीचा अमल चालिला पाहिजे त्यास सभणा देसाई सावित्रीचा देर याचे बापे पहिले देसमुखी केली होती कामाचा मर्दाना येकनिष्ट रयेती राजी जाणौन देसमुखीचा मामला याचे स्वाधीन करून हे पत्र तुम्हास सादर केले असे तरी सभणा देसायाचे हुकुमाप्राा वतनदाराची मर्यादा राखून वर्तणूक करून दिवाणकाम चालऊन सावित्रीचा इनाम हकवर्तना जो चालिला असेल तो सभणा देसाई पाा माार यास देत जाणे जाणिजे राा छ १० जमा दिलाखर [नि*] पाा हुजूर

सु. ११०७ } जखर ११ }

१२१

श्री [नि*] सुबराज

{ श. १६२८ भाद्रपद शुद्ध १३ { इ. १७०६ सप्टेंबर ९

[पाठीवर ले. ११९ प्रमाणें शि. व मो.*]

राजश्री संभाजी नरसोजी सिंदे देसाई पा रायेबाग गोसावी यांसि

दं अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य [मो. जा.*] श्री हिदूराऊ घोरपडे ममलकतमदार सुहूर सन सबा मया अलफ तुम्ही मा हरि साबाजी यास पाठविलें आपली कितेक येकनिष्टता सागोन पाठविली होती त्यास तुम्ही पेसजी निष्टेने सेवा केली व पुढेही करीत आहा याकरिता तुम्हावरी कृपाळू होऊन देशमुखीचे वतन सिदराम भिकाजी व सावित्री करीत होती त्यास सावित्री बायेको बेढंगपणे वर्तते रयेत गैररजावंद जाणोन देशमुखीचे वतन तुमचे स्वाधीन करून सनदापत्रा करून देऊन हरि साबाजीस पाठविले असे तेण्हेप्रमाणे वतन अनभवणें हरकीचा ऐवज निर्वाह करून पाठवणे येक-निष्टेने वर्तणूक करावयास अंतर न करिता राहाटी करीत जाणे तुमचे चालवावयाविशी आंतर होणार नाही तुम्हास देसमुखी स्वाधीन केली याची वस्रें

पासोडी १ कोचकी १

ऐसे दोनी सनगे पाठविली आहेत घेणे जाणिजे रा छ ११ जमादिलाखर [नि*] पा। हुजूर

सु. ११०८ } रखर २० }

१२२

श्री

{ श. १६२९ आषाढ वद्य ७ { इ. १७०७ जुलै १०

[आरंभी लं. व. शि.*] श्रीअंबाच । रण श्रीनीवास । माधवराव । शरण

राजश्री नरसिंगराऊ सिंदे सेनासहश्री गोसावी यासि

दं अखडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये [मो. जा.*] श्री श्रीनिवास माधवराऊ असीर्वाद सुा समान मया अलफ तुम्ही हुजूर उमेदवार होतेस कामाचे मर्दाने स्वामि-कार्यावरी येकनिष्ट तरवारेचे पाहून तुम्हस लस्करची हंजारीचा कार्येभाग सांगितले असे तरी इमानेइतबारे राहून लस्करचा जमाव वागऊन स्वामिसेवा करीत जाणे तुम्हास वेतन दो चाकर सालीना होन पादशाही

खासा जातीस होन पा। ६००

चाकरास होन पादशाही
२०८ भोई १० (१२ ?)
६० दिवटे २
२४ अडेकरी १
२४ नेजदार १
३६ अफ्तागिऱ्या १
४८ चाकर २
———
४००

योगा हजार होन करार केले असत झा पौ पासून वजावटाऊ दंडकप्रमाणे वजा करून उरल वेतन शिरस्तेप्रा घेत जाणे मोईनप्रा चाकर ठेवाल त्या दिवसापासून चाकराचा हक पावेल हजारीचे भरतीस जमाव ठेवाल त्याचा अलाहिदा सरंजाम करून घेणे त्याप्रा त्यास पावेल तुम्हास जमान [मो. जा.*] हुजूर घेतले असे जाणिजे छ २० रबिलाखर [नि*] पा हुजूर [वा. वा. मो.*] विलस । ती लेख । नावधि

बार सूद

सु. ११०८ रमजान २	१२३ श्री [नि *] मुब्राज	इ. १६२९ मार्गशीर्ष शुद्ध ३ इ. १७०७ नोव्हेंबर १६

[पाठीवर ले. ११९ प्रमाणें शि. व. मो.*]

राजश्री संभाजी नरसोजी सिंदे देसाइ पा रायेबाग गोसावी यासि

दं अखडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्वो हिंदूराऊ घोरपडे ममलकतमदार सुहूर सन समान मया अलफ तुम्ही हुजूर येऊन विनंती केली की पा मजकूरचे वतन देशमुखी वडीलपण सिका आपला [अस] ता भिकाजी नरसोजी आपले आप्त पुरुष बलावोन आटोप केला त्यास साहेबी आपली स्थापना करून देशमुखीचे वतन आपले दुमाला केले त्यास साप्रत सिदराम भिकाजी देसाई याणी उत्पात करून वतनास खल-खल केली त्यास आपण कोण्हाचा गुमान न धरिता स्थल रक्षून होतो साप्रत साहेबी आपणावरी पूर्ण दया करून वतनदारीस हाती धरिले पाहिजे म्हणून विनंती केली त्यावरून मनास आणून पा मजकूरची देशमुखीचे वतन पेशजी तुमचे दुमाला करून सनदा सादर केल्या तेणेप्रा हली करार केले असे तरी सुखरूप वतन अनभऊन आपले उर्जित करून घेण दिवाण रुजुवातीने राहात जाणे वतनाचे बाबे शक न धरणे इनाम हक सालाबाद मोईन प्रा आनभवणे जाणिजे छ २ [रमजान]

सु. ११०८ जिल्हेज ११	१२४ श्री [नि *] मुब्राज	श. १६२९ फाल्गून शुद्ध १४ इ. १७०८ फेब्रुवारी २३

[पाठीवर ले. ११९ प्रमाणें शि. व मो.*]

राजश्री सभाजी देसाइ पा रायेबाग गोसावी यासि

दं अखंडितलक्ष्मीअलकृत राजमान्य [मो. जा.*] श्वो हिदूराऊ घोरपडे ममलकतमदार सुा सन समान मया अलफ तुम्ही येकनिष्टा धरून शर्तमर्दी करून

निरन्हा केला आकोजीस मारून चालविले लोक ठार केले जखमी होऊन लस्कर कूच पैलाड गेला म्हणून रा। रायाजी लिगोजी याचे लिहिल्यावरून तुमचा मुजरा जाला पुढेही येकनिष्टपणे वर्तणूक करणे मा।निले सागतील त्याप्रा। राहा‍टी करीत जाणे म्हणजे तुमचा सर्व प्रकारे अभिमान आहे चालवायास अंतर पडणार नाही समाधान असो देणे आम्हीही लौकरीच येतो जे गोष्टीने जागा जतन राहे ते करणे दगा न खाणे जाणिजे रा। छ ११ ज़िल्हेज

रा. श ३५, सर्वधारी ज्येष्ठ वद्य २ भौम

१२१

श्री रामो जयति

श. १६३० ज्येष्ठ वद्य २
इ. १७०८ मे २५

[आरंभीं प. बा. सं. शि. *] श्री। वर्धिष्णुर्विक्रमै। विष्णोः सा मूर्तिरिव। वामनी शंभुसूनो। रसौ मुद्रा शिवरा। जस्य राजते [आणि चौथ्या व पाचव्या ओळींच्या डाव्या अंगास लं. बा. शि. *] + ~ श्री ० +। शिवनरपति ह। र्पनीधान मोरेश्वर। सुत भैरव मुख्य। + प्रधान +

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक ३५ सर्वधारी संवत्सरे जेष्ट बहूल द्वितीया भोमवासरे क्षत्रियकुलावतस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामी यांणी मा। संबाजी नरसोजी सिंदे देशमूख पा। रायेबाग यासि दिल्हे अभयपत्र ऐसे जे तुम्ही खडकलाटेचे मुकामी येऊन स्वामीचे दर्शन घेतले आपला अर्थ विदीत केला की आपण पहिलेपासून या राज्यात येकनिष्ठेने वतनावारी सेवा करून आहो आपले बापभाऊ सिदराम भिकाजी आहेत याचे आपले हर येक वतन देसमुखी पा। मा।रची व कसबे एकसंबे येथील पाटिलकी हे येक पूर्वापार त्याचे वडील व आपले वडील हर दू वतने अनभवितातीं काही दिवस त्याणी देसमुखीचे वतन चालविले काही दिवस आपण पाटिलकीचे वतन चालविले ऐसेच परंपरागत चलत आले आहे आपण हाली देसमुखीचे वतन चालवीत आहो स्वामीचे पायासी येकनिष्ठेने वर्तणूक करितो ऐसियास पेस्तर सिदराम भिकाजी कथला न करी ऐसे अभय देऊन चालविले पाहिजे म्हणोन विनती केली आणि दिवाणचे ठाणे येकसबियात घेतले त्यावरून तुझी येकनिष्टा स्वामीस कलोन स्वामी तुजवरी कृपाळू होऊन देसमुखीचे वतन तुझे तुज करार करून हे अभयपत्र सादर केले असे तरी वतन अनभऊन स्वामीचे पायासी रुजुवात धरून सुखरूप असणे तुझा बापभाऊ सिदराम याण्हे कथला करावयास गरज नाही कथला केलिया स्वामी पारपत्य करितील तू वतन देसमुखीचे चालऊन सुखरूप असणे वतनास हकलाजिमा इनाम चालिला असेल तण्हेप्रा। करार केला असे अनभवीत जाणे अभय असे [नि*] निदेश समक्ष [ष*] मर्या। देयं रा। जते

सुरू सूद

रा. श. ३५ विरोधी वैशाख वद्य ९ मंद	१२६ श्री	श. १६३१ वैशाख वद्य ८ इ. १७०९ मे २१

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३५ विरोधी सवत्सरे वैशाख बहूल नवमी मदवासरे क्षत्रियेकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी याणीं समस्तराजेकार्येधुरधर विस्वासनिधि राजमान्य राजेश्री उधो श्रीपती यासी आज्ञा केली ऐसी जे तुम्ही विनतीपत्र पाठविले ते प्रविष्ट जालें सबणा देसाई येकसंबेकर यास किले पावनगडावरी ठेविला आहे तरी स्वामीनी त्याजवरी कृपाळू होऊन त्याचे जीवनमाफीक त्याचे माथां बेरीज ठेऊन मुक्त केले पाहिजे म्हणून लिहिलें त्यावरुन त्यास रुपये २००० दोन हजार करार करून किले पनालियास रु॥ १५०० पधरासें व पावनगडास रुपये ५०० पांचसें नेमून देऊन सबणाची मुक्तता केली असे तरी तुम्ही सदरहू दोन हजार रुपयाचा निर्वाह करून घेऊन त्यास सोडून देणें जाणिजे बहूत लिहिणे तरी सुज्ञ असा [ष*] मर्या । देयं रा । जते

बार

रा. श. ३५, विरोधी वैशाख वद्य ९ शनि	१२७ श्री	श १६३१ वैशाख वद्य ८ इ. १७०९ मे २१

[ले. १२५ प्रमाणें आरंभीं शाहूचा शि.; ४ ते ६ ओळींच्या डाव्या अंगास भैरव मोरेश्वराचा शि. व पुढें ष. शि.*]०~ । श्री शंकर श्री । शाहू छत्रपती । कृपानिधी प्रल्हा । दसुत गदाधर । प्रतिनिधी

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३५ विरोधी सवत्सरे वैशाख बहूल नवमी मदवासरे क्षत्रियेकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी याणीं सबणा देसाई पा॥ रायेबाग यासी दिल्हे अभयेपत्र ऐसे जे तुजपासून कितेक अंतर पडिलें याकरितां तुज अदबखाना ठेविले होतें ऐशास राजश्री हमीरराऊ जाध[व*] याणी तुजविसीं स्वामीसनिध विनती केली त्यावरून स्वामी तुजवरी कृपाळू होऊन तुझी मुक्तता केली असे तरी तू आपले वतनावरी राहोन येकनिष्टपणे वर्तणूक करणे स्वामी तुझे चालवावयास अतर करणार नाही अभये असे जाणिजे तुझे माथा खड ठेविला अहे त्याचा अलाहिदा कौल असे त्याप्रमाणें देने सुखें असणे लेखनालंकार [ष*] मर्या । देयं रा । जते

रुजू सुरु सूद बार

} १२८ { श. १६३१ वैशाख वद्य ९
} श्री { इ. १७०९ मे २१ सुमार

[ले. १२५ प्रमाणें छ. शाहूचा शि. व मो.*] राजश्री पिराजी घाटगे गोसावी यासि

ई अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य [मो. जा.*] प्रति राजश्री राजा शाहू छत्रपति उपरी संबणा देसाई येकसंबेकर याचे विसी तुम्ही राजश्री हमीरराव जाधव यास लिहिले होते त्यावरून त्याणी हुजूर विनती केली येशास स्वामीनी त्यास खंड रुपये २००० दोन हजार करार करून त्याची मुक्तता केली आहे तरी तुम्हीही त्याची हर येकविसी साह्यता करण जाणिजे [नि*] बहुत काये लिहिणे

रुजू सूद बार

सु. ११०९ रवल २४ } १२९ { श. १६३१ वैशाख वद्य १०
[अखेर*] } श्री { इ. १७०९ मे २३

[पहिल्या तीन ओळींच्या डाव्या अंगास द्वादशदलान्त वर्तुळांत*]

~ + ० । भास्वद्रम्यकरा । भास्वद्पादयोरिव । मुद्रिका : दाक्षायणि । प्रेमराज द्राजभानोर्विराज्यते [द्वादशदलांतः *] श्री परदेवता सावरणा पातु

ई मा। आनाम सबणा देसमूख प्रा रायेबाग प्र [ति]

राजेश्री रायेभानजी राजे सुा तिसा मयां आलफ तुमचे विशई रा माहादजी विठल यानि लिहिले त्यावरून राजश्री स्वामीस विनती करून निर्वाव्हा केला असे वडिलाच्या वतनाचे कागदपत्र करून देविले आसती याउपरी मुरलीतपणे वर्तनूक करणे यामधेच बरे आहे फिरून मागती हरामजादगीचे ढंग केलिया येकदर मुलाहिजा होणार नाही पूर्वी आम्हस कतबा लेहून दिल्हा होता त्याचा हा कालपावतो निर्गम केला नाही तरी हे रीत काही बरी नव्हे हली पीर महमद पाठविला आसे कतबियाप्रमाणे निर्वाव्हा करून पाठवणे पीर महमद यास बदल मुशाहिरा रुो ८॥ साडेआठ देविले असती आदा करून पावलियाचे कबज घेणे जाणिजे छ २४ [नि*] माहे रबिलावल [अष्टदलांत वर्तुळांत*]
~ ० । मुद्रा रुद्रा । णीव विरा । ज्यते

बार

सु. ११०९ रवल २४ [अखेर *] — १३० श्री — श. १६३१ वैशाख वद्य १० इ. १७०९ मे २३

[ले. १२९ प्रमाणे शि. व मो. *]

राजेश्री खंडोजी खराडे हवालदार किले पावनगड गोसावी यासि

दं अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये [मो. जा.*] श्री रायेभानजी राजे सुा तिसा मया आलफ पत्र पाठविले पावोन लिहिले वर्तमान कळं आले सबणाचे विशई लिहिले त्यावरून राजश्री [मो. जा *] स्वामीस विनती करून त्याचा तहा केला आहे यैवज दोही किल्यास देविला असे येविशई रा॥ [मो. जा.*] चे अज्ञापत्र पाठविले आहे तेणेप्रमाणे निर्वाव्हा करून घेऊन वरकड सरजामाची ताकीदपत्रे पूर्वीच पाठविली आसती लोकाचा दिलासा करून किला सरकारचा मजबुदीने राखणे यामधे तुमचा मुजुरा असे वरकड वर्तमान रा॥ [मो. जा.*] च्या पत्रावरून कळू येईल [नि*] विशेष काय लिहिणे छ २४ रावल

सु. १११७ जखर १६ [अव्वल *] — १३१ श्री — श. १६३८ ज्येष्ठ वद्य २ इ. १७१६ मे २७

राजश्री संभाजी देसाई पा॥ रायेबाग गोासि

दं अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य [मो. जा.*] श्री हिंदूराऊ घोरपडे ममलकतमदार सुा सन सबा असर मया अलफ तुम्हीं पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लिहिले वर्तमान विदीत जाले आज्ञेवरून येत होतो इतकियात लस्कर पुढे गेले हे कलोन रांहिलो सावत्रीने सर्व प्रकारे पाठी घेतली बाहेर घातले मान अभिमान आपला आहे म्हणून लिहिले तरी बरे ते गोष्टीचे काये आहे सावित्रीस ताकिदी परभारी पाठऊन दिल्ही आहे आणि रा॥ सयाजी सावतासही लिहिले आहे त्या प्रांते राजश्री रामोजी भापकर यांस ठेविले आहे तुमचे विषीही त्यास सांगितले आहे तुम्ही त्याचे अनुमतें असणे ते उपद्रव लागो देणार नाहीत समाधान असो देणे जाणिजे रा॥ छ १६ माहे जमादिलाखर [नि*] पा॥ हुजूर

सु. ११२१ जिल्हेज १७ — १३२ श्री [नि*सुबराज] प्रां — श. १६४२ आश्विन वद्य ४ इ. १७२० आक्टोबर ९

[दोन व तीन ओळींच्या डाव्या अंगास हिंदूराव घोरपडे याचा चौरस शि.*]

दं मा॥ अनाम सभणा पाटील कसबा येकसबा पा॥ रायेबाग यासि हिंदूराव घोरपडे ममलकतमदार सुा इहिदे असरईन मया अलफ कसबा मजकूर इनाम राजश्री विरोजी

पतंगराऊ यासी पहिलेपासून आहे त्यास सांप्रत नागोजी सावतानी बलाऊन ठाणे घालून राहिले आहेत त्यास राज्यातून व कैलासवासी राजश्री राऊ यांपासून गांव पतंगराव यांस इनाम आहे त्यास नाही तो विक्षेप करून सावतांस बलावयास गरज काये याकरिता राजश्री तिमाजी विठल मुतालीक यांचे स्वाधीन कसबे मजकूर हा गाव केला असे तुम्हीं वतनदार आहा निष्टेस अंतर न करिता मारनिलेस अनुकूल होऊन ठाणे बसवणे तुम्हीं येकनिष्ठपणें मारनिलेच्या आज्ञेप्रा राहाटी करणे मारनिलेस आम्ही कुलमुखतयार या जिल्हेचा दिल्हा असे तुम्हास वचन देऊन आज्ञा करितील ते [आ]मची वचने समजोन निष्ठा धरून सांगतील तेणेप्रा राहट करून उर्जीत करून घेणे तुम्ही जैसी निष्ठा धराल तैसे उजित होईल लिहिलेप्रा अंतर न करणे जाणिजे छ १७ जिल्हेज [नि*] पाा हुजूर [चौ. मो.*] लेखन मर्यादा

मोहरम १८ | १३३ श्री | श. १७०९ इ. १७८७ सुमार

दी कसबे सदलगे प्रांत हुकेरी कृतानेक सिरसाष्टांग नमस्कार विज्ञाप [ना*] येथील क्षम तागायेत छ १८ माहे मोहरमपावेतो मोकाम पुणे येथें जमावासुधा सुखरूप असो विशेष बहूत दिवस आपणाकडील वर्तमान कलत नाही याजकरिता चितास समाधान होत नाही तरी सदैव येणारासमागमे पत्र पाठऊन आपत्याचा परामृशे घेत जावे यानंतर इकडील राजकी वर्तमान तरी राजेश्री भास्कर नागनाथ देशपांडे जमखंडीकर व आखोलकर व महमदापूरकर येकत्र मिळून पंधरा हजार स्वार व गाडदी पांच हजार व प्यादे कानडे रगडे जमिनीचे च्यारी हजार व इटेकरी पाचसेहे येसे मिळून टिपू सुलतान याजकडे मोहीम होणार नालबंदी येकंदेप्रमाणे लोकास दिली गुदस्ता समजाविसीचा येवज पोत्यास देविला दिपवाली होताच कर्णाटक प्रांती निघतात त्यासी तुम्ही आपले पागा पाचसेहे आहेत यासी राजेश्री माहादजी विठल समागमे सिरस्त...री करून द्यावी सिवाय कारकून पाचजण येणेप्रमाणे पागा सामानसुधा तयारीत आसणे मागाहून लिहून पाठवितो नालबंदीचा येवजही आणविले आहे होनोलीवरी वराता दिले आहेत राजश्री येमाजी सिवदेव चिटनीस वसूलस गेले आहेत महिनेत येवज येईल येताच राजश्री आपाजीपंत वकील याजबराबरी फुली होन पाठऊन देऊ रुपयेच नाल येथे नाही होनाची चाल आहेत रुपये हुकेरी चालत नाही सेकडा येक आणा पाडा पडतो फुलचेरी रुपये आगर होन फुली येतील शाहीसिरस्ताप्रमाणे नालबंदी पोंहचल खासगत घरचे [अपूर्ण*]

सावंतवाडी–सावंत–पुरवणी

पौ सु. [११*] ७९ जखर २३	१३४ श्री [नि*] व्यंकटेश	श. १७०० आषाढ वद ९ इ. १७७८ जुलै १८

पौ छ २३ जाखर तिसा सबैन

राजश्री खेम सावंत भोंसले सरदेसाई पां कुडाल व माहाय गोसावी यांसि

दं सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये [मो. जा*] स्नो व्यंकटराव नारायेण आसिर्वाद विनंती येथील कुशल जाणौन स्वकीय कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष आपणांकडून बहूत दिवस पत्र येऊन परामृष होत नाही तेणेंकरून चित उदास आहे तरी ऐसें न करितां निरतर पत्रीं स्नेहाभिवृधी करीत असांवे यानंतर कितूरकर देसाई याणें जमाव मिलऊन राजश्री पंतप्रधान यांच्या मुलकात ठाणी घालीत चालिला आहे शापूर प्रांती अमल बसविला पुढां आजरे प्रांतास उपसर्ग करावयाचें मानस आहे म्हणौन यैकितो कदाचित त्याणे उपसर्ग आरंभिल्यास आजरेकर मामलेदार आपणास जमावाविसीं लिहितील त्याप्रा आपण मनावर घेऊन जमाव पाठवून आजरे प्रातांचा बच्याव होये ते करावे [नि*] बहूत ‹ काय लि › काय लिहिणे [नि*] लाभ करावा हे विनती

सु. [११*] ७९ शाबान १६	१३५ श्री	श. १७०० भाद्रपद वद २ इ. १७७८ सप्टेंबर ८

राजश्री खेम सावंत भोसले सरदेसाई प्रां कुडाल व माहालानिहाये गोसांवी यासि

दं अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य [मो. जा.*] श्नो सखाराम भगवंत आसीर्वाद विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन करीत असिलें पाहिजे विशेष तुम्ही पत्र पाठविलें तें प्रविष्ट जालें हैदरखानानी या प्रांती दंगा माडला आहे त्याचे पारपत्यास फौजा लवकर याव्या येविसीचा मार विस्तारे लिहिला तों कलला ऐसियास त्या प्रांती फौजा रा व्हावयाची तर्तूद होत आहे लौकरच फौजा रवाना होतील तुम्हीही आपले जमावसुधां तयार असावें लाकडी खडावाचे जोड तीन व छत्री येक व गंजिफा पाठविल्या त्या लिहिल्याप्रों पावल्या रा छ १६ शाबान बहूत काय लिहिणें लोभ असो दीजे [नि*] हे विनंती

पौ छ १० रमजान तिसा सबैन

सु. ११८० ज़खर ९ } १३६ श्री { श. १७०१ आषाढ शुद्ध ११ इ. १७७९ जून २४

[ले. ६४ प्रमाणे पाठीवर शि. व. मो. *]

राजश्री खेम सावत भोसले सरदेसाई प्रां कुडाल वगैरे मोहाये गोसावी यासि

दं अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य [मो. जा. *] स्नो माधवराव नारायण प्रधान आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणे विशेष प्रां चंदगडे वगैरे येथे कितूरकर देसाई व हैदरखान याचा दंगा होऊन सरकारची ठाणी व किले व मुलूक गेला सबब ते प्रांतीचा बंदोबस्त करावयाची सरकारातून आज्ञा राजश्री मोरो विश्वनाथ यास करून याचे निाने रा बचाजी जिवाजी जमावसुधा रवाना केले असेत ऐशियास तुम्हीही जमावसुधा यास सामील होऊन कितूरकर व हैदरखान याणी सरकारचा मुलूक घेतला आहे तो सोडवणें व जाजती सुपें व उडवें व सोधें वगैरे प्रांतात उपद्रव करून मुलूक काबीज करून सरकारचे काम होये ते करणे तुम्हाकडून पहिल्यापासून सरकारकामे होत आली व ते प्रांतीची सर्व माहितगारी तुम्हांस आहे ज्यात सरकारकाम येथास्थित तें करालच करणे [नि*] जाणिजे छ ९ जमादिलाखर सुा समानीन मया व अलफ [नि *] बहुत काय लिहिणे

पौ छ २ जिल्हेज सन समानैन मया आलफ

सु. [११ *] ८६ रखर ६ सोमवार } १३७ श्री { श. १७०७ माघ शुद्ध ८ इ. १७८६ फेब्रुवारी ६

राजश्री कासीपंत मो बेलगाव गोसावीं यांसि

दं अखंडितलक्ष्मीआलकृत राजमान्य [मो. जा. *] स्नो राजे खेम सावंत भोसले बहादर सरदेसाई पा कुडाल व माहालानिहाये राम राम विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन केलें पों विशेष तुम्ही छ २ राखरचें पत्र व छ ३ राखरचे पत्र पों ती पत्रें पावोन लिा मजकूर सविस्तर कलला अजम टिपू सुलतान खांन नवाब याचे फौजेचे सडेकडील व कितुराकडील वर्तमान लिहिलें निवेदन जाहालें प्रसंगी यवनाचे फौजे खाली कोकणांत चल दिल्यास तिकडून साहित्याविसी कमती पडणार नाही म्हणोन यविसी लिोंत उतम आहे तूर्त यवनाची फौज सडेस आहे पहिल्यापेक्षां फौज हलका आहे गलीम सहतसीर आण सडा या संस्थानचे सरादीचे मस्तकावर तेव्हा अशास इकडून घाटाचा वगैरे बदोबस्त करणे तो केलाच आहे येवनानी प्रबलता न व्हावें तिकडून फौजा येऊन येवनास तंबी पोहचलेस येवनानी

फौज शहर होणार नाही या अर्थ लिहितो केवल इकडीलच साहित्याविसी लिहितो असा अर्थ नाही येवनाने बल धरून फैलाव केल्यास उभयें पक्षी उपयोगी नाही हे ध्यानी आणोन जे कर्तव्य ते करावें कितुराकडील व गैर बातमी येथास्थित आणोन लिहीत असावी रा छ ६ राखर सीत समानैन सोमवार दोन प्रहर

सु ११८६ रखर १०	१३८ श्री	श. १७०७ माघ शुद्ध १२ इ. १७८६ फेब्रुवारी १०

[ले. ६४ प्रमाणे पाठीवर शि. व मो. *]

राजश्री खेम सावत भोसले सरदेसाई प्रांा कुडाल व माहालानिहाये गो यांसि

दं अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य [मो. जा.*] श्रो माधवराव नारायण प्रधान आशीर्वाद उपरी येथील कुशल जाणोंन स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष साल मजकुरी फतेअलीखांन यांजवर मोहीम करणें जरूर यास्तव शाहापूर बेलगांवचे रोखे सरकारच्या फौजा रा जाल्याच आहेत खानाची फौज त्या जिल्हेस येऊन सडयाचा ताल्लुका दाबिला सबब त्या तरफेस राजश्री जिवाजी गोपाल यांची रवानगी सरंजामसुधां केली आहे तरी तुम्हीं व मारनिले व फिरंगी गोवेकर अैसे येक विचारे होऊन तिकडील घाटबदीचा बदोबस्त राखोन खानाचा ताल्लुका काबीज करणे [नि*] जाणिजे छ १० रबिलाखर सुा सीत समानीन मया व अलफ [नि*] बहूत काय लिहिणे

पौ छ २४ जालौवल सन सीत समानैन

सु [११*] ८६ फाल्गुन शुद्ध २	१३९ श्री	श. १७०७ फाल्गुन शुद्ध २ इ. १७८६ मार्च २.

चिरजीव विजईभव राजेश्री राजे खेम सावत भोसले बहादर सरदेसाई प्रा कुडाल माहलानिहाये यांसि प्रति सखूबाई सिंदे आनेक आसीरवाद उपर येथील कुशल तो फाल्गून सुद्ध २ परियेत येथास्थित जाणोन स्वकीये कुशल लेखन करीत गेले पाहिजे विशेष तुम्ही पत्र छ १० रारचे पाठविले त्यात मजकूर की येवनाची फौज सडा हस्तगत करून तेथील बदाबस्तास हजारबारासे लोक ठेऊन बम फौज खानापूर कितूर येथे गेल्या येवनाचे फौजच व श्रीमंत राजश्री पतप्रधान याच्या फौजा राजश्री तुकोजी होंलकर वगैर बदामीचे राणात सिरोन त्याचे याचे तोड लागले यसे वर्तमान आंहे म्हणोन

लिहिले ते सर्व कलले यैसी यांसि इकडून श्रीमंताच्या फौजा होलकर व गेर जाऊन पोहचल्या व कोल्हापूर प्रांतातही फौजा पाठऊन बदोबस्त करावा म्हणौन सरकार आज्ञेवरून होळकर कोलापूर प्रांती आले म्हणोन लस्करचे वर्तमान पिराजी जासूद आला त्याने सांगितले येथूनही सांडणीस्वार बरोबर होलकर व राजश्री गणेशपंत बहेरे व राजश्री परशरामपंत भाऊस पत्र लेहून तैसच आपणाकडेस पत्रे रवाना केले आहेत ते येऊन पोहचोन वर्तमान कलले आपण आपल्या बहूत बदोबस्ती राखून आसावे लस्करात तावडतोब पत्रे राजश्री बालाजोपंतनानास व हरिपंततात्यासी पाठविली आहेत कोल्हापूरकरासही पत्रे [नि *] श्रीमंताची सत्वरच येऊन पोहचतील कलावे बहूत काय लिहिणे लाभ असो दीजे हे आसीरवाद

पौ छ १३ जौ॰ऱ्ल सीत समानैन

पौ सु. [११*] ८६
जखर २

१४०
श्री

श. १७०८ चैत्र शुद्ध ४
इ. १७८६ एप्रिल २

पौ छ २ जमाखर सीत समानैन

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ययाविराजीत राजश्री राजे खेम सावत भोसुले बहादर सरदेसाई प्रगेणे कुडाल व म्हालानिहायनी गोसावी यांसि

दं श्री निलकठगौडा सरदेसाई प्रां खानापूर राम राम विनंती येथील कुशल जाणून स्वकीये स्वानंदाभ्युदये लेखनाज्ञा लेखिका निरोपिली पाहिजे विशष आलीकडे आपणाकडून पत्रिका येऊन साभाल होत नाही ऐसे करणे आपले म्हणविल्या ठायी युक्त नव्हे सदैव पत्रा}न{नी साभाल केला पाहिजे तदुपरी इकडील वर्तमान म्हणावे तर श्रीमंताची फौज राजश्री बापोजी होलकर व राजश्री गणशपत भरे च्यालीस पनास हजार फौज व पचवीस हजार पेडार येणेप्रमाणे कितूर प्राती आली तमाम ठाणी घालितात कितूरचा गड घेतला किला मात्र घेतला नाही तोही घेतील अमित्रची फैज मुगदाच्या तलावर होती तथ पेढार याणे जाऊन मारामार करून च्यार पाचसहे घोडे व बैल व हती पाडाव करून घेऊन येता किले धारवाड यथील उपराला येऊन मारामारी जाहाली अमित्राकडील से दोनसेह खराब जाहाले व दोग सरदार मातबर ठार जाहालेमुले दहशत खाऊन सर्व जमाव व तोफखानासुधा मिश्रीकोटेवर गेले फुडे जातच आहे हेही कितूर घेऊन धारवाडास येका दो राजात जाणार ऐसे वर्तमान आहे आमंची ठाणी सडा जाबोटी आपले कृपेकरून आम्हास हस्तगत जाहाली चिरंजीव जमावसुधा जाबोटीस आहेत आम्हीही आज उद्या जायास जाणार देवधर्म स्थलसुधी व्हावी याजकरितां जाणार हे सविस्तर वर्तमान आपणास श्रुतं व्हावे याजकरिता लिहिले आहे यानतर हेवालकर

देसाई याजविसी विनती चिरंजीवाने आपणास केलीच आहे ते पुरातन आपले पदरचे अशास त्याकडून अतर पडलेकरिता त्यावर इतराजी हे प्रमाणच परत ते जमेदार त्याचे वतनबाब त्यास चालऊन त्यास हाती धरून सेवा घेऊन उर्जित करावे हे समर्थास योग्यच आहे आम्हासही त्याणी बहुताप्रकारे सागितलेवरून राजश्री बालाजी रघुनाथ यासी बोलिला आहे ते विनंती करितील ते चिती आणून कौल सादर करावा आम्हीही त्यास वचन दिले आहे की तुम्ही रयतीस दिलभरी देऊन लावणी संचणी करा ऐसे वचन दिले आहे आमच्या वचनाचा अभिमान साहेबी धरून कौलपत्र पाठविले पाहिजे आम्हीही भेटीस येणार होतो त्यास देवपण नीट करावयास पाहिजे करिता जावयास गेलो पधर दिवसी भेटीस यावयास येतो कलावेयाकरिता लिा आहे [नि*] बहूत काय लिहिणे कृपा अखडीत असो दिली पाहिजे [बालबोधींत नि*] हे वीनंती

सु. ११८६ रजब ११ } १४१ श्री { श. १७०८ वैशाख शुद्ध १२ इ. १७८६ मे १०

[ले. ६४ प्रमाणें पाठीवर शि.; शेवटीं व जोडावर मो. *]

राजश्री खेम सांवत भोंसले सरदेसाई प्रां कुडाल व माहालानिहाय गोसावी यांसि

ई अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य [मो. जा. *] श्री माधवराव नारायेण प्रधान आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणोंन स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे विशेष राजश्री जिवाजी गोपाळ यास टिपूचे फौजेवर जमावसुधा कोकणांतून रा। केले आहेत त्यास तुम्ही आपलेकडील जमाव घेंऊन मारनिले व तुम्हीं येक होऊन राजश्री तुकोजी होलकर व गणेश विश्वनाथ बेहरे यांस सामील व्हावें येविसीं तुम्हांस पेशजी लेहून पाठविलें होतें त्याचें उतर आलें की करवीरवासी माहाराज फौजेसुधा वाडी प्रांतात आले येक दोन गांव मारले यांचा वेध दूर जाहाला म्हणजे जमावसुधा सरकारचाकरीस सिध्ध आहों म्हणून तुम्हीं लिहिलें त्याजवरून गणेश विश्वनाथ यास लेहून तिकडील शह दूर करविला जिवाजी गोपाल जमावसुधा गणेश विश्वनाथ याजकडे आले परंतु तुम्ही अद्यापे जमाव घेऊन मारनिलेकडे येत नाही हें ठीक नसे हाली सरकारचे हुजरे पाठविले असेत तरी विलंब न लाविता जमावसुधा निघोंन स्वारीत यावें जाणिजे [नि *] छ ११ रजब सुा सीत समानीन मया अलफ [नि*] बहूत काय लिहिणे

पौ छ २० रजेब सीत समानैन

सु. [११ *] ८६ } रजब २० }

१४१

श्री

{ श. १७०८ वैशाख वद्य ६ { इ. १७८६ मे १९

[ले. ८२ प्रमाणें पाठीवर शि. व मो. *]

पौ छ १० सवाल सन सबा समानैन

राजश्री राजे खेम सावंत भोसले बहादर गोसावी यांसि

॥ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य [मो. जा. *] श्रो माहादजी सिंदे राम राम विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन करीत जावे विशेष तुम्हीं पत्रें पाठविली ती पावली टिपूकडील फौज येऊन सडे घेतलें व कोल्हापूरवाले याची आमची लडाई जाहली त्यास येविसी पत्रे राजश्री बालाजीपंत नाना फडणीस यासी व कोल्हापूरवाले यासी येऊन कलह न वाढे ते जाहले पाहिजे म्हणौन लिा तें सविस्तर कललें ऐसियांसि टिपूचे फौजेने पेशकदमी केली यावरून सरकारच्या फौजा बेहरे व राजश्री तुकोजी बावा होलकर टिपूचे फौजेचे मुकाबल्यास रवाना जाहले आहेत त्यावरून टिपूचे फौज सरून धारवाडचे झाडीत गेली याउपरी ठाणी टिपूकडील फौजेने घेतली असतील ती सोडऊन टिपूचे पारपत्य होईल कोल्हापुराकडून तुम्हास उपसर्ग लागला आहे त्याजविसी पत्रे राजश्री बालाजीपंत नाना यासी व कोल्हापुरास पाठविली आहेत यावरून उपसर्ग लागणार नाही वर्तमान वरचेवर लेहून कळवावे [नि *] रा। २० रजब [नि *] बहूत काय लिहिणे लोभ कीजे [नि *] हे विनती

प्रस्तुत खंडांतील पत्रांचा कालानुक्रम

जाड खिळ्यांचा तपशील मूळ पत्रांत आहे. अकालयुक्त पत्रें मूळ मुद्रणांत कालयुक्त पत्रांच्या पुढें ज्या क्रमानें छापलीं त्याच क्रमानें येथें दिलीं आहेत. कांहीं पत्रांच्या कालांत सुधारणा केल्या आहेत.

११२	सु. १०१२	श. १५३३-३४	इ. १६११-१२
११३	सु. १०१४ जिल्हेज १७	श. १५३५ माघ वद्य ३	इ. १६१४ जानेवारी १८
११४	सु. १०१८ जवल ५	श. १५४० वैशाख शुद्ध ६	इ. १६१८ एप्रिल २०
१	सु. [१०२९*] ९ सवाल ९, श. १५५१ शुक्ल ज्येष्ठ शुद्ध ११ शुक्रवार	श. १५५१ ज्येष्ठ शुद्ध ११	इ. १६२९ मे २२
२	श १५९८ नल वैशाख शुद्ध ७ सोमवार	श. १५९८ वैशाख शुद्ध ७	इ. १६७६ एप्रिल १०
३	आ. जु. २७ सवाल २२	श. १६०५ आश्विन वद्य ९	इ. १६८३ आक्टोबर ४
१००	सवाल ७	श. १६०५	इ. १६८३ सुमार
१०२	सवाल ८	श. १६०७	इ. १६८५ सुमार
४	आ. जु. २९ जखर १०	श. १६०८ वैशाख वद्य ७	इ. १६८६ मे ४
५	आ. जु. ३० सवाल ९	श. १६०८ भाद्रपद शुद्ध ११	इ. १६८६ आगस्ट १९
६	सवाल ११ नंतर	श. १६०८ भाद्रपद शुद्ध १३	इ. १६८६ आगस्ट २१
७		श. १६०८ आश्विन शुद्ध ६	इ. १६८६ सप्टें. १३ पूर्वी
८		,,	,, नंतर
१०७		श. १६१०-११	इ. १६८९ पूर्वी
९	फ. १०९८ रवल २१	श. १६१० पौष वद्य ८	इ. १६८९ जानेवारी ४
१०	फ. [१०*]९९ सवाल २७	श. १६११ श्रावण वद्य १४	इ. १६८९ आगस्ट ४
११	फ. ११०० सफर ६	श. १६१२ कार्तिक शुद्ध ७	इ. १६९० आक्टोबर २९
१२	फ. ११०० सफर १२	श. १६१२ कार्तिक शुद्ध १३	इ. १६९० नोव्हेंबर ४
१३	फ. ११०० रवल ७	श. १६१२ मार्गशीर्ष शुद्ध ८	इ. १६९० नोव्हेंबर २९
१४	फ ११०० रवल ९	श. १६१२ मार्गशीर्ष शुद्ध १०	इ १६९० डिसेंबर १
१५	फ. ११०० रवल १४	श. १६१२ मार्गशीर्ष वद्य १	इ. १६९० डिसेंबर ६
१६	फ. ११०० रवल १९	श. १६१२ मार्गशीर्ष वद्य ६	इ. १६९० डिसेंबर ११
१७	फ ११०० रवल २१	श. १६१२ मार्गशीर्ष वद्य ८	इ. १६९० डिसेंबर १३
१८	फ. ११०० रवल २२	श. १६१२ मार्गशीर्ष वद्य ९	इ. १६९० डिसेंबर १४
१०५			
१०६		श. १६१२	इ. १६९० सुमार
१०८			
१०९			
१९	फ ११०० रखर १७	श. १६१२ पौष वद्य ४	इ. १६९१ जानेवारी ८

२०	सु. १०९१ रजब ४	श. १६१३ चैत्र शुद्ध ६	इ. १६९१ मार्च २५
२१	श. १६१३ कार्तिक वद्य ७ सोमवार; सु. १०९२ सफर २१	श. १६१३ कार्तिक वद्य ७	इ. १६९१ नोव्हेंबर २
२२	श. १६१४ अंगिरा कार्तिक वद्य १० बुधवार; सु. १०९३ रबल ०४	श. १६१४ कार्तिक वद्य १०	इ. १६९२ नोव्हेंबर २३
२३	श. १६१४ अंगिरा कार्तिक वद्य १३ शुक्रवार	श. १६१४ कार्तिक वद्य १२	इ. १६९२ नोव्हेंबर २५
११६	फ. ११०४ आ. जु. ३९ रमजान १	श. १६१७ वैशाख शुद्ध २	इ. १६९५ एप्रिल ५
११५			
२४	सु. १०९५ रमजान २५	श. १६१७ वैशाख वद्य १२	इ. १६९५ एप्रिल ३०
२५	श. १६२० बहुधान्य चैत्र शुद्ध ५ सोमवार; सु. १०९८ रमजान	श. १६२० चैत्र शुद्ध ६	इ. १६९८ मार्च ७
११७	सु. ११०३ शाबान ६	श. १६२४ पौष शुद्ध ८	इ. १७०२ डिसेंबर १५
११८	सु. ११०६ सफर २९	श. १६२७ आषाढ शुद्ध १	इ. १७०५ जून ११
११९	व्यय भाद्रपद शुद्ध १० इंदु; सु. ११०७ जखर ९	श. १६२८ भाद्रपद शुद्ध १०	इ. १७०६ सप्टेंबर ६
१२०	सु. ११०७ जखर १०	श. १६२८ भाद्रपद शुद्ध १२	इ. १७०६ सप्टेंबर ८
१२१	सु. ११०७ जखर ११	श. १६२८ भाद्रपद शुद्ध १३	इ. १७०६ सप्टेंबर ९
१२२	सु. ११०८ रबर २०	श. १६२९ आषाढ वद्य ७	इ. १७०७ जुलै १०
१२३	सु. ११०८ रमजान २	श. १६२९ मार्गशीर्ष शुद्ध २	इ. १७०७ नवंबर १६
१२४	सु. ११०८ जिल्हेज ११	श. १६२९ फाल्गुन शुद्ध १४	इ. १७०८ फेब्रुवारी २३
१२५	रा. श. ३५, सर्वधारी ज्येष्ठ वद्य २ भौम	श. १६३० ज्येष्ठ वद्य २	इ. १७०८ मे २५
१०३	जिलकाद २१	श. १६३०	इ. १७०८ सुमार
११०			
१०४		श. १६३१	इ. १७०९ पूर्वी
१२६	रा. श. ३५ विरोधी वैशाख वद्य ९ मंद	श. १६३१ वैशाख वद्य ८	इ. १७०९ मे २१
१२७	„	„	„
१२८		„	„ सुमार
१२९ व १३०	सु. ११०९ रबल २४	श. १६३१ वैशाख वद्य १०	इ. १७०९ मे २३
२६	सु. ११११ जिल्हेज १९	श. १६३३ पौष शुद्ध १३	इ. १७१२ जानेवारी १०
१३१	सु. १११७ जाबर १६	श. १६३८ ज्येष्ठ वद्य २	इ. १७१६ मे २७
१३२	सु. ११२१ जिल्हेज १७	श. १६४२ आश्विन वद्य ४	इ. १७२० आक्टोबर ९

२७	सु. ११३९ रमजान १०	श. १६६० मार्गशीर्ष शुद्ध १२	इ. १७३८ डिसेंबर १९
२८	जिल्काद २९; पौ इ. १७४० मार्च २	श. १६६१ फाल्गुन शुद्ध १	इ. १७४० फेब्रुवारी १७
२९		श. १६६२ चैत्र शुद्ध १	इ. १७४० मार्च १७
३०			
३२		श. १६६३ भाद्रपद शुद्ध १	इ. १७४१ आगस्ट ३१
३१	सु. ११४७ जखर १७	श. १६६८ आषाढ वद्य ५	इ. १७४६ जून २६
३३			
३४	इ. १७६०; शाबान २९	श. १६८२ वैशाख शुद्ध १	इ. १७६० एप्रिल १६
३५	सु. ११६२ जवल २६; इ. १७६१ डिसेंबर २४	श. १६८३ मार्गशीर्ष वद्य १३	इ. १७६१ डिसेंबर २४
३६	सु. [११*] ६५ शाबान ७	श. १६८६ माघ शुद्ध ८	इ. १७६५ जानेवारी २९
१११	जवल १०	श. १६८८	इ. १७६६ सुमार
३७	सु ११६८ रमजान २	श. १६८९ माघ शुद्ध ४	इ. १७६८ जानेवारी २३
३८	इ. १७६८ आक्टोबर १०	श. १६९० भाद्रपद वद्य ३०	इ. १७६८ आक्टोबर १०
३९	सु. ११७० रमजान २९	श. १६९१ माघ शुद्ध १	इ. १७७० जानेवारी २७
४०		श. १६९४	इ. १७७२ सुमार
४१	सु. ११७३ जवल २८	श. १६९४ श्रावण वद्य ३०	इ. १७७२ आगस्ट २८
४२		श. १६९६	इ. १७७४
५२		श. १६९६	इ. १७७४ नंतर
४३	सु. ११७५ रमजान ६	श. १६९६ कार्तिक शुद्ध ८	इ. १७७४ नोव्हेंबर १९
४४	सवाल १; मार्गशीर्ष	श. १६९६ मार्गशीर्ष शुद्ध २	इ. १७७४ डिसेंबर ५
४५	सु. ११७५ जिल्काद १६	श. १६९६ पौष वद्य ३	इ. १७७५ जानेवारी १९
४६	सु ११७५ जिल्काद २०	श. १६९६ पौष वद्य ६	इ. १७७५ जानेवारी २३
४७	सु. ११७५ जिल्काद २१	श. १६९६ पौष वद्य ७	इ. १७७५ जानेवारी २४
४८	श. १६९७ मन्मथ ज्येष्ठ शुद्ध १५; इ. १७७५ जून १३	श. १६९७ ज्येष्ठ शुद्ध १५	इ. १७७५ जून १३
४९			
५०			
५१	सु. ११७७ जिल्काद ७	श. १६९८ मार्गशीर्ष शुद्ध ९	इ. १७७६ डिसेंबर १९
५३	सु. [११*] ७७, फाल्गून वद्य ७	श. १६९८ फाल्गुन वद्य ७	इ. १७७७ मार्च ३१
५४	सु. [११*] ७७ रवल ५	श. १६९९ चैत्र शुद्ध ७	इ. १७७७ एप्रिल १४
५५	सु. [११*] ७७ रवल २२	श. १६९९ चैत्र वद्य ९	इ. १७७७ मे १
५६	जिल्हेज १७	श. १६९९ पौष वद्य ५	इ. १७७८ जानेवारी १७
५७	चैत्र वद्य ४, रवल १७	श. १७०० चैत्र वद्य ५	इ. १७७८ एप्रिल १६
५८	पौ सु. [११*] ७९ जखर १९	श. १७०० आषाढ वद्य ५	इ. १७७८ जुलै १४
१३४	पौ सु. [११*] ७९ जखर २३	श. १७०० आषाढ वद्य ९	इ. १७७८ जुलै १८

५९ १३५	सु. [११*]७९ शाबान १६	श. १७०० भाद्रपद वद्य २	इ. १७७८ सप्टेंबर ८
६०	सु. [११*]७९ शाबान २१	श. १७०० भाद्रपद वद्य ८	इ. १७७८ सप्टेंबर १४
६१	सु. [११*]७९ शाबान २४	श. १७०० भाद्रपद वद्य १०	इ. १७७८ सप्टेंबर १६
६२	सु. [११*] ७९ सवाल ५	श. १७०० कार्तिक शुद्ध ६	इ. १७७८ आक्टोबर २६
६३	सु. [११*] ७९ जिल्काद १०	श. १७०० मार्गशीर्ष शुद्ध ११	इ. १७७८ नोव्हेंबर ३०
१३६	सु ११८० जखर ९	श. १७०१ आषाढ शुद्ध ११	इ. १७७९ जून २४
६४	सु. ११८० सवाल २१	श. १७०१ आश्विन वद्य ८	इ. १७७९ नोव्हेंबर १
६५		श. १७०१	इ. १७७९ नंतर
६६		श. १७०१	इ. १७७९ नंतर
६७	सु. [११*] ८१ रजब ४	श. १७०३ आषाढ शुद्ध ६	इ. १७८१ जून २७
६८			
६९	सु. ११८४ जिल्काद ७	श. १७०५ आश्विन शुद्ध ९	इ. १७८३ आक्टोबर ४
७०	सु. १८८५ शाबान	श. १७०६ आषाढ	इ. १७८४ जून–जुलै
७१	सु. [११*] ८६ शाबान १	श. १७०७ ज्येष्ठ शुद्ध २	इ. १७८५ जून ९
७२	सु. [१ *] ८६ जिल्हेज २९ गुरुवार	श. १७०७ कार्तिक शुद्ध १	इ. १७८५ नोव्हेंबर ३
७३	सु. ११८६ सफर २४	श. १७०७ मार्गशीर्ष वद्य १२	इ. १७८५ डिसेंबर २७
७४	सु. [११*] ८६ रवल	श. १७०७ पौष शुद्ध २	इ. १७८६ जानेवारी २
७५	सु ११८६ रवल १२	श. १७०७ पौष शुद्ध १४	इ १७८६ जानेवारी १३
१३७	सु. [११*] ८६; रखर ६ सोमवार	श. १७०७ माघ शुद्ध ८	इ. १७८६ फेब्रुवारी ६
१३८	सु. ११८६ रखर १०	श. १७०७ माघ शुद्ध १२	इ. १७८६ फेब्रुवारी १०
७६	सु [११*] ८६ रखर १९	श. १७०७ माघ वद्य ६	इ. १७८६ फेब्रुवारी १९
१३९	सु. [११*] ८६; फाल्गून शुद्ध २	श. १७०७ फाल्गुन शुद्ध २	इ. १७८६ मार्च २
७७	सु. ११८६ जवल १४	श. १७०७ फाल्गुन वद्य १	इ. १७८६ मार्च १५
१४०	पौ. सु. [११*] ८६ जखर २	श. १७०८ चैत्र शुद्ध ४	इ. १७८६ एप्रिल २
१४१	सु. ११८६ रजब ११	श. १७०८ वैशाख शुद्ध १३	इ. १७८६ मे १०
१४२	सु. [११*] ८६ रजब २०	श. १७०८ वैशाख वद्य ६	इ. १७८६ मे १९
७८	सु. ११८७ रवल २८	श. १७०८ पौष वद्य ३०	इ. १७८७ जानेवारी १९
१३३		श. १७०९	इ. १७८७ सुमार
७९	पौष शुद्ध ५ इंदुवार; पौ सु ८८ रखर २२ भौमवार	श. १७०९ पौष शुद्ध ५(६)	इ. १७८८ जानेवारी १४
८०	सु. [११*] ८८ रखर १७	श. १७०९ पौष वद्य ५	इ. १७८८ जानेवारी २७

८१	सु. ११८८ रखर ११, श. १७०३ प्लवंग पौष वद्य ७, इ. १७८८ जानेवारी २९	श. १७०९ पौष वद्य ७	इ. १७८८जानेवारी २९
८२	रजब२, पौ सु.[११*]८९ सवाल १३	श. १७१० चैत्र शुद्ध ३	इ. १७८८ एप्रिल ९
८३	सु. ११८८ रजब १	श. १७१० चैत्र शुद्ध ३	इ. १७८८ एप्रिल ९
८४	सु. ११९० जखर १३	श. १७११ फाल्गुन वद्य १०	इ. १७९० मार्च १०
८५	जवल १६	श. १७१२ पौष वद्य १	इ. १७९१ जानेवारी २१
८६	सु. [११*] ९१ सफर १	श. १७१३ आश्विन शुद्ध ३	इ. १७९१ सप्टेंबर ३०
८७	सु. [११*] ९३ शवाल १८	श १७१४ ज्येष्ठ वद्य ५	इ. १७९२ जून ९
८८	सु. ११९३ सफर २१	श. १७१४ आश्विन वद्य ८	इ. १७९२ आक्टोबर ८
८९	रखर २०	श. १७१४ मार्गशीर्ष वद्य ७	इ. १७९२ डिसेंबर २५
९०	सु. [११*] ९३ जवल १०	श. १७१४ पौष शुद्ध १२	इ. १७९: डिसेंबर ५
९१	सु. [११*] ९३ रजन १२	श. १७१४ फाल्गुन शुद्ध १४	इ. १७९३ फेब्रुवारी २४
९२	सु. [११*] ९३ फाल्गून वद्य ११	श. १७१४ फाल्गुन वद्य ११	इ. १७९३ मार्च ८
९३	शावान १	श. १७१५ चैत्र शुद्ध २	इ. १७९३ मार्च १४
९४	सु [११*] ९३ शावान २	श. १७१६ चैत्र शुद्ध ७	इ. १७९३ मार्च १९
९५	सु. ११९५ रवल १५	श. १७१६ आश्विन वद्य २	इ. १७९४आक्टोबर १०
९६	सु. १२०० जवल १६	श. १७२१ आश्विन वद्य ३	इ. १७९९आक्टोबर १९
९७	सु. १२०५	श. १७२६–२७	इ. १८०४–५
९८	सु. १२१३ मोहरम ५, इ. १८१३ जानेवारी ९	श. १७३४ पौष शुद्ध ७	इ. १८१३जानेवारी ९
९९			
१०१	जवल ९		
११०	सवाल ७		

पोर्तुगीज भारतांतील व्हाइसरॉय, गव्हर्नर इ.

या खंडांत पोर्तुगीजांशीं आलेल्या संबंधांचे कागद इ. १७१२ पासून सुरू होतात. पण चिटणीस संग्रहांतील फार्सी कागद त्यापूर्वींचे असून त्यांत पोर्तुगीजांचे व्हाइसरायांचे निर्देश आहेत. शिवाय कांहीं प्रकाशित मराठी कागद फार्सी कागदांच्याही पूर्वींचे असून त्यांतही पोर्तुगीजांचे निर्देश आहेत. या सर्व कागदांच्या अर्थकारणास उपयोगी पडावे म्हणून येथें भारतांत होऊन गेलेल्या पोर्तुगीज व्हाइसरॉय, गव्हर्नर, कॅप्टन–जनरल इत्यादींची सूची येथें देतों. ही सूची डॅन्व्हर्सकृत 'दी पोर्तुगीज इन इंडिया' या ग्रंथाच्या दुसऱ्या खंडांतील परिशिष्ट B मधून घेतली आहे. हा ग्रंथ इ. १८९४ मध्यें प्रकाशित झाला. तदनंतरच्या संशोधनानें यांत कांहीं फरक झाला असणें शक्य आहे. तरीही ती उपयुक्त वाटल्यानें येथें दिली आहे.

1. Dom Francisco de Almeida (Viceroy=V) ... 1505–1509
2. Alfonso de Albuquerque (Governor=G) ... 1509–1515
3. Lopo Soares de Albergaria (G) 1515–1518
4. Diogo Lopes de Sequeira (G) 1518–1521
5. Dom Duarte de Menezes (G) 1521–1524
6. Dom Vasco da Gama, Conde de Vidigueira (V) 1524
7. Dom Henrique de Menezes (V) 1525–1526
8. Lopo Vaz de Sampaio (G) 1526–1529
9. Nuno da Cunha (G) 1529–1538
10. Dom Garcia de Noronha (V) 1538–1540
11. Dom Estevao da Gama (G) 1540–1542
12. Martin Affonso de Sousa (G) 1542–1545
13. Dom Joao de Castro (G) 1545-1547
(G & Captain-in-chief) 1547–1548
13.A Dom Joao de Castro (V) 1548–1549
14. Garcia de Sa (G) 1549–1550
15. Jorge Cabral (G) 1550–1554
16. Dom Affonso de Noronha (V) 1554–1555
17. Dom Pedro Mascarenhas (V) 1555–1558
18. Francisco Barreto (G) 1558–1561
19. Dom Constantino de Braganza (V) 1561–1564
20. Dom Francisco Coutinho, Conde de Redondo (V) 1564
21. Joao de Medonca (G) 1564–1568
22. Dom Antonio de Naronha (V)

23. Dom Luiz de Athaide (V) 1568-1571
24. Dom Antonia de Noronha (V) 1571-1573
25. Antonio Moniz Barreto (G) 1573-1576
26. Dom Diogo de Menezes (G) 1576-1578
27. Dom Luiz de Athaide (V) 1578-1581
28. Fernao Telles de Menezes (G) 1581
29. Dom Francisco Mascarenhas,
    Conde da Villa da Horta (V) 1581-1584
30. Dom Durte de Menezes,
    Conde de Tarouca (V) 1584-1588
31. Manoel de Sousa Coutinho (G) 1588-1591
32. Mathias de Albuquerque (V) 1591-1597
33. Dom Francisco da Gama,
    Conde da Vidigueira (V) 1597-1600
34. Ayres de Saldanha (V) 1600-1605
35. Martim Affonso de Castro (V) 1605-1607
36. Dom Fr. Aleixo de Menezes,
    Archbishop of Goa (G) 1607-1609
37. Andre Eurtado de Mendonca (G) 1609
38. Ruy Lourenco de Tavora (G) 1609-1612
39. Dom Jeromymo de Azevedo (V) 1612-1617
40. Dom Joao Coutinho, Conde de Redondo (V) 1617-1719
41. Fernao de Albuquerque (G) 1619-1622
42. Dom Francisco da Gama,
    Conde de Vidigueira (V) 1622-1627
43. Dom Fr. Luiz de Brito,
    Bishop of Meliapor (G) 1627-1628
44. Nuno Alvarz Botello; Dom Lourenco da
    Cunha Goncalo Pinto de Fonseca
    (Commission=Co) 1628-1629
45. Dom Miguel de Noronha,
    Conde de Linhares (V) 1629-1635
46. Pero da Silva (V) 1635-1639
47. Antonio Telles des Menezes (G) 1639-1640
48. Joao de Silva Tello de Menezes,
    Conde de Aveiras (V) 1640-1646
49. Dom Filippe Mascarenhas (V) 1646-1651
50. Dom Fr. Francisco dos Martyres; Francisco
    de Mello de Castro; Antonio de Sousa
    Couotinho (Co) 1651-1652

51. Dom Vasco Mascarenhas,
Conde de Obidos (V) 1652–1653
52. Dom Braz de Castro (A Usurper) 1653–1655
53. Dom Rodrigo Lobo da Silveira,
Conde de Sarzedas (V) 1655–1656
54. Manoel Mascarenhas Homen; Francisco de Mello de Castro; Antonio de Sousa
Countinho (Co) 1656–1661
55. Luiz de Mendonca Furtado;
Dom Pedro de Lancastre (Co) 1661–1662
56. Antonio de Mello e Castro (G) 1662–1663
57. Joao Nunes da Cunha,
Conde de S. Vicente (V) 1666–1668
58. Antonio de Mello e Castro (relative of the Viceroy of the same name); Luiz de Miranda Henriques; Manoel Corte-Real de
Sampaio (Co) 1668–1671
59. Luiz de Mendonca Furtado de Albuquerque,
Conde de Lavradio (V) 1671–1677
60. Dom Pedro de Almeida, Conde de
Assumar (V) 1677–1679
61. Dom Fr. Antonio Brandao, Archbishop, Primate; Antonio Paes de Sande; Francisco
Cabral de Almada (Co) 1679–1681
62. Francisco de Tavora, Conde de Alvor (V) 1681-1686
63. Dom Rodrigo da Costa (G) 1686–1690
64. Dom Miguel de Almeda (G) 1690–1691
65. Dom Fernando Mattins Mascarenhas de
Lancastre; Luiz Goncalves Cotta (Co) ... 1691
65.A Dom Fernando Martins Mascarenhas de Lancastre; Dom Fr. Agostinho da Annunci-
acao, Archbishop of Goa (Co) 1691–1693
66. Dom Pedro Antonio de Noronha, Conde
de Villa Verde (V) 1693–1698
67. Antonio Luiz Goncalves da Camara
Coutinho (V) 1698–1701
68. Dom Fr. Agostinho da Annunciacao, Archbishop of Goa; Dom Vasco Luiz
Coutinho, Colonel of Infantry (Co) ... 1701–1703

69. Caetano de Mello de Castro (V) 1703–1707
70. Dom Rodrigo da Costa (V) 1707–1712
71. Vasco Fernandes Cesar de Menezes (V)... 1712–1717
72. Dom Sebastiao de Andrade Pessanha, Archbishop Primate (G) 1717
73. Dom Luiz de Menezes, Conde de Ericeira (V) 1717-1720
74. Francisco Jose de Sampaio e Castro(V) ... 1720-1723
75. Dom Christovao de Mello (G) 1723
75.A Dom Christovao de Mello; Dom Ignacio de Santa Thereza, Archbishop Primate; Christovao Luiz de Andrade, Chancellor of the State (Co) 1723–1725
76. Joao de Saldanha da Gama (V) 1725–1732
77. Dom Ignacio de Santa Thereza, Archbishop Primate; Dom Christovao de Mello; Thome Gomes Moreira (Co) 1732
78. Dom Pedro Mascarenhas, Conde de Sandomil (V) 1732–1741
79. Dom Luiz de Menezes, Conde de Ericeira (V) 1741–1742
80. Dom Francisco de Vasconcellos, Bishop of Cochin; Dom Luiz Caetano de Almeida (Co) 1742–1743
80.A Dom Laurenco de Noronha, Councillor of the State; Dom Luiz Caetano de Almeida (Co) 1743–1744
81. Dom Pedro Miguel de Almeida e Portugal, Conde de Assumar, Marquez de Castello Novo (V) 1744–1750
82. Francisco de Assis, Marquez de Tavora (V) 1750–1754
83. Dom Luiz Mascarenhas, Conde de Alva (V) 1754–1756
84. Dom Antonio Taveira da Neiva Brum da Silveira, Archbishop; Joao de Mesquita Matos Teixeira, Chancellor of the State; Filippe de Valladares Souto Maior (Co) 1756
85. Manoel de Saldanha de Albuquerque, Conde de Ega (V) 1756–1765
86. Dom Antonio Taveira da Neiva Brum da Silveira, Archbishop; Joao Baptista Vaz

Pereira, Chancellor of the State; Dom Joao Jose de Mello, Comptroller General of the Exchequer (Co) 1765–1768

87. Dom Joao Jose de Mello (G) 1768–1774
88. Filippe de Valladares Souto Maior (G) 1774
89. Dom Jose Pedro da Camara (G and Captain General=CG) 1774–1779
90. Dom Frederico Guilherme de Sauza (G and CG) 1779–1786
91. Francisco da Cunha e Menezes (G and CG) 1786–1794
92. Francisco Antonio da Veiga Cabral (G and CG) 1794–1807
93. Bernardo Jose de Lorena, Conde de Sarzaedas (V and CG) 1807–1816
94. Dom Diogo de Souza, Conde de Rio Pardo (V and CG) 1816–1821

टीपा

१

मला मिळालेल्या मराठी कागदांत हा पहिला आहे. या कागदाच्या शेवटीं गवाह किंवा साक्षीदार म्हणून बारा गृहस्थांचीं नांवें आलीं आहेत. हीं सर्व मोडींत लिहिलीं असून त्यांपैकीं तीन नांवांपुढें कानडी हस्ताक्षरांत सह्या आहेत. सासंइमध्यें ३४ व्या पृष्ठासमोर श. १५२६ (इ. १६०४) च्या मराठी भाषा व मोडी लिपी यांमधील एका कागदाची प्रतिमा दिली आहे. तीमध्यें कांहीं व्यक्तींचीं नांवें आलीं आहेत. ते बहुतेक सेटी आहेत. त्या प्रत्येकाच्या नांवाखालीं कानडीमध्यें ' द ' अक्षर घालून पुढें कानडींतच त्या त्या पुरुषाचें नांव लिहिलें आहे. हे त्यांचे दस्तूर आहेत याविषयीं शंका नाहीं. याशिवाय त्या पत्रावर मराठी व कानडी दोन्ही भाषांत कांहीं शेरे आहेत. पत्राचा गाभा उपर्युक्त पुस्तकांत प्रतिमारूपानें छापलेला नाहीं. पण तो मराठी व मोडी लिपींत असला पाहिजे. या प्रतिमापत्रांत दिसत असलेले चारही शिक्के फार्सीमध्यें आहेत. प्रस्तुत प्रतिमापत्रावरून एवढें दिसतें कीं, सावंतवाडी व त्याच्या आसपासच्या कांहीं प्रदेशांत पत्रकालीं कांहीं लोकांत थोडेसे कानडी भाषेचे संस्कार होते. कै. बांवडेकर यांनीं आपल्या ' मठगांवचा शिलालेख आणि ब्राम्हण सामंत राजवंश ' या पुस्तकांत श. १५२२ (इ. १६००) व श. १५२६ (इ. १६०४) या दोन कालांच्या पत्रांचीं छायाचित्रें (क्र. ४ व ५) दिलीं आहेत. त्यावरूनही नेमकें एवढेंच सिद्ध होत आहे. या पत्रानंतर २५ वर्षांनीं लिहिलेल्या व क्र. १ म्हणून येथें प्रकाशित करीत असलेल्या पत्रांत कानडीचा संस्कार आणखी कमी झालेला दिसतो. पुढील कांहीं वर्षांत तर तो संस्कार आणखीही कमी झालेला होता आणि ३०० वर्षांनंतर आजच्या काळांत तेथें कानडीचा कोणताच संस्कार राहिलेला नाही हेंही आपणांस दिसून येतें. प्रस्तुत पत्र क्रयपत्र आहे. हें ज्यांनीं आपल्या उत्पन्नाचा कांहीं अंश दुसऱ्यास विकत दिला अशासंबंधीं झालेला व्यवहार सांगत आहे. हें पत्र ३२५ वर्षांपूर्वींची सावंतवाडी-कडील मराठी भाषा कशी होती हें समजण्याच्या दृष्टीनें उपयुक्त असल्यामुळे येथें छापलें आहे. या पत्रांत 'नुकरा होन' असा एक शब्दप्रयोग आला आहे. नुकरा म्हणजे रुपें. तेव्हां नुकरा होन म्हणजे रुप्याचा होन. होन हा शब्द संस्कृत सुवर्ण>सोन>होन किंवा कन्नड पोन्>होन असा तयार झाला आहे. पोन् शब्दही संस्कृत सुवर्णपासून तयार झाला असावा. तें कांहीं असो; होन सोन्याचा असल्याचें त्या शब्दाच्या आंगिक अर्था-वरूनच सिद्ध होतें. मात्र प्रथम त्या शब्दाच्या अर्थामध्यें सोन्याचें नाणे असा विस्तार झाला. पण पुढें त्याच्या अर्थाचा संकोच होऊन एक नाणें एवढाच अर्थ शिल्लक राहिला. या पत्रांत त्याच्या मागें नुकरा शब्द लावल्यामुळें रुप्याचे होन होते असें ठरतें. होन-इ-नुकरा असे उल्लेख दुसऱ्या इब्राहीम आदिलशाहाच्या कांहीं फर्मानांतून आल्याचें मला पक्कें स्मरतें. पण ते सध्या सांपडत नाहींत. शिवाय ते प्रकाशित किंवा अप्रकाशित

कागदांत आहेत हेंही ध्यानांत येत नाहीं. या रुप्याच्या होनाचें स्वरूप व तौलनिक मूल्य समजण्यास आणखी कागद मिळाले पाहिजेत.

२

या कागदांत बापानें आपल्या संपत्तीची तीन मुलांत वाटणी करून दिली त्यावेळीं स्वतःसाठीं एक वांटा ठेविला हें लक्ष्य आहे.

३

सुभेदाराहून वरच्या पण बादशाह किंवा बादशाही प्रतिनिधि यांहून खालच्या अधिकाऱ्यानें म्हणजेच मुख्य प्रधानानें काढलेल्या आज्ञापत्रास हस्बुलहुक्म म्हणतात. येथें हा औरंगजेबाचा एतत्कालीन मुख्य प्रधान असदखान यानें काढला आहे. हें व यापुढील कित्येक पत्रें औरंगजेब दक्षिणेच्या स्वारीसाठीं महाराष्ट्रांत आला असतां त्याच्या अधिकाऱ्यांनीं येथील वतनदारांना आपल्या पक्षांत ओढण्यासाठीं कसकसे प्रयत्न केले तें दाखवीत आहेत. या व ४–७ या पत्रांत उल्लेखिलेला शेख मुहम्मद मुघलांकडील बक्षी आणि दंडाराजपुरीचा किल्ला व पादशाही आरमार यांचा वाकेनिगार होता हें क्र. ४,७ व १०२ या पत्रांवरून स्पष्ट होतें. बक्षी व वाके–नवीस–निगार या पदांच्या अधिक माहितीसाठीं पहा आइमु पृ. ३९ ते ४२.

४

या पत्रांत शेख मुहम्मद सुरतेस आल्याचें सलाबतखान लिहितो. तेव्हां सलाबत-खान सुरतेचा अधिकारी आहे असें वाटतें. सुरत व भडोच गॅझेटियरमध्यें सुरतेचे मुलकी प्रशासक, कारकून, मुत्सद्दी, इत्यादींची तत्कालीन यादी दिली आहे तींत सलाबत मुहम्मद (१६८७) अशी एकच व्यक्ति आहे (सुरत व भडोच गॅझेटियर–जुनी आवृत्ति पृ. ९१ टीप ५). तो व हा सलाबतखान एकच असावे. माआमध्यें तर आ. जु. २८ शव्वाल ४ (इ. १६८४ सप्टेंबर ४) या दिवशीं हा सलाबतखान सुरत बंदराचा मुत्सद्दी बन-ल्याचें स्पष्ट सांगितलें आहे (फार्सी मूळ पृ. २४७). येथें पहिल्या खेम सावंतास चार हजार जात व चार हजार स्वार एवढ्या मनसबीचें प्रलोभन दाखविलें आहे. मनसबीच्या या प्रकाराच्या अर्थासाठीं पहा आइमु पृ. ३–११.

५

प्रस्तुत पत्र सुरत येथील मुघली आरमाराचा प्रमुख, याकूतखान यानें खेम सावंतास लिहिलें आहे. यांत अनेक प्रसंगांचे निर्देश आहेत. त्यांवरील विवेचन थोडक्यांत असें : याकूतखान साल गुजस्ता म्हणजे श. १६०७ (इ. १६८५) मध्यें कांही जिन्नस खरेदी करण्यासाठीं आपल्या आरमारासह गनिमाच्या म्हणजे मराठ्यांच्या मुलखांत दंडाराजपुरी येथें गेला असतां इकडे भडोच येथें बतेकौमाने (बदकौम ?) बंड उभारून तेथील फौजदारास कैद केलें. ही गोष्ट मराठ्यांकडून घडली असावी

(सुरत व भडोच गॅझेटियर पृ. ४६८, ५५३). हें बादशहास (औरंगजेबास) समजतांच त्यानें याकूतखानास बंड मोडण्याची आज्ञा केली. तीप्रमाणें तो भडोचकडे जाण्यास निघाला. दरम्यान गुजरातचा बादशाही सुभेदार कारतलबखान यानें स्वतःच भडोचला जाऊन बंडवाल्यांना कापून काढलें व भडोच बादशाही कबजांत आणिलें. हें समजतांच याकूतखान दंडराजपुरीस परतला. मुघली रियासतींत या कालाच्या सुमारास २।३ कारतलबखान होऊन गेले. पैकीं एकाचें लहानसें चरित्र मासिरुलउमरामध्यें दिलें आहे. त्यांत त्याच्या या कर्तबगारीची माहिती नाहीं. मराठी, संस्कृत, फार्सी, इत्यादि साधनांत याजविषयीं अनेक उल्लेख आले आहेत. उदाहरणार्थ, शिवप्र. पृष्ठ २१,५८; शिवभारत अ. २८, अ. २९ श्लोक ३९ ते ४२; मासिर–इ–आलमगीरी, फार्सी, पृ. २४७; सिलेक्टेड वकाया ऑफ दि डेक्कन पृ. ४६ व ८४; सिलेक्टेड डॉक्युमेंट्स ऑफ शाहजहान्स रेन पृ. ३४ व ५०; पण हे सर्व निर्देश एकाच कारतलबखानाचे असतील असें दिसत नाहीं. यांपैकीं केवळ मासिर–इ–आलमगीरींतील निर्देशच प्रस्तुत पत्रांतील कारतलबखानाचा असावा. याकूतखान दंडराजपुरीस पोचतांच त्यास बातमी लागली कीं गनिमाचें म्हणजे मराठ्यांचें आरमार दाभोळच्या खाडींत एकत्र होऊन खेम सावंताच्या बाजूस म्हणजे मालवण–वेंगुर्ल्याकडे जाण्याच्या तयारींत आहे. आणि शाहजादा म्हणजे औरंगजेबाचा बंडखोर मुलगा अक्बर त्याबरोबर जाणार आहे. तेव्हां याकूतखानानें मराठ्यांच्या आरमारावर स्वारी केली, त्या आरमाराचा प्रमुख गोविंद कान्हो यासह पाच गुराबा पकडल्या, ७।८ बुडवल्या व त्यांचे कित्येक शिपाई कापून काढले. एवढेंच नव्हे तर मराठ्यांचे लोक दंडराजपुरी व चेऊल यांच्या आसपास बळ धरून राहिले होते त्यांचाही त्यानें निकाल लाविला. या प्रकरणीं मराठी साधनांत त्रोटक माहिती आली आहे. उदा. श. १७६० (इ. १८३८) च्या सुमारास झालेल्या चेऊलच्या बखरींत श. १६०४ ते १६०७ (स. १६८२ ते ८५) च्या दरम्यान, संभाजी राज्य करीत असतां हबशी फौज घेऊन आरमारासह पालवचे खाडींत आला. तेथून रात्रीचे समयीं छापा घालून चेऊलचीं घरें दग्ध केलीं. मालमत्ता लुटून नेली येवढी माहिती आली आहे (रा. ३ पृ. ५१०). याच कालाच्या सुमारास झालेल्या अधिकारी शकावलींत श. १६०७ (इ. १६८५) चेऊल हबशी यानें मारलें अशी नोंद आहे (श्री. शा. वि. आवळसकर–आंग्रेकालीन अष्टागर नोंद ८). श. १७३२ (इ. १८१०–११) च्या सुमारास मल्हार रामराव चिटणिसानें लिहिलेल्या संभाजीच्या बखरींत हबशी यांणीं चौलावर स्वारी करून तेथूनही लोक बहुत धरून नेले असें नमूद आहे. तदनंतर पुढील मजकूर आहे. त्याजवरी सिद्दी मिसरी व दौलतखान व मायनाक भंडारी, संताजी पवळा (पडवळ ?), गोविंदजी जाधव, व गोविंद कान्हो हे आरमाराचे सरदार नागोठणें व आपटें यांकडे आरमार घेऊन गेले. ते उरणाचे खाडीनजीक हबशी यांचें आरमार जात होतें. [तेथें *] त्यांची यांची गांठ पडली. युद्ध बहुत जाहलें. महाराजाकडील पंधरा गलबतें व सिद्दी मिसरी पाडाव

करून नेले. कितेक गलबतें बुडविलीं. कितेक पळून गेले (चौथी आवृत्ति पृ. १९). ही चकमक उरणाजवळची आहे तर आपल्या पत्रांतील चकमक दाभोळ-जवळची असून तींत गोविंद कान्हो पाडाव झाल्याचें नमूद आहे. तेव्हां ही उरणनंतर झडली असली पाहिजे. शिवाय श्री बेंद्रे यांनीं दिलेल्या माहितीप्रमाणें सीदी मिसरी संभाजीच्या बाजूनें सीदी कासमशीं लढत असतां ता. ४–१०–१६८२ रोजीं जखमी होऊन सीदी कासमकडे पाडाव झाला व दुसरे दिवशीं मेला (छत्रपति संभाजी महाराज पृ. ३८०,३८१). तेव्हां तो इ. १६८५–८६ च्या हालचालींत भाग कसा घेणार ? तेव्हां येथें बखरींतील हकीकतींत विविधकालीन घटनांची कालविपर्यासासह भेसळ झालेली दिसते. श. १६९१ (इ. १७६९) व श. १६९४ (इ. १७७२) च्या सुमाराच्या दोन कागदांत श. १६०७ (इ. १६८५) संवसरी हबसी येण्हे चेऊल मारिलें लोक जागा जागा गेले अशी नोंद आहे. याचें कारण येथें दिलें आहे तें असेंः— शिवाजी महाराजांच्या निरणाची व्यथा बरा करणारा व चेऊलचा रहिवासी वैद्य पिलाजी न्हावी याचा मुलगा बजाजी यानें उन्मत्त होऊन संभाजीतर्फेनें हबशीकडील उंदेरी घेण्याच्या प्रयत्न केला (रामदास रामदासी ४२ वा भाग पृ. ६३, ६६, ६९, ७९). प्रस्तुत पत्रांत आलेल्या हालचाली श्री. बेंद्रे यांच्या उपर्युक्त पुस्तकांत नमूद नाहींत.

६

श्रीमान शिवरामराजे भोंसले यांनीं मजपाशीं दिलेल्या फार्सी व फार्सी–मराठी कागदांत एक लपेटदार कानडी लिपीमध्यें लिहिलेला कागद आहे. मी व माझे कांहीं कानडी मित्र मिळून तो वाचण्याचा प्रयत्न केला. पण लागला नाहीं. तथापि या कागदा-वरून असें दिसतें कीं प्रस्तुत कागद त्या कानडी कागदाचा सारांश आहे. तो कागद कानडी अक्षरांत लिहिण्याचें कारण त्यामध्यें कांहीं मतलबा किंवा मागण्या आहेत. त्या कोणास समजूं नयेत म्हणून कानडी लिपीच्या कागदांत त्यांचा समावेश केला आहे. या पत्रांतील उल्लेखावरून अशीही कल्पना होते कीं, त्या कानडी पत्राची लिपी कानडी असली तरी भाषा फार्सी असावी. त्या कानडी पत्राचें उत्तर हिंदवी अखेरी बालबोध लिपींत व बहुधा मराठी भाषेंत पाठवावें असें प्रस्तुत पत्रांत लिहिलें आहे. तथापि या पत्रांतील शेवटच्या शेऱ्यांत प्रस्तुत पत्राचा जबाब फार्सी किंवा मराठी मजकुरानें यावा असें लिहिलें आहे. या पत्रामुळें श. १६०८ (इ. १६८६) च्या सुमारास, सावंतवाडी–गोवें या बाजूच्या सामान्य मनुष्यांस कानडी समजेनासें झालें होतें एवढें सिद्ध होऊं पहात आहे. मुसलमानांत यऊकूतखान>याकूदखान व यऊकूबखान>याकूबखान अशीं दोन्हीं नांवें प्रचलित आहेत. शिवकालीन मोडींत ‘ द ’ व ‘ ब ’ यांची सहज अदलाबदल होते. पण येथें पहिलें नांवच विवक्षित आहे. क्र. ५ च्या पत्रांत धारवाडहून साह्य मिळेल असें दर्शित केलें आहे. धारवाड मुघलांच्या ताब्यांत कसें व केव्हां गेलें याविषयीं पहा शिचसा ६।१ टीप.

७

सहाव्या पत्रांत, लानगो (छोटा) राम दळवी, तान सावंत व देव सावंत यांस पत्रें पाठविल्याचें लिहिलें आहे. त्यांपैकीं तान सावंतास पाठविलेल्या पत्राचा सारांश म्हणजे हें पत्र होय. सहा व सात या दोन पत्रांवरून थोरला व धाकटा असे दोन राम दळवी असल्याचें दिसतें. हजरत जिल्ल इलाही म्हणजे औरंगजेब विजापुरास आहे, विजापूर जिंकल्यावर बादशाही फौजा, पादशाहजादा (शाह आलम ?) व बुबराव कोंकण प्रांतांत उतरणार, ते उतरण्यापूर्वीं खेम सावंत व तान सावंत यांनीं मुघलांसाठीं केलेली सेवा पादशाहास मान्य झाली म्हणजे ठीक असें हें पत्र लिहिण्याचा हेतु आहे. बाकी खेम सावंत व तान सावंत हे गनिमांशीं म्हणजे मराठ्यांशीं लढून त्यांचा प्रदेश पादशाही कबजांत आणण्याचा प्रयत्न करीत होते ही बातमी शेख मुहम्मदानें मागेंच बादशाहाकडे पाठविली होती आणि तिचा जबाब म्हणून बादशाहाकडून प्रोत्साहनपर पत्रही आलें होतें.

८

या पत्राचा लेखक महादजी नाईक, खेम सावंतास पत्र लिहून पादशाहाकडे येण्याबद्दल त्याचें मन वळवीत आहे. हा तुम्ही आम्ही पहिल्यापासून शरीरसंबंधीं आहों असें लिहीत आहे. त्यावरून हा शिवाजी महाराजांचा जावई महादजी नाईक निंबाळकर तर नसेल ना अशी शंका येते. महादजी नाईक शिवाजी महाराजांचा जावई असला तरी तो मुघलांच्या बाजूस होता हें दाखवितां येतें. या पत्रांत तर तो मुघली बादशाहाची "यासमान दुसरा कोणी नाहीं" अशी तरफदारी करीत आहे, एवढेंच नव्हे तर औरंगजेबानें विजापूरची गत कशी केली, सध्या तो भागानगरच्या किंवा गोवळकोंड्याच्या मोहिमेवर आहे पण ती संपल्यावर तो संभाजीचीही खोडकी मोडणार असें सांगून, हें सर्व होण्यापूर्वींच, खेम सावंत बादशाहास मिळाला तर त्याचा फायदा होईल असें त्याच्या निदर्शनास आणीत आहे.

१३–१८

या सहा पत्रांत तसेंच फार्सी पत्र क्र. ५० व ७० यांत मुख्यतः एकच घटना सांगितली आहे. आणि ती म्हणजे मुघलांकरितां खेम सावंतानें पारगड मराठ्यांकडून जिंकून घेणें ही होय. प्रस्तुत गड बेळगांवच्या पश्चिमेस ३० मैलांवर चंदगडाजवळ आहे. या सर्व पत्रांत मिळून सन ११०० रबिलावल २ ते रबिलावल २१ पर्यंतच्या तारखा आल्या आहेत. येथें हें साल कोणत्या कालगणनेचें आहे हें सांगितलें नसलें तरी मी मराठी पत्र क्र. १७ मध्यें उल्लेख आला आहे त्यावरून या सर्व पत्रांतील वर्षांचा निर्देश फसली कालाचा आहे असें धरलें आहे. पण मुघली कागदांत अशा तऱ्हेनें फसलीचे कालनिर्देश येतील कीं काय हा प्रश्न आहे. बहुधा येऊं नयेत, हिजरीचे यावेत. तेव्हां या पत्रांतील कालनिर्देश हिजरी वर्षांचे धरले तर यांत निर्देशिलेली पारगडासंबंधींची हकीकत

हि. ११०० रबिलावल २ ते रबिलावल १९ (श. १६१० पौष शुद्ध ४ ते वद्य ८, इ. १६८८ डिसेंबर १६ ते १६८९ जानेवारी ४) या दरम्यान घडली असल्याचें ठरेल. या आठ पत्रांपैकीं सर्वप्रथम पत्र फार्सी क्र. ५० रबिलावल २ (श. १६१२ मार्गशीर्ष शुद्ध ४, इ. १६९० नोव्हेंबर २४) चें असून त्यांत पारगड तुमच्या हद्दींत आहे, त्या-बद्दल काळजी घ्यावी आणि तो हस्तगत करून इकडे यावें असें मुघली अधिकाऱ्यानें खेम सावंतास लिहिलें आहे. याप्रमाणें तीन चार दिवसांत कांहीं न घडल्यामुळें क. १३ चें पत्र खेम सावंतास लिहिलें असून त्यांत तुम्ही, जलालखान व दुलबा नाईक असे तिघे जण जाऊन पारगड घ्यावा व तेथील व्यवस्था लावून हुजूर यावें असें फर्माविलें आहे. अशाच प्रकारच्या आज्ञा १४ व १५ या दोन पत्रांत दिल्या आहेत. पत्र क्र. १६ वरून असें दिसतें कीं, वरील आज्ञांप्रमाणें खेम सावंत पारगडाकडे न जातां घाटाखालीं उतरल्याची बातमी मुघली अधिकाऱ्यास लागली. तेव्हां तो या पत्रांत तुम्ही, शहबाजखान व इतर जमीदार मिळून पारगडास वेढा द्या म्हणून आज्ञापीत आहे. ही आज्ञा झाली तरी खेम सावंत पारगडास गेल्याची बातमी न आल्यामुळें मुघली अधिकारी त्याबद्दल खेम सावंतास क्र. १७ च्या पत्रांत विचारणा करीत आहे आणि लागलीच दुसरे दिवशीं लिहिलेल्या क. १८ च्या पत्रांत मुघली अधिकाऱ्यानें खेम सावंतानें आपलें सैन्य तात्काळ पारगडास पाठवावें आणि तो व राम दळवी यांनीं मुघली अधिकाऱ्याकडे जावें म्हणून हुकूम दिला आहे. फा. क्र. ७० च्या पत्रांत राम दळवी, मांप सावंत, कान सावंत इ. पारगडास गेले आहेत, ते तो किल्ला घेण्याचा प्रयत्न करणार आहेत, आवश्यक झाल्यास त्यांच्या मदतीसाठीं मुघली सैन्य जाणार आहे, तरी तुम्हीहि आपल्या सैन्या-सह जावें, पारगड फत्ते झाल्यावर तुमचें ऊर्जित होईल असें खेम सावंतास मुघली अधिकाऱ्यानें लिहिलें आहे. दोन्ही फार्सी पत्रांत अजमखान नांवाच्या एका मुघली सेनापतीचा उल्लेख आला आहे. पण मराठी पत्रांत तसा उल्लेख या संदर्भांत आलेला दिसत नाहीं. नाहींतर ले. १०५ मध्यें त्याचा निर्देश आहे.

२६, २८–३०, ३२, ३३, ३५, ३८, ४०, ४२, ४८–५०, ५२, ६५, ६६, ६८–७०, ८१.

हे २० लेख एका बाजूस सावंतवाडीकर व दुसऱ्या बाजूस पोर्तुगीज सत्ता यांमध्यें वेळोवेळीं झालेल्या तह व करारमदाराविषयीं आहेत. यांत कांहीं व्हावयाच्या करारमदारांचीं टिपणें आहेत. त्यांस यादी ही संज्ञा आहे. दुसरे कांहीं जबाबासाठीं पाठविलेले कागद आहेत. आणखी कांहीं मुद्यांना होकार, नकार, फेरफार इत्यादि प्रकारांनीं पाठविलेल्या उत्तराच्या रूपांत आहेत. तर त्याहून निराळे कांहीं अंतिम स्वरूपांचे तह आहेत. पण या सर्व कागदांचें वैशिष्ट्य हें आहे कीं, हे अस्सल स्वरूपांत नसून नकल स्वरूपांत आहेत. यांपैकीं कोणत्याहि कागदावर शिक्के, शेरे किंवा सह्या यांपैकीं कांहींही नाहीं. प्रत्येक कागदावरील सर्व लिखाण एकटाकी आहे. तथापि त्यांत आलेली माहिती विश्वास्य आहे यांत शंकाच

नाहीं. पेशवाईत वाडीकर सावंताच्या सभोवती पोर्तुगीज, आंग्रे, इंग्रज, कोल्हापूरकर, पेशवे, हैदर-टिपू इत्यादि सत्ता होत्या. यांपैकीं पेशव्यांना मराठी राज्याचा विस्तार करावयास इतर जागा असल्यामुळें त्यांनीं सावंतवाडीकरांवर आक्रमण करण्याची इच्छा धरली नाहीं; पण इतरांना स्वतःचा विस्तार करण्यास इतरत्र जागा नसल्यामुळें हे सर्व जण संधि मिळतांच एकमेकांवर आक्रमण करण्याचा प्रयत्न करीत. या प्रत्येकाच्या ताब्यांत कांहीं ना कांहीं समुद्रकिनारा असून प्रत्येकाचें व्यापारी व लढाऊ आरमार होतें आणि बहुतेकजण चांचेगिरीही करीत. एक कोल्हापूरकर सोडले तर सैन्य, द्रव्य इत्यादि बाबतींत सर्वजण सामान्यतः तुल्यबल होते. पण आरमाराच्या बाबतींत पोर्तुगीज व इंग्रज पहिल्यापासूनच सावंतांहून वरचढ होते. आंग्र्यांचा पाडाव झाल्यापासून या दोन्ही सत्ता अधिकच वरचढ बनल्या. अशा स्थितींत सावंत संकोच पावत कां होईना आपल्या जागीं टिकून राहिले हेंच विशेष. चारी बाजूंनीं आक्रमणें होण्याची सतत भीति असल्यानें पोर्तुगीजांशीं सलोखा ठेवणें सावंतांना आवश्यक वाटलें ही मोठी दुःखद घटना आहे. शिवाय हा सलोखा विकत घेण्यासाठीं स्वातंत्र्याबरोबर मिळणारे कांहीं जन्मसिद्ध हक्कहि गमवावे लागले व नंतर कांहीं प्रदेशहि सोडावा लागला हें अधिकच दुःखदायक आहे, हा या कागदांतील अनुस्यूत धागा आहे. दुसऱ्या खेम सावंताच्या कालांत संस्थानचा विस्तार झाला तर तिसऱ्या खेम सावंताच्या कालांत संकोच झाला असें सामान्यतः दिसतें. या सर्व कागदांचा केवळ मराठी किंवा इंग्रजी साधनांच्या साह्यानें पूर्ण किंवा तौलनिक अभ्यास करतां येणार नाहीं. त्यासाठीं निदान पोर्तुगीज साधनें तरी पाहिलींच पाहिजेत. या बाबतींत डॉ. पां. स. पिसुर्लेकर हेंच अधिकारवाणीनें कांहीं सांगूं शकतील. त्यांनीं लिहिलेल्या Portuguese e Marattas आणि Assentos do Conselho do Estado च्या पंचखंडात्मक मालेंतील चौथ्या व पाचव्या खंडांत येथील कागदांत आलेल्या सावंत व्यक्तींपैकीं नारबा, दुसरा खेम फोंड, नागोबा, चौथा खेम, रामचंद्र, तान, जयराम, या सावंतांचे निर्देश निश्चित आले आहेत. Biker कृत Collecçaoo de Tratados e concertos de pazes या चतुर्दशखंडात्मक मालेंत पोर्तुगीज व इतर सत्ता यांमध्यें झालेले तह, पत्रव्यवहार इत्यादि लेख छापले आहेत. पैकीं किमान ४, ६, ७ व ८ या खंडांत सावंत व पोर्तुगीज यांच्या संबंधावर प्रकाश टाकणारे ४० हून अधिक लेख आहेत असें त्यांतील लेखांच्या तणासणींत आढळून आलें आहे. प्रस्तुत पुस्तकापैकीं ले. २६ हा एक इ. १७१२ जानेवारी १० चा तहनामा असून तोच बिकेरच्या ६ व्या खंडांत पृ. २२१ वर इ. १७१२ एप्रिल ७ या तारखेखालीं दिला आहे; एवढेंच नव्हे तर तेथें थोडी अधिक माहितीहि आल्याचें दिसतें. ले. २८ हाहि एक इ. १७४० फेब्रुवारी २८ चा तहनामा असून तो सहाव्या खंडाच्या १९६ पृष्ठावर दिला आहे. ले. २९ चा कालनिश्चय करण्याचें गमक त्यांत नाहीं. पण बिकेर खंड ६, पृ. १९९ वर याच स्वरूपाचा पण अधिक तपशिलाचा लेख दिला असून तेथें त्याची तारीख इ. १७४० मार्च २८ अशी दिली आहे. पण

पोटांत मात्र इ. १७४० फेब्रुवारी २८ ही तारीख दिलेली दिसते. ले. ३२ मध्यें काल-निर्देश नसल्यानें मी त्यास तारीख देऊं शकलों नाहीं. पण बिकेरच्या सहाव्या खंडांत पृ. २३३ वर एतद्रूप लेख असून बिकेरनें त्यास इ. १७४१ सप्टेंबर ११ ही तारीख दिली आहे. बिकेरच्या पाठाच्या गर्भांत मात्र या लेखास २९ रमजान किंवा २७ नोव्हेंबर इ. १७४१ ही तारीख दिलेली दिसते. प्रस्तुत ले. ३५ शीं अनुरूप असा पोर्तुगीज लेख बिकेरच्या सातव्या खंडांत २८८ पृष्ठांवर आहे. येथील क्र. ३८ एका तहनाम्याची नकल असून अपूर्ण आहे. पण बिकेरच्या आठव्या खंडांत पृ. १२ वर हा तह पूर्ण रूपानें आला आहे. क्र. ८१ चें पोर्तुगीज रूपांतर याच आठव्या खंडांत पृ. १९६ वर आलें आहे. अशा रीतीनें वीस लेखांपैकीं सात लेखांचीं पोर्तुगीज रूपांतरें बिकेरच्या चार खंडांत मिळालीं. उरलेल्या तेरा लेखांपैकीं बरेचसे लेख बिकेरच्या इतर खंडांत सापडा-वेत. पण पुण्यास बिकेरच्या १४ खंडांपैकीं कोणतेहि खंड नाहींत. मुंबईस सर्व नाहींत, चार दोन आहेत. पण ते मुंबईस व मी येथें सर्व यामुळें खंड तपासणें मला शक्य झालें नाहीं. येथील मराठी कागद नकला असल्यानें त्यांत व्यक्तिस्थलनामें तारखा व पाठ यांत कांहीं चुका झाल्या असतील. त्या बिकेरच्या पोर्तुगीज पाठांच्या साह्यानें किंवा गोव्याच्या पुराभिलेखसंग्रहांत यांचीं मूळें असल्यास त्यांच्या साह्यानें सुधारतां येतील. पोर्तुगीज लोक यावेळीं इसवी तारखा नवीन पद्धती (new style) च्या देत. इंग्रज व त्यांच्या संगतीनें आम्हीं जुन्या पद्धती (old style) च्या देतों. इ. १७०० फेब्रुवारी नंतर पूर्वोक्त तारखा ११ दिवसांनीं उत्तरोक्तांच्या पुढें असतात.

३६, ३९, ४१, ४८, ५३–५५, ५८, ५९, ६३, ६४, ७१–७६, ७८, १३४–१४२

या २७ पत्रांचा येथें साकल्यानें विचार केला आहे; यांपैकीं क्र. ५५ सारखींच आणखी दोन पत्रें (मूळ क्र. ४३४, ४३५) असून ती सखारामबापू व नाना फडणीस यांनीं लिहिलीं आहेत. तीं येथें गाळलीं आहेत. यांतील पहिलें पत्र श. १६८६ (इ. १७६५) चें तर शेवटचें श. १७०८ (इ. १७८७) मधील आहे. यांत मुख्यतः हैदर व टिपू यांनीं कर्नाटकांतील मराठी प्रदेशांत केलेल्या हालचाली व त्यांवर पेशव्यांनीं योजलेले प्रतिबंधक उपाय यांची माहिती आहे. कल्याणदुर्ग येथें रघुनाथराव उर्फ दादासाहेब यांनीं हैदरखानाबरोबर केलेल्या तहापासून ते टिपू सुलतानाच्या पहिल्या मोहिमेपर्यंतचा भाग मुख्यतः येथें आला आहे. इतरही कांहीं प्रकरणें आहेतच.

पत्रांवर शिक्के आहेत, पैवस्तीच्या तारखा आहेत, पत्रांच्या शेवटीं निराळें अक्षर आहे, पत्रांतून उल्लेखिलेल्या घटनांचें काल आणि पत्रांतील तारखा इतर उपलब्ध पुराव्याशीं ताडून पाहतां जुळणारे आहेत. यावरून हीं पत्रें अस्सल आहेत व यांतील माहिती विश्वास्यही आहे असें मानावयास कांहींच प्रत्यवाय नाहीं.

हैदर व टिपू यांनीं कर्नाटकांत आणि मराठ्यांच्या मुलखांत जो दंगा माडला होता,

त्या संदर्भात खेम सावंत यांची मदत पेशवे सरकारनें मागितल्याचे उल्लेख या पत्रांतून आहेत. या काळांत कुडाल प्रांताच्या सरदेशमुखीवर ३ रा खेम सावंत (१७५५ ते १८०३) हा सावंतवाडीच्या सावंत भोसले घराण्यांतील पुरुष होता (पृ. ४,५). ३ऱ्या खेम सावंताचे आणि पेशव्यांचे पूर्वापार संबंध सलोख्याचे होते. १७६५ सालच्या एका पत्रांत (ले. ३६) असा उल्लेख आहे कीं, तुम्ही पुरातन वतनदार, तुमच्या वडिलांनीं स्वामिकार्यें केलीं आहेत. गोपाळजी आंग्रे पेशव्यांच्या तालुक्यांत उपद्रव करूं लागल्यावर त्याचा बंदोबस्त सावंतांनीं केला असा उल्लेख १७७० सालच्या पत्रांत आहे (ले. ३९). सावंतांच्या एकनिष्ठपणाबद्दल पेशव्यांच्या मनांत मुळींच संदेह नव्हता. पहिल्यापासून तुम्ही सरकारचे लक्षांत आहां पुढेंही याप्रमाणेंच लक्ष धरून चालाल. तुमचे निष्ठेची खातरजमा आहे असा निर्वाळा पेशव्यांनीं दिला आहे (ले. ४१, इ. १७७३).

कल्याणदुर्गाच्या तहानंतर कर्नाटक प्रांतांत हैदरानें धुमाकूळ घालण्यास प्रारंभ केला. त्याचें वृत्त कुडाळकरांनीं पेशवे आणि कारभारी यांना मे १७७७ मध्यें कळविलें तेव्हां सवाई माधवराव पेशवे, (ले. ५१) सखाराम भगवंत आणि नाना फडणीस या तिघांनीं एकाच मजकुराचीं पत्रें खेम सावंताकडे धाडलीं. खेम सावंताचें म्हणणें असें कीं, हैदराकडील प्रबलता दिवसेंदिवस वाढत चालली, आपण फौजांच्या नेमणुका केल्या आहेत असें ऐकतों, परंतु कर्नाटकांत त्याला दहशत बसत नाहीं, तेव्हां आपण काय विचार केला आहे तो कळविणें, आमची आणि कर्नाटकाची सरहद्द लागून असल्यामुळें हा विचार करावा लागतो (ले. ५४). यावर हैदराचें पारिपत्य करण्यासाठीं हरिपंत तात्या आणि निजामुदौला यांची रवानगी कर्नाटकाकडे झाली आहे असें पेशवे आणि कारभारी यांनीं सावंतांना कळविलें. कर्नाटकाकडे पेशव्यांच्या फौजा निघाल्या आहेत हें वर्तमान खेम सावंतास लिहिलेल्या एका सेवकाच्या पत्रांत देखील नमूद आहे (ले. ५३, ५५).

कोल्हापूरकरांनीं याच वेळीं दंगा मांडला होता. त्यांना राघोबा व हैदर यांची फूस असावी (कछघइसा भाग ३।४ ले. ४८). त्यांच्या पारिपत्यासाठीं रामचंद्र गणेश व महादजी रवाना झाले होते. कोल्हापूरचा फडशा झाल्यावर रामचंद्र गणेश तिकडे येतील असें आश्वासन सावंतांना मिळालें होतें.

१७७६ सालीं हैदरानें गुत्तीच्या मुरारराव घोरपड्याचा अमानुषरीत्या पराभव करून तें ठाणें घेतलें व १७७७ मध्यें सावशीच्या लढाइत पटवर्धनांचा पराभव केला. १७७७ डिसेंबरपर्यंत कृष्णा, तुंगभद्रा दुआबांतील सर्व किल्ले जिंकून त्यानें या प्रदेशांतील देसायांना आपले मांडलिक बनविलें होतें (Mysore Gazetteer Revised edition पृ. २५१२).

मराठ्यांच्या गृहकलहाचा फायदा घेऊन हैदरानें कर्नाटकांतील मराठी मुलुखास

उपद्रव देण्यास प्रारंभ केला (विल्क्स–हिस्ट्री ऑफ म्हैसूर खंड १, पृ. ४०३). आणि कोप्पळ, बदामी व मलप्रभेच्या दक्षिणेकडील मुलख घेऊन १७७८ मध्यें धारवाडावर आपला अंमल बसविला (ले. ६३; खरे ७, ले. २४१४).

करवीरकरांना वठणीवर आणण्यासाठीं महादजी शिंद्यांची रवानगी झाली व (कछघइसा भाग ३।४ ले. ४८, ५८) त्यांनीं तह घडवून आणला (खरे ६, २३११). परंतु तो अल्पकाळ टिकला आणि करवीरकरांनीं परत दंगा सुरू केला (खरे ७, २३४६). याचा उपद्रव सावंतांनाच मुख्यतः होई म्हणून ते नेहमीं हैदराच्या आणि करवीरकरांच्या पारिपत्याविषयीं पेशव्यांना लिहीत. त्यास तयारी होत आहे, तुम्हीही तयारींत असावें अशीं उत्तरें येत (ले. ५९, १३५).

याच सुमारास कित्तूरकरांनींदेखील पेशव्यांना त्रास देण्यास प्रारंभ केला. आजरेकरांना कित्तूरकराकडून त्रास होईल-तेव्हां त्यांनीं मदत मागितल्यास आपण त्यांच्या बचावासाठीं जावें असा इषारा घोरपडयांनीं सावंतांना दिला आहे (ले. १३४). त्याप्रमाणें आजऱ्याच्या सरदेसायानें लिहिलें की, कित्तूरकरांनीं खानापूर प्रांत घेतला आहे आणि आजऱ्यापर्यंत येईलसें वाटतें (इ. १७७८). बेळगांव हें पेशव्यांचें ठाणें अद्याप पडलें नव्हतें आणि शहापूर हें पटवर्धनांचें ठाणें बल धरून आहे, तें बेळगांवच्या जोरामुळेंच होय असें म्हटलें आहे (ले. ५८). हैदरानें मनोळी व सोंडूर हीं पेशव्यांचीं ठाणीं घेतलीं आणि आपली कांहीं फौज बदामीस ठेवली असा उल्लेख येथें आहे.

इ. १७७९ मध्यें सखाराम बापूस कैद करण्यांत आल्यामुळें कारभारीपण केवळ नानाकडेच आलें. हैदराचा बंदोबस्त करण्यासाठीं म्हणून त्यानें परशुरामभाऊंची नेमणूक केली. त्यांनीं एक बदामी सोडून पेशव्यांचीं बाकीचीं सर्व ठाणीं परत घेतलीं. (खरे ७।२५०१; विल्क्स १।४०२)

कित्तूरकर देसाई १७७९ च्या सुमारास चंदगड येथें आल्यावर त्यांना यशवंत विठ्ठल व होनाजी हे दोन वाडीकर सावंतांचे भाऊबंद मिळाल्यामुळें खेम सावंतानें त्यांचें पारिपत्य करणें आवश्यक होतें. त्यांचें पारिपत्य होत नाहीं ही गोष्ट उचित नाहीं, तेव्हां त्यांचें चांगलें पारिपत्य करून कित्तूरकर आणि हैदरखान यांनीं घेतलेला सरकारचा मुलूख काबीज करणें, पूर्वी सरकारची बहुत कामें करीत होता, पण आतां हयगय होते अशी तक्रार करून ' ज्यांत सरकार काम येथास्थीत तें करालच' अशी उमेद व्यक्त केली आहे (ले. ६४,१२६). हीं पत्रें खास प्रधानांचीं आहेत.

करवीरकर आणि कित्तूरकर यांचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी परशुरामभाऊवरच आली. गोकाकचें ठाणें बळकावून कित्तूरकर उपद्रव देत होता. भाऊनें १७८० मध्यें दोघांचाहि बंदोबस्त केला (खरे ७।२५४०, २५४४).

यानंतर या संबंधांत जीं पत्रें मिळतात तीं इ. १७८५,८६ या सालांतील होत.

अर्थात् या कालापर्यंत म्हैसूरकराकडून सावंतांना कांहीं उपद्रव न झाल्यामुळें कांहीं पत्रें नसणें स्वाभाविकच होतें. मराठ्यांनीं १७८० सालीं हैदरशीं तह केला (Mysore Gazetteer २।२५१५; विल्क्स ११४१९) आणि मलप्रभा व तुंगभद्रा मधील जो मुलूख हैदरानें घेतला होता तो त्याचेकडेच राहूं दिला (खरे ७।२५४९). पुढें १७८२ मध्यें हैदरचा मृत्यु झाला आणि १७८३ सालीं सालबाईच्या तहावर सह्या झाल्यानंतर हैदरअलीचा मुलगा टिपू याचा निजामअलीच्या साहाय्यानें पराभव करून दिलेला सर्व मुलूख परत घेण्याचा घाट नानानें घातला आणि त्यासाठीं यादगीर येथें निजामाची भेट घेतली (खरे ८।२७९०). या संबंधाचा उल्लेख खेम सावंताला नाना फडणीसानें लिहिलेल्या पत्रांत आढळतो. या भेटींतच टिपूच्या पारिपत्याची मसलत शिजली (ले. ७६).

इ.१७८०च्या करारान्वयें हैदराकडे गेलेल्या मुलुखांत नरगुंद आणि कित्तूर हीं दोन संस्थानें होतीं (ले ७३). हीं दोन्ही संस्थानें काबीज करण्याच्या हेतूनें टिपूनें प्रथम इ. १७८५ सालीं नरगुंद वेढलें, आणि तोरगलकर शिंदे, कित्तूरकर देसाई व करवीरकर यांना खंडणीविषयीं तंबी देण्यास प्रारंभ केला. हैदराचें अनुकरण करून टिपूनें देखील अशा रीतीनें कर्नाटकांत दंगा चालू केला. सावंतांना लिहिलेल्या एका पूर्वीच्या पत्रांत, जिवाजी गोपाळ आणि गणेश विश्वनाथ बेहरे यांना टिपूचे फौजेवर रवाना केलें आहे, तुम्हींही त्यांना सामील व्हावें असें पेशव्यांनीं लिहिलें होतें. परंतु सावंत या वेळीं घरच्या अडचणींत सापडले होते. कारण करवीरकरांनीं वाडी प्रांतांतील सावंतांचें एक गांव मारून उपद्रव देण्यास प्रारंभ केला होता. तेव्हां ही आपली अडचण दूर केल्यास आपण सरकारचाकरीस सिद्ध आहों असें सावंतांनीं कळविलें. प्रधानांनीं करवीरकरांचा शह दूर करविला तरी अद्याप जमावानिशीं तुम्हीं सामील झाला नाहींत तरी त्वरित व्हावें अशी सूचना सरकारी हुजऱ्यांच्या बरोबर सावंतांना पाठविली (ले. १४१).

करवीरकर आणि सावंत यांचे परस्पर संबंध सलोख्याचे नव्हते. त्यांचे वारंवार तंटे होत. हे झगडे पेशव्यांना मिटवावे लागत. १७७७ सालच्या एका पत्रांत (ले. ७८) सवाई माधवरावांनीं सावंतांना खास पत्र लिहून करवीर प्रांतांत उपद्रव न करण्याविषयीं ताकीद केली होती व जे तुमचे लढे असतील ते माहितगाराकडून आपल्याकडे सांगून पाठविण्याविषयीं लिहिलें होतें. पुढें १७८२ च्या सुमारास त्यांची दिलजमाई झाली असावी. कारण महादजी शिंद्याकडून आतां करवीरकरांपासून तुम्हांस त्रास होणार नाहीं असें आश्वासन सावंतांना मिळालें (ले. १४२, कछवइसा भाग ३।४, पृ. ७७).

कुडाळचे सावंत हे या सुमारास बरेच प्रबळ असावेत. कारण ज्याप्रमाणें पेशव्यांना त्यांच्या मदतीची आवश्यकता होती त्याप्रमाणें इतर सरदेसायांनादेखील होती. आजऱ्याच्या देसायाप्रमाणें (ले. ५८) खानापूरच्या सरदेसायानेंहि त्यांचें साहाय्य मागितलें आहे (ले. १४०). आपणांस दारूगोळा आणि इतर मदतीची किती

आवश्यकता आहे हें पटविण्याकरितां तो लिहितो, "लक्ष पत्राचे जागा हे पत्र समजावे, येस द्यावे, आम्ही आपले असो" (ले. ७२).

१७८५ डिसेंबरमध्यें खेम सावंतानें खंडेराव सरलश्करांना टिपूच्या दंग्या. संबंधीचें एक पत्र लिहिलें आहे. १७८५ च्या आगस्टमध्यें टिपूनें नरगुंद घेतलें (खरे ८।२८७०) आणि तो कित्तूराकडे वळला. कित्तूरकर देसायानें तत्काल शरणागती पत्करली. परंतु टिपूनें त्याला त्याच्या परिवारासह कैदेंत टाकलें आणि पेशवाई मुलुखांतील इतर गांवें संपगांव, खानापूर, जांबोटी इ. घेतलीं (खरे ८, पृ. ३९५९). खेम सावंताच्या पत्रांतहि हे सर्व उल्लेख आढळतात. नरगुंद घेतलें, कित्तूरकरास आश्वासन दिलें होतें, परंतु देसाई व त्यांचे कारभारी यांना धरून तें ठाणें घेतलें, टिपूची फौज धारवाडच्या आसपास आहे, जांबोटी चार दिवस लढलीं इत्यादि उल्लेख यांत आहेत. टिपूच्या दंग्यामुळें लोकांचे झालेले हाल, त्यांचा सुटलेला धीर, हिंदुधर्मावर आलेलें संकट, यवनाची सर्वत्र झालेली प्रबलता इत्यादि सांगून पंतप्रधान काय करीत आहेत असा सवाल विचारला आहे. हा सर्व मजकूर राजश्री बालाजीपंत नाना व राजश्री हरीपंततात्या यास कलावा. परभारेंहि त्यास वातमी आहेच. परंतु इकडून लेहून वचेंवर पत्रें पाठवीतच आहों त्यास उत्तर कांहींच कलत नाहीं हाली यवनाची वर्तणूक म्हणावी तर सर्वत्र ठाऊकच आहे हिंदूधर्मास येकछत्र राजश्री पंतप्रधान, ईश्वरेंहि त्यांस सर्व प्रकारें सामर्थ दिलें आहे, कासीरामेश्वरापावेतों एकछत्र त्यांणीं केलें, तूर्त यवनाची प्रबलता जाहाली, यांत हिंदू धर्माचा लोप व्हावा असा समई प्राप्त जाहाला, याचा विचार राजश्री पंतप्रधान यांसी करावा व तुम्ही चार मानकरी मातबर आहां त्याही त्यांस समजोन सांगोन यवनाचे परिमार्जन होई ती मसलत घ्यावी हेच तुम्हा सर्वत्रांस उचित आहे. केवळ कुडाळ धोक्यांत आहे म्हणून आपण लिहीत आहों असें समजू नये असेंहि येथें नमूद केलें आहे. शेवटीं सावंत लिहितात, राजश्री पंतप्रधान यांसी आपले तालुकेचा बंदोबस्त न करितां हिंदूधर्माचा लोप होऊन यवनास शेर करावें हें त्यांचें चिंती असलेस मग इतरांस भगवंत आहे जें घडेल ते पाहातच असतील येस्यास ज्यारही अर्थ तुम्हीं सर्व मिलोन आजपावेतों लौकिकास पाऊन इभ्रत मिळविली त्याची वृद्धी होय तो विचार करावा (ले. ७३).

सडें हें ठाणें मराठ्यांच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचें होतें. १७८५ मध्यें टिपूनें हें हस्तगत केलें (ले. १३७, १३९). या सुमारास पेशवे आणि होळकर यांच्या मुख्य फौजा बदामीकडे होत्या (ले. १३९). पण श्रीमंतांच्या आज्ञेवरून होळकरांच्या कांहीं फौजा कोल्हापुराकडे गेल्या होत्या. यावरून टिपूनें सर्वत्र धुमाकूळ घालण्यास प्रारंभ केला होता असें ठरतें. सड्याचें ठाणें सावंतवाडी संस्थानच्या पूर्व सरहद्दीवर होतें (ले. ७५). सड्यावर हल्ला झाला तेव्हां सावंतांची त्या देसायाला मदत मिळाली नसावी (ले. ७५ खरे ८।२८८८,२८८९). नाना लिहितात सडे घेतले हा संस्थानचे सरहदेस शह प्राप्त जाहाला मोठे संकट प्राप्त जाहाले त्यास आपलेंकडून साहित्य होऊन बच्याव (होये

ऐसे*) केले पाहिजे. याच पत्रांत सड्याच्या बंदोबस्तासाठीं जिवाजी गोपाळ याची रवानगी केली आहे, तेव्हां तुम्ही त्यांच्या समवेत येक विचारें होऊन घाटाचा वगैरे बंदोबस्त राखोन मजबुतीनें राहावें असा आदेश दिला आहे. निजामाची आणि आपली भेट झाली ही बातमी देऊन टिपूचें पारपत्य लौकरच होईल अशी नानांनीं येथें आशा व्यक्त केली आहे. शहापूर बेळगांवच्या रक्षणार्थ तुकोजी होळकर याची नेमणूक झाली होती (ले. ७६,१३८).

सड्याचा धोका फार मोठा होता. व्यंकटराव घोरपडे सावंताला लिहितो टिपूखान याजकडील फौज येऊन सध्या तूर्त सड्यास मोर्चे दिल्हे आहेत, पुढें खाली उतरावे हीं मसलत त्याची आहे येविसीच्या मसलतीची तरतूद आपण योजिलीच असेल. पंतप्रधानांकडून गोपाळराव यांची नेमणूक या संदर्भात झाली होती. घोरपडे सावंताला लिहितो कीं आपण गोपाळरावांशीं सहकार्य केल्यास आपलीं पुण्याकडील सर्व लहान-मोठीं कामें सहज घडून येतील. तेव्हां बाजी मारून येश घ्यावे यातच सर्व अर्थ आहे असा उपदेशहि यात केला आहे (ले. ७४). टिपूनें सडें घेतल्यावर आसऱ्यासाठीं म्हणून फिरंग्यांच्या मुलखांतील केरी गांवीं सडेकर देसाई गेला होता. पण आतां त्यानें तें ठाणें परत जिंकून घेतलें (ले. ७१, खरे ८।३९००) व तो मुलांमाणसांसुद्धा तेथें राहण्यास आला (इ. स. १७८६ जानेवारी). परंतु हें ठिकाण त्याकडे अल्पकाळच राहिलें असावें (खरे ८ पृ.३९६०).

१७८५ मध्यें पेशव्यांच्या फौजा बदामीस परीघ घालोन बसल्या होत्या. तुंगभद्रेच्या दक्षिणतीरीं मोठ्या जमावानिशीं टिपू आल्यामुळें सावनूरचा नबाब घाबरला व त्यानें श्रीमंतास सांगून पाठविलें कीं, टिपूमिया याजकडील दहा पंधरा हजार लोक व च्यार हजार स्वार सावनुरास आले आहेत व ते आपणांस धरून नेणार आहेत. तेव्हां त्याच्या रक्षणार्थ पेशव्यांनीं पन्नास हजार फौज पाठविली आणि पुढें बदामीहि घेतली (खरे ८, पृ. ४०१२). तेव्हां टिपूची फौज सोंधे बिदनूरची झाडी धरून राहिली (ले. ७१).

१०७, १०८

या खंडांतील आणखी कांहीं पत्रांकडे वाचकांचें लक्ष मी वेधूं इच्छितों. शिवछत्रपतींनीं आदिलशाही, मुघल, कुत्बशाही इत्यादि मोठ्या आणि पोर्तुगीज, सिद्दी, इंग्रज इत्यादि छोट्या अशा सर्व सत्तांच्या विरोधास न जुमानतां येथील बहुजनसमाजाचें स्वतंत्र राज्य स्थापन करून त्यांच्या अनिर्बंध प्रगतीचा मार्ग मोकळा करून दिला. त्याचा अनुभवहि स्वराज्यांतील लोक घेऊं लागले होते. वस्तुस्थिति अशी असतां अजूनहि कांहीं लोक असे होते कीं, त्यांना या स्वराज्याचें प्रेम न वाटतां परकी मुघली राज्याबद्दल विलक्षण आदर व आपुलकी वाटत होती. मुघली सेवकांनीं स्वतःच्या सत्तेचें

गुणगान या संग्रहांतील पहिल्या कांहीं पत्रांत केलें आहे त्याचा अर्थ समजूं शकतो. पण तसलेंच गुणगान व मराठी सत्तेविषयीं क्षुद्र विचार मूलवासींनीं प्रकट करावे याचें दुःख होतें (क्र. ८, १०७,१०८). शिवछत्रपतीपासून ते पेशवाईअखेरपर्यंत या महाराष्ट्रांत अशीं कांहीं घराणीं होऊन गेलीं कीं, त्यांना मराठी राज्याविषयीं फारशी आपुलकी वाटली नाहीं. प्रथम आदिलशाही, नंतर मुघल व पुढें निजाम अशा तऱ्हेनें त्यांच्या निष्ठेनें आपुलकीनें प्रवास केला.

११२-१३२

एकसंबें–देसायांचे कागदही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. त्यांतील शिवपूर्वकालीन कागद नकल असले तरी त्या नकलाही समकालीन आहेत. पण त्यांजकडे खास शिवशाहीचे कागद नाहींत. त्यांचे कागद राजाराम–ताराबाई–शाहू कालीन असून त्यांवरून संभाजी नरसोजी देसाई यानें सामान्यतः मुघलांविरुद्ध मराठ्यांस चांगलें साह्य केलें असें दिसतें. शिवाय त्याच्या हिश्शाचें वतनी कामही तो उत्तम प्रकारें करीत होता. उलट त्याचा तत्कालीन भाऊबंद भिकाजी परसोजी मेल्यावर त्याची बायको सावित्री उन्मार्गवर्ती बनून व निष्ठा सोडून वतनाचा कारभार मनमाने तसा करूं लागली. तेव्हां सर्व वतन दोन हजार रुपये शेरणी घेऊन संभाजीच्या स्वाधीन केलें गेलें. पुढें त्यास बहुधा ताराबाई-कडून सेनासहस्त्रीही मिळाली. शाहू मुघलांच्या कैदेंतून सुटून आल्यावर संभाजी नरसोजी जाऊन शाहूस भेटला. शाहूस त्याची निष्ठा मान्य होऊन त्यानें संभाजीस वतनाविषयीं अभयपत्रहि दिलें. ही गोष्ट श. १६३० ज्येष्ठ वद्य २ = इ. १७०८ मे २५ ची. पण पुढें काय झालें कुणास ठाऊक त्यास पावनगडावर कैदेंत पडावें लागलें. हें जितक्या त्वरेनें झालें तितक्याच त्वरेनें त्याजकडून दोन हजार रुपये दंड घेऊन त्यास सोडूनहि दिलें व त्याची वतनावर पुनः स्थापना केली. हें सारें एक वर्षाच्या अवधींत घडलें. शाहू सुटून आल्यावर मराठी राज्यांतील अनेक एकनिष्ठ सेवक, वतनदार शाहूचा पक्ष धरावा कीं ताराबाईचा याविषयीं किंकर्तव्यतामूढ बनले. तसा हाहि बनला असावा. यामुळें त्यास कैदेंत पडावें लागलें. पण लवकरच परिस्थितीचें आकलन झाल्यावर त्याची सुटका होऊन वतनावर स्थापनाहि झाली. मात्र त्यांस आतां त्यांच्या या वर्तनांतील फेरबदलाबद्दल दोन हजार रुपये दंड द्यावा लागला. सत्तांतर होत असतां पूर्वी वतन-दारांच्या पुढें नेहमींच अशासारखा प्रश्न उभा राही.

सूची

(आकडे लेखांकांचे)

५६६

५५ शिवचरित्रसाहित्य, खंड ८ १—५०
*५५ अ, शिवचरित्रसाहित्य, खंड ५ ३—५०
५६ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड४ २—०
५७ ऐ. संकीर्ण वाङ्मय साहित्य,खंड१ १—५०
५८ शिवकालीन दंडनीति (वा.सि. बेंद्रे) ३—०
५९ पुणेंनगरसंशोधनवृत्त,खं. २(चिं.ग.कर्वे)१-५०
६० ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड१ १-५०
६१ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य,खंड५ १-५०
६२ शिवचरित्रसाहित्य, खंड ९ (शां. वि. आवळसकर) १—५०
६३ हिंगणे दप्तर, खंड १ (ग. ह. खरे) ३—०
६४ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य,खंड६ १-५०
६५ ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड३ २—०
६६ पुणें नगरसंशोधनवृत्त खंड ३ (चिं. ग. कर्वे) १—५०
६७ महाराष्ट्रांतील कांहीं ताम्रपट व शिलालेख (डॉ. मो. गं. दीक्षित) ३—०
६८ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड७ २—०
६९ ऐतिहासिक संकीर्ण निबंध,खंड २ ३—०
७० हिंगणे दप्तर, खंड २ (ग. ह. खरे) ३—०
७१ आंग्रेकालीन पत्रव्यवहार (शां. वि. आवळसकर) ३—०
७२ ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड४ २-५०
७३ पेठे दप्तर, भाग १ (वि.सि.चितळे) ३-०
७४ Explorations at Karad 5—0
७५ संभाजीकालीन पत्रसारसंग्रह व शकावली (शं. ना. जोशी) ३—०
*७६ दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें, खंड ३ (ग. ह. खरे) ३—०
७७ ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ४ (ग. ह. खरे) ३—०
७८ पेठे दप्तर, भाग २ (वि.सि.चितळे) ३—०
७९ पेशवेकालीन सामाजिक व आर्थिक पत्रव्यवहार (रा. वि. ओतुरकर) ३—०
८० इतिहासकर्ते मराठे (ग. ह. खरे) २—०
८१ दाभाडे दप्तर, खंड१ (शं.ना.जोशी) ३—०
८२ दक्षिणेच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें, खं. ४ (डॉ.मो. गं. दीक्षित) ३—०
८३ पुणें नगरसंशोधनवृत्त, खंड ४ (चिं. ग. कर्वे) २—०
८४ ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड ५ ३—०
८५ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड ८ (द. वा. पोतदार) ३—०
८६ शिवचरित्रसाहित्य, खंड १० (शां. वि. आवळसकर) ३—०
८७ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड९ ३—० (शं. ना. जोशी)
८८ ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड ६ ५—०
८९ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड१० ५—० (शां. वि. आवळसकर)
९० शिवचरित्रसाहित्य खंड ११ (ग. ह. खरे) ५—०
९१ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड ११ (य. न. केळकर) ५—०
९२ भारत–इतिहास–संशोधक–मण्डलस्थ–हस्तलिखित–ग्रन्थानुक्रमणिका (ग. ह. खरे) १५—०
९३ ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ५ (ग ह. खरे) ६—०
९४ शिवचरित्रसाहित्य, खंड १२ (ग. ह. खरे) ५—०
९५ शिवचरित्रसाहित्य खंड १३ (ग. ह. खरे) ६—०

मंडळ त्रैमासिक पुस्तकें १ ते ४२ प्रत्येकीं ५ रु.

सूचना :—स्वीय मालेंतील पुस्तकांच्या खरेदीवर खालीं दिल्याप्रमाणें सवलत मिळेल; २५-५० रु = १० टक्के; ५१-१०० रु. = १२॥ टक्के; १०१ रु. व पुढें = १५ टक्के.

याशिवाय सर्व प्रकारचीं ऐतिहासिक पुस्तकें मिळवून देण्याची खटपट केली जाईल.